18-03-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

SGJ/ D/ ST/ 10:00

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**तालिका सभापती श्री. मोहन जोशी** : आजचा शिक्षणाच्या संदर्भातील प्रस्ताव माननीय मंत्रीमहोदयांच्या उत्तरासह एक तासात पूर्ण करावयाचा असल्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी सहकार्य करावे अशी विनंती आहे.

**पृ.शी.** : वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी परीक्षेच्या कामांवर घातलेला बहिष्कार

**मु.शी. :**वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी परीक्षेच्या कामांवर घातलेला बहिष्कार या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड.आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री नागो गाणार, भगवान साळुंखे, कपिल पाटील वि..प.स.यांचा प्रस्ताव.

श्री.चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या संघटनांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी परिक्षेच्या कामावर बहिष्कार टाकला असणे, वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना ५ वा वेतन आयोग दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून लागू करणे, विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिल्याप्रमाणे राज्य शासनाने दिनांक १ जानेवारी, २००६ ते ३१ मार्च, २०१० या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगाची ८० टक्के थकबाकी न देणे, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना महागाई भत्ता न देणे, शिक्षकेत्तरांच्या आकृतीबंधाचा विषय गेली १३ वर्षे प्रलंबित असणे, कायम विना अनुदानित शाळांचा शब्द काढून टाकताना उच्च माध्यमिक शाळांना जाणीवपूर्वक वगळणे, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ च्या मुल्यांकनाच्या निकषामध्ये बदल करण्याचे मान्य करुनही कारवाई न होणे, दिनांक २८ नोव्हेंबर, २००६ च्या विना अनुदानित सेवा कालावधी वरिष्ठ निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याच्या निर्णयातून प्राथमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व सर्व शिक्षकेत्तरांना वगळणे, राज्य पुरस्कार प्राप्त



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ......

शिक्षकांना देय वेतनवाढी ४ वर्षापासून बंद करणे, शिक्षकेत्तरांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू न करणे, वेतनेत्तर अनुदानाची मागील ८ वर्षांची थकबाकी नाकारणे, पटपडताळणीच्या अनुषंगाने बंद पडणाऱ्या शाळांमधील शिक्षक-शिक्षकेत्तरांना संरक्षण व समायोजन नाकारणे, गुणवत्तेच्या नावाखाली सेवेत असलेल्या इयत्ता ६ वी ते ८ वी च्या शिक्षकांसाठी पदवी प्राप्त करण्याची सक्ती करणे, विना अनुदानित शाळांचे मूल्यांकनाचे जाचक निकष शिथिल करण्याचे आश्वासन देऊनही शासनाने कारवाई न करणे, विना अनुदानित शाळेत सेवेत असलेले सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण न देणे, परिणामी विना अनुदानित शाळेच्या शिक्षकांनी आत्मदहनाचा इशारा देणे, वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार जाहीर केल्यामुळे राज्यातील विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये शासनाविषयी नाराजी निर्माण होणे, विद्यार्थी हिताचा विचार न करता शासनाने या विषयाकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थी व पालक यांचेवर प्रचंड ताण व तणाव निर्माण होणे, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या व विना अनुदानित शाळेमधील शिक्षकांच्या उक्त मागण्यांच्याबाबतीत तोडगा काढण्यास शासनास आलेले अपयश, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची उपाययोजना व याबाबतची शासनाची भूमिका विचारात घेण्यात यावी. "

सभापती महोदय, जवळ जवळ पूर्व प्राथमिक पासून उच्च शिक्षणापर्यंत संपूर्ण शिक्षण क्षेत्र आज रस्त्यावर उतरले आहे. या सर्व प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी नियम २६० अन्वये चर्चा करण्यासाठी शासनाने या ठिकाणी आम्हाला संधी दिलेली आहे. परंतु या चर्चेमध्ये सर्व समस्या समोर आवश्यक असून त्यासंदर्भात मंत्रीमहोदयांनी सविस्तर उत्तर देण्याची आवश्यकता आहे. उच्च माध्यमिकच्या संदर्भातील माहिती माननीय मंत्री महोदया प्रा. फौजिया खान यांनी द्यावी व वरिष्ठ महाविद्यालयाच्या संदर्भातील माहिती माननीय मंत्रीमहोदय श्री.डी.पी. सावंत साहेबांनी देण्याची आवश्यकता आहे.या विषयाची व्याप्ती बघता एक तासामध्ये ही चर्चा पूर्ण होणार नाही त्यामुळे चर्चेला वेळ वाढवून द्यावा अशी मी सुरुवातीलाच विनंती करतो.

सभापती महोदय, या चर्चेला कोठून सुरुवात करावी याबाबत माझ्या मनात संभ्रम आहे. महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक सेवा समितीने आज पासून आझाद मैदानावर उपोषण करण्यास

..३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ......

सुरुवात केलेली आहे. त्यामुळे या चर्चेला प्राथमिक शाळेच्या शिक्षकांच्या मागण्यांपासून सुरुवात करु की, कायम विना अनुदानित शिक्षकांनी मागच्या आठवडयात आत्मदहनाचा म्हणजे रॉकेल ओतून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यापासून सुरुवात करु असा संभ्रम पडलेला आहे.

सभापती महोदय, उच्च माध्यमिकच्या शाळांमधून कायम शब्द काढला नाही त्यापासून या चर्चेला सुरुवात करु असा संभ्रम मला पडलेला आहे. मागील अधिवेशनात उच्च माध्यमिक प्राध्यापकांनी भीक मांगो अधिवेशन केले होते. आज प्राध्यापकांना भीक मागण्याची वेळ आलेली आहे त्या विषयापासून सुरुवात करु असा संभ्रम पडलेला आहे.

सभापती महोदय,आजच्या सर्व वर्तमानपत्रात बातमी छापून आलेली आहे की, सगळया विद्यापीठातील परीक्षेच्या संदर्भात त्या त्या विद्यापीठांनी बैठक घेऊन परीक्षा पुढे ढकलल्याचा निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, आम्ही ज्यावेळेस कॉलेजमध्ये शिक्षण घेत होतो तेव्हा सर्व विद्यापीठांच्या परीक्षा जून, जुलै पर्यंत चालत असत व त्यानंतर रिझल्ट लावले जात असत. महाराष्ट्रातील विद्यार्थी देशातील अन्य विद्यापीठाच्या पोस्ट ग्रॅज्यूएशनच्या कोर्समध्ये प्रवेश घेऊ शकत नव्हते. खूप मेहनतीने यासंदर्भातील टाईमटेबल रुळावर आले होते परंतु या वर्षी वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मागण्या सरकारने वेळेवर पूर्ण केलेल्या नसल्यामुळे त्यांनी परीक्षेवर बहिष्कार टाकलेला आहे. आजच्या वर्तमानपत्रात सर्व विद्यापीठांनी आपल्या परीक्षा बेमुदत पुढे ढकललेल्या आहेत अशी माहिती छापून आलली आहे.

सभापती महोदय, आजच्या चर्चेला मी उच्च महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मागण्यांपासून सुरुवात करीत आहे. एखादा विषय आपण एतक्या दिवस का प्रलंबित ठेवता ?प्राध्यापकांनी शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून स्वत:च्या पायावर दुसऱ्यांना उभे केलेले आहे. परंतु असे असतांना त्या शिक्षकांना सरकारकडे आज भीक मागावी लागते, वर्षानुवर्षे मागण्या मांडण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागते, बेमुदत संपावर बसावे लागते हे शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्यांना बरे वाटत नाही.

सभापती महोदय,उच्च माध्यमिक मधील कायम विनाअनुदानित मधील "कायम"शब्द काढावा यासाठी उच्च माध्यमिक मधील प्राध्यापकांनी आतापर्यंत ५० पेक्षाही जास्त प्रमाणात आंदोलने

..४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील ......

केलेली आहेत. त्यामुळे मला आपल्या माध्यमातून सरकारला विचारावयाचे आहे की, अशा प्रकारे दुसऱ्यांना स्वत:च्या पायावर उभे करणाऱ्या शिक्षक, प्राध्यापकांना सरकारकडे वारंवार भीक मागावी लागत आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

तोच वरिष्ठ महाविद्यालयाचा विषय आहे.

1500 कोटी रूपयाचा सहाव्या वेतन आयोगाचा फरक सरकार देणे लागते. हा फरक सरकारने द्यायचा आहे काय ? महाराष्ट्र सरकारला 80 टक्के रक्कम युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशन परत देणार आहे. मात्र आधी वरिष्ठ महाविद्यालायातील प्राध्यापकांना सगळे पैसे महाराष्ट्र सरकारने दिले पाहिजेत. ते पैसे दिल्याची रिसिट राज्य शासनाने सादर करावी असे युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनचे म्हणणे आहे. त्यानंतरच आपणास 1500 कोटी पैकी 80 टक्के रक्कम मिळणार आहे. मात्र, हे पैसे देण्यास महाराष्ट्र शासन तयार नाही. याबाबत अनेक प्रकारच्या चर्चा सुरू आहेत. आता राज्य सरकार फक्त 500 कोटी रूपये देण्यास तयार झाले आहे. राज्यातील दुष्काळामुळे शासनाला 1500 कोटी रूपये देणे शक्य नसेल तर शासनाने एक शिष्टमंडळ दिल्लीला घेऊन जावे व युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनला आपली भूमिका समजावून सांगावी. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीमुळे महाराष्ट्र शासनाला 1500 कोटी रूपये एकाच वेळी देता येणार नाही हे त्यांना समजावून सांगावे. त्यामुळे आम्ही 500 कोटी रूपये देऊ. त्याची रिसिट दिल्यानंतर तेवढी रक्कम अदा करावी. असा काहीना काही तरी मार्ग काढला पाहिजे. पण तसे न करता प्राध्यापकांच्या संघटनेला चर्चेला न बोलावण्याची भूमिका शासनाने घेतली आहे. आजच्या वर्तमानपत्रात माननीय मुख्यमंत्री प्राध्यापकांच्या संघटनेला चर्चेसाठी बोलाविणार आहेत अशा प्रकारची बातमी आहे. तेव्हा मी आपल्या मार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, उच्च महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या संघटनेला चर्चेला बोलावून त्यांच्या या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष देऊन तो सोडवावा. अजूनही वेळ गेलेली नाही. जर जास्त वेळ गेला तर महाराष्ट्रातील विद्यापीठातील परीक्षा बेमुदत पुढे ढकलाव्या लागतील.

सभापती महोदय, शाळांच्या संबंधातील एक महत्त्वाचा मुद्दा आता पुन्हा ऐरणीवर आला आहे. जेव्हा केव्हा शिक्षक सेवक नावाचा प्रकार सुरू झाला तेव्हा त्यास सर्व शिक्षक संघटनांनी विरोध केला. शिक्षक सेवक म्हणजे ॲप्रेंटीसशिप आहे. शिक्षक हा डी.एड., बी.एड.असला पाहिजे असा आपण आग्रह धरता. मग त्याची नियुक्ती शिक्षक सेवक कशी काय करता ? दहावी नापास

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

झालेला आयटीआय झालेला उमेदवार असतो त्याला प्रॅक्टीकल नॉलेज मिळावे यासाठी कारखान्यांमध्ये ॲप्रेंटीसशिप सुरू झाली. पण ती पद्धती देखील आता हळूहळू संपत आली आहे. आता खूप चांगले शिक्षण आयटीआय मध्ये मिळते. पूर्वी सारखा दहावी नापास झालेला उमेदवार आता आयटीआयमध्ये जात नाही. आपण शिक्षण क्षेत्रात शिक्षक सेवक या नावाने जी ॲप्रेंटीसशिप सुरू केली आहे त्यामागचे लॉजिक काय आहे ? ही जर ॲप्रेंटीसशिप असेल तर राज्यातील सर्व सरकारी कार्यालयात ती सुरू करावी. आरोग्य विभागात सुरू करावी, मंत्रालयीन पातळीवर सुरू करावी. माननीय मंत्र्यांसाठी देखील तीन वर्षांची ॲप्रेंटीसशिप सुरू करावी. माननीय मंत्र्यांची तीन वर्षे होता होता ते जातील. त्यामुळे शिक्षक सेवक ही संकल्पनाच चुकीची आहे.

सरकारकडे पुरेसा पगार देण्यासाठी पैसा नाही. शासनाने ही जी संकल्पना सुरू केली आहे त्यास संपूर्ण शिक्षकांचा विरोध आहे. त्यामुळे ती रद्द झाली पाहिजे. मधल्या काळामध्ये त्याचे मानधन वाढवावे अशी चर्चा झाली. त्यानुसार शासनाने मानधन वाढविले आहे. शिक्षक सेवक या तीन वर्षाच्या कालावधीत एखादी महिला शिक्षिका प्रसूतीच्या रजेवर गेली तर तिला सहा महिन्याची रजा मिळते. पण ती रजा या तीन वर्षाच्या कालावधीत धरली जात नाही. त्यामुळे तिचा सहा महिन्याचा कालावधी वाढतो. महिला शिक्षिकांची साधी मागणी आहे की, प्रसूती काळातील सहा महिने रजेचा कालावधी वाढवू नका. पण ही साधी मागणी देखील शासन मान्य करायला तयार नाही.

माध्यमिक आणि प्राथमिक शाळेतील आपण कायम शब्द काढला आहे. जुलै 2008 मध्ये मी सभागृहाचा सदस्य झालो. त्यावेळी हा विषय मोठ्या प्रमाणावर चर्चेला आला होता व डिसेंबर 2008 च्या अधिवेशनामध्ये हा शब्द वगळण्यात आला. त्याला चार वर्षे उलटली तरी माध्यमिक व प्राथमिक शाळेतील शिक्षकांना अजून पर्यंत शाळांचे व शिक्षकांचे वैयक्तिक मूल्यांकन करून अनुदान देण्यास सुरूवात केलेली नाही. हे अनुदान देण्यासाठी शासनाने समिती स्थापन केली आहे. या समितीचे निकष कडक आहेत. 2200 प्राथमिक शाळा आणि 2000 माध्यमिक शाळा अशा एकूण 4200 शाळांपैकी केवळ 54 शाळा या निकषामध्ये बसल्या आहेत. त्याचा सरकारने विचार केला पाहिजे. शासन आता असे म्हणते की, रिझर्व्हेशन फॉलो केले नाही. कायम विनाअनुदान शाळेतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

शिक्षकांची पदे शासनाने मान्य केली आहेत, त्यावेळी एज्युकेशन ऑफिसरने ती मान्य का केली आहेत, त्यावेळीच त्यांनी अडवायला पाहिजे होते.

आता गावांमध्ये शाळा गेल्या आहेत त्या शाळांना अनुदान दिले पाहिजे. सरकारी पैसा खर्च करून सरकार शाळा देऊ शकले नसते. म्हणजे दहा-बारा वर्षे या सगळया शिक्षकांकडून रूपये 700, रूपये 800, रूपये 1000 पगार देऊन वेठबिगारीने काम करून घेतले आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील.....

शिक्षणक्षेत्रातील गरज पूर्ण करुन घेतली आणि आता त्यांच्या बाबतीत 10-12 वर्षानंतर नियम लागू करणे योग्य नाही. हा विषय खूप महत्वाचा आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्र आज अस्वस्थ आहे. त्यासाठी आपण मला बोलण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, या संदर्भात करण्यात आलेले नियम अतिशय कडक आहेत. एक नियम असा आहे की, ग्रामीण भागातील शाळांमध्ये 100 विद्यार्थ्यांमध्ये 60 मुली असल्या पाहिजेत. ग्रामीण भागामध्ये पुरुष आणि स्त्रियांचे प्रमाण व्यस्त होत चालले आहे हे आपणास माहीत आहे. त्याच प्रमाणे ग्रामीण भागातील मुली सातत्याने शाळेत जात नाहीत. शासनाने नमूद केले आहे की, शाळांना अनुदान पाहिजे असेल तर शाळेमध्ये 60 टक्के मुली असल्या पाहिजेत, हे ग्रामीण भागात शक्य आहे काय ?

सभापती महोदय, मागील अधिवेशनात या संदर्भातील नियम शिथिल करण्यासाठी आम्ही पदवीधर शिक्षक आमदारांनी आग्रह धरला. तेव्हा आम्हाला सांगण्यात आले की, हे नियम शिथिल करण्यात येतील. परंतु आजपर्यंत हे नियम शिथिल करण्यात आलेले नाही. शासन हे नियम केव्हा शिथिल करणार आहे ? समजा पुढे नियम शिथिल केले तर त्यानंतर सर्व्हे होणार, त्यानंतर प्रती वर्षी 20 टक्के या प्रमाणे पाच वर्षानंतर शिक्षकांना पूर्ण पगार मिळणार आहे. गेली 10-12 वर्षे हे शिक्षक वेठबिगाऱ्यासारखे काम करीत आहेत म्हणून त्यांनी गेल्या वर्षीच्या अधिवेशनात "भीक मांगो" आंदोलन केले होते.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रातील मागण्या ऐरणीवर आल्या आहेत. आज वेतनेतर अनुदान मिळत नसल्यामुळे शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. शाळेमध्ये खडू आणि डस्टर घेण्यासाठी शिक्षकांना कॉन्ट्रीब्युशन काढावे लागत आहे. सन 2005 पासून 2013 पर्यंत म्हणजे गेली आठ वर्षे शासनाने वेतनेतर अनुदान दिलेले नाही. आता शासन सांगत आहे की, दिनांक 1 एप्रिल, 2013 पासून पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनेतर अनुदान देणार आहोत. माझा प्रश्न आहे की, शासन पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनेतर अनुदान का देत आहे, सहाव्या वेतन आयोगा नुसार का देत नाही ? संस्थांनी कर्ज काढून शाळा चालविल्या आहेत. शासनाकडून शाळांच्या इमारतीचे भाडे मिळालेले नाही, विजेची देयके मिळालेली नाहीत. काही संस्थांच्या चार-पाच शाळा आहेत त्यांची





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील.....

थकबाकी एक-एक कोटी पर्यंत गेली आहे. तेव्हा शासनाने त्यांची थकबाकी देताना हा सर्व पैसा शाळांच्या सुविधा पुरविण्यावर खर्च केला पाहिजे असा निकष घालावा. शासनाने असे केले तर शासनाला शाळा कॉलेजमधील पायाभूत सुविधांसाठी पैसे द्यावे लागणार नाहीत. शासनाने संस्थांची थकबाकी देणार नाही असे सांगून संस्थांची हलाखीची परिस्थिती निर्माण करण्याऐवजी संस्थाची थकबाकी दिली पाहिजे. तसेच सहाव्या वेतन आयोगनुसार वेतनेतर अनुदान दिले पाहिजे.

सभापती महोदय, शासनाने या सर्व मागण्यांचा विचार केला नाही तर येत्या जून महिन्यापासून शाळा-कॉलेजेस सुरु होणार नाहीत आणि त्यामुळे समाजामध्ये खूप मोठा असंतोष पसरेल. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन असल्यामुळे ते अधिक काळ चालणार आहे तेव्हा शिक्षकांच्या सर्व मागण्या तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मागण्या माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केल्या नाहीत तर परीक्षा बेमुदत काळापर्यंत पुढे जातील आणि त्याचे परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागतील. तेव्हा शासनाने शिक्षकांच्या मागण्यांकडे लक्ष द्यावे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, ज्या प्रश्नासंबंधी शासनाकडे न्याय मागावयाचा आहे तेवढेच मुद्दे मांडावेत.

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती शिक्षक विभाग ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये शिक्षकांच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्याची मला संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी आपल्या प्रलंबित न्याय्य मागण्यांसाठी परीक्षांवर बहिष्कार टाकला होता. त्यांच्या दोन-तीन मागण्या आहेत. त्यांची पहिली मागणी अशी आहे की, पाचव्या वेतन आयोगातील 80 टक्के रक्कम देण्यात यावी. त्यासाठी त्यांनी चार-पाच वेळा आंदोलने केली. आझाद मैदानावर आंदोलने केली, संचालकांच्या कार्यालयासमोर देखील आंदोलने केली. दोन दिवसांपूर्वी जवळपास 10 हजार प्राध्यापकांनी जेलभरो आंदोलन करुन स्वत:ला अटक करुन घेतली.

सभापती महोदय, 1991 ते 1999 या कालावधीत जे प्राध्यापक नोकरीस लागले त्यांना नेटसेट परीक्षेमधून सूट देण्यात आली.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ ST/ पूर्वी श्री.अजित.... 10:15

श्री.वसंतराव खोटरे....

त्यांना रुजू होण्याच्या दिनांकापासून वेतन निश्चिती हवी आहे. परंतु ती सुध्दा दिली नाही. या बाबत संघटनेची माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा झाली होती. त्या बैठकीला माननीय उच्च शिक्षण मंत्री, उच्च शिक्षण राज्यमंत्री, विभागाचे सचिव आणि संघटनेचे पदाधिकारी सुध्दा उपस्थित होते. त्या बैठकीत माननीय मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला होता की, "मुख्यमंत्री म्हणून मी दिलेला शब्द निश्चितपणे पाळला जाईल." परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी पदाधिकाऱ्यांना दिलेला शब्द उच्च शिक्षण विभागाने पाळला नाही. माझी मागणी आहे की, त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांचा शब्द पाळावा. महोदय, या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने सुध्दा जी.आर. काढला आहे. परंतु त्या आदेशाला आणि जी.आर. ला केराची टोपली दाखविण्यात आली आहे. विभागाने न्यायालयाच्या आदेशाचा सुध्दा विचार केला नाही. या सर्व कारणांमुळेच 35 लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षा लांबणीवर पडल्या आहेत. इतकेच नव्हे तर संपूर्ण विद्यापीठांच्या परीक्षा लांबणीवर पडल्या आहेत. क्वचितच काही विषयांचे प्रॅक्टीकल झाले आहेत. बहुतांश विषयांचे प्रॅक्टीकल पार पडलेले नाही. त्यामुळे सरकारने या बाबीचा विचार करावा आणि ताबडतोब शिक्षकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावा, अशी मी विनंती करतो.

महोदय, दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे सध्या कायम विना अनुदानित कृती समितीचा संप सुरु आहे. त्या समितीने काल माननीय मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवशी पाणी न पिता आंदोलन केले. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. विना अनुदानित कृती समितीचा वर्षानुवर्षे संप सुरु, चर्चा सुरु आहे. महोदय, माध्यमिक शाळांचा 'कायम' शब्द काढून काढताना त्यातून या शाळांना जाणूनबुजून वगळण्यात आले आहे. यामुळे त्यांना विनाकारण वेठीस धरण्यात आले. परिणामी आता त्यांनी आत्मदहनाचा इशारा देऊन सुध्दा त्यांच्या मागण्यांबाबत विचार केला जात नाही.

महोदय, दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 पासून जे शिक्षक अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांमध्ये लागले त्यातील 3/4 शिक्षकांनाच संचालकांच्या दिनांक 16 नोव्हेंबर, 2005 रोजीच्या आदेशानुसार जी.पी.एफ. क्रमांक देण्यात आले आहेत. परंतु त्याच वेळी लागलेल्या उर्वरित 1/4 शिक्षकांना मात्र जी.पी.एफ.क्रमांक देण्यात आलेले नाहीत. त्या शिक्षकांना जी.पी.एफ.क्रमांक न दिल्यामुळे त्यांचा जी.पी.एफ. सुरु नाही. या बरोबरच सहाव्या वेतन आयोगाचा फरक सुध्दा अजून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे....

पर्यंत त्यांच्या खात्यामध्ये जमा झाला नाही. त्यामुळे घोळ होण्याची शक्यता आहे. माननीय मंत्री महोदय, शिक्षकांच्या इतरही अनेक प्रकारच्या मागण्या आहेत.

महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना एवढेच सांगतो की, शासनाने शिक्षकांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक विचार करुन, त्यांच्या मागण्या पूर्ण कराव्यात. महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

धन्यवाद.

-------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे (कोकण पदवीधर विभाग) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, अतिशय महत्त्वाच्या विषयावरील प्रस्ताव सभागृहासमोर चर्चेसाठी आणल्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार मानतो.

महोदय, पट पडताळणीच्या अटी शिथिल करणे गरजेचे आहे. माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांनी या विषयी लोकप्रतिनिधींची बैठक घेतली होती. त्या बैठकीत त्यांनी सकारात्मक भूमिका दाखविली होती. परंतु पट पडताळणीच्या अटी शिथिल होताना दिसत नाहीत. पट पडताळणीच्या नावाखाली आज शिक्षक भरती बंद आहे. गणित, विज्ञान विषयांच्या शिक्षकांची पदे पट पडताळणीच्या नावाखाली भरली जात नाहीत. तसेच सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणाऱ्या शिक्षकांची पदे भरणे गरजेचे असताना सुध्दा ती भरली जात नाहीत. परिणामी विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत आहे.

महोदय, राईट टु एज्युकेशनमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणाचे धोरण गोंधळाचे आहे. ज्या संस्था पूर्व प्राथमिक शिक्षण सुरु करणार आहेत त्या संस्था चालकांना पूर्व प्राथमिक शिक्षण संस्था कोणत्या बेसिसवर घ्याव्यात तसेच शुल्क कोणत्या बेसिसवर घ्यावे बाबत कसलीही सुस्पष्टता नाही.

महोदय, इयत्ता 11 वी व 12 वी च्या महिला शिक्षकांच्या प्रसूती रजेची मागणी योग्य आहे. त्यामुळे या विषयाकडे राज्य सरकारने संवेदनशीलतेने बघणे आवश्यक आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निरंजन डावखरे ....

त्याचप्रमाणे आपण बोर्डाच्या परीक्षेचे पेपर्स डिसेंट्रलाइज्ड पध्दतीने तपासतो परंतु रत्नागिरीमध्ये उर्दू, इंग्रजी माध्यमाचे जे शिक्षक आहेत त्यांना कंपल्सरी बोर्डामध्ये येऊन पेपर तपासण्यास भाग पाडले जाते. ही विषमता का ?

सभापती महोदय, वेतनेतर अनुदान बंद असल्यामुळे आता शिपायांची भरती सुध्दा बंद आहे. शिपायांची भरती बंद असल्यामुळे शिक्षकांना किंवा लिपिकांना बरीच कामे करावी लागतात. त्यासाठी शासनाने लवकरात लवकर मदत करावी. सेल्फ फासनन्स स्कूलच्या पध्दतीमध्ये मराठी, उर्दू आणि गुजराथी माध्यमाच्या शाळा सुध्दा घेतलेल्या आहेत. मराठी, उर्दू आणि गुजराथी माध्यम हे व्हर्नाक्युलर माध्यम आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळा सेल्फ फायनान्स स्कूल पध्दतीमध्ये टिकू शकतील परंतु या स्पर्धेमध्ये मराठी माध्यमाच्या शाळा टिकणे अतिशय कठीण जाईल. त्यामुळे आपली मातृभाषा टिकविण्यासाठी मराठी माध्यमाच्या शाळा अनुदानित पध्दतीमध्येच राहाव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी तसेच आम्ही इतर सर्व सदस्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाच्या संदर्भात नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, कपिल पाटील व मी मांडलेली होती. त्यावेळी राज्य शासनाने एक सर्क्युलर काढले आणि तोंडाला पाने पुसली असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. कारण त्यातील ज्या मागण्या होत्या त्या सर्व मागण्या वर्षानुवर्षे लटकत ठेवल्या. आज राज्य शासन नेमके शिक्षकांसाठी काय करीत आहे हा एक मोठा प्रश्न आहे. या सभागृहामध्ये शिक्षकांच्या प्रश्नासाठी एक दिवस पूर्ण प्रश्नोत्तराचा तास असतो तरी देखील हे प्रश्न वर्षानुवर्षे सुटत नाहीत. गेली बारा वर्षे मी या सभागृहामध्ये आहे आणि हे तेरावे वर्ष आहे. 'कायम' शब्द काढून टाकण्याच्या बाबतीतील प्रश्न अर्धा सुटला. तो प्रश्न सोडला तर एकही प्रश्न सुटलेला नाही.

सभापती महोदय, गेले कित्येक दिवस प्राध्यापकांचा संप सुरु आहे. प्राध्यापकांच्या संपामुळे प्रॅक्टिकलच्या परीक्षा पुढे ढकलल्या गेल्या आहेत. प्रॅक्टिकलच्या परीक्षा जवळजवळ फक्त 49 कॉलेजमध्येच झाल्या. बाकीच्या कॉलेजेसमध्ये प्रॅक्टिकलच्या परीक्षा झालेल्या नाहीत. या परीक्षा नेमक्या कधी होणार आहेत ? काल मी मिठीबाई कॉलेच्या समोर बघितले की, त्या ठिकाणी काल रविवारी परीक्षा होती. त्या परीक्षेला 50 टक्के विद्यार्थीच बसलेले आहेत. आपण या ज्या परीक्षा तुकड्यातुकड्याने घेतलेल्या आहेत. त्यामध्ये आज 50 टक्के विद्यार्थ्यांना बसविता, उद्या 25 टक्के विद्यार्थ्यांना बसविता, असे का ? विद्यापीठ नेहमी अनुदान आयोगाकडेच का बोट दाखविते ? विद्यापीठ स्वायत्त असले तरी प्रत्येक वेळी त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडेच नेहमी बोट का दाखवावयाचे ?

ज्यावेळी विद्यापीठाची परीक्षा होते त्यामध्ये त्यावेळी एखादा प्रश्न सिलॅबसच्या बाहेरचा आहे अशा प्रकारचे विद्यार्थ्यांचे मत होते त्यावेळी खरोखर काय परिस्थिती आहे हे सांगणारा जो पर्यवेक्षक त्या ठिकाणी असतो तो बऱ्याचदा के.जी.मध्ये शिकविणारा असतो. तो ज्युनिअर के.जी. मध्ये शिकविणारा असतो, बी. एड. झालेला असतो. त्यामुळे प्रत्येक सेंटरला किंवा किमान तीन सेंटरला मिळून या विषयातील एखादा तज्ज्ञ त्या ठिकाणी असणे आवश्यक आहे. तसे केले तर विद्यार्थ्यांच्या ज्या काही समस्या असतील, त्यांना एखादा शब्द समजला नाही तर

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

त्यांना उत्तर सांगू नका पण त्यांच्या ज्या समस्या असतील त्या तरी वरपर्यंत कळतील. विद्यार्थी प्रचंड टेंशनमध्ये असतो. त्याला एखादा शब्द कळत नाही किंवा एखादी गोष्ट सिलॅबसच्या बाहेरची असते किंवा अर्थ बदलून प्रश्न विचारलेला असतो, अशा वेळी त्या प्रश्नाचा अर्थ सोपा करुन सांगितला तर विद्यार्थ्याला या पर्यवेक्षकाची खूप मोठी मदत होणार आहे. या बाबतीत शासन काही विचार करणार आहे का ?

सभापती महोदय, आपल्या देखील लक्षात आले असेल की, वाडा, मोखाडा, खोडाळा येथे कारेगाव सारखी सामूहिक कॉपी झाली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.बरवड 10:25

डॉ.दीपक सावंत...

तेथील कॉपीचे प्रकार बंद करण्यासाठी राज्य शासनाने खूप प्रयत्न केले असले तरी ते प्रकार बंद झालेले नाहीत. सरकार सध्या काय करीत आहे तर शिक्षकांना पगार वेळेवर न देता शिक्षकांना शिक्षण सेवक म्हणून गणते. शिक्षकांना गाईड लाईन्स देत नाही. त्यामुळे शिक्षकांनी परीक्षा व पेपर तपासणीच्या कामावर बहिष्काराचा मार्ग अनुसरला आहे व आत्मदहनाचा इशाराही दिलेला आहे. ही समाजिक व्यवस्थेला लाजिरवाणी बाब आहे. विद्यार्थ्यांसमोर शिक्षक हा आदर्श असतो. शिक्षकांचे पोट भरले नाही तर शिक्षक विद्यार्थ्यांना काय शिकविणार ? शिक्षकांनी गणित, इंग्रजी, भूगोल यापैकी कोणते विषय शिकवावेत हे त्या त्या विषयाच्या तज्ज्ञांकडून त्यांना कळले पाहिजे. जर शिक्षकांनी अशा प्रकारे संपाची भूमिका घेतली असेल आणि त्यांच्या भूमिकेबाबत आम्हाला सहानुभूती असली तरी त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. शासनाने हे प्रश्न इतके दिवस का प्रलंबित ठेवले, याचे उत्तर आम्हाला मिळणार आहे का ?

सभागृहात असे नेहमीच सांगितले जाते की, शासनाकडे पैसा नसल्यामुळे शिक्षकांच्या मागण्या पूर्ण करता येत नाहीत. काय व्हायचे ते होऊ देत, शाळा बंद करावयाच्या असतील तर करु देत. शासनाच्या अशा प्रकारच्या भूमिकेमुळे राज्यात अराजकता माजेल. त्याला सरकारच जबाबदार असेल. शासन शाळांना मान्यता देते, शिक्षकांच्या नेमणुका करते, विद्यार्थ्यांची पटपडताळणी करते त्यामुळे शिक्षकांच्या मागण्या प्रलंबित ठेवण्याचा शासनाला अधिकार नाही. या मागण्या 13 वर्षे प्रलंबित आहेत. एक तप झालेले आहे. तरी देखील या मागण्या तशाच प्रलंबित आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांनी या मागण्यांबाबत ठोस उत्तर द्यावे. मी तर असे म्हणेन की, त्यांनी पॉईन्ट टू पॉईन्ट उत्तर द्यावे. त्यांच्या उत्तरात खरोखरच्या उत्तराचा भाग कमी असतो आणि बाकीच्या इतर गोष्टीच जास्त असतात. त्यामुळे विद्यापीठाचा प्रश्न असेल, शालेय शिक्षकांचा प्रश्न असेल हे प्रश्न तातडीने सुटले पाहिजेत. सुदैवाने सभागृहात माननीय उच्च शिक्षण राज्यमंत्रीही उपस्थित आहेत. त्यांनी या प्रश्नांची दखल घेऊन प्रलंबित मागण्यांची पूर्तता करावी. आजचे विद्यार्थी हे उद्याचे मतदार आहेत. त्यामुळे त्यांचे नुकसान करुन त्यांची नाराजी ओढवून घेऊ नये. म्हणून येणाऱ्या आठ दिवसामध्ये शासनाने अर्थसंकल्पात भरीव तरतूद करावी आणि शिक्षक, प्राध्यापक व शालेय शिक्षक या सर्वांचे प्रश्न सोडवावेत ही विनंती करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

-----

2....

18-03-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

डॉ.सुधीर तांबे ( नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावावर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, खरे या प्रस्तावातील प्रत्येक विषय मोठा आहे. त्यावर स्वतंत्ररित्या चर्चा व्हावी अशी परिस्थिती आहे. या विषयांबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. शासनाने शिक्षणासारख्या महत्वाच्या क्षेत्राकडे बघण्याची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे असे शासनाकडून नेहमी सांगितले जाते. मला मंत्री महोदयांच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, हे कल्याणकारी राज्य आहे. त्यामुळे इयत्ता 12 वी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. ती जबाबदारी पार पाडावयाची असेल तर खर्चाकडे बोट दाखवून चालणार नाही. दरवर्षी आम्ही आम्ही कोणतीही समस्या घेऊन गेल्यावर मंत्री महोदयांकडून शासन शिक्षण क्षेत्रासाठी 30 हजार कोटी रुपये खर्च करीत आहे असे सांगितले जाते. इतका खर्च हा होणारच आहे, कारण राज्याची लोकसंख्याच खूप मोठी आहे. सर्वांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या वारंवार घोषणा केल्या जातात, विचार व्यक्त केला जातो. परंतु त्याला अनुसरुन शासनाचे धोरण नसते.

कायम विना अनुदानित हे तत्वच मुळात चुकीचे आहे. इयत्ता 10 वी व इयत्ता 12 वी पर्यंत कायम विना अनुदानित तत्वावर शाळा चालविण्याची परवानगी शासनाने दिली. हे धोरणच चुकीचे आहे. ते निस्तरावयाचे कोणी ? ग्रामीण भागामध्ये या धोरणाचे चटके गरीब विद्यार्थ्यांना बसत आहेत.

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 10:30

डॉ. सुधीर तांबे...

गरीब विद्यार्थी कोठून फी देणार ? एकीकडे आपण म्हणता की, शिक्षकांना 6वा वेतन आयोग लागू झाला पाहिजे. होय. तो लागू झालाच पाहिजे आणि त्यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. दुसरीकडे विद्यार्थ्यांकडून 300-300 रुपये फी घ्यावी असेही सांगता. आता मुलींसाठी 12वी पर्यंतचे शिक्षण मोफत केलेले आहे. या सर्व गोष्टींचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. शासनाने 2009साली "कायम" शब्द काढला. त्यानंतर मूल्यांकनाच्या अटी ठरविण्यासाठी 4 वर्षे घेतली. त्या अटी देखील जाचक आणि कडक आहेत. या सर्व गोष्टी विचारात घेता या शाळांना अनुदान देऊच नये असे शासनाला वाटत आहे असे स्पष्ट दिसते.

सभापती महोदय, आंदोलनकर्त्या शिक्षकांच्या भावना आपण समजून घ्यायाला पाहिजे. आज शिक्षक 10-10 वर्षे विनावेतन काम करीत आहेत. ते वेठबिगार आहेत काय ? त्यांचे वेतन कोण देणार ? संस्था देऊ शकत नाही. दुसरे म्हणजे आपण जो बृहत आराखडा केलेला आहे त्यामध्येही या शाळा अंतर्भूत केलेल्या आहेत. 8वी पर्यंत मोफत शिक्षण देण्याचे मान्य केलेले आहे. तरीही शिक्षणाच्या हक्काच्या कायद्याचा भंग होत आहे. सभापती महोदय, या शिक्षकांच्या मागण्यांकडे शासनाने कसे दुर्लक्ष केलेले आहे याबाबतीत खूप बोलता येण्यासारखे आहे. 12 पर्यन्त कायम विनाअनुदानित शाळा दिलेल्या आहेत. ज्युनिअर कॉलेजेस ही कायम विनाअनुदानित आहेत. निम्म्या शाळा कायम विनाअनुदानित आहेत. आदिवासी मुलांकडून, मागासवर्गीय मुलांकडून, मुलींकडून फी घ्यावयाची नाही असे शासनाने धोरण आहे आणि अशा परिस्थितीमध्ये शाळा चालविण्यास सांगितले जाते.

सभापती महोदय, या शिक्षण खात्यामध्ये मला तर प्रचंड गोंधळ दिसत आहे. एकीकडे माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत विना अनुदानित सेवा ग्राह्य धरण्यासंबंधीचा जी.आर. काढला जातो आणि दुसरीकडे ज्युनिअर कॉलेजेसच्या शिक्षकांच्या बाबतीत काढला जात नाही. ही विसंगती दूर झाली पाहिजे. ग्रामीण भागातील शाळांमधून शालेय पोषण आहार द्यावा लागतो. शाळांची बांधकामे पाहण्याची जबाबदारी शिक्षकांवर सोपविली जाते. या ठिकाणी वारंवार सांगितलेले आहे की, बांधकामे तपासण्याची कामे शिक्षकांवर सोपवू नका. ते काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका युनिटकडे द्या. शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊन त्यांना वेठीस धरले जात आहे. काही शिक्षकांनी तर आत्महत्या देखील केल्याची उदाहरणे आहेत. अनेक गोष्टी या ठिकाणी बोलता येण्यासारख्या

==2==



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे...

आहेत. परंतु वेळेचे बंधन असल्यामुळे त्या मांडता येत नाहीत.

सभापती महोदय, मी एवढेच सांगू इच्छितो की, शिक्षकांचा प्रश्न हा सर्व सामाजिक कार्यकर्त्यांशी, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करुन निकाली काढावा. जेव्हा या सभागृहामध्ये शिक्षणाच्या प्रश्नासंबंधी चर्चा होते त्यावेळी शिक्षक आमदार, पदवीधर आमदार खूप बोलत असतात असेही म्हटले जाते. परंतु परिस्थिती खरोखरच अतिशय गंभीर आहे. एकीकडे शिक्षणाच्या गुणवत्ते बाबत बोलत असताना दुसरीकडे शिक्षकांवर खूप अशैक्षणिक कामे लादली जातात त्याचा कोणी विचार करीत नाही. त्यांना दर्जेदार प्रशिक्षणही दिले जात नाही. या सर्व प्रश्नांचा शासनाने गंभीरपणे विचार करावा असे आवाहन करुन मी माझे भाषण संपवितो.

----

श्री. विक्रम काळे : या विषयावरील चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तरासह आजच संपविण्यात येणार आहे काय ? तसे असेल तर चर्चेसाठी वेळ फार कमी मिळेल.

**तालिका सभापती** : आपण याबाबतीत माननीय सभापतींना भेटावे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आमच्यासह मांडलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे असे आपण मानत आलो आहोत. आपण महात्मा ज्योतिबा फुलेंचे नाव घेऊन राज्य करता. असे असताना शिक्षण क्षेत्रातील सर्व घटक, मग ते प्राथमिक शिक्षक असतील, माध्यमिक शिक्षक असतील, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक असतील, हे सर्व शिक्षक आपल्या न्याय मागण्यासाठी रस्त्यावर आलेले आहेत. त्यांचे रस्त्यावर येणे ही दुर्भाग्यपूर्ण घटना आपल्य राज्यामध्ये घडलेली आहे. शिक्षकांना आपल्या न्याय मागण्यांसाठी लढा द्यावा लागत आहे ही या राज्याला लाजिरवाणी अशी बाब आहे.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार...

आम्ही दिलेले राज्यकर्ते हे ठेकेदार मालक भूमिकेतून वागतात. या प्रस्तावाच्या निमित्ताने जेवढे मुद्दे मांडले गेले, त्या मुद्यांबाबत कोणत्याही प्रकारचा वाद नाही. सर्व घटकांना, सर्व मान्यवरांना हे मुद्दे मान्य आहेत. या विषयाच्या बाबतीत अनेक वेळा बैठका झाल्या, संघटनासोबत बोलणी झाली. चर्चेमध्ये मागण्या मान्य केल्या गेल्या, परंतु वर्षोगणती त्या मागण्या अंमलबजावणीसाठी मांडल्या गेलेल्या नाही. मागण्यांच्या बाबतीत बोलले जाते, मागण्या मान्य केल्या जातात, परंतु त्या मागण्यांची अंमलबजावणी होत नाही. नेट सेटचा प्रश्न असेल,सहाव्या वेतन आयोगाचा प्रश्न असेल, विना अनुदानित शाळांचा "कायम " हा शब्द काढणे व कनिष्ठ महाविद्यालयांचा "कायम" शब्द न काढणे, अनुदानाच्या जाचक अटी, पटपडताळीच्या नावाखाली शाळा बंद करणे, शिक्षकांना बडतर्फ करणे, या गोष्टीकडे शासन गांयीर्याने बघताना दिसत नाही.

महोदय, दिनांक 12 डिसेंबर, 2012 रोजी महाराष्ट्र शिक्षण परिषदेने सन्मान यात्रा काढली होती. त्यावेळी आम्ही शासनास एक निवेदन दिले होते, त्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने आम्हाला आश्वासन दिले होते की, या विषयाच्या बाबतीत उच्चस्तरीय सचिवांची बैठक घेतली जाईल व या प्रश्ना बाबत आम्ही लक्ष घालू. अजूनपर्यंत बैठक झाली नाही आणि आमच्या मागण्यांकडे लक्ष देण्यात आले नाही. पटपडताळी मध्ये 50 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त विद्यार्थी अनुपस्थित असतील, त्या शाळा बंद करण्याचा निर्णय झाला. शिक्षकांना बडतर्फ करण्याचा निर्णय घेण्यात आला, तो निर्णय रद्द करण्यात यावा म्हणून साखळी उपोषण झाले. बेमुदत उपोषण झाले, या संदर्भात चर्चेला बोलाविण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन शासनाकडून मिळाले म्हणून उपोषण सोडले, परंतु अद्यापही आम्हाला चर्चेसाठी बोलाविण्यात आले नाही.

सभापती महोदय, राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षकांना दोन वेतनवाढीची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली, परंतु त्या घोषणेची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झाली नाही. मुल्यांकनाच्या जाचक अटी दिनांक 31 डिसेंबर, 2012 पर्यंत कमी करण्यात येतील अशाही प्रकारचे आश्वासन मिळाले होते. परंतु त्याही आश्वासनाची पूर्तता शासनाकडून झालेली नाही.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार...

सभापती महोदय, शिक्षकांच्या मागण्यांबद्दल अशी अनास्था शासनाने ठेवू नये. शिक्षक जेव्हा आंदोलन करतो, तेव्हा आम्हाला विद्यार्थ्यांचे हित आठवते. शिक्षणाची गुणत्ता आठवते. शिक्षक हाच खऱ्याअर्थाने शिक्षणाची गुणवत्ता वाढवित असतो. शिक्षणाची गुणवत्ता टिकवित असतो. शिक्षक हाच विद्यार्थ्यांचे हित जोपसत असतात. शिक्षकाला लढण्यासाठी, तसेच रस्त्यावर येण्यासाठी आम्ही मजबूर करतो. माझी विनंती आहे, विद्यार्थ्यांला राष्ट्रीय संपत्ती म्हणून समजले पाहिजे. शिक्षणाचा खर्च व्यवसायिक दृष्टीकोनातून विचारात घेऊ नये. ती एक आपली जबाबदारी आहे, आपले ते एक कर्तव्य आहे, ते करण्यासाठी आपण सत्त्वेवर आलो याचे भान ठेवले गेले पाहिजे. आई-वडिलांना जो सन्मान देतो, तोच सन्मान शिक्षकाला देण्याचे धोरण शासनाने बोलण्यातून नाही तर व्यवहारातही आणले पाहिजे. भविष्यात कधीही शिक्षक रत्यावर येऊच नये अशी धारणा शासनाने या व्यवहारात ठेवली पाहिजे, तर आणि तरच असे प्रस्ताव पुन्हा सभागृहात आणण्याची गरज आम्हा सदस्यांना पडणार नाही, अशी विनंती करतो आणि याबाबतीतील माझे मनोगत पूर्ण करतो.

-------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ ST/ D/ प्रथम श्री.शिगम.... 10:35

## तालिकास्थानी माननीय उपसभापती

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, भाषण सुरु करण्यापूर्वी मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आजची ही चर्चा नियम 260 अन्वये आहे. नियम 97 खालील चर्चा असेल त्यावर सभागृहात एक तासाची चर्चा होत असते. नियम 260 च्या प्रस्तावावर किमान अडीच तासांचा वेळ सभागृहात दिला जातो. आजच्या चर्चेला वेळ द्यावयाचा किंवा नाही या संबंधी निर्णय घेण्याचा अधिकार आपणास आहे. परंतु नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचने बाबत किमान अडीच तास चर्चा होणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, माझा आरोप असा आहे की, सिनियर कॉलेजच्या प्राध्यापकांचा संप सुरु आहे. हा संप सरकारला हवा आहे. केंद्राकडून पैसे मिळणार ही बाब माहिती असूनही ते पैसे न देण्याचे धोरण शासन अवलंबित आहे. राज्यात दुष्काळी स्थिती आहे. अनेक प्रश्न गंभीर बनलेले आहेत. विद्यार्थी, पालक, शेतकरी, सर्वसामान्य जनता यांच्यामध्ये याबाबतीत खूप असंतोष निर्माण झालेला आहे. हा असंतोष विद्यार्थ्यांच्या मार्फत रस्त्यावर येऊ नये, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात येऊ म्हणून संप चिघळत ठेवावयाचा, तो संप जास्तीत जास्त चालवावयाचा अशी खास योजना शासनाने आखलेली आहे. मुलांच्या शिक्षणाची माती झाली तरी चालेल, मुले रस्त्यावर येता कामा नये, म्हणून प्राध्यापकांचा संप लांबवावयाचा. तेवढया एका करणासाठी शासनाचा हा खटाटोप आहे.

महोदय, या ठिकाणी पैशांचा मुद्दा नाही. ते यु.जी.सी.कडून येणार आहेत, म्हणजे यात केंद्र सरकारचा 80 टक्के वाटा आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ गितेनंतर 10:40

श्री.कपिल पाटील.........

त्यांनी तुम्हाला सांगितले आहे की, तुम्ही हे अगोदर द्या, मग आम्ही तुम्हाला देऊ. असे असताना जाणीवपूर्वक तीन हप्ते पाडण्यात आले आहेत. हा फक्त शिक्षकांवरील अन्यायाचा प्रश्न नसून राज्यातील असंतोष उघड्यावर येऊ नये आणि सरकारला त्रासदायक ठरु नये म्हणून शिक्षकांचा संप झाला तरी चालेल, विद्यार्थी आणि शिक्षक घरी बसतील अशी जाणीवपूर्वक साळसूदपणाची भूमिका शासनाने स्वीकारली आहे.

सभापती महोदय, ज्युनियर कॉलेजबाबत कायम विनाअनुदानित शब्द काढण्याची भूमिका अजूनही सरकारने स्वीकारलेली नाही. दोन वर्षापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी नागपूरच्या अधिवेशनात आश्वासन दिलेले होते. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांबाबत जीआर काढताना ज्युनियर कॉलेजना का वगळले? आम्ही गांधीजींच्या नावाने राज्य करीत आहोत असे आजचे राज्यकर्ते म्हणतात. महात्मा गांधीजींनी प्रि-युनिव्हर्सिटी शिक्षण सरकारने मोफत दिले पाहिजे अशी भूमिका घेतली होती. शासन मात्र आठवीच्या पुढील शिक्षण मोफत द्यायला तयार नाही. 1 एप्रिल, 2013 पासून आठवीपर्यंतच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी शासनावर येणार आहे. आजच्या घडीला आझाद मैदानावर पाचवीपासूनच्या अनेक शाळातील शिक्षक उपोषणाला बसलेले आहेत. त्या शाळांना शासनाचे अनुदान मिळत नाही. सामान्य शिक्षण मिळण्याचा अधिकार हा विद्यार्थ्यांचा आहे, जो शासन नाकारीत आहे. 1 एप्रिल, 2013 पासून या सगळ्या शाळांना 100 टक्के अनुदान देणे कायद्याने भाग पडणार आहे. टप्प्याटप्प्याने विचार करु असे उत्तर देता येणार नाही.कायदा पाळणार की नाही एवढे शासनाने जाहीर करावे. शासन कायदा मानत नाही, सभागृहाला मानत नाही या एका उत्तराची शासनाला निवड करावी लागेल.

सभापती महोदय, मूल्यांकनाचे निकष लबाडीचे आहेत. 1 एप्रिलपासून 100 टक्के अनुदान द्यावे लागणार आहे. म्हणून मूल्यांकनाचा मुद्दा पुढे करुन या सगळ्या शाळा अनुदानापासून बाहेर काढायच्या आहेत. शाळांमध्ये योग्य संख्येने विद्यार्थी आहेत की नाहीत, शिक्षक क्वॉलिफाईड आहेत की नाहीत हे शासनाने तपासावे. विद्यार्थी संख्या योग्य असेल, शिक्षक पात्र असतील तर 100 टक्के अनुदान दिले पाहिजे. त्यापासून शासनाला पळ काढता येणार नाही.

सभापती महोदय, वस्ती शाळांच्या संदर्भात हाच मुद्दा आहे. उत्तराखंड राज्यात वस्ती शाळांमधील शिक्षकांना शिक्षक मित्र मानले जाते. त्या शिक्षकांना 1 जानेवारी, 2013 पासून त्या

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/ गितेनंतर 10:40

श्री.कपिल पाटील..........

राज्यात दरमहा 13 हजार रुपये वेतन सुरु केलेले आहे. पूर्वी दरमहा 10 हजार रुपये वेतन दिले जात होते. महाराष्ट्र राज्यात 1500 रुपये दरमहा वेतन दिले जात होते. आता त्या राज्याने दरमहा 13 हजार रुपये वेतन सुरु केल्यानंतर राज्य सरकारने दरमहा 3500 रुपये वेतन देणे सुरु केले.

वस्ती शाळातील शिक्षकांचा बॅक डोअर प्रवेश झालेला नाही. रितसर परीक्षा दिल्यानंतर त्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांना सामावून घेतले पाहिजे, असा ॲडव्होकेट जनरल यांनी अहवाल दिला आहे. वस्ती शाळातील शिक्षकांना सेवेत नियमित करुन घेण्यात कोणताही अडथळा येत नाही असा स्वयंस्पष्ट अभिप्राय त्यांनी अहवालातील शेवटच्या परिच्छेदात नमूद केलेला आहे. सेवेत सामावून घेत असताना त्यांच्यासाठी वेगळी नोटीस काढू नये अशी भूमिका ॲडव्होकेट जनरल यांनी घेतली आहे, त्या भूमिकेचे शासन पालन करणार की नाही? महाराष्ट्र हे पुढारलेले राज्य आहे. किमान उत्तराखंड राज्याच्या पाठोपाठ चालणार की नाही? महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, ज्या राज्यात शिक्षण मोफत नाही. अन्य कोणत्याही राज्यात शिक्षण मोफत आहे. सगळ्यात प्रगतीशील राज्य म्हणून दावा करणाऱ्या महाराष्ट्र राज्यात शिक्षण मोफत नाही. 'विनाअनुदानित' हा शरमेचा आणि लज्जास्पद शब्द आहे. हा कलंक धुऊन काढणार का?

शिक्षणाचा हक्क 1 एप्रिल पासून लागू होणार आहे. या शिक्षण हक्क कायद्यातील ज्या ज्या बाबी शासनाला करायच्या नव्हत्या, ज्या परस्पर शाळांनी, शिक्षकांनी करायच्या त्या संदर्भात शासनाने जीआर काढला. शिक्षण हक्क कायद्यात ताबडतोब अंमलात आणावयाच्या नाहीत अशा ज्या तरतुदी आहेत, त्या बाबींची तीन वर्षापूर्वी अंमलबजावणी करण्यास सूट होती. त्यातील कोणत्याही बाबीची अंमलबजावणी सुरु केली नाही. आता घाईघाईने जीआर काढण्यास सुरुवात केली आहे. त्या नावाखाली बट्टयाबोळ सुरु आहे. आता पाचवीचा वर्ग खाली जाणार आहे. सहावी ते आठवीपर्यंत शिक्षण हे मिडल स्कूल होईल आणि सगळ्या शाळांना माध्यमिकशी जोडले जाणार आहे. त्यांच्यासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक नेमावा लागणार आहे. राज्यातील अनुदानित शाळांची संख्या सुमारे 22 हजार आहे. म्हणजे किमान 22 हजार अनुदानित शाळांसाठी नव्याने 22 हजार मुख्याध्यापक नेमावे लागणार आहेत. प्रशासन कसा मूर्खपणा करते याचा हा एक नमुना आहे. मिडल स्कूल माध्यमिकला जोडले...........

नंतर जे.1....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

तर ते प्रायमरीच्या आत येते व शाळा कोठेही असली तरी त्यासंदर्भात कायदा कोठेही आड येत नाही. आपल्याला केवळ पहिली ते आठवी प्रर्यंतचे प्रायमरीचे शिक्षण मोफत द्यावयाचे आहे. 6 वी ते 8 वी पर्यंतचे वर्ग माध्यमिकला जोडलेले राहिले तर आपल्या 25 हजार मुख्याध्यापकांची पदे वाचणार आहेत. परंतु कोणताही विचार न करता शासन पत्रक काढते.

सभापती महोदय, न्यायाने जे द्यावयास पाहिजे ते शासन देत नाही व नको तो खर्च वाढवता हे कसले शहाणपण आहे ? माध्यमिकच्या मुख्याध्यापकाकडे आज मिडलची सुध्दा जबाबदारी आहे परंतु ही जबाबदारी काढून आपण ती स्वतंत्रपणे देण्याच्या संदर्भातील जीआर दोन दिवसापूर्वी ड्राफ्ट केलेला आहे. यामध्ये नव्या 25 हजार पदांच्या संदर्भातील विचार न करता तो सोडून दिलेला आहे. या ठिकाणी मी केवळ गंभीर मुद्दे मांडण्याचे काम करीत आहे. जे मुद्दे शासनाच्या निधीशी निगडीत आहेत,गुणवत्तेशी निगडीत आहेत, कायद्याशी निगडीत आहेत असेच मुद्दे या ठिकाणी मी मांडीत आहे. या ठिकाणी मी कोणतेही वैयक्तिक प्रश्न मांडीत नाही.

सभापती महोदय, आपल्याकडे ऑलरेडी जे 25 हजार मुख्याध्यापक आहेत त्यांच्यावर जर हा भार दिला तर प्रश्न सुटू शकतो परंतु हा प्रश्न आपण सोडण्याचे सोडून वाढविण्याचे काम करीत आहात.

सभापती महोदय, सहावी ते आठवी पर्यंतचे शिक्षक हे पदवीधर व ट्रेन्ड असले पाहिजेत असा कायदा सांगतो. ही बाब मी गेल्या वर्षाभरापासून लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला होता परंतु यासंदर्भात अतिरिक्त मुख्य सचिवांनी तसेच माननीय मंत्री महोदयांनी मी मांडलेल्या मुद्याच्या संदर्भात लक्ष घातले नाही. शिक्षकांनी पदवी शिक्षण प्राप्त करण्याची गरज आहे. यासंदर्भात मला सांगण्यात आले की, ही बाब सर्व शाळांना कळविण्यात आलेली आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, ही बाब आपण कोणत्याही शाळांना कळवलेली नाही. यामध्ये त्या शिक्षकांचा कोणताही अपराध नाही. आता त्या शिक्षकांना कशा प्रकारे सामावून घ्यावयाचे व त्यांचे संरक्षण कसे करावयाचे ही आता आपली जबाबदारी आहे. 1 लाख शिक्षकांना आपण बाहेर काढू शकत नाहीत.

सभापती महोदय, मी गेल्या वर्षी दीड हजार शिक्षकांना मुंबईतील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामार्फत पदवी शिक्षणाचे प्रवेश घेऊन दिले असून पुढील दोन वर्षात हे शिक्षक पदवीधर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

होतील. हा प्रश्न केवळ मुंबईचा नाही. मी मुंबईतील शिक्षकांना आवाहन केले व त्यांनी मला प्रतिसाद दिला. गुणवत्तेची जबाबदारी प्रशासन करीत नसेल तर तुम्ही शिक्षण खाते कशासाठी चालविता, यामध्ये पैशाचा कसला प्रश्न येतो ? परंतु या प्रश्नामध्ये शासन लक्ष घालण्यास तयार नाही. जून पासून या प्रश्नाच्या संदर्भात घोळ तयार होणार असून त्याला तुम्ही सर्वस्वी जबाबदार राहणार आहात. शिक्षकांच्या पदवीच्या शिक्षणाचे एक वर्ष तुम्ही वाया घालवले आहे व यामध्ये तुम्हीच जबाबदार आहात. दिनांक 1 एप्रिल 2015 पर्यंत सहावी ते आठवी पर्यंतचे शिक्षक पदवीधर असले पाहिजे हे कायद्याने बंधनकारक राहणार आहे. परीक्षा पुढे ढकलून घोषित करा असे तुम्ही विद्यापीठांना सांगणार आहात काय ? यामध्ये जी तारांबळ उडणार आहे त्यासंदर्भात शासनाकडे कोणतेही उत्तर नाही.

सभापती महोदय, शिक्षक आमदार गुणवत्तेच्या संदर्भात बोलत नाही असे येथे सांगितले जाते. परंतु गुणवत्तेसाठी शासन काय प्रयत्न करीत आहे ? हा माझा सवाल आहे. गेल्या वर्षभरापासून शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा पाऊस पडला आहे. प्रशिक्षणामध्ये शिक्षकांना कोणतेही प्रशिक्षण दिले जात नाही. प्रशिक्षणातील प्रशिक्षक वेलट्रेन्ड नसतात, त्यांचा दर्जा चांगला नसतो. शाळा बंद करुन वर्ग वाऱ्यावर सोडून मुध्यापकांना 5-10 दिवस प्रशिक्षणामध्ये बसविले जाते. या वर्षभरात मुख्याध्यापकांना आपण अशा प्रकारे तीन वेळेस बोलावले असून शिक्षकांना या वर्षी 3 ते 4 वेळा बोलावले आहे. दर महिन्याच्या शनिवारी प्रशिक्षणासाठी शिक्षकांना बोलावून सहावी ते आठवीची अर्धी शाळा ओसाड पाडली जाते. खरे म्हणजे हे सर्व प्रशिक्षण आपल्याला ऑनलाईन करता येऊ शकते. मुलांसाठी जशी पुस्तके असतात तशी पुस्तके तुम्ही शिक्षकांना उपलब्ध करुन दिली तर ही पुस्तके शिक्षक आपल्या घरी वाचतील व वाटले तर शिक्षकांनी अभ्यास केला आहे की, नाही यासाठी 5-10 मिनिटांची टेस्ट घ्या. असे झाले तरी प्रशिक्षण चांगल्या प्रकारे होऊ शकेल. परंतु कोणतेही प्रशिक्षण धड करावयाचे नाही, शाळा ओस पाडावयाच्या त्यामुळे यातून तुम्हाला कोणती गुणवत्ता अभिप्रेत आहे ?

सभापती महोदय, गुणवत्तेच्या नावाखाली जी प्रशिक्षण शिबिरे चालवली जातात ती त्वरित बंद करावीत अशी माझी मागणी आहे. प्रशिक्षण ऑन लाईन करा अशी माझी मागणी आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

शिक्षकांनी अभ्यास बरोबर केलेला आहे की, नाही यासंदर्भात इन्सपेक्शन करा. परंतु इन्स्पेक्शन करण्याची आपल्याकडे कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. माझ्या काळात इन्स्पेक्शन होत असे. परंतु आता इन्स्पेक्शनच होत नाही. आपल्याकडे केवळ पाकीटे घेण्यासाठीच इन्स्पेक्शन होत असते. शाळेमध्ये इन्स्पेक्टर आला की, शिक्षकांना कळते की, हा काही तरी घ्यायला आला आहे त्यामुळे पाकीटे दिले की, विषय संपतो. गुणवत्तेचा सर्व बोऱ्या वाजला आहे. इन्स्पेक्शन करण्यासाठी जो स्टाफ उपलब्ध असावा लागतो तो स्टाफ शासनाकडे उपलब्ध नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

सभापती महोदय, मी जाता जाता अनुदानासंबंधीची भूमिका मांडत आहे. दिनांक 1 एप्रिल 2013 पासून या राज्यातील सर्व शाळां कायद्यानुसार अनुदानावर असतील, मुलांना मोफत शिक्षण देण्याची जबाबदारी राज्य शासनाची असेल. त्याच बरोबर अनुदानावरील शिक्षक उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनावर असेल असे आपण आज जाहीर करणार आहात काय ? असा माझा मुद्दा आहे.

माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, लोअर प्रायमरीसाठी 30 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक आणि अप्पर प्रायमरीला 35 विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असे प्रमाण आहे. ते आपण कसे देणार आहात ? या घडीला मुंबईमध्ये 2500 विज्ञान व गणिताच्या शिक्षकांची पदे रिक्त आहेत. यासंबंधीचा उल्लेख मी तीन अधिवेशनात केलेला आहे. माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, 15 दिवसात या शिक्षकांचा प्रश्न सोडवतो. अजूनही तो प्रश्न सुटलेला नाही. हा मुंबईसह अन्यत्र राज्यामध्ये देखील प्रश्न असू शकतो. मुंबईमध्ये पटपडताळणीमध्ये एकही बोगस विद्यार्थी सापडलेला नाही. एकही अतिरिक्त शिक्षक सापडलेला नाही. तिथल्या देखील सगळ्या नेमणुका थांबवून ठेवलेल्या आहात. त्याचे कारण काय आहे ? विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडायचे आणि गुणवत्तेचा जप जपायचा, ही लबाडी चालणार नाही. ही लबाडी बंद करावी, अशी मागणी करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता उत्तराला सुरूवात होईल.

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी शांत व्हावे. सर्व माननीय सदस्यांनी खाली बसावे. या चर्चेसाठी एकूण एक तास इतका वेळ देण्यात आला होता. मला माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराला सुरूवात करावी असे स्पष्ट आदेश आहेत. त्यानुसार मी सभागृहाचे कामकाज चालवणार आहे. मी आता माननीय मंत्र्यांच्या उत्तराला सुरूवात करीत आहे. प्रत्येक शिक्षण सदस्यांना 40-40 मिनिटे बोलायचे असते. माननीय मंत्र्यांनी उत्तरास सुरूवात करावी.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य घोषणा देतात.)

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी शिक्षणाच्या प्रश्नासंबंधी सभागृहात चर्चा उपस्थित केली आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय सभापती महोदयांनी या चर्चेसाठी वेळ वाढवून दिलेला आहे.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माननीय सभापतींनी या चर्चेसाठी वेळ वाढवून दिलेला आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे देखील माननीय सभापतींनी वेळ वाढवून दिलेला आहे असे सांगत आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे हे सगळेच खरे सांगतील हे मी मानायला तयार नाही. तरी देखील माननीय सभापतींनी या चर्चेसाठी वेळ वाढवून दिली आहे किंवा नाही याची माहिती घेतो. तो पर्यंत मी सन्माननीय सदस्य श्री.अपूर्व हिरे यांना बोलण्यास अनुमती देत आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अपूर्व हिरे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी तीनच मुद्दे मांडणार आहे. मी कुठलाही मुद्दा रिपीट करणार नाही याची खात्री देतो. धुळ्यामध्ये मागच्या महिन्यामध्ये शिक्षकाला मारहाण करण्यात आली आहे. ही मारहाण त्याला विद्यार्थ्यांकडून झालेली असेल. नंदूरबारमध्ये एका शिक्षकाला मास कॉपी मुळे निलंबित करण्यात आले आहे. मास कॉपी का घडत होती ? परीक्षेच्या वेळी वर्गाच्या बाहेर पालक उभे होते. ती मॉस कॉपी त्या शिक्षकाने करू दिली नसती तर त्या शिक्षकाला बेदम मारहाण झाली असती. तेथे त्याचा जीव गेला असता. तेथे बंदोबस्ताला एकही पोलीस नव्हता. फक्त होमगार्डस् होते. त्यांची भूमिका फक्त बघ्याची असते. शिक्षकांच्या संरक्षणाकरिता कुठलाही कायदा या राज्यात अस्तित्त्वात नाही. त्यामुळे माझी पहिली प्रामुख्याने मागणी आहे की, या राज्यात शिक्षक संरक्षक कायदा अस्तित्वात आणावा.

प्रत्येक मुद्यासंबंधी शासन पैसे नाहीत, बजेटमध्ये तरतूद नाही अशा प्रकारचे उत्तर देत आहे. आपण इन्कम टॅक्स घेत असलो तरी देखील या देशात शिक्षण कर हा स्वतंत्र घेतला जातो. त्यामुळे या माध्यमातून शिक्षणासाठी स्वतंत्र निधी गोळा होत असतो. एकूण बजेट पैकी 3 टक्के रक्कम आपण शिक्षणावर खर्च करीत आहोत. आपल्या राज्य घटनेमध्ये तरतूद आहे की, शिक्षणावर निदान 5 ते 6 टक्के निधी खर्च झाला पाहिजे. त्यामुळे आपण प्राथमिक, माध्यमिक व विनाअनुदानित शाळांसंबंधीच्या मागण्या पैसे नाहीत म्हणून मंजूर करीत नाही असे म्हणून चालणार नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अपूर्व हिरे...

आपण त्या तातडीने मंजूर कराव्यात अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, विनाअनुदानित शाळांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे. कायम विनाअनुदानित शाळांचा "कायम" हा शब्द काढून टाकण्यात आला. परंतु तो शब्द फक्त नावापुरताच काढलेला आहे. कारण शासनाने ज्या अटी घातल्या आहेत त्यामध्ये फक्त दोन-चार शाळांचा समावेश होऊ शकेल आणि जास्तीत जास्त शाळांचा त्यामध्ये समावेश होणार नाही याची काळजी घेतलेली आहे. उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीत देखील तेच घडले आहे. उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीत शासन काही बोलावयास तयार नाही. तेव्हा आज महाराष्ट्रातील शिक्षकांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. शेतकऱ्यांच्या आणि दुष्काळग्रस्तांच्या आत्महत्या होती आहेत. भविष्यात शिक्षकांच्या आत्महत्या होणार नाहीत याची काळजी शासनाने घेणे गरजेचे आहे. काही शिक्षकांनी आत्मदहनाचा प्रयत्न केलेला आहे. तेव्हा शिक्षकांच्या प्रश्ना संदर्भात शासनाने काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांनी बसून बोलण्यापेक्षा उभे राहून बोलावे,आम्ही त्यांचे विचार ऐकायला उत्सुक आहोत.

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, केंद्र सरकारने शिक्षणाचा अधिकार कायदा केला. परंतु शासनाला स्वत: ज्या गोष्टी करणे शक्य नाही त्या शाळांवर टाकलेल्या आहेत आणि त्या तीन वर्षे पुढे ढकलल्या आहेत. असे प्रकार देखील आपणास पहावयास मिळत आहेत. वेळ अपुरा असल्यामुळे मी येथेच थांबून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 260 अन्वये शिक्षणासंबंधी जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विषयावर अनेक शिक्षक आमदारांनी आपले विचार व्यक्त करुन शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या विषयाला स्पर्श केलेला आहे त्याचा मी पुनरुच्चार करणार नाही. परंतु शासनाच्या एकूणच भूमिकेबद्दल आमच्या मनात संशय आहे म्हणून आम्हाला काही मुद्दे मांडणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मागील एक वर्षामध्ये शिक्षणासंबंधीचा प्रस्ताव दुसऱ्यांदा या सभागृहात चर्चेला आला आहे. मी शासनाला आठवण करुन देऊ इच्छितो की, शासन आम्हाला वेगवेगळ्या विषयांच्या संदर्भात मग तो विषय शिक्षकांच्या संदर्भातील असेल, गुणवत्तेच्या संदर्भातील असेल फक्त आश्वासन देण्याचे काम करीत आहे. वेळ टळून गेल्यावर शासनाला आपल्या आश्वासनांचा विसर पडत आहे.

सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, एक वर्षापूर्वी या सभागृहात शिक्षणासंबंधीचा प्रस्ताव चर्चेसाठी आला होता. त्या प्रस्तावावर चार-पाच तास गांभीर्याने चर्चा झाली. त्या चर्चेमध्ये फक्त शिक्षक आणि पदवीधर आमदारांनी भाग घेतला नसून इतर सर्व आमदारांनी देखील भाग घेतला होता. त्यावेळी खूप चांगली चर्चा झाली होती आणि सन्माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांनी देखील त्या चर्चेचे खूप कौतुक केले होते. त्यावेळी माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी सांगितले होते की, एक महिन्याच्या आत श्वेतपत्रिका काढण्यात येईल. परंतु ती श्वेतपत्रिका अजून काढण्यात आलेली नाही. ती कुठे गायब झाली आम्हाला माहीत नाही. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी श्वेतपत्रिका काढण्याचे आश्वासन दिले होते त्याप्रमाणे श्वेतपत्रिका काढणार आहात काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

सभापती महोदय, गुणवत्तेचा विषय सातत्याने मांडला जात आहे.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, शिक्षकांनी वर्गामध्ये महिलांवर केलेल्या अत्याचाराबाबत एकाही शिक्षक आमदारांनी किंवा शिक्षक संघटनेने निषेध केल्याचे जाहीर झालेले नाही. हे आपण लक्षात घ्यावे. कृपया मला बोलते करु नका.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आम्हा सातही शिक्षक आमदारांवर हेत्वारोप केले आहेत. माझी मागणी आहे की, त्यांनी शिक्षक आमदारांवर केलेले हेत्वारोप मागे घ्यावेत. शिक्षक आमदार आणि मी स्वत अनेकदा स्त्रियांच्या प्रश्नावर बोललो आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हेंना सुध्दा हे माहीत आहे. या सभागृहात अनेक महिला सदस्य आहेत. मी पुन्हा एकदा मागणी करतो की, सन्माननीय सदस्यांनी शिक्षक आमदारांवर केलेले हेत्वारोप मागे घ्यावेत.

**उप सभापती** : मला वाटते ही चर्चा आपण अन्य विषयाकडे नेता कामा नये. आता मी या प्रस्तावावरील चर्चा येथेच थांबवितो.

आज माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाच्या ठरावावर माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या सदर प्रस्तावावर बोलण्यासाठी सन्माननीय सदस्यांना 25 मिनिटे वेळ देण्यात येईल तसेच माननीय मंत्र्यांना उत्तरासाठी 20 मिनिटे वेळ दिला जाईल. त्यानंतर कोणालाही या प्रस्तावावर बोलण्यास संधी दिली जाणार नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी ऑन लेग आहे ना ?

**उप सभापती** : होय. आता मी सभागृहाची विशेष बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 11.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.02 ते 11.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**वर्धा पॉवर कंपनीने (ता.वरोरा जि.चंद्रपूर) मोहबळा ग्रामपंचायतीची धनादेश न वटवून फसवणूक केल्याबाबत**

**(१) * ३७९८५ श्री.मितेश भांगडिया, श्री. शरद रणपिसे, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहबळा (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) ग्रामपंचायतीला वर्धा पॉवर कंपनीने दिलेला कर रकमेचा धनादेश न वटवून ग्रामपंचायतीची फसवणूक केल्याची घटना दिनांक ९ जानेवारी, २०१३ रोजी उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रकमेची पूर्तता करु नये अशी लेखी सूचना कंपनीने बँकेला दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धनादेश प्राप्त झाल्याबरोबर ग्रामपंचायतीने कर वसूल झाल्याची पावती देखील दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामपंचायतीची फसवणूक करणाऱ्या कंपनीच्या संचालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री. जयंत पाटील यांच्याकरिता** : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) सरपंच ग्रामपंचायत मोहबळा यांनी ठाणेदार पोलीस स्टेशन, वरोरा यांच्याकडे दिनांक ०७.०१.२०१३ रोजी तक्रार केली असुन पोलीस स्टेशन वरोरा कडून याबाबत चौकशी सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये मला आपल्या अनुमतीने थोडी दुरुस्ती करावयाची आहे. प्रश्न क्रमांक 1 च्या उत्तरामध्ये 'होय' नंतर ' अशी तक्रार ग्रामपंचायतीने दिनांक 7.11.2013 रोजी केली आहे' असे वाचावे.

श्री. मितेश भांगडिया : सभापती महोदय, हे प्रकरण मोहबळा ग्रामपंचायतीच्या मालमत्ता कराच्या संदर्भात आहे. वर्धा पावर कंपनीने 3 वर्षाचा 32,99,703 रुपये मालमत्ता कर टप्प्याटप्प्याने भरण्याचे आश्वासन 100 रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिले होते. त्यापैकी एक दशांश हिस्सा

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37985 ..... श्री. मितेश भांगडिया ....

म्हणजे 3 लाख आणि काही हजार रुपयांचा चेक सदर कंपनीने ग्रामपंचायतीला दिला. ग्रामपंचायतीने तो चेक वटविण्यासाठी टाकल्यानंतर सदर कंपनीने बँकेला तो चेक वटवू नये असे पत्र दिलेले आहे. त्यामुळे त्यांच्यावर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट, 1881 प्रमाणे जी कारवाई करावयास पाहिजे ती झालेली नाही. ती कारवाई केव्हा करणार ? शासन मोहबळा ग्रामपंचायतीला हा मालमत्ता कर वसूल करुन देणार का किंवा त्या कंपनीला हा मालमत्ता कर देण्यास भाग पाडणार का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मालमत्ता कराची नोटीस त्या संबंधित कंपनीला देण्यात आली होती. ही नोटीस दिल्यानंतर संबंधित कंपनी हायकोर्टात गेली. हायकोर्टात गेल्यानंतर त्या दिवशी जप्तीचे आदेश घेऊन तहसीलदारांसमवेत ग्रामपंचायतीचे अधिकारी त्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांनी 10 टक्के म्हणजे 3 लाख 30 हजार रुपयांचा चेक दिला. हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतर त्यामध्ये जर स्टे मिळाला तर देऊ नये असे अंडरस्टँडींग ग्रामपंचायत व त्या कंपनीमध्ये झाले. परंतु हायकोर्टाने त्यामध्ये स्टे दिला आणि 25 टक्के रक्कम जी वादातील आहे ते 8 लाख रुपये हायकोर्टाने भरुन घेतले. आता हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. परंतु शासन म्हणून आमची निश्चितपणे अशी भूमिका असणार आहे की, हा मालमत्ता कर त्या कंपनीने ग्रामपंचायतीला भरावाच लागेल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37985.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, संबंधित कंपनीला डायरेक्ट हायकोर्टामध्ये जाता येत नाही. त्यांनी प्रथम पंचायत समितीकडे दाद मागितली पाहिजे. त्यांनी नाकारल्यानंतर स्थायी समितीसमोर गेले पाहिजे. स्थायी समितीच्या संदर्भात हायकोर्टाने अनेक जज्जमेण्ट दिलेले आहेत. स्थायी समितीने फायनल केलेला कर हायकोर्टाने कधीही कमी केलेला नाही. रायगड पंचायत समितीला अनेक वेळा अशा प्रसंगांना सामोरे जावे लागलेले आहे. त्यामुळे संबंधित तहसीलदार हायकोर्टात गेल्यानंतर हायकोर्टाने स्टे दिलेला आहे असे तहसीलदार सांगत आहेत. परंतु ते कोणत्या अधिकारात हायकोर्टात गेले ? पंचायत समिती व स्थायी समितीसमोर जाण्याचा अधिकार असताना डायरेक्ट हायकोर्टात जात असतील तर ते चुकीचे आहे. त्यामुळे त्या तहसीलदारांवर शासन कारवाई करणार काय ?

तसेच अनेक प्रकल्प उभे राहून त्यांच्याकडून कर भरला जात नाही. त्यामुळे पंचायत समितीच्या क्षेत्रावर त्या कंपनीचा खूप मोठा बोजा येतो. शासनाने या संदर्भात ठाम धोरण स्वीकारुन उभे राहिलेले किंवा येणारे प्रकल्प असतील तर त्यांच्याकडून कर वसूल करणार आहे का, रायगड जिल्ह्यात निमशासकीय प्रकल्पाकडूनही कर वसूल केला जातो. त्यामुळे शासन स्पष्ट धोरण जाहीर करील काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, त्या पॉवर कंपनीने पंचायत समिती, स्थायी समितीकडे दाद मागितली होती. परंतु त्यांनी त्यांची मागणी अमान्य केली होती. त्यांनी सर्व प्रक्रिया पार केल्यानंतर ते हायकोर्टात गेले होते. एमआयडीसीने सुध्दा शासनाविरुध्द केसेस घातल्या होत्या. त्यांचे असे म्हणणे की, मालमत्ता कर देता येणार नाही. परंतु त्यापैकी अनेक निर्णय शासनाच्या बाजूने लागलेले आहेत. नुकताच मद्रास हायकोर्टाने एसइझेडच्या विरोधात निकाल दिलेला आहे. त्यामुळे शासनाची सकारात्मक भूमिका असून एसइझेड अंतर्गत कंपनी असेल किंवा इतर कंपन्या असतील त्यांना मालमत्ता कर भरावाच लागेल.

श्री.हेमंत टकले : पंचायत राज्य व्यवस्थेमध्ये पंचायत समित्यांचे आर्थिक सबलीकरण करण्याच्या दृष्टीने कर वसूल होणे गरजेचे आहे. त्यावेळी ही कंपनी कर भरण्यासाठी नकार देते त्यावेळी कंपनी का नाकारत आहे याची शासनाने माहिती घेतली आहे काय आणि घेतली असल्यास त्यमाध्ये काय आढळले आहे ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37985.....

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : त्या कंपनीला मालमत्ता कर भरावाच लागेल. त्यांनी काय बाजू मांडली यापेक्षा शासनाला कर भरणे अपेक्षित आहे. हायकोर्टाने स्थगिती देत असताना त्यांच्याकडून 30 टक्के रक्कम भरुन घेतलेली आहे. सध्या हे प्रकरण प्रलंबित आहे. त्या कंपनीकडून कर वसूल केला जाईल ही शासनाची भूमिका आहे.

ॲड.आशिष शेलार : हायकोर्टाने स्थगिती दिलेली आहे आणि शासन हतबल आहे असे वारंवार मंत्री महोदयांच्या उत्तरावरुन दिसून येत आहे. निगोशिएबल इन्स्ट्रूमेण्ट ॲक्ट हा स्वतंत्र ॲक्ट आहे. या ॲक्टच्या तरतुदीनुसार चेक बाऊन्स झाला किंवा चेक स्टॉप केला तर एनआयॲक्ट खाली केस दाखल करावी लागते. हायकोर्टाने निगोशिएबल इन्स्ट्रूमेण्ट ॲक्ट खाली केस दाखल करण्याला बंदी घातली आहे काय. बंदी घातली नसेल तर या ॲक्टखाली केस दाखल केली जाणार आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, 17 तारखेला चेक दिल्यानंतर 18 तारखेला हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. त्यामुळे ताबडतोब त्याच दिवशी संबंधित कंपनीने ग्रामपंचायतीला कळविले आहे की, हा चेक देण्यात येऊ नये. त्यांनी पेमेण्ट थांबविण्याचे निर्देश दिले होते. तरी सुध्दा तांत्रिक बाबी तपासून योग्य तो गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याचा तपास चालू आहे. त्यात ते दोषी आढळले तर निगोशिएबल इन्स्ट्रूमेण्ट ॲक्ट खाली सुध्दा गुन्हा दाखल केला जाईल.

--------

3....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

NTK/ D/ D/ ST/ KTG/

**पळसन (जि.नाशिक) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनीवर झालेल्या बलात्काराच्या घटनेनंतर आदिवासी विभागाने पंधरा कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेतल्याबाबत**

**(2) * 37717 डॉ.दीपक सावंत** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पळसन (जि.नाशिक) आश्रमशाळेतील विद्यार्थीनींवर झालेल्या सामुदायिक बलात्काराच्या घटनेची दखल घेत आदिवासी विकास विभागाने निलंबित केलेल्या पंधरा कर्मचाऱ्यांचे निलंबन अवघ्या चोवीस तासातच मागे घेतले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, निलंबन मागे घेण्याची कारणे काय आहेत, तसेच याबाबत करण्यात आलेल्या चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) या प्रकरणाची अद्याप चौकशी पूर्ण झाली नसल्यास, याबाबत सद्य:स्थिती काय आहे, तसेच विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (1) (2), व (3) शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा,पळसन,ता.सुरगाणा,जि.नाशिक येथील विद्यार्थीनीवर दिनांक 23/12/2012 रोजी झालेल्या बलात्काराच्या घटनेची दखल घेत सदर आश्रमशाळेचे वर्ग-3 संवर्गातील 9 कर्मचारी व वर्ग-4 संवर्गातील 6 कर्मचारी असे एकूण 15 कर्मचाऱ्यांना निलंबित केले होते व त्याऐवजी पर्यायी व्यवस्था म्हणून अन्य आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांना स्थानांतराने सदर आश्रमशाळेवर पदस्थापना देण्यात आली होती.

तथापि, सदर आश्रमशाळेतील इ 1 ली ते 12 वी च्या विद्यार्थ्यांनी निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांना कामावर घेतल्याशिवाय जेवण करणार नाही व वर्गातही बसणार नाही. निलंबित कर्मचाऱ्यांना कामावर न घेतल्यास आयुक्त कार्यालयात पायी जाऊन तेथे आंदोलन करु असा पवित्रा घेतला. विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्याकरिता विद्यार्थ्यांचे पालक व पंचक्रोशीतील नागरिक जमा झाल्यामुळे व परिस्थिती हाताबाहेर जात असल्यामुळे जमावाची मानसिकता लक्षात घेता व विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार मुख्याध्यापक व अधिक्षक वगळता उर्वरित वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेवून त्यांना त्याच शाळेवर दि.1.1.2013 पासून पुन:स्थापित केले.

सद्य:स्थितीत शासकीय आश्रमशाळा, पळसन येथे मुख्याध्यापक व अधीक्षक वगळता पूर्वीचेच कर्मचारी कार्यरत आहेत. मुख्याध्यापक व अधीक्षक हे सद्यस्थितीत निलंबित असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सामुदायिक बलात्काराचा प्रश्न आहे. नाशिक जिल्ह्यातील पळसन येथील आश्रमशाळेमध्ये हा गुन्हा घडलेला आहे. अशा अनेक आश्रमशाळांमध्ये असे प्रकार घडत असतात. त्यापैकी काही गुन्हे सरफेसवर येतात तर काही गुन्हे दाबले जातात. या दृष्टीकोनातून मी 3 महत्वाचे प्रश्न विचारु इच्छितो. या आश्रमशाळेची स्थिती अत्यंत वाईट होती. त्या शाळेचे दरवाजे, खिडक्या व कम्पाऊण्ड तुटलेल्या अवस्थेत होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37717... डॉ. दीपक सावंत...

दुसरी गोष्ट अशी की, ही मुले तेथे सातत्याने येत होती. त्या शाळेत महिला अधीक्षिका नव्हत्या. त्या शाळामध्ये महिला अधीक्षिका नाहीत हे प्रकल्प अधिका-यांच्या लक्षात आले नाही काय, या आश्रमशाळेची परिस्थिती वाईट आहे हे प्रकल्प अधिका-यांच्या लक्षात आले नाही काय ? ही मुले वारंवार येत होती, छोट्या मोठ्या घटना तेथे घडत होत्या हे प्रकल्प अधिका-यांच्या निदर्शनास आले नाही काय ? या प्रकरणी 15 कर्मचा-यांना निलंबित करण्यात आलेले आहे. खरे तर या प्रकरणी प्रकल्प अधिकारी किंवा उप प्रकल्प अधिकारी यांच्यावर काय कारवाई करण्यात आलेली आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांनी या घटनेची बरीच माहिती घेतलेली आहे. ही आश्रमशाळा 1972ला उघडण्याचा निर्णय झाला. 12 कोटीची नवीन इमारत बांधण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिलेली आहे. माझ्याकडे त्याबाबतच्या तारखा देखील आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे जी घटना घडली ती ग्राऊंडच्या पलीकडे दुपारी 3.00 वाजता घडली. 12वीमध्ये शिकणारी मुलगी आपल्या मैत्रीणी बरोबर बाहेर जाते, मित्राला भेटते. त्यांनतर हा प्रकार घडलेला आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी झालेली आहे. 1/3ला ही केस न्यायप्रविष्ट झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रकल्प अधिका-यांवर का कारवाई केली नाही असा प्रश्न विचारला. या प्रकाराची दूरध्वनीवरुन माहिती मिळाली. पहिल्या दिवशी लिहून दिले "नाही", मुलीने लिहून दिले की, तसे काही झालेले नाही. वडिलांनी देखील "नाही" असे लिहून दिले. पण सुमोटो आपल्याच माणसाचे चौकशी केली. तरी देखील असे काही घडले नाही असे मुलीने सांगितले. एक दिवस प्रकल्प अधिकारी तेथे गेले त्यांनी कौन्सिलिंग केले, त्यांनंतर 24/25 तारखेला तीला घेऊन आले आणि 27 तारखेला केस नोंदविलेली आहे.

ही घटना रविवारी घडली. त्या ठिकाणी मुख्याध्यापक हजर नव्हते. ते संध्याकाळी आले म्हणून त्यांच्यावर कारवाई केली. त्या घटनेच्या दिवशी रविवार असल्यामुळे रविवारी जे लोक गैरहजर होते त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. त्यांना परत घेण्याचे कारण असे की त्याबाबतीत तेथील मुलांनी सत्याग्रह केला म्हणून त्यांना परत घेतले. परंतु दोषी माणसावर कारवाई केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे यामध्ये मोठ्या अधिका-यांची चूक आहे काय हे तपासले जाईल आणि ते तपासून वरिष्ठ अधिका-यामार्फत चौकशी करुन कारवाई केली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37717...

श्री. दिवाकर रावते : या प्रकरणी चौकशी करु असे सांगण्याकरिता मंत्री महोदयांची काय आवश्यकता आहे. या प्रकरणी काय कारवाई केली हे त्यांनी सांगितले पाहिजे. विषय अत्यंत ज्वलंत आहे.

श्री. बबनराव पाचपुते : या प्रकरणी पोलिसांकडून सर्व तपास करुन 1/3ला केस कोर्टात दाखल केलेली आहे. हे सर्व प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणी माहिती मिळाल्यानंतर संबंधित अधिकारी तेथे गेले, प्रकल्प अधिकारी तेथे गेले, वरिष्ठ अधिकारी तेथे गेले. त्यांनी ही केस रजिस्टर करण्यास लावलेली आहे. ही वस्तुस्थिती येथे सांगणे काही चूक नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : 556 अधीक्षिकांच्या नेमणुकांना स्थगिती दिलेली आहे. या जागा गेल्या वर्षभरापासून भरलेल्या नाहीत. महिलांवरील अत्याचाराचे प्रसंग वारंवार घडत आहेत याकडे शासन गांभीर्याने पहात नाही. तेव्हा स्टे उठवून 556 अधीक्षिकांच्या जागा केव्हा भरण्यात येणार आहेत ?

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांनी योग्य प्रश्न विचारला. पदे भरण्यासाठी परवानगी मिळालेली आहे. परंतु ही परवानगी मिळत असताना मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमण्यात आली. त्या समितीने काही पदे अपगत करण्यास सांगितले. त्यावर पुन्हा चर्चा होऊन श्री. आर.आर.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली, त्या समितीने दिलेला अहवाल मुख्य सचिवांनी मान्य केलेला आहे. पदे भरण्यास परवानगी मिळालेली आहे. अधीक्षिका कोणत्या कॅटेगरीच्या घ्याव्यात हा प्रश्न होता. आता तोही प्रश्न सुटलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ ST/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 11:30

ता.प्र.क्र.37717.... श्री.बबनराव पाचपुते...

ही पदे प्रत्यक्षात तीन महिन्यांच्या आत भरली जातील. जून महिन्यापासून शाळा सुरु होतील, त्या अगोदर ही पदे भरण्यात येतील. पदे भरण्या बाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी तीन महिन्याच्या आत केली जाईल.

श्रीमती विद्या चव्हाण : तीन महिन्यापूर्वी एका विद्यार्थिनीवर सामुहिक बलात्काराची घटना घडलेली आहे, घटना अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. या प्रश्नाच्या उत्तरावरुन लक्षात येत नाही की, त्या विद्यार्थिनीवर बलात्कार कोणी केलेला आहे ? या प्रकरणी मुख्यापक, अधीक्षक यांच्यासह 15 कर्मचाऱ्यांना निलंबित केलेले आहे. या प्रकरणातील ते खरे आरोपी आहेत म्हणून त्यांना निलंबित केले आहे काय, जर, ते या प्रकरणातील खरे आरोपी नसतील तर त्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करुन अन्याय का केला आहे, त्या विद्यार्थिनीला विश्वासात घेऊन बलात्कार कोणी केला अशा प्रकारची माहिती विचारली आहे काय, या प्रकरणाची चौकशी योग्य मार्गाने व्हावयास पाहिजे ती का होत नाही ?

श्री. बबनराव पाचपुते : हा प्रश्न वेगळा आहे आणि सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी वेगळया स्वरुपाचा प्रश्न विचारलेला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन जे आरोपी आहेत, त्यांना अटक करण्यात आली असून ते सध्या तुरुंगात आहेत. अटक असलेल्या आरोपी विरुध्द चार्जशीट दाखल झालेली आहे. सदर विद्यार्थिनींची वैद्यकीय तपासणी करुन त्यासंबंधीचा अहवालही आलेला आहे. तो अहवाल चार्जशीट दाखल करताना जोडलेला असल्यामुळे त्या आरोपींना जामीन मिळालेला नाही. या ठिकाणी प्रश्न वेगळया स्वरुपाचा विचारला गेला आहे. काही अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित करुन परत का कामावर घेण्यात आले. या घटनेस जे जबाबदार होते, त्यांच्या विरुध्द निलंबनाची कारवाई केलेली आहे. दिनांक 23,24 आणि 25 डिसेंबर, 2012 रोजी पोलिसांनी विद्यार्थिनीच्या वडिलांचा जबाब घेण्यात आला त्यांच्याकडून नकारार्थी जबाब आला. तिच्या वडिलांकडून अर्ज घेतल्यानंतर हे प्रकरण पोलीस स्टेशनमध्ये रजिस्टर्ड झाले ही वस्तुस्थिती आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : या अल्पवयीन विद्यार्थिनीवर सहा व्यक्तींनी बलात्कार केलेला आहे. आश्रमशाळेतील काही कर्मचारी आणि गावातील काही माणसे यांचे संगनमत असते. त्या ठिकाणी सर्व व्यवहार हा अंडरस्टॅडींगने चाललेला असतो. या आश्रमशाळेसंबंधी अशा प्रकारच्या तक्रारी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आल्या होत्या काय, तसेच या प्रकरणाच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी यांचे विरुध्द काय कारवाई करण्यात आली, महाराष्ट्रातील आश्रमशाळांमधील विद्यार्थिनी सुरक्षित नाहीत, त्या आश्रमशाळांमधील विद्यार्थिनींना सुरक्षितता मिळावी म्हणून प्रकल्प अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्या प्रकारची जबाबदारी टाकणार आहात?

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. ही घटना घडली आहे, त्याबाबत संपूर्ण चौकशी करुन संबंधित आरोपींना अटक करुन सदर आरोपी तुरुंगात आहेत. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या बाबतीत भाष्य करणे बरोबर होणार नाही. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी महाराष्ट्रातील एकूण आश्रमशाळांबाबतचा मुद्दा उपस्थिती केला आहे. ही अतिशय जुनी आश्रमशाळा आहे, या आश्रमशाळेत पूर्वीच्या कालावधीत अशा प्रकारची एकही घटना घडलेली नाही. ही विद्यार्थिनी स्वत:हून तिच्या मैत्रिणी बरोबर दुपारी 3.00 वाजता तेथील लोकांची नजर चुकवून बाहेर गेलेली होती. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे या बाबतीत मी भाष्य करु शकत नाही. परंतु या प्रकरणी जबाबदारी फिक्स करुन संबंधित कर्मचाऱ्यांना सस्पेंड केलेले आहे. या आश्रमशाळेत अशा प्रकारची ही पहिलीच घटना घडली. तेथे कोणाचेही जाणे-येणे नव्हते. या घटनेच्या बाबतीत विद्यार्थिनीचे जबाब नोंदवून घेण्यात आलेले आहे. पुढे अशा घटना घडू नये म्हणून शासनाने काळजी घेतलेली आहे व विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसंबंधी सर्व आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांना सूचना दिलेल्या आहेत.

श्री.विक्रम काळे : माननीय मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर आणि अचूक उत्तर दिलेले आहे असे मला वाटते. ही घटना अतिशय निंदनीय आहे या बाबतीत दुमत असण्याचे कारण नाही. परंतु अशा प्रकारची कोणतीही घटना घडली तर बिचाऱ्या शिक्षकांविरुध्द कारवाई केली जाते. या ठिकाणी कर्मचाऱ्यांवरील कारवाई मागे घेतलेली आहे. ही घटना शाळेच्या बाहेर घडलेली आहे, त्यामुळे या आश्रमशाळेतील मुख्याध्यापक आणि अधीक्षक त्यांच्यावरील सुध्दा कारवाई मागे घेणे गरजेचे आहे. ही घटना शाळेच्या बाहेर घडलेली असल्यामुळे मुख्याध्यापक आणि अधीक्षकांचा यामध्ये कोणताही दोष नाही. ज्यांनी दोष केला आहे, त्यांना अटक करण्यात आलेली आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. मुख्याध्यापक आणि अधीक्षकांचा काहीही दोष नसल्यामुळे त्यांच्यावरील कारवाई मागे घेणे गरजेचे आहे....

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ D/ KTG/ ST/गितेनंतर 11:35

श्री.विक्रम काळे........... ता.प्र.क्र.37717....

.......(अडथळा)......तुम्ही तुमचे मत मांडा, आम्हाला आमचे मत मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी नेमका प्रश्न विचारावा. सगळ्या गोष्टीचे समर्थन करु नये, ते चुकीचे आहे. नेमका प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय,मी समर्थन करीत नाही. चुकीच्या पध्दतीने कारवाई झालेली आहे. त्याची दखल आपण घेतली पाहिजे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी म्हटल्याप्रमाणे प्रकल्प अधिकाऱ्यांबाबत तपास करुन कारवाई केली पाहिजे. मुख्याध्यापकांविरुध्द चुकीच्या पध्दतीने कारवाई केली आहे ती मागे घेण्यात येईल काय?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रकरणात चुकीची कारवाई केलेली नाही. चौकशी करुन कारवाई केलेली आहे. रविवारचा दिवस असला तरी जबाबदारी असताना मुख्याध्यापक त्या आश्रमशाळेत हजर नव्हते. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई केली आहे, ती चुकीची नसल्यामुळे मागे घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना असे म्हटले की, ती मुलगी स्वत:हून आश्रमशाळेतून बाहेर गेली होती. मित्रांबरोबर बाहेर गेल्यानंतर तिच्यावर बलात्कार झाला. बलात्कार झाल्याचे सिध्द झाले आहे. बलात्कार संमतीने झाला की असंमतीने झ ाला हे महत्वाचे नसून बलात्कार झाल्याचे सिध्द होणे हे महत्वाचे आहे. याकरिता जबाबदार असलेल्या प्रकल्प अधिकारी व त्यांचे दुय्यम अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हे प्रकरण आता न्यायप्रविष्ठ आहे. न्यायप्रविष्ठ प्रकरणाबाबत अधिक भाष्य करणे अडचणीचे ठरु शकते. माननीय सदस्य सांगतात त्यांची चौकशी केली जाईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, ही गंभीर घटना घडलेली आहे. माननीय सदस्यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या अनेक घटना राज्यातील आश्रमशाळांमध्ये घडत असतात. यापुढे अशी घटना घडू नये म्हणून कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या संदर्भात वरिष्ठांची एक समिती तयार केली असून काय करावे या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत. यापुढे असे होऊ नये म्हणून दक्षता घेतली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37717....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना असे म्हटले की, ती मुलगी स्वत:हून बाहेर गेली. या वाक्यातील 'स्वत:हून' हा शब्द रेकॉर्डवरुन वगळण्यात यावा.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रकरणात मुलीचे नाव घेणे बरोबर नाही. तीच जबाबदार आहे. तिची जबाबदारी दाखवावयास मी तयार आहे. आता ही गोष्ट न्यायप्रविष्ठ आहे.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नाशिक येथील ओढा व सयद पिंप्री येथील प्लॉटधारकांची केलेली फसवणूक**

**(३) * ३६९५१ श्रीमती शोभाताई फडणवीस** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील ओढा व सयद पिंप्री येथील साडेतीनशे एकर जमिनीच्या व्यवहाराचे अधिकार असल्याचे भासवत "विक्रोत हॅपी होम्स" ने राज्यातील हजारांहून अधिक प्लॉटधारकांची संबंधित महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने फसवणूक केल्याचे माहे डिसेंबर, २०१२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधितांवर कारवाई करुन व फसवणूक करण्यात आलेल्या प्लॉटधारकांच्या पैशाची वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१), (२) व (३) होय, याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे तक्रार प्राप्त झाली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत आहे. चौकशी अंती दोषी आढळणाऱ्या सर्व संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, किमान एक ते दीड महिना अगोदर प्रश्न विचारले जातात. या प्रकरणाची चौकशी पूर्ण होऊन अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अहवालानुसार संबंधित दोषींविरुध्द अद्याप कारवाई का केली नाही?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली असे उत्तर मी दिलेले नाही. जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली होती, त्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत आहे. चौकशीअंती दोषी आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : डिसेंबर, २०१२ मध्ये हा प्रकार उघडकीस आलेला होता व त्या अनुषंगाने तक्रार करण्यात आली होती. तीन महिने उलटूनही तक्रारीची चौकशी अद्याप सुरु आहे. मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचे लोकांचे म्हणणे आहे. किती दिवसात चौकशी पूर्ण करुन संबंधितांवर कारवाई केली जाईल?

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३६९५१.........

श्री.बाळासाहेब थोरात : विषयाचे स्वरुप खूप मोठे आहे. ओढा गावामध्ये 151 हेक्टर क्षेत्र 1996 मध्ये एन.ए.करण्यात आले आहे. सयद पिंप्री गावामध्ये 56 हेक्टर क्षेत्र 1998 साली एन.ए.करण्यात आले. प्लॉटची संख्या खूप मोठी आहे. ओढा गावात जवळपास 1900 प्लॉट पाडण्यात आले आणि सयद पिंप्री गावात 2790 प्लॉट पाडण्यात आले. तक्रार अलीकडच्या कालखंडात आलेली होती.

नंतर एस.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 36951......

श्री. बाळासाहेब थोरात ....

यांसदर्भातील तक्रारी मुखत्यार पत्राच्या संदर्भात असून यामध्ये ज्या सहया घेण्यात आल्या आहेत त्या बनावट आहेत अशा प्रकारच्या यामध्ये मुख्यत्वे तक्रारी आहेत. त्यामुळे यातील तक्रारीचे स्वरुप पाहता मुखत्यार पत्र, प्लॉट,कागदपत्रे, कोणते मुखत्यार पत्र जोडले गेले अशा प्रकारे मोठे स्वरुप या प्रकरणात आहे. त्यामुळे या चौकशीचे काम जवळपास सहा महिने चालणार आहे. यामध्ये मोठया प्रमाणात तक्रारी असून यामध्ये या जागेच्या प्लॉटमध्ये 250 बंगले उभे राहिलेले आहेत. त्यामुळे या प्रकरणातील सर्व बारकाव्यांचा अभ्यास करण्यासाठी चौकशीला वेळ लागणार आहे. हे सर्व प्रकरण बारकाईने पूर्ण करण्यासाठी कमीतकमी सहा महिन्यांचा कालावधी लागेल अशी परिस्थिती आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय,जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडे तक्रार केव्हा आली ? या प्रकरणाची चौकशी कोणत्या स्तरावरील अधिकारी करीत आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडे 2010 च्या लोकशाही दिनामध्ये तक्रार करण्यात आली होती. 15 सीव्हील सूटची चौकशी करण्याचे काम सुरु आहे. या केसमध्ये मोठया प्रमाणात गुंता असून ही सर्व चौकशी पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, या प्रकरणाची तक्रार सन 2010 मध्ये आली होती आता सन 2013 साल सुरु आहे. या चौकशीचे काम पूर्ण होण्यासाठी अजून 6 महिन्यांचा कालावधी लागेल अशी माहिती मंत्री महोदयांनी दिली आहे. हे प्रकरण गुंतागुंतीचे असल्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, विक्रोत हॅपी होम आणि संबंधित अधिकाऱ्यांवर पहिल्यांदा एफआयआर दाखल करुन नंतर विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे काय ? असे झाले नसेल तर एफआयआर दाखल करुन संबंधितांची सीआयडी चौकशी सुरु केली तर त्यामध्ये दोषी अधिकारी शोधण्यामध्ये कदाचित शासनाला लवकर संधी मिळेल असे शासनाला वाटते काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या प्रकरणात मुख्यत्वे तपासणीचे काम मुखत्यार पत्राचे असून हे काम महसूल विभागाचे असल्यामुळे यामध्ये सीआयडी चौकशीची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 36951......

श्री. बाळासाहेब थोरात ....

आवश्यकता नाही. या प्रकरणाच्या तपासणीचे काम अतिरिक्त जिल्हाधिकारी करीत असून यामध्ये काहींचे जबाब नोंदण्याचे काम पूर्ण झालेले आहे. सीआयडीकडे रेव्हेन्यूचे काम तपासण्याची कोणतही यंत्रणा नसते..

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, या प्रकरणात बोगस पेपर्स बनविले गेले आहेत त्यामुळे या प्रकरणाच्या चौकशीचे काम सीआयडीकडे देण्याची आवश्यकता असल्यामुळे या प्रकरणाच्या चौकशीचे काम सीआयडीकडे दिले जाणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या जमिनीचा एनए 1996 मध्ये झाला होता. या ठिकाणी प्लॉट पाडून त्या प्लॉटची विक्री सुध्दा झाली असून त्या ठिकाणी 250 बंगले उभे राहिलेले आहेत. त्या ठिकाणच्या जमिनीच्या किंमती वाढल्यानंतर ही तक्रार देण्यात आलेली आहे. लोकशाही दिनामध्ये ही तक्रार आल्यामुळे अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे या प्रकरणाची चौकशी करण्याचे काम देण्यात आलेले आहे. येत्या 3 महिन्यामध्ये या चौकशीचे काम पूर्ण करावे अशा सूचना संबंधितांना देण्यात येतील.

**उप सभापती** : आता ता.प्र.क्र. 37196 घेण्यात येईल.

----------

.....3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निरंजन डावखरे : माननीय सभापती महोदय, ता.प्र.क्र. 37196 व ता.प्र.क्र. 40518 या दोन्ही प्रश्नांचा विषय एकच असल्यामुळे हे दोन्ही प्रश्न एकत्र घ्यावेत अशी विनंती आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. ता.प्र.क्र. 37196 व ता.प्र.क्र. 40515 हे दोन्ही प्रश्न एकत्र घेतली जातील.

**सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खनन होत असल्याबाबत**

**(४) * ३७१९६ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रमेश शेंडगे, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे, श्री.सुभाष चव्हाण, श्री.विनायकराव मेटे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतीश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालयाने गौण खनिज उत्खननासाठी पर्यावरण दाखला अनिवार्य करण्याचे निर्देश दिलेले असताना सुध्दा सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खनन सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१), (२) व (३) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २७/०२/२०१२ रोजीच्या आदेशानुसार गौणखनिज उत्खननापुर्वी पर्यावरण अनुमती अनिवार्य केली आहे. तसेच केंद्रशासनाने दिनांक १६/०८/२०१० नुसार सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात अधिस्थगन लागू केले आहे. केंद्र शासनाने लागू केलेल्या अधिस्थगनामुळे पर्यावरण अनुमती प्राप्त होत नसल्याने, गौणखनिज उत्खननास परवानगी देता येत नाही.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुक रोखण्यासाठी दक्षता पथकांची स्थापना करण्यात आली असुन, पथकाने ४८ प्रकरणात रूपये ८,२९,४३०/- इतका दंड आकारला आहे. तसेच एका प्रकरणात पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

**ठाणे जिल्हयातील आदिवासींचा गौण खनिज उत्खननाचा परवाना बंद केल्याबाबत**

**(८८) * ४०५१८ श्री. निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील आदिवासींना घरकुल मंजूर झालेले असून देखील शासनाने गौण खनिज उत्खननाचा परवाना बंद केल्याने बांधकामास लागणारे रेती, खडी, डबर, मुरुम व माती इत्यादी साहित्य मिळत नसल्याने घरकुल बांधण्याची कामे रखडली असून त्यामुळे विक्रमगड या आदिवासी तालुक्यातील हजारो कुशल कारागीर व मजूर बेरोजगार झाले आहेत, हे खरे आहे काय,

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(२) तसेच आदिवासी भागात रस्ते, पूल, साकव, संरक्षक भिंत व विहीरी इत्यादी कामे निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कामाचा कार्यादेश मिळालेला असतानाही गौण खनिजाचा परवाना मिळत नसल्याने बंद आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) आदिवासी भागातील विकास व घरकुलांची कामे पूर्ण होण्यासाठी व बेरोजगारांना काम मिळण्यासाठी अटी शिथिल करुन गौण खनिज उत्खनन व वाहतूकीचा परवाना देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) (३) व (४) शासनाने गौण खनिज उत्खननावर कोणत्याही प्रकारची बंदी घातलेली नाही. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २७/०२/२०१२ रोजीच्या आदेशानुसार गौणखनिज उत्खननापूर्वी पर्यावरण अनुमती अनिवार्य झाल्याने, गौण खनिज उलब्धपतेबाबत प्रश्न निर्माण झालेला आहे. याबाबत शासनाने वेळोवेळी कार्यवाही करुन गौणखनिज उत्खननासाठी पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेण्यासाठी सर्व जिल्हाधिकारी यांना सुचना दिल्या आहेत. तसेच सर्व जिल्हाधिकारी यांनी खाणपट्टे तसेच वाळू/रेती घाटांसाठी राज्य स्तरीय पर्यावरण समितीसमोर पर्यावरण अनुमतीसाठी सादरीकरण केले आहे. काही जिल्हे वगळता पर्यावरण अनुमती प्राप्त झाली आहे.

तात्पुरते परवाने देण्यासाठी पर्यावरण अनुमती घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांचेकडून कार्यवाही सुरु आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व राज्यात अस्तित्वात असलेले गौणखनिज नियम विचारात घेऊन, महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास आणि विनयमन) नियम २०१३ तयार करण्यात आले आहेत. त्यास मा. सर्वोच्च न्यायालयाची अनुमती प्राप्त झाल्यावर या नियमांनुसार कार्यवाही करता येईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, उत्तरामध्ये ४८ प्रकरणात दंड आकारण्यात आला असून केवळ एका प्रकरणामध्ये पोलिसांकडे गुन्हा दाखल केला आहे असे उत्तरामध्ये म्हटले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, जर ४८ प्रकरणांपैकी एकच गुन्हा दाखल केला असेल तर तो एक विशेष गुन्हा होता काय ? सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये अशा प्रकारच्या आपण किती परवानग्या दिल्या होत्या, परवानग्या दिल्या जात असतांना अटीचे पालन होते की, नाही यासंदर्भात पाहणी केली जाते काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37196 व ता.प्र.क्र.40518 ....

श्री.प्रकाश बिनसाळे..

अत्यंत छोट्या रस्त्यावरून तेथे शेकडोने ट्रक्स जात आहेत. त्याचा स्थानिक रहिवाशांना त्रास होतो. तेव्हा ह्या सर्व खाणी अटींचे पालन करून सुरू आहेत काय, याची आपण शहानिशा केली आहे काय ? 48 प्रकरणात आपण दंड आकारला आहे. त्यांच्या विरोधात आपण पोलीस कारवाई करणार आहात काय ? असे माझे तीन प्रश्न आहेत.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, गौण खनिज हा विषय सिंधुदुर्ग जिल्ह्या पुरता मर्यादित राहिलेला नाही. तो देशात देखील काही कारणांमुळे महत्त्वाचा झालेला आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांमधील स्वरूप आणखी वेगळे आहे. वेस्टर्न घाट इकॉलॉजिकल पॅनलने आपला अहवाल दिला आहे. त्यांनी अत्यंत संवेदनशील क्षेत्र निवडले आहे. त्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पूर्वेकडील भाग आणि रत्नागिरी जिल्ह्याचा समावेश केला आहे. ... (अडथळा).... सांगली जिल्ह्यामध्ये भेट होत नसल्यामुळे सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे बोलत आहेत असे दिसते.

डॉ.पतंगराव कदम (बसून) : सभापती महोदय, सांगली जिल्ह्यात देखील एकत्रच कार्यक्रम होतात.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, तरी देखील त्यांच्या येथे गप्पा सुरू आहेत. त्यामुळे त्यांना आपण ताकीद द्यावी.

**उप सभापती** : आपण मला सांगितले की, सन्माननीय मंत्री महोदयांना ताकीद द्यावी. मी येथे त्यांना ताकीद देईन. पण बाहेर ते माझे उट्टे काढतील त्याचे काय ?

श्री.बाळासाहेब पाटील : सभापती महोदय, तसे होणार नाही. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे सर्वांनाच मदत करणारे आहेत. वेस्टर्न घाट इकॉलॉजिकल पॅनलने मॉनेटोरियम लावला आहे. त्यांनी संवेदनशील क्षेत्राला पूर्णपणे बंदी लावली आहे. त्यात या दोन जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यामुळे यास देखील मॉनेटोरियम लावण्यात आला आहे. आता देखील सुप्रीम कोर्टात केस सुरू आहे. सुप्रीम कोर्टाने सन 2012 मध्ये निर्णय दिला आहे. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37196 व ता.प्र.क्र.40518 ....

श्री.बाळासाहेब थोरात...

आपण 5 हेक्टरच्या आतील पर्यावरणाचे मूल्यांकन करीत नव्हतो. पण त्याचे देखील मूल्यांकन करण्यात यावे अशा प्रकारचा निर्णय झालेला आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाने परवाच यासंबंधातील नियमावली स्वीकृत केली आहे. पर्यावरणाशी संबंधित असलेल्या निरनिराळ्या राज्य स्तरावरील समित्यांसमोर जाऊन आपल्याला बाजू मांडावी लागत आहे. त्यानंतरच या समित्या त्या गटाला मान्यता देत आहेत. अशा प्रकारच्या अडचणी अलीकडच्या कालावधीत उपस्थित झालेल्या आहेत. मंत्रिमंडळाने नियम स्वीकारले आहेत. ते नियम पुन्हा सुप्रीम कोर्टाला दाखविण्याची व्यवस्था आपण करीत आहोत. ॲटर्नी जनरल श्री.वहानवटी यांना सदर नियमावली दाखविण्यासंबंधातील विनंती केली आहे. हा देशभरातील प्रश्न आहे. त्याबाबत महाराष्ट्र शासनाने प्रयत्न केलेला आहे की, नवीन नियमावलीसाठी सुप्रीम कोर्टाची मदत घ्यायची. त्यानुसार यामध्ये सुलभता आणण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. जेथे बेकायदेशीर प्रक्रिया घडत आहे त्या विरूद्ध आपण कारवाई करीत आहोत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, दिनांक 27.2.2012 रोजी न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे म्हणजे 1 वर्ष 2 महिने ही स्थगिती आहे. त्यामुळे संपूर्ण कोकणातील खाणी पूर्णपणे बंद आहेत. दगडाच्या खाणी बंद असल्यामुळे कोकणात वर्षभरात एकही घर निर्माण झालेले नाही. कोकणात जांभा दगडाचीच घरे होतात. गेल्या वर्षभरापासून वाळू उत्खनन देखील बंद आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यात कुठलेही बांधकाम होत नाही. आता पोलिसांच्या आशीर्वादाने गपचूप वाळू निघते. त्या वाळूचा दर दहा हजार रूपये ब्रास इतका आहे. यासाठी तहसीलदार, पोलीस आणि प्रांताला हप्ता द्यावा लागतो. खाणीबाबत देखील असेच. खाणीसाठी प्रांताला किती हप्ता दिला जातो हे जर आपण ऐकले तर थक्क व्हाल. आज प्रांताला खाणीच्या उत्खननासाठी एक लाख रूपयाचा हप्ता दिला जात आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37196 व ता.प्र.क्र.40518

श्री.रामदास कदम....

म्हणजे खाली हप्ता मिळण्यासाठी हेतुपुरस्सर हे काम थांबविण्यात आलेले आहे. मी हे विधान जबाबदारीने करीत आहे. यापूर्वी मी अशाप्रकारचे विधान केलेले नाही.

सभापती महोदय, या प्रश्ना संदर्भात कोकणातील सर्व आमदार माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले होते. त्यावेळी त्यांनी आश्वासन दिले की, माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री महोदयांच्या निदर्शनास ही बाब निदर्शनास आणून स्थगिती उठविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी नागपूरच्या अधिवेशनात हे आश्वासन दिले होते. परंतु अजून त्याची पूर्तता झालेली नाही. माननीय मुख्यमंत्री सिंधुदुर्ग जिल्ह्यात आले होते तेव्हा त्यांनी जाहीर सभेत सांगितले होते की, ताबडतोब स्थगिती उठविण्यात येईल. या आश्वासनाची देखील पूर्तता झालेली नाही. मागील एक वर्षापासून सातत्याने कोकणावर अन्याय करण्याचे काम सुरु आहे. तेव्हा माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, या संदर्भातील नियमावली मंत्रिमंडळापुढे किती दिवसांत आणणार आहात, त्याची तत्काळ अंमलबजावणी केली जाणार आहे काय ?

सभापती महोदय, पर्यावरण विभाग न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करीत नाही तोपर्यंत आपणास परवानगी मिळणार नाही. हा विषय आपल्या अखत्यारित नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. तेव्हा पर्यावरण विभागाचे प्रतिज्ञापत्र किती दिवसांत न्यायालयात सादर होणार आहे ? आपणास खालून काही कागदपत्रे मिळणार नाहीत हे मी जबाबदारीने बोलतो. तेव्हा आपण या प्रकरणी स्वत: लक्ष घालून किती दिवसांत ही स्थगिती उठवून कोकणाला न्याय देणार आहात ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात दोन पध्दतीमुळे अडचणी निर्माण झालेल्या आहेत ही गोष्ट खरी आहे. एक म्हणजे वेस्टर्न घाट इकॉलॉजी एक्स्पर्ट पॅनेलने बंदी आणलेली आहे तर दुसरी म्हणजे माननीय सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यामुळे बंदी आहे. अशी एकत्रितपणे बंदी आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, कोकणातील मागील एक वर्षात एका नवीन घरांचे बांधकाम झालेले नाही तर दुसऱ्या बाजूला चोरी चालते असेही सांगितले. ही गोष्ट खरी आहे की, त्या भागातील बांधकामांवर खूप मर्यादा आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांच्या अडचणी निर्माण होत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37196 व ता.प्र.क्र.40518...

श्री.बाळासाहेब थोरात.....

आहेत. साहजिकच लोक चोरी करण्याचा प्रयत्न करतात. परंतु असे कोणी करीत असेल त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, आपण यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे की, पर्यावरणाच्या विभागाच्या गाईड लाईन्स स्वीकाराव्यात किंवा त्यामध्ये बदल करुन स्वत:च्या गाईड लाईन्स कराव्यात. त्याप्रमाणे आपण नियम केलेले असून मंत्रिमंडळाने ते स्वीकारलेले आहेत. आता आपण हे नियम माननीय सर्वोच्च न्यायालयापुढे सादर करुन आपण जे सांगितले त्याप्रमाणे आम्ही हे नियम स्वीकारले आहेत तेव्हा आम्हाला आमच्या नियमाप्रमाणे काम करण्याची परवानगी द्यावी असे सांगणार आहोत. या प्रश्नाच्या संदर्भात राज्याचे मुख्य सचिव दिल्ली येथे जाऊन श्री.वहानवटी यांना भेटले. आपली बाजू न्यायालयापुढे मांडण्याची त्यांना विनंती केलेली आहे. हे प्रकरण पुढच्या आठवड्यात माननीय सर्वोच्च न्यायालयापुढे येईल असा आमचा प्रयत्न आहे. कारण आपला अर्ज दाखल करण्याची जबाबदारी आपली आहे. तेव्हा त्या संदर्भातील मसुदा तयार झालेला आहे आणि तो आपण सर्वोच्च न्यायालयात दाखल करीत आहोत.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, शासनाने गौण खनिज उत्खननाचा परवाना बंद केला असल्यामुळे बांधकामासाठी लागणारी रेती, मुरुम व माती याचे अधिकृत उत्खनन बंद आहे. याचा फार मोठा फटका जव्हार, मोखाडा व विक्रमगड या आदिवासी तालुक्यांना बसत आहे. आदिवासी घरकुलांची कामे बंद आहेत. ठेकेदारांची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. कामाचा कार्यादेश मिळालेला असताना देखील फक्त गरिबांच्या घरांची कामे गौण खनिज उत्खनन बंद असल्यामुळे थांबली आहेत. मोठमोठ्या बिल्डर्सना बांधकामासाठी अनधिकृतरित्या रेती उपलब्ध होत आहे. तेव्हा गरीबांच्या घरकुलांसाठी शासन वेगळे धोरण स्वीकारणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. पाच हेक्टरच्या आत सुध्दा पर्यावरणाचे मूल्यांकन करावे अशाप्रकारच्या गाईड लाईन्स आहेत. यामध्ये अनेक बारकावे आहेत. एखादी बोट वाळू काढण्यासाठी नदीमध्ये जाते तेव्हा किती ऑईल बाहेर पडेल, किती धूर बाहेर पडेल हे सर्व पर्यावरण विभाग पाहत आहे. पुणे जिल्ह्यात सुध्दा पर्यावरण विभागाकडून कोणतीही मान्यता मिळालेली नाही. त्यामध्ये जलचराचे प्रश्न आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ D/ ST/ KTG/ पूवी श्री.अजित... 11:55

ता.प्र.क्र.37196 व 40518.....

श्री.बाळासाहेब थोरात....

या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की, 31 जिल्ह्यांमध्ये 1960 वाळू साठ्यांपैकी 1623 वाळू साठ्यांना समितीने मान्यता दिलेली आहे. शासनाने या बाबत व्यवस्थितरित्या बाजू मांडलेली आहे. त्यामुळे या ठिकाणी वाळूचा लिलाव सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी ठाणे जिल्ह्याच्या बाबतीत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, या सर्व परिस्थितीमुळे विशेषत: गरीब माणूस घर बांधू शकत नाही. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, आवश्यक त्या बाबींची पूर्तता झाल्यानंतर लिलावाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करणार आहोत. सर्वोच्च न्यायालयाकडून मान्यता मिळाल्यानंतर या गोष्टी आणखी सुलभ होतील आणि या मध्ये कोणतीही अडचण राहणार नाही.

श्री.विनायक राऊत : महोदय, हा प्रश्न सावंतवाडी तालुक्यातून होणाऱ्या अनधिकृत गौण खनिजाबाबतचा आहे. या प्रश्नाच्या प्रश्न क्र.2 ला "सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात अधिस्थगन लागू आहे." असे उत्तर देण्यात आले आहे. तसेच पुढे असेही लेखी उत्तर दिले आहे की, "पथकाने 48 प्रकरणात रुपये 8,29,430/- इतका दंड आकारला आहे. तसेच एका प्रकरणात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे." महोदय, 48 प्रकरणी जे अनधिकृत गौण खनिज पकडण्यात आले आहे त्यामध्ये कोणत्या कंपन्या आहेत, तसेच अनधिकृतपणे काम करणाऱ्या कोणत्या कंपनीविरोधात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : महोदय, सध्या माझ्याकडे कंपनीबाबतची माहिती नाही. यामध्ये ट्रॅक्टर, ट्रॉली भरुन वाळू वाहून नेणाऱ्या छोट्या लोकांचा प्रयत्न असतो आणि त्यांचाच यात प्रामुख्याने समावेश असतो.

श्री.हेमंत टकले : महोदय, 48 प्रकरणात 8 लाख रुपयांच्या वर दंड आकारण्यात आला आहे. किंबहुना तो वसूल झाल्याचे आपण गृहीत धरु या. महोदय, पर्यावरणाचे रक्षण करताना जी बंदी येते किंवा उच्च न्यायालयाचे आदेश येतात त्यातून एका बाजूला मार्ग काढण्याचा प्रयत्न असताना दुसऱ्या बाजूला अशा प्रकारच्या अवैध गोष्टी घडत असतात. अवैध गोष्टी करणाऱ्या व्यक्तींवर कोष्टकानुसार दंडाची रक्कम निश्चित केली जात असल्यामुळे हे व्यवहार होणे सोपे होते. दंड म्हणून ठराविक रक्कम भरावयाची, पावती घ्यायची आणि नंतर पुन्हा अवैध बाबी करीत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ D/ ST/ KTG/ पूवी श्री.अजित... 11:55

ता.प्र.क्र.37196 व 40518.....

श्री.हेमंत टकले....

राहायचे असा प्रकार सुरु असतो. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, या गोष्टींना पायबंद घालण्यासाठी शासन वेगळ्या उपाययोजना करणार काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : महोदय, नद्या, खाड्यातून खूप अंतरावरुन वाळू उपसा होत असतो. नद्या, खाड्यांना दोन बाजू असतात.. कोण कोठे घुसून वाळू काढेल यावर लक्ष ठेवणे प्रशसनाला अवघड गोष्ट असते. ज्या ज्या ठिकाणी असे प्रकार निदर्शनास आलेले आहेत त्या ठिकाणी कारवाई केली आहे. सन्माननीय सदस्यांची मागणी आहे की, यावर वेगळा पर्याय शोधावा. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले किंवा सभागृहातील अन्य सन्माननीय सदस्यांनी यावर आळा घालण्यासाठी चांगला पर्याय सांगितला तर त्या बाबत निश्चितपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

**उप सभापती** : मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, वाळू तस्करी जगजाहीर झाली आहे आणि वाळू तस्करी करणारी माणसे सुध्दा तीच तीच आहेत. मी तर म्हणेन की, वाळू तस्करी हा राज्याला कलंक आहे. प्रशासन व्यवस्थेमध्ये या गोष्टी आढळून आल्या आहेत. वाळू तस्करी हा ऑर्गेनायझेशन क्राईम आहे असे माझे स्वत:चे मत आहे. महसूल विभागाकडून वाळू तस्करी करणाऱ्यांवर मोक्का कायद्यान्वये कारवाई करण्याबाबत गृह विभागाला सांगितले तर यावर कायमस्वरुपी आळा बसेल आणि शासनाचे नुकसान टळेल.

श्री.बाळासाहेब थोरात : महोदय, विकास कामांमध्ये वाळू हा आवश्यक घटक आहे. वाळू पासून राज्याला महसूल मिळतो. हे करीत असताना पर्यावरणाचे रक्षण करावयाचे असते. मागणीपेक्षा पुरवठा कमी असेल तर अशा प्रकारचा तणाव निर्माण होतो. काही विशिष्ट लोक अशा प्रकारे वाळूचा अवैध धंदा मोठ्या प्रमाणावर करतात. महसूल विभाग त्यांना रोखण्यासाठी गेल्यानंतर त्यांच्यावर हल्ले झाल्याचे प्रकार घडलेले आहेत.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37196 व 40518 .....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण जो प्रश्न विचारला त्या संदर्भात उत्तर देत असताना मंत्री महोदय दिशाभूल करीत आहेत. या महाराष्ट्रामध्ये किती लिलाव वेळेवर केले ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ज्यावेळी आम्ही रोखण्यासाठी जातो त्यावेळी अनेक ठिकाणी हल्ले झाल्याच्या घटना पाहिलेल्या आहेत.

**उप सभापती** : महिला तहसीलदाराला सुध्दा सोडलेले नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या बाबतीत गृह विभागाचे सहकार्य घेणे आवश्यक आहे. मोका लावण्याच्या बाबतीत सांगू इच्छितो की, 25 ऑक्टोबरच्या जी.आर. प्रमाणे तशा कारवाईची सुध्दा तरतूद आहे. गृह खाते आणि आम्ही एकत्र बसून योग्य कारवाई करु.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, आपण स्पेसिफिक प्रश्न विचारला होता की, तस्करी रोखण्यासाठी काय कारवाई करणार ? याबाबत मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपण जी सूचना केली त्या बाबतीत गृह विभाग आणि आम्ही एकत्र बसून पुढची कारवाई करण्यात येईल.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, चिरे, वाळू या बाबतीत सिंधुदुर्ग जिल्हा अतिशय संकटात आहे. मी जे बोलणार होते ते सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सविस्तर मांडले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यात चौके गाव आहे. ते संपूर्ण गाव चिऱ्याच्या खाणींचे आहे. त्या ठिकाणी खांडवा दगड तयार होतो. धामापूर तलाव खांडवा दगडांनी बांधलेला आहे. हा प्रश्न फार गंभीर झालेला आहे. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्री आले होते. माननीय मुख्यमंत्री, माननीय महसूल मंत्री तसेच महसूल विभागाचे प्रधान सचिव श्री. क्षत्रिय या तिघांनाही आम्ही लोकप्रतिनिधींनी प्रश्न विचारला की, कोणतीही पडवी वगैरे कोसळली तरी सुध्दा ती पडवी बांधता येणार नाही असा गंभीर प्रश्न झालेला आहे. या प्रकरणाला कधी न्याय मिळणार, चिरे कधी मिळणार, आम्ही घरे कधी बांधणार ? संपूर्ण कारभार ठप्प झालेला आहे. आपण ॲडव्होकेट जनरल नेमला, चांगले कौन्सीलर नेमले परंतु हे सर्व किती दिवसात सुरु होणार आहे ?

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ S

ता. प्र. क्र. 37196 व 40518 .....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या आठवड्यामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयामध्ये अर्ज दाखल होणार आहे. आमचा प्रयत्न राहील की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने ताबडतोब हा विषय घ्यावा आणि आम्हाला मान्यता द्यावी. त्यानंतर या सर्व गोष्टी सुलभ होणार आहेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, कोकणामध्ये विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वाळूचे लिलाव गेल्या 1 वर्षापासून का काढले जात नाहीत ? काही मंत्री महोदयांचे ड्रेझर्स आहेत. मंत्र्यांना वाळूचा ठेका मिळत नाही असे जेव्हा बघावयास मिळते तेव्हा जिल्हाधिकारी लिलाव थांबवितात, ही गोष्ट खरी आहे का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बाबतीत सांगितले की, यामध्ये दोन प्रकारच्या अडचणी असतात त्या आपण सोडवित आहोत. त्यानंतर लिलाव होतील.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, वाळूच्या बाबतीत आणि खाणींच्या बाबतीत आमचे निश्चितपणे समाधान झालेले नाही. आमच्या कोकणावर सातत्याने अन्याय होतो. माननीय मुख्यमंत्री या सभागृहामध्ये शब्द देतात तसेच आम्ही त्यांना त्यांच्या दालनात भेटतो त्या ठिकाणी सुध्दा ते शब्द देतात पण ते शब्द पाळले जात नाहीत. येत्या आठ दिवसात वाळू आणि चिरेखाणी चालू होतील का ? उप सभापती महोदयांनी सांगितल्याप्रमाणे तहसीलदारापासून प्रांत अधिकाऱ्यांपर्यंत आणि पोलिसांपर्यंत जे हप्ते चाललेले आहेत ते ताबडतोब बंद होतील का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, तहसीलदार आणि बाकीच्यांबाबत सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्याप्रमाणे ते असे काही करीत असतील याच्याशी मी सहमत नाही. परंतु सर्वोच्च न्यायालयासमोर या आठवड्यामध्ये अर्ज जात आहे. त्याच निर्णय झाल्यानंतर या सर्व गोष्टी सुलभ होतील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदय, मघापासून वाळू आणि चिऱ्याच्या बाबतीत कोर्टाचा आधार घेत आहेत. या सर्व विषयामध्ये सरकारला ठोस भूमिका घ्यावयाची आहे असे दिसत नाही. आम्ही चर्चा केल्यानंतर माननीय उप सभापतींनी विचारताना असे सांगितले की,

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/ ST

ता. प्र. क्र. 37196 व 40518 .... श्री. विनोद तावडे ....

हा महाराष्ट्राला कलंक आहे. वाळू माफिया, वाळू तस्करी हा जर कलंक असेल तर या विषयामध्ये शासन मोक्का आवणार का ? आम्ही तपासून बघू, गृह खात्याला विचारुन बघू असे उत्तर माननीय मंत्री देत आहेत. आपण सिनियर मंत्री आहात. मुख्यमंत्र्यांच्या लाईनीमध्ये आहात. आपण ठोस निर्णय घेतला पाहिजे. मुख्यमंत्र्यांच्या लाईनीमध्ये असणाऱ्या मंत्र्यांनी अळमटळम बोलावे लागते, बाजूला बघावे लागते. आपण ठोस भूमिका घेणार असाल तर तसे सांगावे. आपण ठोस भूमिका घेणार नसाल तर आम्हाला सन्माननीय सदस्यांना पाठिंबा द्यावयाचा आहे. कारण सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितले ते खरे आहे की, यामध्ये अनेक मंत्री महोदयांचे हितसंबंध आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37116 व 40518.... श्री.विनोद तावडे.....

हे हितसंबंध थांबविण्याची शासनाची इच्छा आहे की नाही, शासन या लोकांविरुध्द मोक्का कायदा लावणार आहे की नाही ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यासंबंधी कडक कारवाई केली जाईल.

श्री.विनोद तावडे : मंत्री महोदयांकडून आम्हाल ठोस आश्वासन पाहिजे. या प्रकरणी मोक्का लावला जाईल की नाही ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा प्रश्न गंभीर स्वरुपाचा आहे. त्यामुळे आपण सूचना दिल्याप्रमाणे कारवाई केली जाईल. शासनाने या प्रश्नाबाबत कारवाई केलेली आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

अनेक ठिकाणी सामुदायिक स्वरुपात वाळूची तस्करी केली जाते. त्यामुळे आपण सूचना दिल्याप्रमाणे कारवाई केली जाईल. (अडथळा) सभापती महोदय, आवश्यक तेथे मोक्का कायदा सुध्दा लावला जाईल.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुर्तिजापूर (जि.अकोला) महामार्गावरील बोरगाव मंजू या गावाला तालुका घोषित करण्याबाबत**

**(5) * 37096 श्री.गोपीकिसन बाजोरिया** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मूर्तिजापूर (जि.अकोला) राष्ट्रीय महार्गावर असणाऱ्या बोरगाव मंजू या गावाला 84 खेडी व गावे जोडली आहेत व या गावाची लोकसंख्या 35,000 च्या वर आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, बोरगांव मंजू हा नवीन तालुका करण्यात यावा ही देखील नागरिकांची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, उपरोक्त या नवीन तालुक्याची निर्मिती न झाल्यामुळे अकोला येथील तहसील कार्यालयावर कामाचा ताण व नागरिकांची गर्दी देखील वाढली आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, बोरगांव मंजू हा नवीन तालुका करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. बाळासाहेब थोरात** : (1) अंशत: खरे आहे.

(2) होय.

(3) अंशत: खरे आहे.

(4) व (5) नवीन तालुका निर्मितीचे निकष सुधारित करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित निर्णय घेण्यात येईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, अकोला जिल्ह्यातील नवीन तालुक्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी सर्व प्रश्नांना "होय" असे उत्तर दिलेले आहे. जे तालुके निर्मितीसाठी पात्र आहेत अशा तालुक्यासंबंधी हे उत्तर दिलेले आहे. शेवटच्या उत्तरात असे नमूद केले आहे की, "नवीन तालुका निर्मितीचे निकष सुधारित करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर उचित निर्णय घेण्यात येईल." यासंबंधी माझा स्पष्ट प्रश्न असा आहे की, हे नवीन निकष काय आहेत, त्याची आवश्यकता का भासली ? बोरगांव मंजू हे गाव अकोला तहसीलपासून 25 कि.मी.अंतरावर आहे. लोकांना तहसील कार्यालयात जाण्यासाठी नॅशनल हाय-वे वरुन ये-जा करावी लागते. नवीन निकष तयार करण्यासाठी वेळ लागत असेल तर एका आठवड्यामध्ये बोरगांव मंजू या गावामध्ये अतिरिक्त तहसीलदारांची नेमणूक केली जाणार आहे का ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37096.....

श्री.बाळासाहेब थोरात : महाराष्ट्रात नवीन तहसील कार्यालयांची निर्मिती करण्याची जनतेची मागणी आहे. त्याची संख्या जवळपास 50 इतकी आहे. नवीन तहसील निर्माण करण्यासाठी सूत्र असावयास पाहिजे. हा केवळ एका तहसीलचा प्रश्न नाही. त्यामुळे कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागीय आयुक्तांची एक समिती नेमली होती. त्या समितीने मार्च महिन्यात शासनाला अहवाल सादर केलेला आहे. त्या अहवालाची छाननी सुरु आहे. अनेक ठिकाणी लोकसंख्या वाढीचा भार वाढल्यामुळे महसूल अधिकाऱ्यांवर सुध्दा त्याचा भार वाढलेला आहे. शासन त्याचाही विचार करीत आहे. नवीन तहसील निर्माण करण्यासंबंधीचे निकष निश्चित झाल्यानंतर याबाबतची कार्यवाही केली जाईल. बोरगांव मंजू येथे नायब तहसीलदारांची नेमणूक करण्यासंबंधी निश्चित विचार केला जाईल.

डॉ.रणजित पाटील : अकोला जिल्ह्यात 7 तालुके आहेत. अकोला जिल्हा परिषदेमध्ये 50 सदस्य आहेत. यापैकी 13 सदस्य बोरगांव मंजूचे आहेत. म्हणजे एक तृतीयांश सदस्य या गावचे आहेत. या गावची लोकसंख्या 35-40 हजार आहे. 50 कि.मी.परिघापर्यंत गावाचे क्षेत्रफळ वाढलेले आहे. तेथील शेतकऱ्यांना अकोला तहसीलदार कार्यालयात जावयाचे असेल तर 50 कि.मी.अंतर पार करावे लागते. ही वस्तुस्थिती आहे. शासनाने निकष सुधारित करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवालही आता प्राप्त झालेला आहे. त्यामुळे बोरगांव मंजू या तहसील निर्मितीची कार्यवाही किती दिवसात केली जाईल ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, केवळ बोरगांव मंजू या गावचा प्रश्न नाही. या गावाचा परिघ 38-40 कि.मी.पर्यंत गेलेला आहे. सभागृहाच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, सांगली जिल्ह्यातील जतही मोठा तालुका आहे. जवळपास 50 नवीन तालुक्यांची मागणी आलेली आहे. त्यात आदिवासी क्षेत्रातील गावांचाही समावेश आहे. त्यामुळे मी मघाशी सांगितल्या प्रमाणे यासंबंधी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. त्या समितीचा शासनाला अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अहवालाची छाननी केल्यानंतरच निर्णय केला जाईल.

यानंतर श्री.शिगम....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 12:10

ता.प्र.क्र.37096....

श्री. जयंत प्र. पाटील : जत आणि अकोला तालुक्यामध्ये फरक आहे. अकोला तालुकयामध्ये महापालिका आहे. तसेच जिल्हा परिषदेचे 13 सदस्य आहेत. तेव्हा महापालिकेसाठी वेगळा तहसीलदार आणि ग्रामीण भागासाठी वेगळा तहसीलदार देण्याची मागणी शासन मान्य करील काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अशी अनेक शहरे मोठी झालेली आहेत. नागपूर, पनवेल या शहरांची उदाहरणे देता येतील. आता हवेली शहराची लोकसंख्या देखील 30 लाखापर्यंत गेलेली आहे. तेथे देखील एकच तहसीलदार आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे मोठ्या शहरांसाठी वेगळा तहसीलदार आणि ग्रामीण भागासाठी वेगळा तहसीलदार करण्यासंबंधी शासन विचार करीत आहे. महाराष्ट्रातील अनेक शहरामध्ये ही परिस्थिती आहे. या संदर्भातील समग्र अहवाल प्राप्त झालेला असून त्याची छाननी झाल्यानंतर निर्णय होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : हा प्रश्न शासनाकडे अनेक दिवस प्रलंबित आहे. अकोला तालुक्यामध्ये अकोला शहर आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे अकोला तालुक्यामध्ये 200च्या वर गावे आणि महापालिका आहे. अहवालाच्या छाननीचे काम चालू आहे. सरकारच्या छाननीचे काम पाच-पाच वर्षे पूर्ण होत नाही. तेव्हा शहरी भागासाठी वेगळा आणि ग्रामीण भागासाठी वेगळा तहसीलदार नेमण्याचा निर्णय किती दिवसात घेण्यात येईल?

श्री. बाळासाहेब थोरात : मी पुन्हा पुन्हा हेच सांगत आहे की, हा प्रश्न केवळ अकोला आणि बोरगाव मंजू पुरता मर्यादित नाही. आमच्या तालुक्याचे विभाजन करावे अशा प्रकारची मागणी 50 ठिकाणाहून आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे दोन तहसीलदार नेमण्याबाबतचाही शासन विचार करीत आहे. परंतु यासंबंधी अहवालाची छाननी पूर्ण झ ााल्याशिवाय निर्णय घेऊ शकत नाही. छाननी पूर्ण झाल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

डॉ. अपूर्व हिरे : राज्यामध्ये सर्व महापालिका आणि तालुक्यासाठी एकच तहसीलदार आहे. महापालिकेच्या कामाची व्याप्ती मोठी असते. तेव्हा महापालिकेसाठी आणि ग्रामीण भागासाठी दोन वेगवेगळी तहसीलदार नेमण्यात येतील काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : ग्रामीण भागासाठी वेगळा आणि महापालिकेसाठी वेगळा तहसीलदार करण्यासंबंधी देखील विचार करावा लागणार आहे.

--

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील आदिवासी मुलांच्या वसतीगृहामधील अपुऱ्या व्यवस्थेबाबत**

**(६) * ३७०११ श्री.प्रवीण पोटे पाटील, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी मुलांना अत्यंत चांगल्या प्रकारे जीवन जगता यावे यासाठी त्यांच्या शिक्षणाकरीता कोट्यवधी रुपयांच्या योजना शासन स्तरावर राबविल्या जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी मुलांचे शासकिय वसतीगृह (ता.वरुड,जि.अमरावती) येथे एका खोलीत तब्बल १४ विद्यार्थी व एकूण ११० विद्यार्थ्यांकरीता वसतीगृहात फक्त दोनच शौचालये असण्याची बाब डिसेंबर, २०१२ च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वसतीगृह परिसरामध्ये दुर्गंधी, अस्वच्छता, शेवाळलेल्या टाकीतील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था विद्यार्थ्यांकरीता करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासी वस्तीगृहामधील अपूऱ्या व्यवस्था तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (१) हे खरे आहे.
(२),(३),(४) व (५) अमरावती जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी ९ व विद्यार्थीनींसाठी ९ अशी एकूण १८ वसतीगृहे कार्यरत आहेत. त्यापैकी वरुड, जि.अमरावती येथे मुलांचे १२५ क्षमतेचे वसतीगृह भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहे. सदर इमारतीमध्ये १५ खोल्या व १ हॉल, ८ शौचालये, १२ स्नानगृहे उपलब्ध होती. तथापि, विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात सदर इमारत अपुरी पडत असल्याने विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी दि.५.०१.२०१३ पासून सदर इमारत बदलण्यात आली असून सद्यस्थितीत सर्व सोयी सुविधांनी युक्त नवीन इमारतीत विद्यार्थ्यांची सोय करण्यात आली आहे.

श्री. प्रवीण पोटे : आदिवासी विद्यार्थ्यांची प्रगती व्हावी यासाठी शासन विविध उपाययोजना करीत आहे. परंतु प्रकल्प अधिकारी नसल्यामुळे आदिवासी मुलांना योजनांचा लाभ मिळत नाही. सर्व सोयींनी युक्त असा शासकीय वसतिगृहाचा आराखडा बनविणे गरजेचे आहे. मी अमरावती जिल्ह्यामधील एका वसतिगृहाची पाहणी केली असता तेथे एकेका खोलीमध्ये 10-15 विद्यार्थी राहात असल्याचे आणि वसतिगृहातील विद्यार्थ्यांची संख्या 125 असल्याचे निदर्शनास आले. त्या विद्यार्थ्यांसाठी स्नानगृहाची, प्रसाधनगृहाच्या सोयी उपलब्ध करुन दिलेल्या नव्हत्या. ही परिस्थिती बदलेली आहे असे उत्तरामध्ये दिलेले आहे. ही परिस्थिती 5.1.2013 नंतर बदलली. परंतु त्याआधी मी अप्पर आयुक्त आणि प्रकल्प अधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्यानंतर परिस्थिती बदली. माझा प्रश्न असा आहे की, वसतिगृहातील गैरसोयीकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर शासन काय कारवाई करणार आहे ?

...नंतर श्री. गिते...

अस्वाक्षरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आदिवासी विद्यार्थ्यांना पदवी पर्यंतचे शिक्षण घेता यावे म्हणून महाराष्ट्र शासनाने 495 वसतीगृहे मंजूर केलेली आहे. त्यापैकी 481 वसतीगृहे सुरु झालेली आहेत. वसतीगृहे भाडयाच्या इमारतीत चालवावयाच्या नाहीत, अशा प्रकारचा शासनाने निर्णय घेतलेला असल्यामुळे 303 वसतीगृहांच्या इमारतींसाठी जमिनी मिळविलेल्या आहेत. या साठी 152 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. 58 वसतीगृहांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. येत्या दोन वर्षामध्ये ही सर्व वसतीगृह स्वत:च्या जागेत बांधलेल्या इमारतीमध्ये जातील. त्या वसतीगृहात राहण्याची, बाथरुम, जेवणे इत्यादी सर्व सुविधा देखील उपलब्ध होणार आहेत.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचे मुद्दे**

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आपण शैक्षणिक वर्ष 2012-13 च्या अंतिम टप्प्यात आहोत. सध्या इयत्ता 10 आणि इयत्ता 12 वी च्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु आहेत, त्या विद्यार्थ्यांच्या तोंडी परीक्षा सुरु आहेत. पर्यवेक्षणाचे काम सुरु आहे, पेपर्स तपासण्याचे काम सुरु आहे. आता विधानसभेची अथवा लोकसभेची निवडणूक नाही. अशा परिस्थितीमध्ये आमच्या शिक्षकांना केंद्रस्तरीय मतदान अधिकारी म्हणून कामे दिलेली आहेत. अनेक शाळांमधील शिक्षकांकडे सदरचे काम सोपविण्यात आले आहे. शिक्षकाने घराघरात जावयाचे, फोटो पास वाटावयाचे, कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे फॉमर्वर फोटो चिटकावयाचे, मतदार याद्या दुरुस्त करावयाच्या अशी कामे त्यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहेत. शाळेमधील काम करुन केंद्रस्तरीय मतदार अधिकारी म्हणून सोपविलेले काम केले नाही तर शिक्षकांवर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करावेत, अशा प्रकारचे आदेश जिल्हाधिकारी आणि निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेले आहेत. शिक्षकांची परिस्थिती अत्यंत गभीर झालेली आहे. शिक्षकांना सदरची कामे देऊ नये, तसेच कोणाही शिक्षकावर पोलीस कारवाई करण्यात येऊन नये अशा प्रकारचे आदेश आपण माननीय महसूल मंत्र्यांना द्यावेत, अशी माझी आपणास विनंती आहे.

---------------

3...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, काल नागपूर येथे एका गंभीर प्रकरणाच्या बाबतीत मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

महाराष्ट्रातील लाखो लोक आणि असंख्य गुरे दुष्काळाच्या वणव्यात होरपळून निघत असताना आध्यात्मिक संत श्री.आसाराम बापू यांनी काल नागपूर येथील कस्तुरचंद पार्क येथे धुळवड सादर करुन लाखो लीटर पाण्याच्या नासाडी केली. दुष्काळग्रस्त भागातील जनता पाण्यासाठी एक एक थेंबापासून तहानलेली असताना श्री.आसाराम बापू यांनी लाखो लीटर पाण्याचे फवारे आपल्या भक्तांवर उडविले. एवढे प्रचंड पाणी वाया जात असताना श्री.आसाराम बापू यांचे भक्त आनंदाने धुळवड साजरा करीत होते ही अतिशय खेदाची बाब आहे. नेहमी समाज प्रबोधनाचा दावा करणारे श्री.आसाराम बापू अशा आध्यामिक गुरुंनी अशा प्रकारे पाण्याची नासाडी केल्याने राज्यभर तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. धुळवड साजरी करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने पाण्याचे टँकर्स पुरविले होते. पाण्याची उधळपट्टी करणाऱ्यां विरोधात राज्य शासनाने तातडीने कारवाई करावी व अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याची शासनाने दक्षता घ्यावी या करिता हा औचित्याचा मुद्दा मी उपस्थित केलेला आहे.

( अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**उप सभापती** : हा औचित्याचा मुद्दा चार सन्माननीय सदस्यांकडून आलेला आहे. मी आपणा प्रत्येकाला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी संधी उपलब्ध करुन देणार आहे, त्यावेळी आपण औचित्याचा मुद्दा उपस्थित करावा. आता सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

-----------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आपली आभारी आहे की, आपण अतिशय संवेदनशीलता दाखविली आहे. माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात सभागृहात उपस्थित आहेत. मी आजच सकाळी त्यांच्याशी संपर्क साधलेला आहे. कोणावर कारवाई करावयाची हा जसा महत्वाचा भाग आहे, परंतु असे प्रकार होऊ नये अशी अपक्षा व्यक्त करीत असताना नवी मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित आज दुपारी अशाच प्रकारे सामूहिक धुळवडीचा कार्यक्रम आयोजित केल्याचे कळते. शिवसेनेचे आमचे जिल्हा उप प्रमुख श्री. मनोहर गायके यांनी तेथे जावे आणि त्या आयोजकांना विनंती करावी अशी सूचना दिली होती, त्याप्रमाणे ते तेथे गेले होते, असे करु नका म्हणून त्यांनी आयोजकांना विनंती केली. आज नापिकीला कंटाळून जालना जिल्हयामध्ये एका महिलेने आत्महत्या केली आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ गितेनंतर 12:20

डॉ.नीलम गोऱ्हे .........

या पार्श्वभूमीवर सामूहिक होळीचा विषय असेल किंवा अन्य समारंभ असतील, पाण्याचा अपव्यय होऊ नये म्हणून या अधिवेशन काळातच योग्य ती समज या सर्व संयोजकांना दिली गेली पाहिजे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रात पाण्याचा अपव्यय होता कामा नये, याबद्दल आपण स्वत: लक्ष घालावे अशी मी विनंती करते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, याच विषयावरील औचित्याचा मुद्दा दोन्ही बाजूच्या अनेक माननीय सदस्यांकडून आपल्याकडे देण्यात आलेला आहे, त्यावरुन हा विषय किती गंभीर आहे हे स्पष्ट होते. या सगळयाचे दृश्य परिणाम कुठे ना कुठे घडत असतात. एकाच चॅनेलवरील बातमीमध्ये कुठल्यातरी छोट्या गावाला पाण्याचा टँकर जातो, त्या टँकरच्या टाकीमध्ये पाईप टाकण्यासाठी लोकांची गर्दी जमते, त्यातून भांडणे होतात, थोडेसे पाणी मिळविण्याकरिता सख्ख्या भावाचा खून पाडला जातो, अशा वेळेला बीभत्स पध्दतीने पाण्याची फवारणी करुन सामूहिक होळी साजरी करताना एखाद्या सिनेमाच्या गाण्याचे चित्रण करावे या पध्दतीने म्युझिक लावून नाचणे, हे सर्व पाहिल्यानंतर आपण महाराष्ट्रात राहतो की कोणत्या इतर राज्यात राहतो असा प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे. असा कार्यक्रम करताना संयोजक सांगतात की, आम्ही नागपूर महापालिकेकडे पैसे भरुन पाणी विकत घेतले होते. पैसे टाकले की वाटेल ते निंदनीय कृत्य करण्यास या राज्यात परवानगी देणार आहात का? महाराष्ट्रातील दुष्काळाच्या काळात अशा प्रकारचे वर्तन करुन हृदयाला ओरखडे ओढले गेले, याबाबत शासनाने लक्ष घालून वेळीच संबंधितांवर कारवाई केली पाहिजे. त्यांना योग्य शासन करण्याची आवश्यकता आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आठ-आठ दिवस अशाप्रकारे होळी साजरी केली जाते, हा प्रकार थांबविला पाहिजे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, दोन्ही बाजूच्या चार माननीय सदस्यांनी याच विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे यावरुन ही किती गंभीर घटना आहे हे सिध्द होते. औचित्याचा मुद्दा म्हणून जरी ही बाब उपस्थित केली असली तरी सदर घटना औचित्याचा मुद्दा म्हणून ट्रिट करता येणार नाही.

**उप सभापती**: या विषयावर सभागृहात चर्चेची मागणी करु नये. मी तीन माननीय सदस्यांना थोडक्यात म्हणणे मांडण्याची संधी दिली आहे. मंत्री महोदय उत्तर देण्यास तयार आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : शासनाने उत्तर दिले पाहिजे.

**उप सभापती** : मंत्री महोदय यापूर्वीच उत्तर देण्यास उभे राहिले होते. परंतु याच विषयावर दोन्ही बाजूच्या अनेक माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा दिलेला असल्यामुळे त्यांनी थोडक्यात म्हणणे मांडल्यानंतर उत्तर द्यावे अशी मी विनंती केली. अन्यथा मंत्री महोदय मघाशीच उत्तर देण्यास तयार होते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आसाराम बापू या तथाकथित संताचा हा एकच उद्योग नाही. यापूर्वी त्यांच्यावर अनेक आरोप झाले. लहान मुलांवरील अत्याचारापासून असंख्य भाविकांची फसवणूक करणे असे अनेक उद्योग या तथाकथित संतांनी केले आहेत.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांच्या आणि सभागृहाच्या भावना लक्षात घेतल्या आहेत. काल नागपूर येथे जो प्रकार घडला, ज्या पध्दतीने पाण्याची फवारणी करुन रंगपंचमी साजरी करण्यात आली ते दृश्य पाहून अनेकांच्या भावना तीव्र झालेल्या आहेत. एका बाजूला अनेक गावांमध्ये पाण्यासाठी टँकर जातात तेव्हा संपूर्ण गावाचा त्या टँकरला वेढा पडतो. पाण्याच्या एका हंड्यासाठी लोक धडपड करीत असतात. असे असताना नागपूर येथे संत आसाराम बापू यांनी त्यांच्या भक्तांसमवेत पाण्याची फवारणी करुन उत्सव साजरा करणे हे दृश्य लोकांच्या मनाला वेदना देऊन गेले, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, आजच सकाळी माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मला दूरध्वनी केला होता. जिल्हाधिकारी यांच्याशी बोलून संबंधितांवर कारवाई करावी अशी त्यांनी विनंती केली. मी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. स्वत: जिल्हाधिकाऱ्यांनी महापालिकेच्या आयुक्तांना सांगितले आहे की, पुन्हा असा प्रकार होऊ नये याची दक्षता घ्यावी. नवी मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना देखील सूचना दिलेल्या आहेत. जनतेचे दु:ख आणि वेदना यात आपण सहभागी होण्याची आवश्यकता आहे. तशी काळजी प्रशासन म्हणून आम्ही घेत आहोत. असे प्रकार करणाऱ्यांनी सुध्दा काळजी घेतली पाहिजे.

श्री.संजय दत्त : माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा सर्व महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांना पत्र लिहून अशी पुनरावृत्ती होऊ नये म्हणून निर्देश दिलेले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य कसे निर्देश देऊ शकतात? निर्देश सरकारने दिले पाहिजेत.

नंतर 2बी.1......

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

सभापती महोदय, जे मंत्री मुख्यमंत्री पदाच्या जवळचे आहेत, जी माहिती ज्येष्ठ मंत्र्यांजवळ नाही ती माहिती सन्माननीय सदस्यांजवळ कशी काय आहे ?

श्री. संजय दत्त :सभापती महोदय,मी या सदनाचा सदस्य आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मला पुन्हा मुख्यमंत्री पदाच्या रांगेत केले जात आहे परंतु मी मुख्यमंत्री पदाच्या रांगेत नाही एवढे या निमित्ताने सांगू इच्छितो.

**उप सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांना आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आधार क्रमांक जमा न करणाऱ्या राज्यातील मुंबई शहर व उपनगर , पुणे,नंदूरबार, अमरावती व वर्धा या सहा जिल्हयातील 1 लाख 70 हजार 827 गोरगरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत न करण्याचा निर्णय घेतल्यमुळे या विद्यार्थ्यांवर शिष्यवृत्तीची रक्कम वितरित न करण्याचा निर्णय घेतल्यामुळे या विद्यार्थ्यांवर शिष्यवृत्तीचा आधार हरपण्याची व पैशांअभावी त्यांचे शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ आलेली आहे. या सहा जिल्हयात सध्या 2 लाख 29 हजार विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असून यापैकी केवळ 58 हजार 617 विद्यार्थ्यांनी आपला आधार क्रमांक जमा केला आहे. येत्या 31 मार्च पर्यंत उर्वरित विद्यार्थ्यांची नोंद होणे अशक्य आहे. राज्यातील शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना राज्य शासनाने प्राधान्याने आधार कार्ड वितरित करण्याची आवश्यकता आहे. आधार क्रमांक नाही म्हणून कोणीही लाभापासून वंचित राहणार नाही अशी स्पष्ट ग्वाही मा. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिली असतांनाही आधार क्रमांक नसेल तर लाभ मिळणार नाहीत अशी स्पष्ट सूचना इ-स्कॉलरशिपच्या वेबसाईटवर देण्यात आल्या असून उर्वरीत विद्यार्थ्यांना देखील शिष्यवृत्ती वितरित करण्याचे स्पष्ट आदेश शासनाने द्यावेत आणि या 1 लाख 70 हजार शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करुन त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी तसेच भावी शैक्षणिक वाटचालीसाठी शिष्यवृत्ती वितरित करावी.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आधार कार्डच्या संदर्भात सूचना केली असतांना सुध्दा वेबसाईटवर आधार क्रमांकाची मागणी करण्यात आलेली आहे तसेच अधिकारी सांगतात की, आधार कार्डच्या संदर्भात आम्हाला माननीय मुख्यमंत्री महोदयांचे आदेश मिळालेले नाहीत. त्यामुळे सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी आपण शासनाला आदेश द्यावेत की, शासनाचे आदेश संबंधित अधिकाऱ्यापर्यंत जातील अशी व्यवस्था करावी अशी मागणी या औचित्याच्या सूचनेद्वारे करीत आहे.

**उप सभापती** : आधार कार्ड नसेल तर लाभापासून कोणीही वंचित राहणार नाही यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सूचना दिली होती. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात संबंधित खाते प्रमुखांना सूचना देण्यात याव्यात. विशेषत: या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे त्याबाबतीत अधिक काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय,शिक्षकाकडे बीएलओची कामे दिल्यामुळे शाळा बंद पडत आहेत. त्यामुळे शिक्षकांवर गुन्हे दाखल केले जात असून शिक्षकांवर गुन्हे दाखल करुन नये याबाबतीत आपण जिल्हाधिकाऱ्यांना निदेश द्यावेत अशी विनंती आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी जी सूचना केलेली आहे त्याचा शासनाने विचार करावा.

आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

---------

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय,विधी मंडळाचे सदस्य म्हणून शासकीय कार्यक्रमाला हजर राहण्याचे तसेच अशा कार्यक्रमांना आम्हाला बोलावण्याचे बंधनकारक असतांना अनेक शासकीय कार्यक्रमाला विधानसभा व विधान परिषद सदस्यांना बोलावले जात नाही, किंबहुना डावलले जाते. हा मुद्दा मी या सभागृहात अनेक वेळा उपस्थित केलेला आहे.

सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने शासनाला विनंती करतो की, कार्यक्रमाला विधानमंडळाच्या सदस्यांना उपस्थित राहण्याचे जे बंधन घातलेले आहे त्या ऐवजी माननीय मंत्री महोदयांना पाहिजे असेल त्याच सदस्यांना बोलविण्याची मुभा द्यावी अशी मी शासनाला विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, विधानमंडळाचे अधिवेशन सुरू असताना कुठलाही शासकीय कार्यक्रम, कुठलीही शासकीय मिटींग, जिल्हा नियोजन मंडळाची बैठक घ्यायची नाही असे बंधन आहे. विधानमंडळाचे अधिवेशन सुरू असताना कुठलेही उद्‌घाटन अथवा कार्यक्रम करता कामा नये. काल अलिबाग तालुक्यात मांडवा पोलीस ठाण्याचे उद्‌घाटन होते. विधानमंडळाच्या अधिवेशनात असे कार्यक्रम घ्यायचे नाहीत असे संकेत आहेत. अलिबाग तालुक्यात पोलीस ठाण्याचे उद्‌घाटन असताना तालुक्यातील दोन्ही आमदारांना म्हणजे माननीय विधान सभा सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील व मला बोलाविण्यात आले नव्हते. सन्माननीय सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील यांचे पत्रिकेमध्ये नाव छापून देखील त्यांना बोलाविण्यात आले नाही. या कार्यक्रमाला येण्याबाबतच निमंत्रण देण्यासाठी साधा पोलीस देखील मला भेटायला आला नाही. आमदार म्हणून मला माझा अवमान वाटतो. या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करतो की, शासनाने एक सुस्पष्ट धोरण आखावे. जे लोकप्रतिनिधी नाहीत ते कार्यक्रमामध्ये उपस्थित राहतात. आम्ही पेपरमध्ये वाचतो की, अंतर्गत गटबाजीमुळे काही मंत्र्यांना देखील बोलाविले जात नाही. ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा नसताना देखील आपण मला बोलण्यास अनुमती दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. राष्ट्रवादीच्याच मंत्र्यांना बोलाविले जात नाही, हे दुर्दैव आहे. अशा पद्धतीने आज सभागृहाचे अवमूल्यन होत आहे. त्यामुळे या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाने ठोस धोरण जाहीर करावे अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : या सर्व प्रकरणाची मी गंभीर दखल घेत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, खरे तर अधिकाऱ्यांविरोधात हक्कभंगाची सूचना दिली पाहिजे. हा प्रकार केवळ सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांच्या बाबतीत झालेला नसून तो या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत झालेला आहे. त्यामुळे आपण एकदा हक्कभंग आणावा. मग सगळे अधिकारी शहाणे होतील.

**उप सभापती** : माझ्याकडे लेखी स्वरूपात औचित्याचे मुद्दे आलेले नसताना देखील मी मोठ्या अंत:करणाने त्यांना ते मांडण्यास परवानगी दिली. पण आता सरसकट सर्व सन्माननीय सदस्य परवानगी मागात आहेत. मला असे वाटते की, आपण आता औचित्याचे मुद्दे थांबवू या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्याला मला सपोर्ट द्यायचा आहे.

**उप सभापती** : त्यांना सपोर्ट देण्याची काहीही गरज नाही. ते अगदी भक्कम आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक 16 मार्च 2013 रोजी खामगाव पंचायत समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्यांनी लिहिले आहे की, पंचायती राज समितीच्या शिफारशीनुसार पंचायत समिती, खामगाव येथील सन 2012-2013 ची वार्षिक आम सभा व सरपंच मेळावा शनिवार दिनांक 16 मार्च 2013 रोजी, सकाळी 11.00 वाजता, माननीय आमदार श्री.दिलीपकुमार सानंदा यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे. विशेष उपस्थिती वर्षाताई वनारे, अध्यक्षा, जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा, श्री.अजिंक्य पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा व प्रमुख उपस्थितमध्ये सर्व जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्यांची नावे आहेत. ज्यावेळी तालुक्याची वार्षिक आम सभा होते त्या सभेला त्या भागातील विधान परिषद सदस्याला देखील विशेष अतिथी म्हणून बोलाविले पाहिजे. पण आता विधान परिषद सदस्यांना अवमानित करण्याचे प्रकार सुरू झालेले आहेत. ते कुठे तरी थांबवले पाहिजेत. मी पंचायत समितीची आम सभेची नोटीस आपल्याकडे पाठवून देतो. हे वरिष्ठ सभागृह आहे. त्यामुळे विधान परिषद सदस्याचा सन्मान राखलाच गेला पाहिजे. त्याचा सन्मान राखला जात नसेल तर जो कोणी अधिकारी असे प्रकार करत असेल त्याच्या विरूद्ध कारवाई झाली पाहिजे.

......

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार,वि.प.स. यांनी "राज्यात 16 आयुर्वेद व 3 यमुनी महाविद्यालये असून या संस्थांमधील अध्यापक गेल्या चार महिन्यांपासून वंचित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी "नांदगांव तालुक्यात चोरीची वाळू विकली जात असून चोरीचा ट्रक पळवून नेत असताना पदाधिकाऱ्यांनी ट्रक थांबविण्याचा प्रयत्न केला असतानाही ट्रक न थांबविता तो अधिकाऱ्यांच्या अंगावर घालून त्यांना जखमी केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी " धुळे शहरातील आझाद नगर पोलीस स्टेशन हे मच्छीबाजार पोलीस चौकीच्या जागेवर स्थलांतरित करण्याची होत असलेली मागणी या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी "राज्यात 138 बोगस अपंग-मतिमंद शाळा असल्याचे निदर्शनास आले असून अनुदान देण्याचा मंजूर केलेला प्रस्ताव रद्द करुन त्याबाबत चौकशी करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, श्रीमती शोभा फडणवीस, श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी " दिनांक 12 मार्च 2013 रोजी विलेपार्ले, मुंबई येथे तसेच दिनांक 15 मार्च, 2013 रोजी माटुंगा येथे महिलेवर झालेला सामुहिक बलात्कार, मुंबई शहरात लागोपाठ घडणाऱ्या सामूहिक बलात्काराच्या घटनांमुळे महिला वर्गात पसरलेले भीतीचे व

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** .....

संतापाचे वातावरण" विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री गोपीकिशन बाजोरिया, डॉ.रणजित पाटील,ॲड.अनिल परब,वि.पस.यांनी "अकोला महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते प्रलंबित असणे तसेच अनेक अधिकाऱ्यांची पदे रिक्त असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील,वि.प.स.यांनी "अंधेरी (प) येथील कॉस्मोपोलिटीन सोसायटीच्या बर्फीवाला हायस्कूलमधील मराठी व इंग्रजी माध्यम बंद करण्यात येत असणे, एस.एस.सी. बोर्डाच्या मराठी, इंग्रजी शाळा बंद करुन श्रीमंतांसाठी अन्य बोर्डाच्या शाळा सुरु करण्याचा होत असलेला प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील,भाई गिरकर, वि.प.स.यांनी "मुंबईच्या वांद्रे येथील अवर लेडी ऑफ माऊंटची (माऊंट मेरी चर्च ) जागा बळकाविण्या प्रकरणी चौकशी करुन संबंधित भूमाफियांवर दुलर्क्ष करणाऱ्या पोलीस अधिक्ऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य 93 अन्वयेच्या सूचना मी दालनात नाकारलेल्या आहेत.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 अन्वयेच्या निवेदना संदर्भात

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही सभागृहात 93 अन्वयेच्या सूचना दिल्या होत्या त्यातील काही सूचनांसंदर्भात आपण शासनास निवेदन करण्याचे आदेश दिले होते. अधिवेशन सुरु होऊन एक आठवडा झालेला आहे. मला वाटले होते की, आज 93 अन्वयेच्या सूचना संदर्भातील निवेदने चर्चेसाठी येतील, परंतु एकही निवेदन चर्चेसाठी आलेले नाही. आपण मागील अधिवेशनात ठरविले होते की, पाच दिवस झाल्यानंतर सहाव्या दिवशी निवेदन सभागृहात आले पाहिजे. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, उद्या नियम 93 अन्वयेच्या सूचना घेण्यापूर्वी ज्या मंत्रिमहोदयांकडून पाच दिवसांच्या कालावधीनंतर निवेदने येणे आवश्यक होते ती न आल्यास त्या मंत्री महोदयांची नावे तसेच त्या विभागाच्या सचिवांची नावे येथे जाहीर करावीत, अन्यथा नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने बंद करावीत.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेली सूचना निश्चितपणे अमलात येईल.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बुलढाणा जिल्ह्यातील जीगाव प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात ठोस उपाय योजना करण्यात न येणे

**मु. शी.** : बुलढाणा जिल्ह्यातील जीगाव प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात ठोस उपाय योजना करण्यात न येणे या संबंधी श्री पांडुरंग फुंडकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" बुलढाणा जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी जीगांव प्रकल्पाचे कामी 'पहिले पुनर्वसन मग धरण' या शासनाच्या संकल्पनेला बगल देण्यात येणे, पुनर्वसनासंदर्भात कोणतीही ठोस भूमिका शासनाच्यावतीने घेण्यात येत नसल्याची मार्च, 2013 मध्ये उघडकीस आलेली घटना, या कामाच्या खोदकामात ब्लास्टिंग करताना करण्यात येणाऱ्या विस्फोटांमुळे परिसर हादरुन आजूबाजूच्या घरांची होणारी पडझड, प्रकल्पावर सुरु असणाऱ्या वर्दळीसाठी वापरण्यात येणाऱ्या मार्गावरील अवजड वाहने, जेसीबी कंटेनर, टिप्पर, इत्यादीसह मोठ्या क्रेनच्या वाहतुकीमुळे होत असलेले अपघात, या प्रकल्पाच्या कामात भिंतीमध्ये काळ्यामातीऐवजी पिवळ्या मातीचा तसेच रेतीचा वापर करण्यात येणे, परिणामी भविष्यात या भिंतीमधून साठविलेले पाणी पाझरुन जाण्याची शक्यता, याकडे प्रशासनाचे होणारे दुर्लक्ष, प्रकल्पग्रस्त नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, जीगांव प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन होण्याबाबत, शासनाने करावयाची आवश्यकता व या बाबतची शासनाची भूमिका. "

श्री.प्रकाश सोळंके ( पुनर्वसन व मदत कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील जीगाव प्रकल्पामध्ये बाधित लोकांचे पुनर्वसन झालेले नाही त्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. "आधी पुनर्वसन मग धरण" असे शासनाचे धोरण आहे. या जीगाव प्रकल्पास दिनांक 6.2.1990 रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यावेळी त्या प्रकल्पाची किंमत 394.83 कोटी रुपये होती. ती मान्यता रद्द झाल्यानंतर पुन्हा दिनांक 1.3.1996 रोजी 698 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली. प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक 20.10.2005 रोजी 1220 कोटी रुपयांची देण्यात आली. त्यानंतर दरसूचीतील वाढ, भूसंपादन, पुनर्वसन किंमतीतील वाढ, धरणाच्या संकल्पनेतील बदल व उपसा योजनेचे सविस्तर सर्वेक्षण इत्यादी बाबी विचारात घेऊन प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने विदर्भ विकास पाटबंधारे महामंडळांने दिनांक 24.6.2009 रोजी 4 हजार 44 कोटी रुपयांचा द्वितीय सुधारित प्रस्ताव सादर केला. मागील सहा वर्षात या प्रकल्पाची किंमत चार हजार कोटींवर गेली.

सभापती महोदय, सन 2011-2012 मध्ये 104 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सन 2010-2011 मधील शिल्लक राहिलेली रक्कम 29.42 कोटी रुपये अशी एकूण 134 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. नोव्हेंबर 2011 पर्यंत 64.75 कोटी रुपये खर्च झाले तर नोव्हेंबर 2012 अखेरपर्यंत 812 कोटी रुपये खर्च झाल्याचे म्हटले आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ D/ पूर्वी श्री.अजित.... 12:40

श्री.पांडुरंग फुंडकर....

या प्रकल्पावर आतापर्यंत 800 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. प्रकल्पाचे काम 30 टक्के पूर्ण झ ाल्याचे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे. या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या 47 गावांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. त्यापैकी 32 गावे पूर्णत: आणि 15 गावे अंशत: बाधित होणार असल्याचेही लक्षवेधीच्या निवेदनात नमूद केले आहे. महोदय, पुनर्वसन अधिनियम कलम 11 (1) ची अधिसूचना दि.24/11/2005 रोजी व कलम 13 (1) ची अधिसूचना दि.16/03/2006 रोजी काढण्यात आली. सुरुवातील पुनर्वसनाचे काम 6 टप्प्यात करण्याचे ठरले होते. परंतु 2013 पर्यंत पहिल्या टप्प्यातील केवळ एका गावाचे पुनर्वसन केले आहे.

महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, "पहिल्या टप्प्यातील 6 गावांपैकी मौजे खरखुंडी या पुनर्वसित गावठाणात नागरी सुविधांची कामे सुरु करण्यात आली आहे. इतर 5 गावांच्या पुनर्वसनाची कामे डिसेंबर, 2013 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे." तसेच पुढे असेही नमूद केले आहे की, "सर्व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मार्च-2015 मध्ये पूर्ण करुन प्रकल्पाची घळभरणी करणे नियोजित आहे." महोदय, 6 टप्प्यांपैकी 2013 मध्ये पहिला टप्पा देखील पूर्ण झाला नाही. पुनर्वसनाबाबत 2006 मध्ये अधिसूचना निघाल्यापासून 2013 पर्यंत एकाही गावाचे पूर्णत: पुनर्वसन करण्यात आलेले नाही. यावरुन आपल्या निदर्शनास येईल की, पुनर्वसनाची कामे किती धिम्या गतीने सुरु आहेत. जिल्हाधिकाऱ्यांकडे पैसे पडून आहेत. शेतकऱ्यांच्या जमिनी सरळ पैसे देऊन खरेदी केल्या जात नाहीत. या प्रकल्पाचे सर्व नियोजन ठरलेले आहे. परंतु या प्रकल्पाच्या कामाला पैसा नाही.

महोदय, दुसरी बाब अशी की, माननीय राज्यपालांनी घटनेच्या कलम 371 (2) अन्वये या प्रकल्पासाठी 171 कोटी रुपयांचा निधी दिला होता. परंतु या राज्य सरकारने ते पैसे अप्पर वर्धा आणि बेंबळा प्रकल्पाकडे वळविले. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यानी बैठकीत सांगितले होते की, एक वर्षात वळविण्यात आलेले पैसे परत करण्यात येतील. परंतु अजूनपर्यंत ते पैसे परत मिळाले नाहीत. वास्तविक पाहता नियमानुसार अशा प्रकारे एका प्रकल्पाचे पैसे दुसऱ्या प्रकल्पाकडे वळते करता येत नाहीत. पैशांअभावी जीगांव प्रकल्प रखडलेला आहे. त्यामुळे मूळ प्रकल्पाची कामे बंद आहेत. शिवाय ठेकेदार काम सोडून गेले आहेत. आजच्या घडीला पुनर्वसन आणि प्रकल्पाचे काम बंद आहे. त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या जमिनीचे खरेदी-

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

विक्रीचे व्यवहार बंद आहेत. सरकार हा प्रकल्प आणखी किती दिवस रखडवणार आहे ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनावरुन मार्च-2015 पर्यंत 47 गावांच्या पुनर्वसनाचे काम पूर्ण होणार आहे. पुनर्वसनाच्या पहिल्या टप्प्याचे काम 2013 पर्यंत पूर्ण झालेले नाही. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, उर्वरित टप्प्याचे काम कालबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जीगांव प्रकल्पाच्या बाबतीत सविस्तर माहिती दिलेली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, जीगांव प्रकल्पामुळे बाधित झालेल्या 47 गावांच्या पुनर्वसनाचे काम 6 टप्प्यांमध्ये नव्हे तर आता 5 टप्प्यांमध्ये करण्याचे ठरले आहे. पहिल्या टप्प्याचे काम डिसेंबर-2013 आणि उर्वरित सर्व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम जून-2015 पर्यंत पूर्ण करुन घळभरणी करणे नियोजित आहे. ही बाब बाब लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केली आहे. हे खरे आहे की, या प्रकल्पाच्या भूसंपादन आणि पुनर्वसनाची कामे धिम्या गतीने सुरु आहेत. हा अनुशेष प्रकल्प असल्यामुळे माननीय राज्यपालांनी अनुशेष निर्मूलनाचे आदेश दिले आहेत. शासनाने भूसंपादन अधिकारी, इतर कर्मचारी वर्गाची रिक्त असलेली पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यास परवानगी दिलेली आहे. परंतु त्यास दुर्दैवाने प्रतिसाद मिळाला नाही. राज्याचे मुख्य सचिव स्वत: दरमहा या बाबत बैठक घेतात. त्यामुळे सद्य:स्थितीत त्या ठिकाणी भूसंपादन अधिकाऱ्यांची 4 पदे भरलेली आहेत.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके .....

आणि भूसंपादनाच्या कामाने निश्चितपणे वेग घेतलेला आहे. हे काम प्राधान्याने करण्याचे शासनाचे नियोजन आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांचे असे म्हणणे आहे की, सरळ खरेदीने जमीन खरेदी करावी. भूसंपादनाच्या कार्यवाहीला जर सहा सहा वर्षे लागत असतील तर सरळ खरेदीने जमीन खरेदी करावी. 2006 ची अधिसूचना आहे आणि आता 2013 साल चालू आहे. 600 हेक्टरपैकी फक्त 100 हेक्टरचे भूसंपादन झालेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे कोट्यवधी रुपये पडलेले आहेत. सरळ खरेदीने या शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करुन ताबडतोब पुनर्वसनाच्या कामाला सुरुवात करण्याचे निर्देश शासन देणार का ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, यामध्ये प्रकल्पासाठी 17 हजार हेक्टरचे भूसंपादन करावयाचे आहे. त्यापैकी आतापर्यंत 433 हेक्टर जमीन वाटाघाटीने संपादित केलेली आहे. म्हणजे ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी असतील त्यांच्याशी वाटाघाटी करुन ही जमीन संपादित केलेली आहे. या 433 हेक्टरपैकी 312 हेक्टर जमीन ज्या ठिकाणी प्रत्यक्ष डॅमलाईनचे काम चालू आहे त्या ठिकाणी आणि पुनर्वसनासाठी 121 हेक्टर इतकी जमीन वाटाघाटीने घेतलेली आहे. परंतु निश्चितपणे बाकीच्या शेतकऱ्यांचा वाटाघाटीने जमीन खरेदी करण्याच्या बाबतीत प्रतिसाद मिळत नाही. त्यांचा जर प्रतिसाद मिळाला तर वाटाघाटीने जमीन खरेदी करावी असे शासनाचे धोरणच आहे. प्रतिसाद मिळत नाही म्हणून शेवटी भूसंपादन कायद्याचा वापर करावा लागत आहे. सरळ खरेदीला जर प्रतिसाद मिळाला तर त्यामध्ये सर्व शेतकऱ्यांनी प्रतिसाद द्यावयास पाहिजे. तो प्रतिसाद दिला तर सरळ खरेदीने जमीन खरेदी करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकरी प्रतिसाद देण्यास तयार आहेत. मी त्या भागातील, त्या तालुक्यातील रहिवाशी आहे. जर आपण सरळ खरेदीने जमीन खरेदी केली तर शेतकऱ्यांची आजही तयारी आहे. 12 कोटी रुपये जिल्हाधिकाऱ्यांकडे पडून आहेत पण जिल्हाधिकारी कोणतीही हालचाल करण्यास तयार नाहीत. दरमहा बैठकीबाबत सांगितले जाते पण त्या बैठकीतून काहीही निष्पन्न होत नाही. आम्ही त्या बैठकीस उपस्थित राहात आलेलो आहोत.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

1990 साली प्रशासकीय मान्यता मिळालेला हा प्रकल्प गेली 23 वर्षे रखडलेला आहे. विदर्भातील हा एक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्या प्रकल्पाची किंमत दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. आता नवीन सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी 5 हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. म्हणजे 362 कोटी रुपयांचा प्रकल्प 5 हजार कोटी रुपयांवर गेलेला आहे. काम होत नाही, काम धिम्या गतीने चालू आहे म्हणून प्रकल्पाची किंमत वाढत आहे. 22-22 वर्षे विदर्भातील प्रकल्प अशा पध्दतीने रखडले तर विदर्भाचा विकास कधीही होऊ शकणार नाही. अशा पध्दतीने विदर्भातील प्रकल्प रखडविले जात आहेत. प्रकल्पाचे पैसे दुसऱ्या प्रकल्पावर वळविले जात आहेत. जीगाव प्रकल्पाचे 171 कोटी रुपये अप्पर वर्धा आणि बेंबळा प्रकल्पाला जे दिलेले आहेत ते एक वर्षात परत येणार होते. ते पैसे परत का आले नाहीत, ते पैसे कधी परत करणार ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन मुद्दे उपस्थित केलेले आहे. मी पहिल्यांदाच सांगितले की, मोठ्या प्रमाणावर भूसंपादन करावे लागणार आहे. जवळजवळ 13 हजार हेक्टरचे भूसंपादन आहे. सरळ खरेदीने जमीन खरेदी करावयाची झाली तर त्यासाठी फार मोठा निधी लागणार आहे. 12 कोटी रुपयांचा निधी त्यासाठी पुरेसा नाही. पुनर्वसनाच्या बाबतीत मी सांगितले की, ज्या ठिकाणी शक्य आहे त्या ठिकाणी प्राधान्याने वाटाघाटीने सरळ खरेदी करण्यात येईल. परंतु यासाठी मोठा निधी लगणार आहे. वाटाघाटीने करावयाच्या सरळ खरेदीमध्ये जरी एका शेतकऱ्याने आक्षेप घेता तरी वाटाघाटीने खरेदी करता येत नाही. कारण आपल्याला त्या सर्व जागेची गरज असते. एक दोन शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला तरी आपल्याला वाटाघाटीने खरेदी करता येत नाही. 171 कोटी रुपये अप्पर वर्धा आणि बेंबळा प्रकल्पासाठी जे वळते केलेले आहेत ते माननीय राज्यपालांच्या आदेशान्वये वळते केलेले आहेत. ही रक्कम परत आणण्यासाठी वित्त विभागाकडे निश्चितपणे पाठपुरावा चालू आहे. हा 171 कोटी रुपयांचा निधी वित्त विभागाच्या माध्यमातून लवकरात लवकर आम्हाला मिळावा असा प्रयत्न चालू आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यपालांच्या निर्देशानुसार बॅकलॉगमधील हा प्रकल्प आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

विदर्भातील अनुशेषातील हा प्रकल्प आहे. 2017 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करावयाचा असेल तर 4 वर्षामध्ये जवळपास 3900 कोटी रुपये लागतील. त्यामुळे दरवर्षी किमान 1 हजार कोटी रुपये मिळाले तरच हा प्रकल्प पूर्ण होईल. राज्यपालांचे निर्देश असल्यामुळे व अनुशेष भागातील हा प्रकल्प असल्यामुळे हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी शासन दरवर्षी अर्थसंकल्पात 1 हजार कोटी रुपयांची तरतूद करणार आहे का ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा किंवा उर्वरित महाराष्ट्र या भागांसाठी राज्यपालांच्या निर्देशानुसार निधीचे वाटप होत असते. राज्यपालांचे निर्देश डावलून बजेटमध्ये तरतूद करता येणार नाही. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात निधी लागणार आहे याची शासनाला जाणीव आहे. 4 हजार कोटी रुपये या प्रकल्पासाठी लागणार आहेत. 900 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. येत्या 4 वर्षामध्ये हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. यासाठी शासनाच्यावतीने निश्चितपणे पाठपुरावा केला जाईल. विदर्भातील महत्वाचा प्रकल्प असल्यामुळे या प्रकल्पासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

-------

2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**पृ. शी.** : धरमतर खाडीतून ईस्पात कंपनीची बोटीतून मालाची वाहतूक सुरु असल्यामुळे अलिबाग हद्दीतील गावकऱ्यांचा मासेमारीचा व्यवसाय बंद पडणे

**मु. शी.** : धरमतर खाडीतून ईस्पात कंपनीची बोटीतून मालाची वाहतूक सुरु असल्यामुळे अलिबाग हद्दीतील गावकऱ्यांचा मासेमारीचा व्यवसाय बंद पडणे यासंबंधी श्री.दिवाकर रावते ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" धरमतर खाडीतून जेएसडब्ल्यू (ईस्पात कंपनी), पीएनपी इत्यादी कंपनीच्या मालाची वाहतूक बोटीने / जहाजाने रात्रंदिवस चालू असणे, वाहतुकीमुळे धरमतर खाडीच्या दोन्ही काठांवर असलेल्या अलिबाग हद्दीतील गावातील लोकांचा मासेमारी हा पारंपारिक व्यवसाय बंद पडणे, हे मच्छीमार सहकारी गेली 14 वर्षे सातत्याने सदरहू कंपन्याविरोधात संघर्ष करीत असणे, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी मच्छीमार नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, बाधित झालेल्या स्थानिक पारंपारिक मच्छीमार कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच इतर मागण्यांसाठी तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिनांक 27 फेब्रुवारी, 2013 रोजी धरमतर खाडी प्रकल्पबाधित मच्छीमार संघर्ष समितीच्यावतीने मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे देण्यात येणे, या सर्व प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, तसेच शासनाने यासंदर्भात केलेली कार्यवाही व उपाययोजना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.भास्कर जाधव ( मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रश्न 1997 पासून प्रलंबित आहे. तत्कालीन पालक मंत्री श्री.मोरे यांनी एक बैठक घेतली होती. त्यानंतर माननीय राज्यमंत्र्यांनी बैठक घेतली होती. त्यावेळी तेथील मच्छीमार बेमुदत उपोषणाला बसले होते. माननीय पालक मंत्र्यांच्या विनंतीनुसार जिल्हाधिकाऱ्यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले होते. त्यानंतर अनेक बैठका झालेल्या आहेत. त्याची यादी माझ्याजवळ आहे. या माल वाहतुकीमुळे मच्छीमारांची जाळी तुटत आहेत. त्याचा सर्व्हेही झालेला आहे. आजच्या निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, "सन 2011 मध्ये पेण तालुक्यातील 28 गावातील व अलिबाग तालुक्यातील 20 गावातील अशा एकूण 3,335 मासेमारांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून मागणी केली आहे. या संदर्भात माननीय मंत्री (बंदरे) यांच्याकडे दि.25.4.2011 रोजी बाधित मासेमार व संबंधित खात्याचे अधिकारी यांची बैठक घेण्यात आली. या संदर्भात बाधित मच्छीमारांची संख्या निश्चित करणे व त्यांना इस्पात व इतर बार्जेसद्वारे वाहतूक करणाऱ्या कंपन्या तसेच रासायनिक कंपनीकडून भरपाई देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी अभ्यास करुन अहवाल देण्याचे निर्देश देण्यात आले." हे निर्देश देऊनही 2 वर्षे झालेली आहेत. मूळ प्रश्न तर 1997 पासून सुरु आहे. त्या भागातील काही मच्छीमारांना नुकसान भरपाई मिळाली काहींना मिळालेली नाही. याबाबतचा अहवाल सादर होऊनही 2 वर्षे झालेली आहेत. त्या लोकांनी सतत आंदोलन करीत राहावे अशी शासनाची इच्छा आहे का ? शासनाने मच्छीमारांच्या बाजूने उत्तर दिलेले आहे. करु, बघू, घेऊ अशा प्रकारची उत्तरे 1998 पासून दिली जात आहेत. आता 2013 साल सुरु झालेले आहे. त्यामुळे शासनाची भूमिका ठाम राहणार आहे की नाही ? माननीय मुख्यमंत्र्यांनी ठाम भूमिका घेतली जाईल असे सांगितलेले आहे. ही ईस्पात कंपनी तेथे मोठ्या प्रमाणावर काम करीत आहे. केवळ 1 ते 2 हजार मच्छीमारांना नुकसान भरपाई द्यावयाची आहे. शासनाचे विजेच्या बिलाचे 350 कोटी रुपये थकविणारी ही कंपनी आहे. त्यामुळे या मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यासंबंधी शासन ठाम भूमिका घेणार आहे की नाही ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा प्रश्न जुना आहे याबद्दल दुमत नाही. 1997 नाही तर 1991 पासूनचा हा प्रश्न आहे. या सभागृहात वेगवेगळ्या माध्यमातून अनेकदा चर्चा झालेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

1991ला हा प्रकल्प तयार झाला. त्यावेळची आकडेवारी पाहिली तर असे दिसून येते की, त्यावेळी मर्यादित असे मच्छीमार होते. त्यानंतर 3335 मच्छीमारांनी नुकसान भरपाईची मागणी केली. तेथे असलेल्या मच्छीमारांच्या संघटना, जिल्हाधिकारी, कंपनीचे व्यवस्थापन या सर्वांची एकत्रितपणे बैठक झली. 1991 ते 2003 या कालावधीपर्यन्त हा प्रश्न उपस्थित झाला नव्हता. अधिकृतपणे असे सांगता येणार नाही, परंतु त्यावेळी त्या परिसरामध्ये वीसएक मच्छीमार होते अशी माहिती उपलब्ध आहे. 2003 सालामध्ये 318 लोकांना प्रत्येकी 1 लाख 45 हजार रुपये प्रमाणे कंपनीने नुकसान भरपाई दिलेली आहे. त्यावेळी किती मच्छीमार अस्तित्वात आहेत, किती मच्छीमारांना मासेमारीचा त्रास होतो यासंबंधीचा आढावा घेण्यात आलेला होता. हा विषय तेथे संपत नाही. या विषयाचा कुठेतरी शेवट व्हावा, याला कुठे तरी डेडलाईन असली पाहिजे.

आता 3335 मच्छीमारांनी आम्हाला नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अशी मागणी केलेली आहे. या संदर्भात कंपनीचे म्हणणे असे आहे की, त्यांना 135 मीटर इतका नोटिफाईड एरिया दिलेला आहे. त्या नोटिफाईड एरियाच्या आत मध्ये मच्छीमारी करताना काही नुकसान झाले तर त्याबाबतीत कंपनीचा काही दोष नाही. नोटिफाईड एरियाच्या बाहेर कंपनीने गेली तर ती दोषी ठरेल. हा प्रश्न सातत्याने सभागृहासमोर येत असला तरी वाढत्या आकडेवारीचा आणि कंपनीने नुकसान भरपाई देण्यासंबंधीचा मेळ घालणे थोडे अवघड जात आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री महोदयांनी डेडलाईनचा उल्लेख केला तरी त्यांनी निवेदनामध्ये मच्छीमारांची चांगली बाजू मांडलेली आहे. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, चॅनेलमध्ये बाहेर जरी जाळी लावली तरी पाण्याचा प्रवाह व वारा यामुळे जाळी भरकटून ती जलवाहतुकीच्या चॅनेलमध्ये येत असतात. कंपनीच्या बार्जेसची होणारी सततची वाहतूक यांचा मच्छीमारांना मासेमारीस होणारा अडथळा, राखून ठेवण्यात आलेला चॅनेल यामुळे मासेमारीसाठी मिळणारे कमी क्षेत्र तसेच खाडीत सोडण्यात येणा-या रसायनमिश्रित पाण्यामुळे पर्यावरणाचा असमतोल यामुळे प्रदूषण होऊन येथील पारंपरिक मच्छीमार यांचे मत्स्योत्पादनावर परिणाम झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

माझे म्हणणे असे आहे की परिस्थिती शासनाने मान्य केलेली असल्यामुळे 3335 मच्छीमारांची जी काही मागणी आलेली आहे ती परिसीमा एकदा ठरवावी. कारण मच्छीमारांना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

फक्त नुकसान भरपाई द्यावयाची आहे त्यांना व्यवसायासाठी काही उपलब्ध करुन द्यायचे नाही. तेव्हा या प्रश्नासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी आपल्या दालनामध्ये बैठक घ्यावी आणि प्रश्न निकाली काढावा. मच्छीमारांच्या संबंधी शासनाने सकारात्मक भूमिका घेतलेली आहे. त्या भूमिकेचा मच्छीमारांना फायदा व्हावा हीच आमची अपेक्षा आहे.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची सद्‌भावना लक्षात घेता यासंदर्भात प्रयत्न सुरु आहेत. यासंदर्भात 25 एप्रिल 2011 रोजी मंत्री महोदय, बंदरे यांच्या दालनामध्ये बैठक झाली होती.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

त्या बैठकीचे इतिवृत्त मी आज सकाळी वाचले. माननीय श्री. नारायण राणे यांच्याकडे बंदरे हा विभाग आहे. मत्स्य विभाग हा आमच्याकडे आहे. बंदरे विकास मंत्री श्री. नारायण राणे यांच्याकडे उद्योग विभाग सुध्दा आहे. हे दोन्ही विभाग त्यांच्याकडे असल्यामुळे तसेच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांना आश्वासन दिल्यामुळे मी आमच्या विभागामार्फत माननीय मंत्री श्री.नारायण राणे साहेबांना विनंती करीन की, या विषयाच्या अनुषंगाने त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात बैठक घेण्यात यावी. कारण माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांच्याकडे उद्योग विभाग आहे. बंदरे विकास विभाग देखील त्यांच्याकडे आहे. मी मत्स्य विकास राज्यमंत्री आहे, मी मत्स्य विकास मंत्री सभागृहात उपस्थित आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय या विषयाच्या बाबतीत बैठक आयोजित करतील त्यावेळी कोकणातील लोकप्रतिनिधींना देखील निमंत्रित करण्यात येईल व त्या बैठकीत या विषयाच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल.

श्री.विनायक राऊत : सन्माननीय मंत्री महोदयांनी मागच्या वेळी मत्स्य व्यवसायावर विपरित परिणाम ज्या गोष्टींमुळे होतो, त्याबाबतीत एक आश्वासन दिले होते. मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, कोकण किनारपट्टीवर जे मत्स्य व्यवसायिक आहेत, जे छोटे आहेत, जे पारंपारीक पध्दतीने मत्स्य व्यवसाय करतात, छोटया यांत्रिकी बोटीने मत्स्य व्यवसाय करतात, त्यांना डिझेल आणि रॉकेल सवलतीच्या दरात देण्यापासूनची पूर्वीपासूनची पध्दत होती. ती पध्दत केंद्र सरकारच्या धोरणामुळे बंद झाली. महाराष्ट्र सरकारने सुध्दा त्यांना अनुदान देणे बंद केले आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी या मत्स्य व्यवसायाला ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहे, त्या सर्व गोष्टी उपलब्ध करुन देऊ अशा प्रकारचे आश्वासन दिले होते. मत्स्य व्यवसायिकांच्या सहकारी संस्थांना मार्फत रॉकेल आणि डिझेल सवलतीच्या दरात देण्याची पूर्वीची पध्दत सुरु होती. त्या बाबतीत शासन नेमकी कोणती कार्यवाही करणार आहें?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांच्या निवेदनातून तीन प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यांना जे काही म्हणावयाचे आहे, ते माझ्या लक्षात आलेले आहे. मच्छीमार सहकारी संस्था मोठया प्रमाणात डिझेल व्यापारी तत्वावर खरेदी करतात म्हणून त्यांची सबसिडी रद्द होण्याचा प्रसंग

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

मध्यंतरीचा काळात उद्‌भवला होता. यात केंद्र सरकारने मार्ग काढलेला आहे. त्यांचा निर्णय मार्गस्थ लागलेला आहे. दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, मच्छीमार सहकारी संस्थांना अनुदान देण्यात येत होते, त्या संस्था त्या त्या खातेदारांच्या नावावर अनुदान वितरित करीत होते. या बाबतीत असा निर्णय झाला आहे की, प्रत्यक्ष मच्छीमार सहकारी संस्थेतील सदस्यांकडे आणि जे कोणी कर्ज काढतात, त्यांच्या नावावर परस्पर धनादेश जमा केले जातात. त्यामुळे या सहकारी संस्था थोडया अडचणीत येत आहेत असे सन्माननीय सदस्यांना कदाचित म्हणावयाचे असावे. आता मच्छामार सहकारी संस्थेतील सदस्यांना थेट अनुदान देण्यात येते. त्यामुळे या मच्छीमार सहकारी संस्था अडचणीत येऊ लागल्या आहेत. या संस्थेतील सदस्यांना थेट अनुदान दिले जात आहे.

सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या तिसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, आंध्र प्रदेश आणि केरळ राज्याच्या धर्तीवर या मच्छीमार व्यवसायिकांना रॉकेलचा कोटा दिला जावा अशा प्रकारचे वक्तव्य मी सभागृहात केले होती ही गोष्ट खरी आहे.मला सांगितले पाहिजे की, दोन महिन्यापूर्वी राज्य शासनाकरिता मच्छीमार व्यवसायिकांसाठी रॉकेलचा कोटा मंजूर करुन घेतलेला आहे. आंध्र प्रदेश आणि केरळ राज्य मच्छीमारांना सबसिडी देते तशा पध्दतीने महाराष्ट्र सरकार सबसिडी देणार आहे काय असाही त्यांचा पुढील प्रश्न असेल. तर त्या बाबतीत "होय" असे उत्तर असून महाराष्ट्र सरकारकडून मत्स्य व्यवसायिकांना सबसिडी दिली जाईल असा प्रयत्न करण्यात येईल.

------------

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : येरवडा,जि.पुणे येथील क्रीडा संकुलाचे अपूर्ण असलेले बांधकाम.

**मु. शी.** : येरवडा,जि.पुणे येथील क्रीडा संकुलाचे अपूर्ण असलेले बांधकाम यासंबंधी श्री.मोहन जोशी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"येरवडा,जि.पुणे येथील महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डातील विभागीय क्रीडा संकुलाचे उद्‌घाटन माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते होऊनही सदर क्रीडा संकुलाचे बांधकाम अर्धवट अवस्थेत असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे, एका दशकापासून या क्रीडा संकुलाचे बांधकाम संथगतीने सुरु असल्यामुळे परिसरातील नागरिकांना त्याचा वापर करता न येणे, निधीची कमतरता तसेच ठेकेदारांच्या दिरंगाईमुळे ऑलिम्पिकच्या धर्तीवर तयार करण्यात आलेले जलतरण तलाव सदोष असल्याचे निदर्शनास येणे, तलावाची झालेली दुरावस्था, क्रीडा संकुलात टेनिस कोर्ट, बास्केटबॉल, स्केटींग, जलतरण तलाव, कबड्डी, खो-खो या मैदानी खेळांसह जॉगिंग ट्रॅक तसेच बहूउद्देशीय सभागृहात कॅरम व बध्दीबळाची व्यवस्था असणे, परंतु क्रीडा संकुलाच्या अपूर्ण बांधकामामुळे मुलांना त्यांचा काहीही फायदा न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

ॲड.पद्माकर वळवी ( क्रीडा व युवक कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : पुणे शहरातील येरवडा, नगररोड या भागात मोठया प्रमाणात लोकसंख्या वाढलेली आहे. त्या भागातील तरुणांसाठी एक क्रीडा संकुल असावे यासाठी 2003-04 या वर्षी सदर क्रीडा संकुलाचे भूमिपूजन झाले. आज त्या भूमिपूजनास 9 वर्षांचा कालावधी झाला आहे. हे क्रीडा संकुल अपूर्ण असताना त्यावेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय घाईघाईने क्रीडा संकुलाचे भूमिपुजन उरकले. या संदर्भात माझे माननीय मंत्री महोदयांना तीनच प्रश्न आहेत. जलतरण तलाव सदोष आहेत हे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात मान्य केले आहे....

यानंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ गितेनंतर 13:05

लक्षवेधी सूचना क्रमांक-5............ श्री.मोहन जोशी.........

त्याला जबाबदार असणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेवर किंवा संबंधित ठेकेदारावर काय कारवाई करणार आहात आणि जे काही नुकसान झाले आहे ते ठेकेदाराकडून वसूल केले जाईल काय?

सभापती महोदय, आजपर्यंत या क्रीडा संकुलासाठी शासनाने किती निधी मंजूर केला व त्यातील किती निधी खर्च करण्यात आला आहे? बांधकाम अपूर्ण असताना तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्याची घाई करण्यामागचे कारण काय होते? ज्यावेळेला स्टेडियम उभारण्याचे निश्चित झाले त्यावेळी जो आराखडा तयार केला गेला, त्या आराखड्यामध्ये स्टेडियमला जोडूनच शेजारी असलेल्या शासकीय मनोरुग्णालयाच्या 10 एकर जागेत ॲथलेटिक ट्रॅक निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतला होता, त्याची अंमलबजावणी आजपर्यंत झालेली नाही. ही जागा ताब्यात घेऊन किती दिवसात ॲथलेटिक ट्रॅक पूर्ण करण्यात येईल?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, 25 नोव्हेंबर, 2011 रोजी पुण्याच्या विभागीय क्रीडा संकुलाचे उद्घाटन तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काही सुविधांच्या स्वरुपात झालेले होते. पूर्ण सुविधांसह उद्घाटन झालेले नव्हते हे मी मान्य करतो. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी उद्घाटन केले त्यामध्ये बास्केटबॉल, व्हॉलीबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, खो-खो मैदान, जलतरण तलाव यांचे उद्घाटन झाले होते. त्या ठिकाणी ज्या सुविधा पूर्ण झाल्या त्या उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या पाणी पुरवठ्याच्या जोडणीची परवानगी 4 फेब्रुवारी, 2012 मिळाली. त्यामुळे जलतरण तलाव सुरु झालेला नाही. ही गोष्ट खरी आहे की, जलतरण तलावाचे बांधकाम करीत असताना त्यामध्ये काही तांत्रिक बाबींची कमतरता राहिली. ते सर्व तांत्रिक अडथळे निश्चितपणे तपासून घेण्यात येतील. त्याबाबत जीएसडीएमार्फत आणि खासकरुन विभागीय क्रीडा संकुलाचे वास्तुविशारदांकडून डायव्हिंग पुलाचे तांत्रिक दोष दुरुस्त करण्याचे काम सुरु आहे.

मी या सभागृहाला आश्वस्त करतो की, मे 2013 अखेर मुख्य तलाव, बेबी तलाव व डायव्हिंग पूल या तीनही जलतरण तलावांचे तांत्रिक दोष बाजूला सारुन ते सुरु करण्यात येतील. यामध्ये काही सुविधा पूर्ण केल्या आहेत. बास्केटबॉल, व्हॉलीबॉल ग्राऊंडची सुविधा एप्रिल महिन्यापासून सुरु होईल. पाण्याच्या जोडणीची परवानगी 4 नोव्हेंबर, 2012 रोजी मिळाल्यामुळे निश्चितपणे सुविधा वापरात येतील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी...... लक्षवेधी सूचना क्रमांक-5...........

माननीय सदस्यांनी निधीबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. 2002 मध्ये सर्वप्रथम या विभागीय क्रीडा संकुलाच्या उभारणीचा निर्णय घेतला होता. तेव्हापासून आजपर्यंत शासनाने 20 कोटी रुपये या क्रीडा संकुलाला दिलेले आहेत. 2004 मध्ये 16.90 कोटी रुपये खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सुधारित प्रशासकीय मान्यता 28 फेब्रुवारी, 2012 रोजी मिळाली. मे, 2013 अखेरीस सर्व बांधकामाच्या सुविधा पूर्ण होतील.

या विभागीय क्रीडा संकुलाच्या बाजूला मनोरुग्णालयाची जागा आहे. ते मोकळे मैदान आहे. क्रीडा संकुलाच्या कामाला सुरुवात करताना त्या दिशेने बैठकीमध्ये चर्चा झाली असावी. परंतु निश्चितपणे याबाबत त्यावेळी झालेल्या चर्चेचे प्रोसिडिंग तपासून घेण्यात येईल. या जागेचा विकास कसा करता येईल ही बाब तपासून घेऊ. आज त्याचा कालावधी मी सांगू शकत नाही. परंतु निश्चितपणे सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना तपासून कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी एका दुर्लक्षित प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

नंतर 2के.1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, मला माननीय मंत्रीमहोदयांना विचारावयाचे आहे की, विलंबामुळे किती खर्च वाढलेला आहे ? उत्तरामध्ये म्हटले आहे की, स्वीमिंग पूलाचे काम सदोष करण्यात आलेले नाही तसेच पाण्याचा दाब विचारात घेऊन उपाययोजना करण्यात आलेली आहे. त्यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, स्वीमिंग पूलांच्या संदर्भात अगोदर जी डिझाईन करण्यात आली होती त्यावेळेस पाण्याचा दाब लक्षात घेतला गेला नव्हता काय ? आज आम्ही आमदार आहोत परंतु आमच्या पूर्वीचे आमदार श्री. छाजेड असतील किंवा नगर सेवक श्री. उध्दवराव वावरे असतील अशा बऱ्याच लोकांच्या प्रयत्नाने हे काम झालेले आहे. त्यामुळे या ठिकाणच्या कामाच्या संदर्भात विधानसभा व विधान परिषदेच्या सदस्यांना बोलावून या ठिकाणी काय काय सुविधा दिल्या जातात तसेच यामध्ये अजून काय काय सुधारणा करणे शक्य आहे याची माहिती घेण्याची आवश्यकता आहे. पुणे येथे कुस्ती क्रीडा मोठया प्रमाणात सुरु असतात त्यामुळे या ठिकाणी दोन्ही सभागृहाच्या सदस्यांना बोलावून, आमच्या सूचना समाजावून घेऊन त्यानुसार पुढील कारवाई केली जाईल काय ?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय,पुण्याचे विभागीय क्रीडा संकुल चांगल्या प्रकारचे क्रीडा संकूल आहे. या क्रीडा संकुलाच्या संदर्भात पुणे विभागाचे विधानसभा व विधान परिषद सदस्यांची एकत्र रित्या भेट देऊन सूचना केल्या तर त्यासंदर्भात निचितच स्वागत केले जाईल.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जलतरण तलावाचा मुद्दा उपस्थित केलेला असून डायव्हींग पूलामध्ये जो दोष होता त्याचे कारण सापडले असून डायव्हींग पुलाची दुरुस्ती करण्यासाठी जीएसडीए आणि वास्तुविशारदाकडून सुधारणा केल्या जात आहेत. त्यामुळे मे 2013 पर्यंत जलतरण तलाव सुस्थितीत सुरु होईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

--------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : ठाणे जिल्हयातील भाईंदर येथील बीएसयुपी अंतर्गत प्राप्त झालेला निधी गेल्या दोन वर्षापासून अखर्चित असणे

**मु. शी.** : ठाणे जिल्हयातील भाईंदर येथील बीएसयुपी अंतर्गत प्राप्त झालेला निधी गेल्या दोन वर्षापासून अखर्चित असणे यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, जयवंतराव जाधव, ॲड. जयदेवराव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" ठाणे जिल्ह्यातील भाईंदर येथील शहरी गरिबांना मूलभूत सुविधा पुरविणे (बीएसयुपी) या योजनेअंतर्गत मीरा भाईंदर क्षेत्रातील चार हजार लाभार्थ्यांसाठी बांधण्यात येणारी घरकुल योजना, या योजनेअंतर्गत मीरा भाईंदर क्षेत्रातील जनता नगर व काशी चर्च येथील झोपडपट्टीवासियांना प्रत्येकी २६९ चौरस फुटांचे घर देण्याचा कार्यक्रम आखण्यात येणे, जनता नगर येथील ३६६५ व काशी चर्च येथील ४७१ झोपडीधारकांना या योजनेचा लाभ मिळणार असणे, परंतु या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने ४८ कोटी रुपयांचा दोन वर्षापूर्वी दिलेला निधी अद्यापही अखर्चित असल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, परिणामी तेथील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने केलेली व करावयाची उपाययोजना "

श्री.सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, ज्या महानगरपालिका क्षेत्रांमध्ये घरांची अत्यंत अडचण होते त्या ठिकाणी जेएनएनयुआरएम अंतर्गत योजना मंजूर होत असते. त्यामुळे सन 2009 साली 2080 कोटी रुपयांचा प्रकल्प मान्य झालेला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या हिश्याचा 48 कोटी रुपयांचा पहिला हप्ता महापालिकेला देण्यात आला आहे. परंतु सन 2013 पर्यंत या योजनेखाली केवळ 13 कोटी रुपयेच खर्च झालेले आहेत. हा प्रकल्प इन-सीटू असून या प्रकल्पाचे चार टप्प्यात विभाजन करण्यात आलेले आहे. सन 2009 ते 2013 पर्यंतचा जवळपास चार वर्षाचा कालावधी गेलेला असतांना तसेच या योजनेसाठी केंद्रसरकारचा एवढया मोठया प्रमाणात निधी आलेला असतांना तो वेळेवर खर्च होऊ शकला नाही तर हा निधी परत जाण्याची शक्यता असते. त्यामुळे तेथील प्रश्न सुटत नाहीत, तेथील घरे बांधली जात नाहीत. एवढा मोठा प्रकल्प पूर्ण करण्याची क्षमता महापालिकेकडे आहे किंवा नाही असा प्रश्न देखील या निमित्ताने निर्माण होतो. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या मान्यता प्राप्त एजन्सीकडून अशा प्रकारचे मोठे प्रकल्प राबविण्यात काही मदत घेता येईल का, जेणे करुन हा प्रश्न लवकर सुटू शकेल ? मीरा भाईंदरच्या या झोपडपट्टी धारकांना लवकरात लवकर घरे मिळण्याच्या दृष्टीने काही उपाययोजना शासन करणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, ही योजना शासनाच्या वतीने पूर्ण करता येईल काय यासंदर्भात विचार करण्यात आला होता परंतु स्वायत्त अधिकार असलेल्या संस्थांना हे काम दिले तर ते डिसेंट्रलाईज होईल त्यामुळे केंद्रशासनाने हा निधी त्या त्या महानगर पालिकेला देऊन ही योजना कार्यान्वित करावी असा निर्णय घेतला. ही योजना 2009 साली सुरु झाली असून वेगवेगळया कारणामुळे या योजनेला पाहिजे त्या प्रमाणात गती मिळालेली नाही ही वस्तुस्थिती आहे.

आपल्याला माहिती आहे की, बीओसीपी अंतर्गत झोपडपट्टीचा पुनर्विकास त्या त्या महानगर पालिकेने करावयाचे आहे. परंतु आहे त्या जागेवरच घरे मिळाली पाहिजे असा लोकांचा आग्रह असतो. त्या ठिकाणच्या लोकांनी इन-सीटू करण्याची भुमिका घेतल्यामुळे महानगरपालिकेला ती योजना घेता आली नाही. या योजनेला टप्प्या टप्प्याने सुरुवात करण्याचा प्रयत्न

..4..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर.....

महानगरपालिकेने केलेला आहे. यासंदर्भात आतापर्यंत 900 लोकांना संक्रमण शिबिरात हलविण्याचे काम देखील झालेले आहे. डिसेंबर 2014 पर्यंत ही योजना कार्यान्वित करण्यात यावी याबाबत महानगर पालिकेला सांगण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर...

सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. बीएसयुपी च्या माध्यमातून केंद्र सरकार निधी देते. परंतु, स्थानिक लोकांचा त्यांच्या स्तरावर विरोध असतो. ही योजना गरिबांसाठी आहे, याचा विचार महानगरपालिकांनी केला पाहिजे. पण तसा विचार नगरपलिका आणि महानगरपालिका करीत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे व्हिडिओ कॉन्फरन्सींगद्वारे सचिवांनी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील त्यांना समज देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुढच्या काळात केंद्र सरकारकडून आलेला निधी परत जाणार नाही याची खबरदारी घेण्यात येईल. केंद्रीय मंत्री श्री.अजय माखन यांना या योजनेला मुदतवाढ देण्यात यावी हणून विनंती केली आहे.

**उप सभापती** : केंद्र शासनाचा निधी परत जाईल या भीतीने योजना न राबविता खऱ्या अर्थाने ही योजना राबविली पाहिजे यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. सदर योजना सन 2014 पर्यंत होईल काय, याबाबत खात्रीशीरपणे सभागृहाला अवगत करावे. कारण हा भाग माझ्या मतदार संघात येतो.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, होय. यासंबंधी योग्य ती काळजी घेतली जाईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबई शहर आणि आसपासच्या परिसरामध्ये लोकसंख्या वाढत आहे. ही लक्षवेधी सूचना आहे ती झोपडपट्टीवासियांसाठी जी योजना राबविण्यात येते त्यासंबंधातील आहे. जनता नगर येथील 3665 व काशी चर्च येथील 471 झोपडीधारकांना या योजनेचा लाभ मिळणार होता. आता मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 900 जणांना संक्रमण शिबिरात स्थानांतर केलेले आहे. शहरामध्ये अनेक योजना सुरू आहेत. यात प्रशासकीय अधिकाऱ्यांचा गलथानपणासुद्धा सुरू आहे. हे अधिकारी पात्र-अपात्रेचा घोळ घालत आहेत. अशा योजना 10 ते 15 वर्षे प्रलंबित राहिल्या आहेत. तेव्हा या योजनेचा निधी परत जाण्या पेक्षा प्रशासनाने आपल्या गलथानपणामध्ये सुधारणा करून लोकांना तातडीने पुनर्वसनाची घरे कशी मिळतील हे पाहणे आवश्यक आहे. दरवेळी आपण अधिवेशनासंबंधी हा मुद्दा उपस्थित करतो. पण काहीच होत नाही. त्यामुळे यासंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देणे आवश्यक आहे. प्रशासन पात्र-अपात्र, संक्रमण शिबिर, पुनर्वसन यासाठी जो अवधी घालवत आहे तो फार मोठा आहे. तो कमी करण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, व्हिडिओ कॉन्फरन्सींगद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांनी महानगरपालिका, नगरपालिकांच्या मुख्य अधिकाऱ्यांशी चर्चा करून ॲक्शन प्लॅन तयार करावा. मानवी चेहऱ्याला आकार देणारी ही योजना आहे. पण त्यासंबंधीची मानसिकता काही काही महानगरपालिकांमध्ये होत नाही. त्यामुळे महानगरपालिकांचे आयुक्त, नगरपालिकांचे मुख्य अधिकारी यांच्या बरोबर सेमिनार आयोजित करण्याचे काम आम्ही करणार आहोत. यामध्ये माननीय मुख्यमंत्री व मी स्वत: पुढाकार घेणार आहोत. या योजने संबंधातील पात्रता-अपात्रता ऑलरेडी झालेली आहे. ही जागा इन-सीटू करावयाची होती. ही जागा शासनाची होती. त्यावर आरक्षण होते. त्यात बदल करण्यासाठी विलंब झालेला आहे. डिसेंबर 2014 पर्यंत ही योजना निश्चितपणे पूर्ण करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मार्च 2014 पर्यंत सदर योजना शासन पूर्ण करणार आह. मला आपल्या मार्फत मंत्री महोदयांना एवढेच विचारावयाचे आहे की, मिरा-भाईंदरमध्ये ज्या कंत्राटदाराला काम दिले आहे त्याला कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने काळ्या यादीत टाकले असून त्याची सगळी देयके थांबविली आहेत हे खरे आहे काय ? काळ्या यादीत टाकलेल्या कंत्राटदाराला आपण काम दिले आहे ते आपण तसेच सुरू ठेवणार आहात काय किंवा त्याच्याकडून काढून घेणार आहात ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, यासंबंधातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. कंत्राटदाराला काळ्या यादीमध्ये टाकले असेल तर त्याला काम न देण्याची राज्य शासनाची भूमिका त्या महानगरपालिकेला कळविण्यात येईल. सदर लक्षवेधी सूचना ही मीरा-भाईंदरशी संबंधित आहे. ती कल्याण-डोंबिवली महानगरपलिकेशी संबंधीत नाही, त्यामुळे यासंबंधातील माहिती आता माझ्याकडे नाही अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : तोच कंत्राटदार असेल तर त्याच्यावर आताच कारवाई करता येऊ शकेल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सुभाष पाटील असोसिएटस असे त्या कंत्राटदाराचे नाव आहे.

**उप सभापती** : मंत्री महोदय, आपण या कंपनीची माहिती घेऊन त्यावर आपण योग्य ती कारवाई करावी.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माझ्याकडे कंत्राटदारांच्या कंपनीची नावे आहेत. शायनो कॉर्पोरेशन, डिव्हिनीटी कॉर्पोरेशन, श्री जी कन्स्ट्रक्शन आणि डी.के.इन्फ्रास्ट्रक्चर अशी नावे आहेत. यापैकी काही जणांची नावे माझ्याकडे नाहीत. त्यात जर त्यांचे नावे असेल तर तशा सूचना देण्यात येतील.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एक माणूस कंपनीचे नाव वेगळे दाखवू शकतो. परंतु डायरेक्टर तोच असू शकतो. तसा प्रकार येथे असेल तर अशा गोष्टी थांबविणार की नाही ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर होय असे आहे.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ ST/ D/ पूर्वी श्री.भारवि... 13:20

**पृ. शी.** : मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशनला वांद्रे (प) येथील मैदान तीन वर्षासाठी देण्याचा निर्णय होऊनही त्याची अद्याप अंमलबजावणी न होणे

**मु. शी.** : मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशनला वांद्रे (प) येथील मैदान तीन वर्षासाठी देण्याचा निर्णय होऊनही त्याची अद्याप अंमलबजावणी न होणे यासंबंधी ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, भाई गिरकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.आशिष शेलार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशनने दिनांक 11 ऑगस्ट, 2010 रोजीच्या पत्राद्वारे वांद्रे (पश्चिम) येथील मैदान क्र.1 हे फुटबॉल खेळण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात म्हाडाला केलेल्या विनंतीनुसार दिनांक 18 नोव्हेंबर, 2011 च्या पत्र क्र. सभुन्य/अंधेरी/मु.म/नाहप्र/ 387/11 द्वारे काही अटी व शर्तीच्या अधीन राहून पुढील तीन वर्ष कालावधीसाठी मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशनला देण्याचा झालेला निर्णय त्यानुसार दिनांक 18 फेब्रुवारी 2011 रोजी फुटबॉल असोसिएशनने रुपये 11,12,103/- इतकी रक्कम म्हाडाकडे भरणा करणे, तथापि, दोन वर्षे उलटून देखील सदर मैदान फुटबॉल असोसिएशनला हस्तांतरित करण्यात न येणे, यामुळे फुटबॉल असोसिएशनचे झालेले नुकसान व फुटबॉल खेळाडूंमध्ये निर्माण झालेला असंतोष या बाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. "

श्री.सचिन अहिर ( गृह निर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये सुधारणा करु इच्छितो. निवेदनाच्या दुसऱ्या पानावर "प्रस्ताव मुंबई मंडळ/म्हाडाकडून मुंबई महानगरपालिकेकडे सादर झालेला आहे." या शब्दाऐवजी "प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे" असे वाचावे. सुधारित निवेदन मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : सुधारित निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आशिष शेलार : सभापती महोदय, मुंबईतील फुटबॉल खेळाडुंची फार मोठी गैरसोय झालेली आहे. मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशन ही एक मान्यताप्राप्त असोसिएशन असून त्यामध्ये अे,बी,सी, डिव्हीजनमध्ये जवळपास 350 रजिस्टर्ड क्लब असून त्या क्लबच्या माध्यमातून हजारो फुटबॉलपटू निर्माण करण्याचे काम या असोसिएशन मार्फत होत आहे. मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशनने मुंबई बोर्डाला अर्ज करुन शासनाचा वांद्रे येथे जो मोकळा भूखंड आहे त्या ठिकाणी नर्गिस दत्त झोपडपट्टी हळूहळू सरकत आहे असे कळविले आहे. मुंबई जिल्हा फुटबॉल असोसिएशनने बोर्डाला सांगितले आहे की, आम्ही त्या भूखंडाची देखभाल मोफत करु. त्या ठिकाणी कोणतेही बांधकाम करणार नाही, जाहिरातीचे कोणतेही काम करणार नाही. बाधा येणारी कोणतीही गोष्ट तेथे होणार नाही, केवळ ती जागा खेळासाठी वापरण्यात येईल. त्यावर तत्कालीन अधिकारी श्री.गौतम चॅटर्जी यांनी त्यास मान्यता दिली. त्यानुसार दिनांक 18.1.2011 रोजी असोसिएशनला पत्र देण्यात आल्यानंतर असोसिएशन लगेच 11 लाख रुपये भरले. दिनांक 19 डिसेंबर 2011 रोजी त्यांनी करारनामा केला. त्या करारनाम्याचा मसुदा त्यांनी पाठविला. आता 2013 हे वर्ष सुरु आहे. आपण 2013 मध्ये स्वामी विवेकानंदांची 150 वी जयंती साजरी करीत आहोत. स्वामी विवेकानंदांनी त्या काळी असे म्हटले होते की, मुलांनी रिलिजीएस गोष्टी नंतर शिकाव्यात परंतु खेळाकडे प्रथम लक्ष द्यावे आणि फुटबॉल खेळाकडे विशेष लक्ष द्यावे.

सभापती महोदय, त्या असोसिएशनने पैसे भरुन दोन वर्षे झाली, मसुदा देऊन दोन वर्षे झाली, परंतु अजून शासनाकडून टोलवाटोलवी सुरु आहे. डिसेंबर 2011 नंतर 8 ऑगस्ट 2012 रोजी मुंबई बोर्डाने गृहनिर्माण विभागाकडे पत्र पाठविले असे निवेदनात म्हटले आहे. गृहनिर्माण विभागाने दिनांक 27.9.2012 रोजी उत्तर दिले की, हा प्रश्न बोर्डाच्या अधीन आहे, आमच्या मान्यतेची गरज नाही. माझा प्रश्न आहे की, हा प्रश्न बोर्डाच्या अधीन आहे, बोर्डाने उत्तर दिलेले आहे, बोर्डाने पैसे घेतलेले आहेत, बोर्डाने कंडीशन घातल्या आहेत, तेव्हा जो करारनामा मंजूर केलेला आहे त्यास मान्यता केव्हा देणार, हा भूखंड मुंबईतील रजिस्टर्ड ऑर्गनायझेशनच्या ताब्यात केव्हा देणार ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, एक-दीड महिन्याच्या आत प्राधिक्रारणाची पहिली बैठक होईल त्यामध्ये या प्रश्नाच्या संदर्भात उचित निर्णय घेण्याबाबत राज्य शासनाच्या वतीने कळविण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला तो पहिल्या प्रश्नाशी निगडीत आहे. कारण प्राधिकरणामध्ये जो काही निर्णय होईल त्याच्याशी संबंधित तो विषय आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबईतील रिकाम्या भूखंडावर झोपडपट्टया वाढवून आपले मतदार वाढवावयाचे असे षडयंत्र चालते. त्या ठिक्राणी धंदे करायचे, होर्डिंग्ज लावायचे असे प्रकार तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी करीत आहेत. खेळाला प्रोत्साहन दिले पाहिजे अशी भूमिका असताना खेळाचे मैदान लोकप्रतिनिधींच्या मतदारांसाठी त्यांच्या घशात घालायचे, तेथे आगी लावायच्या आणि नंतर इंदिरा आवास योजनेंतर्गत तेथे कायम स्वरुपी घरे बांधायची हे प्रकार थांबविले पाहिजे, तेव्हा आपण या प्रकरणी इनिशिएटीव्ह घ्यावा अशी मी आपणास विनंती करतो.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपणास प्रश्न विचारलेला आहे...

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ ST/ D/ पूर्वी श्री.अजित.... 13:25

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी जी वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली ती बरोबर आहे काय ?

श्री.सचिन अहिर : महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, ती वस्तुस्थिती बरोबर आहे. शासनाच्या वतीने म्हाडाला सांगितले आहे की, आपणच या प्रकरणी निर्णय घ्यावा. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी या विषयी निर्णय का घेतला नाही असे विचारल्यामुळे, दीड महिन्यात म्हाडाच्या प्राधिकरणाला निर्णय घेण्यास भाग पाडू, असे मी उत्तर दिले.

**उप सभापती** : या संदर्भात म्हाडाचा निर्णय दीड महिन्यात होत असेल किंवा असोसिएशनकडून प्लॉटचे पैसे घेतले असतील तर हा प्लॉट संबंधित असोसिएशनच्या ताब्यात देण्याबाबत आपण म्हाडाला स्पष्ट आदेश द्यावेत.

श्री.सचिन अहिर : महोदय, फुटबॉल असोसिएशनला जागा देण्याची भूमिका म्हाडाने घेतलेली नाही. ती जागा केवळ देखरेख करण्यासाठी दिली आहे. तो प्लॉट कन्व्हेंशन सेंटरसाठी आरक्षित आहे. सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की, एका फेडरेशनने हा प्लॉट कन्व्हेंशन सेंटरसाठी असला तरी म्हाडाला जेव्हा हवा असेल तेव्हा आम्ही तो देऊ, असे मान्य केलेले आहे. कन्व्हेंशन सेंटर सुरु होईपर्यंत आम्ही या प्लॉटवर फुटबॉल खेळू शकतो, असे त्यांचे म्हणणे आहे. दरम्यानच्या काळात म्हाडाने राज्य शासनाच्या नगर विकास विभागाकडे प्रस्ताव पाठविला की, हा प्लॉट कन्व्हेंशन सेंटरमध्ये चेंज करुन द्यावा. हा प्रस्ताव नगर विकास विभागाकडे प्रलंबित आहे. म्हाडानेच पुढे ती कार्यवाही केलेली नाही. शासनाच्या वतीने सुस्पष्ट सूचना देऊ की, म्हाडाला जे योग्य वाटते तो निर्णय त्यांनी प्राधिकरणाच्या बैठकीत घ्यावा.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. हा मुळात दोन प्लॉटचा विषय आहे. केंद्र सरकारच्या एसएआयएल संस्थेच्या स्पोर्ट ॲक्टीव्हीटीजसाठी एक प्लॉट राखून ठेवण्याचे काम केले आहे. तसेच दुसरा प्लॉट फुटबॉल ग्राऊंडसाठी नव्हे तर कन्व्हेंशन सेंटरसाठी आरक्षित आहे. दोन्ही ग्राऊंड स्पोर्ट ॲक्टीव्हीटीजसाठी ठेवायचे की नाही हा निर्णय नगर विकास विभागाकडे प्रलंबित आहे. शासनाच्या वतीने त्यांना सूचना देऊ की, दीड महिन्यात या संदर्भातील निर्णय प्राधिकरणाने घ्यावा.

..2..

**उप सभापती** : एखाद्या संस्थेला केवळ देखरेख करण्यासाठी प्लॉट दिला असेल तर त्यांच्याकडून 11 लाख रुपये कोणत्या बेसवर घेतले ?

श्री.सचिन अहिर : महोदय, उद्या शासन कन्व्हेंशन सेंटरला मान्यता देईल याच्या अधीन राहून 11 लाख रुपये घेतले आहेत. ते पत्रामध्ये नमूद केले आहे. आपण ते पत्र बघू शकता.

ॲड.अनिल परब : महोदय, त्या परिसरात प्रचंड मोठ्या प्रमाणावर झोपडपट्टी वाढत आहे. एक संस्था केवळ देखरेख करण्यासाठी तो प्लॉट मागत आहे. शिवाय सर्व अटी व शर्तीच्या अधीन राहून तो प्लॉट मागत आहे. त्या असोसिएशनने अंडरटेकींग दिले आहे की, तुम्हाला ही जागा ज्या दिवशी हवी असेल त्या दिवशी परत करु. शिवाय या बाबत आवश्यक असलेली रक्कम सुध्दा जमा केली आहे. त्या असोसिएशनने सर्व गोष्टी मान्य केल्या आहेत. परंतु केवळ कोणाच्या तरी दबावाखाली ही जमीन हस्तांतरित केली जात नाही. त्या परिसरात आपण ज्यावेळी ब्रिजवरुन खाली उतरता तेथे पूर्णपणे झोपडपट्टया आहेत. एक दिवस असा येईल की, रिझर्व्हेशन बाजूला राहील आणि त्या जागेवर झोपडट्टयांचा पूर्ण कब्जा असेल. या वर्षी उचित कार्यवाही झाली नाही तर पुढील वर्षी त्या ठिकाणी मैदानच राहणार नाही. त्या झोपडपट्टीला दोन वेळा आग लागून त्या ठिकाणी आवास योजना लागू करुन तेथे पक्की घरे बांधण्यात आली आहेत. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी त्या प्लॉटचे आवश्यक ते पैसे भरलेले आहेत, अटींची पूर्तता केली आहे. ही जमीन केवळ देखभालीसाठी मागितल्यामुळे म्हाडा प्राधिकरणाच्या बैठकीची आवश्यकता नाही. मी स्पेसिफिक विचारतो की, हा प्लॉट त्या असोसिएशनला किती दिवसांत देणार आहात ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार हे माझे चांगले मित्र आहेत. रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी थोडा खुलासा करु इच्छितो. सन्माननीय सदस्यांचा उद्देशही चांगला आहे हे मला माहीत आहे. यामध्ये दुसऱ्यांचा उद्देश काय आहे हे त्यांना आणि मला माहीत आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी सांगितल्याप्रमाणे अटी व शर्तींच्या अधीन राहून म्हाडाला सूचना देऊ की, संबंधित फेडरेशनला या प्लॉटचे वितरण करण्याची कार्यवाही करावी. सन्माननीय सदस्यांना सांगायचे आहे की, भविष्यात म्हाडाला कन्व्हेंशन सेंटर किंवा अन्य काही करायचे असेल तर त्या वेळी असे होता कामा नये की, आम्हाला देखरेख करण्यासाठी किंबहुना फुटबॉल खेळण्यासाठी दिलेल्या जागेवर म्हाडा आता कन्व्हेंशन सेंटर करीत आहे. या बाबत राजकीय वातावरण तयार करता कामा नये.

नंतर श्री.बरवड....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .....

ही मुळात अडचण आहे. आरक्षणाचा मुद्दा राज्य शासनाकडे आहे. त्यांनी ही जबाबदारी सुध्दा घ्यावयास पाहिजे की, जर भविष्य काळामध्ये आवश्यकता निर्माण झाली तर ज्या अटी आणि शर्ती आहेत त्याचे तंतोतंत पालन केले पाहिजे, नाही तर ते होणार नाही.

**उप सभापती** : त्यांच्याकडून ॲफिडेव्हिट घ्यावे.

श्री. सचिन अहिर : त्या संस्थेकडून व्यवस्थित ॲफिडेव्हिट घेऊन या सर्व गोष्टींची पूर्तता करुन तशा सूचना म्हाडाला दिल्या जातील.

श्री.विनोद तावडे : मी मंत्री महोदयांना एवढेच सांगू इच्छितो की, तुम्हाला झोपडपट्ट्या काढण्यापेक्षा आम्हाला काढणे सोपे जाईल. त्या ठिकाणी एकदा बांद्र्यातील बाबाच्या झोपडपट्ट्या झाल्या की, त्या तुम्हाला काढणे जमणार नाही. त्यापेक्षा आम्हाला काढणे सोपे आहे. त्यामुळे आपण चिंता करु नका.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी./मु. शी.** : राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गणितातील संकल्पना वेगळ्या व सोप्या पध्दतीने शिकवून विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची आवड निर्माण करण्याबाबत श्री. मोहन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"सन 2012 हे वर्ष देशभर गणित वर्ष घोषित करण्यात येऊनही देशासह राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गणिताच्या आकलनाविषयीची स्थिती कधी नव्हे इतकी डबघाईला आल्याचे 'असर' या संस्थेच्या प्राथमिक शिक्षण विषयक केलेल्या पाहणी अहवालातून स्पष्ट झाले आहे. त्या अहवालामध्ये पुरोगामी महाराष्ट्राची स्थिती अतिशय भयानक दाखविलेली आहे. अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, गणितीय व्याख्यांमध्येच अडकून पडल्याने महाराष्ट्रासह संपूर्ण देशच मागे पडत असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. पाचवीच्या विद्यार्थ्यांना साधे भागाकारही सोडविता येत नाहीत. शिक्षकवर्ग गणितीय व्याख्यांमध्ये जास्त अडकून पडल्याने विद्यार्थ्यांना गणित समजणे फार कठीण जात आहे. गणितातील संकल्पना वेगळ्या व सोप्या पध्दतीने आणि साधने वापरुन शिकविणे शक्य असतानाही शिक्षकांकडून विशेष प्रयत्न करण्यात येत असताना दिसत नाहीत. विद्यार्थ्यांना गणिताबद्दल गोडी निर्माण करण्यासाठी स्थापन केलेल्या गणित अध्यापक मंडळातर्फे विविध उपक्रम राबविण्यासाठी शिक्षकांकडूनच प्रयत्न करण्यात येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना गणित विषयाची आवड निर्माण करण्याबाबत शासनाने पुढाकार घेऊन कार्यवाही करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : टुरिंग टॉकीज या व्यवसायावर अवलंबून असणाऱ्यांना शासनाकडून मदत मिळण्याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, राज्यामध्ये दुष्काळाचे संकट तर भयानकच आहे. शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. पाणी मिळत नाही. शिक्षणाचे नुकसान होत आहे. हे सर्व घडत असताना कोठे तरी विरंगुळाही असावयास हवा असतो. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पूर्वी विरंगुळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर टुरिंग टॉकीज असत. टुरिंग टॉकीज हे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचे करमणुकीचे महत्वाचे साधन होते. या राज्यात 1980 साली टुरिंग टॉकीजची संख्या 2 हजार होती. आता 2013 मध्ये फक्त 48 टुरिंग टॉकीज शिल्लक राहिलेल्या आहेत. यंदाच्या भीषण दुष्काळात गावोगावी भरणाऱ्या जत्रांमधून हा व्यवसाय बंद पडला आहे. एका ट्रकमधून तंबूसह फिरणारा हा एक जिप्सीचा वर्ग आहे. त्यांच्या पांढऱ्या पडद्याच्या दोन्ही बाजूला प्रेक्षक बसून सिनेमा पाहतात. पूर्वी तर एका दिवसात सहा शो पर्यंत हा खेळ चाललेला असे. अगदी 2008 पर्यंत खेड्यामध्ये जत्रेत 10 तंबू सुध्दा लागायचे. आता या व्यवसायावर अवलंबून असलेल्यांची संख्या खूप कमी असली तरी गेली कित्येक वर्षे ते हाच व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांना उपजीविकेचे दुसरे साधन शिल्लक राहिलेले नाही. त्यामुळे शासनाने या अतिशय छोट्याशा, परिस्थितीने नाडलेल्या टुरिंग टॉकीज व्यावसायिकांना योग्य ती मदत करावी अशी सूचना मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

-----

..4...

**पृ. शी./मु. शी.** : ठाणे जिल्ह्यातील अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयात पूर्णवेळ वरिष्ठ लेखाधिकारी देण्याबाबत श्री. निरंजन डावखरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो. आपण मला विशेष उल्लेख मांडण्यास परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

"ठाणे जिल्ह्यातील अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयात पूर्णवेळ वरिष्ठ लेखाधिकारी म्हणून श्री. कांबळे हे कार्यरत होते. परंतु त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने अटक केल्यामुळे सदरचे पद रिक्त आहे. सद्य:स्थितीत त्या ठिकाणी चेंबूर येथे पूर्णवेळ असलेले श्री. खेडकर यांच्याकडे अतिरिक्त भार दिलेला असल्यामुळे ते पूर्णवेळ ठाणे येथे उपलब्ध नसतात. सदर कार्यपध्दतीमुळे ठाणे येथील बरीचशी प्रकरणे प्रलंबित राहतात. परिणामी ठाणे येथील माध्यमिक व प्राथमिक विभागातील शिक्षकांचा बराचसा वेळ यामुळे वाया जात आहे. ठाणे जिल्हा भौगोलिक दृष्टीने मोठा असून 1 कोटी लोकसंख्या आणि 9 हजार 558 चौरस किलोमीटरचे प्रचंड क्षेत्रफळ असून डहाणू, पालघर, मोखाडा येथून अधीक्षक वेतन कार्यालयात येणाऱ्या शिक्षकांची कामे होत नसल्यामुळे या शिक्षकात असंतोष वाढत आहे. त्यामुळे ठाण् येथे पूर्णवेळ वरिष्ठ लेखाधिकारी देण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाकडे करीत आहे."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...5...

RDB/ ST/ D/

**पृ.शी./मु.शी.** : पुणे शहरातील शासकीय रुग्णालयात अतिदक्षता विभागांची संख्या वाढवून ट्रॉमाटिक केअर युनिट सुरु करण्याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"पुण्याची लोकसंख्या सुमारे 35 लाखाच्या जवळपास असणे, रस्त्यावर अपघात होण्याचे प्रमाण पुण्यात मोठ्या प्रमाणात असणे, अपघात झाल्यावर एका तासाच्या आत रुग्णास योग्य उपचार मिळाल्यास रुग्णाचा जीव वाचण्याची शक्यता जास्त असणे, परंतु अनेक रुग्णालयात अपघातातील रुग्णांसाठी राखीव अतिदक्षता विभाग नसणे, तसेच दुर्दैवाने शहरात मोठी दुर्घटना किंवा मोठा अपघात झाल्यास अनेक जण गंभीर जखमी झाल्यास शहरात पुरेशी वैद्यकीय सेवा देण्यास सज्ज नसणे, पुण्यासारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरात केवळ एकच ट्रॉमॉटिक केअर सेंटर असल्याची धक्कादायक माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अहवालात उघडकीस येणे, ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या वतीने नवीन ट्रॉमॉटिक केअर सेंटर व राखीव अतिदक्षता विभाग नसल्याने ते मंजुरी अभावी प्रलंबित असणे, ट्रॉमॉटिक केअर सेंटर व राखीव अतिदक्षता विभाग नसल्याने अनेक रुग्णलयातून रुग्णांना इतरत्र पाठविण्यात येणे, त्यामध्ये वेळ जाणे, परिणामी रुग्ण दगावण्याची शक्यता वाढणे, परिणामी पुणे शहरात लोकसंख्येप्रमाणे अतिदक्षता विभागाची संख्या वाढविणे व ट्रॉमॉटिक केअर सेंटरची संख्या वाढविणे व शासकीय रुग्णालय व ससून सर्वोपचार रुग्णालय व औंध येथील नव्याने सुरु असलेल्या व दर्जावाढ करण्यात येणाऱ्या रुग्णालयात ट्रॉमॉटिक केअर युनिट सुरु करण्याची तातडीची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवही."

सभापती महोदय, पुण्यातील लोकसंख्येच्या तुलनेत वाढत चाललेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर अनेक रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभाग नसणे, पूर्ण शहरात एकच ट्रॉमा केअर सेंटर असल्याची धक्कादायक माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अहवालात उघडकीस येणे, त्यामुळे वेळेत उपचार न मिळाल्यामुळे अनेक रुग्ण दगावणे,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

पुण्यातील काही रुग्णालयांची यादी करुन त्यांना आयसीयू विभाग सुरु करण्याची सक्ती करणे व आणखी काही ट्रॉमा केअर सेंटर करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाला आदेश देणे याकरिता मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहाचे लक्ष वेधत आहे.

----------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी./मु.शी.**: अलिबाग तालुक्यातील खारभूमी बंधाऱ्यांच्या कामात झालेले दुर्लक्ष याबाबत श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) येथील भातशेतीत समुद्राचे भरतीचे पाणी येऊन शेतीचे नुकसान होऊ नये आणि गावांचेही संरक्षण व्हावे, यासाठी खारभूमी विकासाच्या अलिबाग उप विभागाच्यावतीने अलिबाग तालुक्यात कावाडे, नवीन मिळकत खार, नारंगी, फोफेरी, नवेदर बेली आणि कुदे-सुडकोली येथील बंधाऱ्यांची कामे हाती घेण्यात आली होती.

या बंधाऱ्यांच्या कामासाठी नाबार्डने 11 कोटी 82 लाख रुपये मंजूर केलेले असून त्यापैकी आतापर्यंत फक्त रु.22 लाखाचे बंधाऱ्याचे काम झालेले आहे. खारभूमी विकास उप विभागाचे शाखा अभियंता यांनी सदरच्या बंधाऱ्याची 50 टक्के कामे पूर्ण झालेली असल्याचा दावा केला आहे. या बंधाऱ्याची कामे पूर्ण होण्यासाठी 9 कोटी 36 लाखांचा निधी मिळाला नसल्याने बंधाऱ्यांची कामे अपूर्ण राहिलेली आहेत.

सदर बंधारे पूर्ण न झाल्यामुळे परिसरातील भातशेतीमध्ये समुद्राचे भरतीचे पाणी शिरुन जवळपास 400 हेक्टर शेतीचे नुकसान झालेले आहे. सदर बंधारे बांधण्याची कामे लवकरात लवकर होण्यासाठी निधी उपलब्ध करण्यात यावा. सबब, शासनाचे या गंभीर प्रकरणी लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

-------

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मुंबईतील खाजगी हॉस्पिटल्सनी 20 टक्के गरिबांवर मोफत उपचार करण्याच्या अटीचा केलेला भंग याबाबत श्री.रामदास कदम, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्य सरकारची मदत घेऊनही गरिबांवर मोफत उपचार करण्यास टाळाटाळ करणाऱ्या मुंबईतील खाजगी तब्बल 40 हॉस्पिटलांना सरकारने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. सरकारकडून जमीन तसेच अन्य सवलती घेणाऱ्या खाजगी हॉस्पिटलांनी 20 टक्के गरिबांवर माफत उपचार करावेत अशी अट आहे. मात्र ती पायदळी तुडवल्याची बाब आरोग्य खात्याने टाकलेल्या छाप्यात उघड झाली आहे, त्यामुळे संबंधित हॉस्पिटलांना नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. या खाजगी हॉस्पिटलांना एकूण खाटांपैकी 20 टक्के खाटा गरीब पेशंटस्वर उपचार करण्यासाठी ठेवण्याचे तसेच हॉस्पिटलच्या नफ्यातील 2 टक्के रक्कम ही गरीब पेशंटस्वरच खर्च करणे बंधनकारक आहे. ही हॉस्पिटले गरीब पेशंटस्ना प्रवेश देखील देत नाही, हे वास्तव सरकारी छाप्यातून समोर आले आहे. 20 टक्के खाटा अन्य पेशंटस्ना देऊन त्यांच्याकडून बाजारभावाने पैसे वसूल केले जात असल्याचे उजेडात आले आहे. 40 खाजगी हॉस्पिटलांनी राज्य सरकारच्या अटींचा भंग केला असल्याचा अहवाल मुख्य सचिवांनी दिला आहे. त्यामुळे संबंधित हॉस्पिटलांची मान्यता काढून घेणे, त्यांच्या प्रशासनावर कारवाई करणे, त्यांना दंड ठोठावणे, यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही याकरिता मी विशेष उल्लेखाद्वारे सूचना करीत आहे."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी./मु.शी.**: चंद्रपूर जिल्ह्यात कुष्ठरोग नियंत्रणासाठी सक्षम योजना राबविण्याची आवश्यकता याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"चंद्रपूर जिल्ह्यात सन 2012-13 च्या कुष्ठरोग तपासणी अभियानात 1876 संशयित रुग्ण व 194 कुष्ठरोगी आढळणे, मुळातच ह्या जिल्ह्यात 4 हजार 452 जुने रोगी असणे, ह्या वाढत्या कुष्ठरोगामुळे चंद्रपूर जिल्ह्याचे स्वास्थ्य धोक्यात येणे, शासनाने तेल फवारणी गेल्या 7 ते 8 वर्षात बंद करणे, ह्या विभागातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे वारंवार मागणी करुनही न भरणे, सध्या हे खातेच आजारी असल्याचे निदर्शनास येणे, शासनाचे ह्या विभागाकडे दुर्लक्ष असणे, तरी शासनाने कुष्ठरोग नियंत्रणासाठी सक्षम योजना राबविण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची कारवाई, याकरिता विशेष उल्लेखाद्वारे मुद्दा उपस्थित करीत आहे."

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी./मु.शी.**: स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मान पेन्शन योजनेची अंमलबजावणी लवकरात लवकर करणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"भारतीय स्वातंत्र्य लढा तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांना राज्यात उदरनिर्वाहासाठी राज्य शासनाने सन्मान पेन्शन सुरु केलेली असणे, या योजनेस पात्र असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना त्यांच्या सन्मान पेन्शनपासून संबंधित कर्मचाऱ्यांद्वारे वंचित ठेवले जाणे, या स्वातंत्र्य सैनिकांच्या फाईल्स गायब करणे, त्यांची पेन्शन प्रकरणे नामंजूर करुन काही कर्मचाऱ्यांकडून दुजाभाव, पक्षपातीपणा केला जाणे, नाशिक जिल्ह्यातील येवल्याचे वै.मनीलाल लालदास पटेल यांनी 1942 च्या "चले जाव" चळवळीत सामील असल्याचे सर्व पुरावे देऊनही त्यांना सन्मान पेन्शन न देणे,

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 13:40

श्रीमती विद्या चव्हाण....

मंत्रालयात परिपूर्ण फाईल उपलब्ध असतानाही पात्र स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन नाकारली जाणे, त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकात शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष व निराशेचे वातावरण, या बाबतीत शासनाने तातडीने लक्ष घालून स्वातंत्र्य सैनिकांना लवकरात लवकर सन्मान पेन्शन द्यावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

सभापती महोदय, हे सर्व लोक वयोवृद्ध आहेत. या प्रश्नी आपण शासनाला तातडीने लक्ष देण्यासंबंधी निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या पेन्शन बाबत मांडलेल्या विशेष उल्लेखाची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर योग्य ती कारवाई करावी.

----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : पंचातारांकित हॉटेल्स मधून अन्नाची होणारी नासाडी याबाबत श्री.भगवान साळुंखे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच[illegible] मांडतो.

"सभापती महोदय, आपल्या राज्यातील प्रत्येक ठिकाणी पंचतारांकित हॉटेल्स, मॉटेल्स, धाबा संस्कृती इत्यादी माध्यमातून अगदी ग्रामीण स्तरापर्यंत मोठमोठी हॉटेल्स चालविली जातात. धावत्या जीवनशैली नुसार त्यांची आवश्यकता देखील आहे. हॉटेल्स मधून प्रचंड मोठ्या प्रमाणावर खरकटे अन्न टाकले जाण्याचे, शिजलेले अन्न फेकले जाण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे. एका अर्थाने ही अन्नधान्याची उधळपट्टीच आहे. याचे दूरगामी परिणामी एकूणच यंत्रणेवर होत आहेत. एका बाजूला अन्नधान्याची उधळपट्टी आणि दुस-या बाजूला भूकबळीची स्थिती याबाबतीत शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता असून याबाबतीत नियमावली करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 13:40

**पृ. शी./मु. शी.** : महाऋषी वाल्मिकी ज्ञानमंदिर तोडल्याबाबत
श्री. निरंजन डावखरे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष
उल्लेखाची सूचना.

श्री. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच[illegible] मांडतो.

"वाल्मिकी समाजाचे लोक ठाणे जिल्हयामध्ये ब-याच वर्षापासून वास्तव्य करीत आहेत. 1972मध्ये त्यांनी महाऋषी वाल्मिकी ज्ञानमंदिर बांधलेले होते. त्यांनी 2010मध्ये मंदिराच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले होते. परंतु दिनांक 13 मार्च 2013 रोजी सायंकाळी 6.15 वाजता माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीच्या सहआयुक्त यांनी कोणतीही नोटीस न देता त्यांचे मंदिर पाडून टाकले. यामुळे वाल्मिकी समाजाच्या लोकांच्या भावना खूप दुखावल्या आहेत. त्यांनी केलेली ही कारवाई कार्यालयीन वेळेनंतर केलेली आहे. तो भाग हा वर्तकनगर प्रभाग समितीमध्ये येत असताना माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीमधून कारवाई झालेली आहे. माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीच्या सहआयुक्त यांना तातडीने निलंबित करावे अशी त्या समाजाने मागणी केलेली आहे. किंबहुना तशी कारवाई 24 तासात झाली नाही तर महापालिकेच्या गेट समोर उपोषण करण्याचा इशारा त्यांनी संबंधित अधिका-यांना दिलेला आहे. तरी या प्रकरणी आपण सहानुभूतीने विचार करुन योग्य ती कारवाई करण्याचे आदेश द्यावेत अशी मी विनंती करतो."

----

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : शाळांच्या मूल्यांकनाच्या अटी शिथिल करण्याबाबत
श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची
सूचना.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, आपण मला विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद. राज्यामध्ये "कायम" शब्द काढून प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना अनुदान देण्याचा निर्णय शासनाने 2009मध्ये घेतलेला आहे. त्या अनुषंगाने शेकडो शाळांचे मूल्यांकन देखील करण्यात आलेले आहे. त्यापैकी माध्यमिकच्या 57 आणि प्राथमिकच्या 132 शाळा अनुदानासाठी प्रात्र ठरलेल्या आहेत. मूल्यांकनाच्या जाचक अटी शिथिल करण्यासाठी 19 तारखेपासून आझाद मैदानावर आंदोलन सुरु आहे. मागील आठवड्यामध्ये त्यांच्या अध्यक्षांनी स्वत:ला पेटवून घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केलेला होता. परवा माननीय मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस होता. त्या निमित्ताने आझाद मैदानावर निर्जळी उपोषण सुरु केलेले आहे. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन शाळांच्या मूल्यांकनाच्या अटी शिथिल कराव्यात अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-03-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) QQ-5

MSS/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 13:40

**पृ. शी./मु. शी.** : आधार क्रमांका शिवाय लाभ मिळणार नाही अशी
ई-स्कॉलरशीप वेबसाईटवर दिलेली सूचना याबाबत
श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष

उल्लेखाची सूचना.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी सकाळी हा विषय औचित्याच्या मुद्याद्वारे उपस्थित केलेला आहे. मी या विषयी परवा विशेष उल्लेख दिलेला असल्यामुळे मी थोडक्यात उल्लेख करणार आहे.

आधार क्रमांक नाही म्हणून कोणीही लाभापासून वंचित राहाणार नाही अशी ग्वाही विधिमंडळात माननीय मुख्यमंत्र्यांनी दिली होती. तरीही आधार क्रमांक नसेल तर लाभ मिळणार नाही अशी स्पष्ट सूचना ई-स्कॉलरशीपच्या वेबसाईटवर दिली जात आहे. म्हणून याची तातडीने दखल घेऊन शासनाने यामध्ये दुरुस्ती करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2.20 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी 1.46 ते दुपारी 2.20 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

------------

यानंतर श्री. भारवी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: माननीय मुख्यमंत्र्यांचे वाढदिवसाबद्दल अभिष्टचिंतन

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल माननीय मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस होता. त्यांनी अत्यंत साधेपणाने आपला वाढदिवस साजरा केला. आपल्या सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी अशी विनंती केली होती की, माझ्या वाढदिवसाबद्दल मला फुलांचे गुच्छ किंवा हारतुरे देऊ नयेत. त्याऐवजी दुष्काळ निधीसाठी देणगी द्यावी. मी माननीय मुख्यमंत्र्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा म्हणून आमच्या शिवसेना पक्षाच्या आमदारांच्या वतीने दुष्काळ निधीला मदत म्हणून आपल्यामार्फत देणगीचे पाकीट पाठवितो.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : धन्यवाद.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांचा काल वाढदिवस होता. राज्यावर दुष्काळाचे सावट असल्यामुळे त्यांनी नेहमीप्रमाणे वाढदिवस साजरा केला नाही. सभागृहातील सर्व आमदारांच्या वतीने मी त्यांना वाढदिवसानिमित्त मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा देतो. त्यांचा 100 वा वाढदिवस साजरा करण्यासाठी आम्ही या सभागृहात रहावे अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वप्रथम मी आपल्याला आणि सर्व सन्माननीय सदस्यांना त्यांनी माझ्याबद्दल व्यक्तिश: शुभेच्छा व्यक्त केल्याबद्दल धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सन्माननीय राज्यपालांचे अभिभाषण अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु होण्यापूर्वी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांसमोर होते. तो आपल्या राज्य व्यवस्थेमधील एक अतिशय महत्वाचा टप्पा असतो, महत्वाची घटना असते. दरवर्षी या अभिभाषणाच्या माध्यमातून शासनाची धोरणे, गेल्या वर्षभरात केलेली कामगिरी, राज्यासमोर आलेली आव्हाने, त्या आव्हानांना सामोरे जाता जाता राज्याला पुढे नेण्याची दिशा त्यात अपेक्षित असते.

सभापती महोदय, या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. सुरुवातीला सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांनी आपले विचार मांडले व त्यानंतर, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, निरंजन डावखरे, राम पंडागळे, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुमंत गायकवाड, विजय गिरकर, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, विनायक राऊत, रामनाथ मोते आणि भगवानराव साळुंखे यांनी या चर्चेमध्ये सहभाग घेतला.

नंतर 2टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ..........

आणि अतिशय उपयुक्त सूचना केल्या आहेत.

माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचा ठराव सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी मांडला असून त्यांनी या चर्चेला सुरुवात केली होती. या चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांचे पुन्हा एकदा मन:पुर्वक अभिनंदन करतो, आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगू इच्छितो की, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा विचार करुन त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांचा आदर शासनातर्फे निश्चित केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेली अभ्यासपूर्ण मांडणी आणि विधायक सूचना हे या सभागृहाचे वैशिष्ट्य आहे. गेल्या दोन दिवसाच्या चर्चेमध्ये शासनाला यासंदर्भात निर्णय घेतांना निश्चितच मदत होईल याबद्दल मला विश्वास वाटतो.

सभापती महोदय, सुरुवातीलाच मी सांगू इच्छितो की, या राज्याचे पहिले मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीचा कार्यक्रम आपण वर्षभर साजरा केलेला आहे. यासंदर्भात अनेक चर्चासत्रेही घेतली गेली. जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने स्थापन केलेल्या समितीनेही यासंदर्भात काही महत्वाचे निर्णय घेतलेले आहेत. यासाठी 100 कोटी रुपयांचा निधी ठेवला होता व त्यातून काही लोकोपयोगी कामे करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या उपक्रमाचा सांगता समारंभ दिनांक 23 मार्च 2013 रोजी सन्माननीय राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते होणार आहे. वर्षभराच्या कार्यक्रमामध्ये जी काही चर्चासत्रे विधिमंडळाच्या माध्यमातून घेण्यात आली त्या चर्चासत्रामध्ये सर्व सन्माननीय सदस्यांनी जो भाग घेतला त्याबद्दल व्यक्तीश: सर्व सदस्यांना मी धन्यवाद देतो.

सभापती महोदय, कै.यशवंतराव चव्हाण यांनी सरकारला तसेच प्रशासनाला एक मानवी चेहरा दिला असून या राज्याच्या प्रशासनाचा पाया घालण्याचे मोठे काम त्यांनी केले होते. वर्षभराच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने जनतेच्या वतीने त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची मला संधी मिळाली आहे. त्यांनी घालून दिलेल्या आदर्शावर तसेच शिस्तीवर आम्हाला पुढे काम करण्यास मार्गदर्शन मिळेल अशी मला अशी आशा आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ..........

सभापती महोदय, त्याच बरोबर हरित क्रांतीचे प्रणेते कै. वसंतरावजी नाईक यांचे देखील हे जन्मशताब्दी वर्ष आपण साजरे करीत आहोत. या निमित्ताने वेगवेगळे कार्यक्रम हाती घेण्यात आले असून त्या कार्यक्रमाची अधिक माहिती सभागृहात देण्याचा मी नंतर प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांचे अभिभाषण हे राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचे प्रतिबिंब उमठवणारे भाषण होते. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना तसेच सन्माननीय सदस्यांना कदाचित विकासाचे काही मुद्दे दिसले नसतील परंतु एका बाजूला राज्यामध्ये भीषण टंचाईची परिस्थिती आहे व दुसऱ्या बाजूला टंचाईच्या परिस्थितीचा सामना करीत असतांना राज्याच्या प्रगतीचा आलेख मग तो औद्योगिक प्रगतीचा असो किंवा राज्यातील असमतोल विकासाच्या बद्दल धोरणात्मक पावले टाकण्याचा असो किंवा राज्यातील कोरडवाहू शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा असो, राज्यातील दुष्काळाच्या टंचाईवर कायमस्वरुपी मात करण्याचा प्रश्न असो या करिता राज्याने निर्णय घेऊन काही धोरणात्मक बदल करुन, प्रशासनामध्ये मूलभूत बदल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपल्याकडे टंचाईची परिस्थिती असली तरी राज्याने विकासाची घोडदौड, विकासाची प्रगती चालू ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. सबंध जगामध्ये, देशामध्ये तसेच आपल्या राज्यात मंदीचे वातावरण आहे हे नाकारता येणार नाही. आपल्या राज्यातील 1/3 भागामध्ये गंभीर टंचाईची परिस्थिती असल्यामुळे त्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्याची जी साधन संपत्ती आहे ती खर्च होते आहे अशी परिस्थिती असली तरी विकासावर नकारात्मक परिणाम होऊ नये असा आम्ही प्रयत्न सुरु ठेवलेला आहे. एका दृष्टीने ही तारेवरची कसरतच आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

मला वाटते की, या आव्हानात्मक परिस्थितीमध्ये राज्य सरकारने योग्य आणि अचूक निर्णय घेऊन परिस्थितीशी सामना करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शासनाने काही मुद्यांवर अग्रक्रमाने काम करण्याची आवश्यकता आहे. या सर्व परिस्थितीचा मुकाबदला करण्याकरिता महाराष्ट्राच्या सत्ताधारी पक्षाने एकदिलाने निर्णय घेतला आहे. आतापर्यंत राज्य हिता करिता जे निर्णय घेण्यात आले आहेत ते यापुढे देखील अशाच प्रकारे घेत राहू हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. सन्माननीय विरोधी पक्षाने चिंता व्यक्त केली, टीका केली असली तरी देखील मी सांगू इच्छितो की, या राज्यातील जनतेने काँग्रेस नेतृत्वाखालील आघाडी सरकारला 14 वर्षे राज्य करण्याची संधी दिलेली आहे. जनादेश दिलेला आहे. राज्यातील जनतेने 1995 मध्ये वेगळा प्रयोग करून बघितला. त्यांनी काँग्रेसला बाजूला करून युतीला कारभार करण्याची संधी दिली. युतीचा साडेचार वर्षाचा कारभार पाहिल्यानंतर राज्यातील जनतेने युतीच्या कारभाराकडे पाठ फिरवली व गेली 14 वर्षे राज्य कारभार करण्याची आम्हाला संधी दिलेली आहे. या पुढच्या निवडणुकीतही आघाडी सरकारच राज्याचे नेतृत्व करेल असा मला विश्वास वाटतो.

आम्ही राज्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक असे निर्णय घेतले आहेत. त्यातील काही निर्णयांना मी स्पर्श करू इच्छितो. त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये देखील आलेला आहे. राज्यातील आघाडी सरकारचे आणि केंद सरकारमधील युपीए सरकारचे विकासाच्या दृष्टीने दोनच मुख्य उद्देश आहेत. तळागाळातील माणसाला, शेवटच्या माणसाला, सोशिक घटकाला मुख्य प्रवाहात आणणे. त्याला ग्रोथ विथ ए ह्युमन फेस अशा प्रकारचे नाव देण्यात आले आहे. विकासाला मानवी चेहरा करण्याचा प्रयत्न या राज्यामध्ये केलेला आहे. राज्य सरकारने भरीव पावले टाकली आहेत. राज्य सरकारने काम करीत असताना औद्योगिक धोरण राबविले आहे. कोरडवाहू शेतकऱ्याकरिता विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याच बरोबर वाढत्या नागरीकरणाचे, गृहनिर्माणाचे प्रश्न याकडे देखील लक्ष दिले आहे. एवढेच नव्हे तर प्रशासनामध्ये मजबूती आणण्याचे प्रयत्न केले आहेत. पायाभूत सुविधा वाढविण्याचे किंवा सामाजिक न्याय देण्याचे प्रयत्न केले आहेत. या सर्वच बाबतीत सर्वांगीण पावले टाकीत विकास करत करत मी पुढे जाण्याचा प्रयत्न केला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

मी ठोस मुद्यांकडे वळू इच्छितो. मी राज्याचा मुख्यमंत्री म्हणून सव्वा दोन वर्षे काम करीत आहे. वैयक्तिक मुद्यांऐवजी सार्वजनिक मुद्यांवरच मी अधिक भर दिलेला आहे. जे प्रश्न किचकट होते त्यावर 10-25 वर्षापासून निर्णय होत नव्हता. अशा प्रश्नांवर सर्वांना बरोबर घेऊन चर्चा करून निर्णय घेण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. याबाबत मुंबईतील गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाबद्दलचे उदाहरण देता येईल. सदर प्रश्न 25-30 वर्षापासून प्रलंबित होता. मुंबईतील गिरणी कामगार कधी न्याय मिळेल याची वाट बघत होते. त्यासाठी आंदोलन देखील करत होते. यासबंधातील वास्तव सर्वांसमोर मांडले. गिरण्यांची जागा गिरणी कामगारांच्या घराकरिता देण्याचा निर्णय झाला. त्या सर्व जमिनीतून जवळ जवळ 15 ते 16 हजार घरे निर्माण होतील. ती सर्व घरे गिरणी कामगारांना देण्यात येतील. त्यापेक्षा जास्त घरे मुंबईत निर्माण करता येणार नाही हे देखील मी त्यावेळी माननीय सभागृहाला सांगितले होते. पहिल्या टप्प्यामध्ये 6900 घरे तयार झाली आहेत. गिरणीच्या जमिनीवर जी घरे उपलब्ध झाली त्यांची वेगवेगळी सोडत काढली. प्रत्येक गिरणीच्या जागेवर तयार झालेली घरे वाटप करण्यास सुरूवात झालेली आहे. काही दिवसांपूर्वीच म्हणजे दिनांक 26 जानेवारी या शुभदिनी 26-27 जणांना किल्ल्या देण्यात आल्या व या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

थोडया् दिवसांत 90 टक्के कर्जाची प्रकरणे पूर्ण झाल्यानंतर, वारसांची कागदपत्रे व्यवस्थित मिळाल्यानंतर आणि जे गिरणी कामगार हयात असतील त्यांनी त्या बाबतचे पुरावे सादर केल्यानंतर 6 हजार 925 गाळे गिरणी कामगारांना सोडतीच्या नियमाप्रमाणे देण्यात येतील.

सभापती महोदय, उर्वरित गिरणी कामगारांच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी दोन समित्यांची नियुक्ती केली आहे. एमएमआरडीएने भाडे तत्त्वावर घरे देण्याच्या योजनेखाली जी काही घरे बांधली होती त्यातील निम्मी घरे गिरणी कामगारांना देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या सदनिका 160 स्वे.फुटाच्या होत्या. तेव्हा दोन घरांचे एक घर करुन एकूण 320 स्वे.फुटाचे घर त्यांना देण्यात येणार आहे. ही घरे पुन्हा सोडतीच्या माध्यमातून गिरणी कामगारांना ना नफा ना तोटा या तत्त्वावर देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. जे गिरणी कामगार आपल्या मूळ गावी परत गेले आहेत त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय जमीन उपलब्ध करुन त्या ठिक्‍ाणी ते स्वत: गृहनिर्माण सोसायटी करुन घरे बांधणार असतील तर त्यांना जमीन देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या वारसदारांना उत्तर अधिकारी म्हणून प्रमाणपत्र देण्याची अट शिथिल करुन तहसीलदारांकडून वारसाचे प्रमाणपत्र घेऊन शपथपत्राच्या आधारे हा कार्यक्रम पुढे राबविला आहे. गेली 25-30 वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न सोडविण्यामध्ये शासनाला यश आले आहे.

सभापती महोदय, मुंबईतील अनेक गृहनिर्माण सोसायट्या खाजगी विकासकांनी बांधलेल्या आहेत आणि त्या संदर्भातील डीम्ड कन्व्हेअन्सचा प्रश्न प्रलंबित होता. परंतु त्या संदर्भात निर्णय घेतल्यामुळे जमिनीची मालकी हक्क देण्यासंबंधी शासनाने एक मोहीम काढली. त्या मोहिमेमध्ये सहकार विभाग, महसूल विभाग, गृहनिर्माण विभागांना सामील करुन घेण्यात आले. मी स्वत: 80 हजार गृहनिर्माण सोसायट्यांच्या अध्यक्षांना पत्रे लिहून कळविले की, आपण या मोहिमेमध्ये सामील होऊन डिम्ड कन्व्हेअन्स करुन आपला मालकी हक्क करुन घ्यावा. विकासक कन्व्हेअन्स करीत नाही. पुढे सदनिका विकण्याचा प्रश्न आला किंवा पुनर्विकासाचा प्रश्न आला, अधिक एफ.एस.आय. देण्याचा प्रश्न आला तर पुढे त्रास होतो. त्यामुळे ही एक अतिशय लोकप्रिय योजना राबविली आहे आणि त्यास लोकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद द्यायला सुरुवात केली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

सभापती महोदय, म्हाडाच्या जमिनीच्या पुनर्विकासाचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. म्हाडाच्या इमारतीचे मोठमोठे 56 ले-आऊट आहेत. त्या ठिकाणी हजारो गृहनिर्माण संस्था आहेत. म्हाडा इमारतींचा पुनर्विकास करुन त्यांना अधिक एफ.एस.आय.देऊन घरे बांधण्याचा निर्णय प्रलंबित होता. सन 2010 मध्ये प्रिमियमचा पर्याय रद्द करण्यात आला होता. त्यामुळे जादा एफ.एस.आय.मुळे जी घरे निर्माण होतील त्यातील काही वाटा म्हाडाला देण्याची सक्ती करण्यात आली होती. या संदर्भातील अंतिम निर्णय प्रलंबित होता. आता त्या संदर्भात अंतिम निर्णय घेतलेला असून त्याची अधिसूचना येत्या आठवड्यात निघेल. ज्या ठिकाणी वाढत्या एफ.एस.आय.मुळे जादा सदनिका होतील त्या कोणत्या प्रमाणात वाटायच्या याचा उल्लेख त्या अधिनियमामध्ये करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, शासनाने नुकतेच राज्याचे औद्योगिक धोरण जाहीर केले. महाराष्ट्र हे औद्योगिकीकरणामध्ये आणि उद्योगाच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहे. आज राज्यात सर्वाधिक जास्त औद्योगिक उपक्रम, सर्वाधिक जास्त औद्योगिक रोजगार, औद्योगिक उत्पन्न, सर्वात जास्त निर्यात आणि सर्वात जास्त परदेशी गुंतवणूक आपल्या राज्यात होत आहे. कोणी काहीही म्हटले तरी आज महाराष्ट्र राज्य औद्योगिकीकरणाच्या बाबतीत आणि उद्योगाच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहे. शासनाने घेतलेल्या नवीन औद्योगिक धोरणामुळे राज्याचा प्रथम क्रमांक पुढे देखील राहणार आहे. शेतीवर आधारित असलेल्या 57 टक्के लोकांना उद्योगामध्ये रोजगार निर्माण करुन देण्याचा आमचा प्रयत्न चालू आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

जुन्या औद्योगिक धोरणामध्ये विशाल प्रकल्पाचे धोरण राबविले होते. त्या धोरणाला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला होता. आतापर्यंत 377 विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी 114 प्रकल्पांमध्ये उत्पादन सुरु झाले आहे. त्यातील जवळजवळ 290 प्रकल्प राज्याच्या मागास भागात सुरु झालेले आहेत. त्यामध्ये 1 लाख 82 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यातून 2 लाख 33 हजार लोकांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे. एकंदरीत विशाल प्रकल्प हे धोरण अतिशय चांगले यशस्वी झाले. त्यामुळेच राज्य सरकारने पूर्वीचे धोरण नवीन धोरणात सुध्दा सुरु ठेवले आहे. नवीन औद्योगिक धोरणात 'अति-विशाल' ही वेगळी कॅटॅगिरी सुरु केली आहे. मोठे प्रकल्प आकर्षिक होण्यासाठी आम्ही हे धोरण राबविणार आहोत. लघु उद्योगांसाठी विशेषत: विदर्भ, मराठवाडा या सारख्या मागास भागामध्ये विशेष सोयी-सवलती देण्यात आल्या आहेत. जेणेकरुन मध्यम उद्योगांना देखील वेगाने चालना मिळेल. या सर्व कामांमुळे त्या भागातील औद्योगिक मागासलेपणा दूर करण्याच्या कामी निश्चितपणे चालना मिळणार आहे. नवीन औद्योगिक धोरणामध्ये राज्याच्या आर्थिक विकासाकरिता या सर्व बाबींची मदत होणार आहे.

महोदय, विदर्भामध्ये औद्योगिकीकरण व्हावे म्हणून काही दिवसांपूर्वी "ॲडव्हान्टेज विदर्भ" नावाची गुंतवणूक परिषद आयोजित केली होती. दोन दिवसांच्या या परिषदेमध्ये मोठमोठे उद्योगपती आले होते. त्यांना नागपूर आणि विदर्भाबद्दलची माहिती देण्यात आली. त्यातील अनेकांनी मिहान प्रकल्पाला सुध्दा भेटी दिल्या. तेथील नवीन उद्योगांची माहिती घेतली. महोदय, मला सांगण्यास आनंद वाटतो की, या परिषदेमध्ये 18,500 कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले. या नवीन गुंतवणुकीच्या उपक्रमामुळे निश्चितपणे विदर्भाच्या विकासाला नवीन चालना या नवीन उपक्रमामुळे मिळणार आहे.

महोदय, विदेशी गुंतवणूक ही देशाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब असते. आपल्या देशात गुंतवणूक करण्याची क्षमता मर्यादित असल्यामुळे अमेरिका, चीन किंवा युरोप खंडातील राष्ट्रे असतील, ही राष्ट्र परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करीत असतात 1991 पूर्वी आपल्या देशात परकीय गुंतवणुकीवर बंदी होती. परंतु त्यानंतर आर्थिक सुधारणांनंतर परकीय गुंतवणुकीला आमंत्रण देण्यास सुरुवात केली गेली. आतापर्यंत देशात आलेल्या एकूण





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

गुंतवणुकीपूर्वी 1/3 परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. परकीय गुंतवणुकी अंतर्गत बहुराष्ट्रीय उद्योग सुरु करण्यासाठी महाराष्ट्र हे प्रथम पसंतीचे राज्य आहे आणि ते तसेच कायम राहील असे ठाम आश्वासन मी या निमित्ताने देतो.

महोदय, काही दिवसांपूर्वी अमेरिका येथील कॉर्निंग टेक्नॉलॉजी कंपनीने चाकण परिसरात उद्योग सुरु केला आहे. त्या कंपनीचे मालक आणि मुख्य प्रबंधकांनी राज्यात येऊन राज्य सरकारचे अभिनंदन केले आहे. त्या कंपनीच्या उद्योगाचा पायाभरणी कार्यक्रम झाल्यानंतर एक महिन्याच्या आत त्या कंपनीने उत्पादनास सुरुवात केली. त्यानी सांगितले की, आमच्या कंपनीचे अनेक राज्यात अनेक उद्योग आहेत. परंतु लवकरात लवकर उद्योग सुरु करण्याची कामगिरी महाराष्ट्र राज्यातच शक्य झाली आहे. चीन किंवा इतर देशात हे शक्य झाले नव्हते. महोदय, ब्रिस्टोन सारखी टायरचे उत्पादन करणारी कंपनी असेल, जगात ट्रक उत्पादन करणारी चीनची फोटॉन कंपनी असेल इ. कंपन्या राज्यात येऊ लागल्या आहेत. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, राज्य सरकारने प्रयत्न केले नसते किंबहुना उद्योजकांना सवलती दिल्या नसत्या तर हे शक्य झाले नसते.

महोदय, मिहान प्रकल्प गेल्या 10-12 वर्षांपासून प्रलंबित होता. सुरुवातीला अशी अपेक्षा होती की, मिहान प्रकल्पाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर उद्योग येतील. मिहान प्रकल्प खूप वेळ रेंगाळला होता. शिवाय तेथील विमानतळाच्या जमिनीचे अधिग्रहण करण्यास विलंब झाला. त्यामुळे शासनाने काही निर्णय घेतले. या विमानतळाच्या प्रकल्पातील शेवटची 100-150 हेक्टर जमीन अधिग्रहीत करणे शिल्लक होते. त्यासाठी वेगळा दर लावून ती जमीन अधिग्रहीत केली जात आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

पुन्हा मिहानला वेगळ्या प्रकारची चालना मिळालेली आहे.

नुकतेच काही दिवसांपूर्वी देशातील सर्वात मोठ्या आय.टी. उपक्रम टाटा कन्सल्टंसी सर्व्हिसेसने 16 हजार लोक कामाला लागतील इतका मोठ्या प्रकल्पाचे भूमिपूजन केले आणि त्या प्रकल्पाला सुरुवात झालेली आहे. इन्फोसीस सारख्या देशातील दुसऱ्या मोठ्या कंपनीने देखील त्या ठिकाणी जागा घेतली. 15 हजार लोकांना उद्योग निर्माण करुन देऊ म्हणून त्यांनी मिहानमध्ये काम सुरु केले आहे. पुढच्या महिन्यात बोईन्गचा विमान रिपेअर करण्याचा कारखाना कार्यान्वित होईल्. एअर इंडिया आणि बोईन्गचा संयुक्त प्रकल्प पुढच्या महिन्यामध्ये सुरु होत आहे. मिहान पुन्हा एकदा वेगाने पुढे निघालेले आहे.

सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी फ्रान्सचे राष्ट्रपती आणि ब्रिटनचे पंतप्रधान खास मुंबईला आले होते. माझी ब्रिटनच्या प्रतप्रधानांशी चर्चा झाली. ब्रिटन आणि युरोप खंडातील इतर राज्ये विशेषत: मुंबईमध्ये आणि महाराष्ट्रामध्ये गुंतवणूक करण्यासाठी इच्छूक आहेत अशी त्यांनी चर्चा केली. ब्रिटनच्या पंतप्रधानांबरोबर ब्रिटनच्या इतिहासामध्ये सर्वात मोठे व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ, 128 मोठमोठ्या कंपन्यांच्या मालकांचे शिष्टमंडळ आले होते. त्यांच्या बरोबरही आमची चर्चा झाली. या ठिकाणी अनेक उपक्रम होतील. विशेषत: मुंबईच्या पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता, विस्ताराकरिता खूप भाग घेण्याचा मानस मला त्यांनी सांगितला.

सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी आम्ही राज्याचे वस्त्रोद्योग धोरण घोषित केले होते. त्या धोरणाची मूलभूत कल्पना अशी होती की, महाराष्ट्र हे कापूस उत्पादनाच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. पण दुर्दैवाने 75 टक्के पासून परप्रांतामध्ये त्यावर प्रक्रिया करण्यासाठी जातो. तेथे त्याचे मूल्यवर्धन होते. त्या राज्यामध्ये रोजगार निर्मिती होते. त्या राज्याला कराचे उत्पन्न मिळते. आपल्याला ते मिळत नाही. आपल्या नवीन वस्त्रोद्योग धोरणाच्या अंतर्गत जास्तीत जास्त प्रक्रिया इथेच झाली पाहिजे अशा प्रकारचे धोरण आम्ही आणले. मला या ठिकाणी सांगण्यास आनंद होतो की, खूप मोठ्या प्रमाणात त्या धोरणाचे स्वागत झालेले आहे. एकंदरीत 40 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होईल अशी आमची अपेक्षा आहे. हे धोरण जाहीर झाल्यापासून आतापर्यंत 320 नवीन वस्त्रोद्योग प्रकल्पांना मान्यता देण्यात आलेली आहे आणि त्यामध्ये 2800

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

कोटी रुपयांची गुंतवणूक होईल अशी अपेक्षा आहे. ज्या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कापूस उत्पादित होतो त्याच परिसरामध्ये हे सर्व उद्योग सुरु होतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, अनेक दिवसांपासून काही रखडलेले निर्णय आहे त्याबाबत सांगू इच्छितो. मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे हे निर्णय खूप दिवसांपासून रखडले होते. ते पुढे मार्गी लावण्याचा प्रयत्न आम्ही केला. त्यामध्ये खूप दिवसांपासून खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याचा निर्णय रखडलेला होता. राज्य शेती महामंडळाने हजारो हेक्टर जमिनी घेतलेल्या होत्या. त्या जमिनीचा वापर न झाल्यामुळे त्या जमिनी परत करण्याचा निर्णय घेतला. त्या जमिनीच्या बाबतीत कोर्टात खूप वाद झाले, कोर्टकचेऱ्या झाल्या. आम्ही चांगले वकील दिले. तो निर्णय राज्य सरकारच्या बाजूने लागल्यानंतर 13 मेळ्यांपैकी 7 मेळ्यांमध्ये जमिनीचे वाटप करण्यात आलेले आहे. नाशिक, पुणे विभागामध्ये हे वाटप करण्यात आलेले आहे. हे वाटप करुन संपूर्णपणे मूळ मालकांना, मूळ शेतकऱ्यांना या जमिनी परत देण्यात येतील. या जमिनीच्या किंमती खूप वाढलेल्या आहेत. तरीही हा एक अत्यंत महत्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे.

सभापती महोदय, आम्ही आमच्या जाहीरनाम्यामध्ये जी आश्वासने दिलेली होती त्यापैकी जी वचनपूर्ती झालेली आहे त्याचीही थोडक्यात माहिती देऊ इच्छितो. त्याबद्दल सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. त्याचा उल्लेख करणे गरजेचे आहे म्हणून मी सांगू इच्छितो. माझ्या दृष्टीने सर्वात मोठा निर्णय म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाकरिता इंदू मिलच्या परिसरातील सर्वच्यासर्व साडेबारा एकर जमीन देण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला. तो अतिशय ऐतिहासिक निर्णय आहे असे मला वाटते. तो निर्णय झाला आहे. त्या ठिकाणी भव्य स्मारक निर्माण करण्याच्या कामगिरीला सुरुवात झालेली आहे. ते करण्याचा मानस यापूर्वीच शासनाने आपल्याला सांगितलेला आहे. त्याचबरोबर कोल्हापूरच्या शाहू मिलच्या जागेमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे स्मारक उभे करण्याचा विषय आहे. त्या जागेमध्ये स्मारक उभे करुन शाहू महाराजांच्या विचारांची प्रेरणा कायम स्वरुपी राज्यातील जनतेला मिळत राहील असा आम्हाला विश्वास वाटतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रात भव्य स्मारक बांधण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. त्या दिशेने शासन पावले टाकत आहे. मी माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री यांना मुंबई भेटीचे निमंत्रण दिलेले आहे. त्या पुढील महिन्याच्या सुरुवातीला मुंबईत येणार आहेत. त्यावेळी त्यांच्याबरोबर या स्मारकाच्या परवानगीबद्दल चर्चा होणार आहे. त्यांच्याकडे प्राथमिक अर्ज मी पाठविलेला आहे. हे काम कशा प्रकारे सुरु करावयाचे आहे त्यासाठी समिती नेमलेली आहे. त्या समितीने एक जागा सुचविलेली आहे. खडकाळ जागेवर उत्कृष्ट स्मारक होऊ शकेल अशा प्रकारचा मला विश्वास आहे. त्याबाबतची अधिक माहिती हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत मी सभागृहाला माहिती देईन.

औरंगाबाद येथे हज हाऊस बांधणे व वंदे मातरम् सभागृहाचा जो वाद होता यासंबंधी निर्णय घेऊन औरंगाबाद येथे हज हाऊस बांधण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. हज हाऊस लवकरच बांधले जाईल.

मुंबईच्या पायाभूत सुविधांबाबत सांगावयाचे झाले तर या सुविधा खूप वर्षांपासून प्रलंबित होत्या. मुंबईतील पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी जवळजवळ 5 हजार कोटी रुपयांचे पायाभूत प्रकल्प पूर्ण झालेले आहेत त्याचे या वर्षअखेर उद्‌घाटन होईल. हे प्रकल्प सुरु झाल्यानंतर मुंबईच्या वाहतुकीसाठी मूलभूत सोय उपलब्ध होईल. त्यामध्ये मोनो रेल, मेट्रो रेल, ईस्टर्न फ्री-वे, आणिक-पांजरापोळ-घाटकोपर लिंक रोड, सहार उन्नत मार्ग, मिलन-सबवे रेल्वे ओव्हर ब्रिज, चेंबूर-सांताक्रुझ लिंक रोड अशा प्रकारच्या वाहतुकीच्या प्रकल्पांचे उद्‌घाटन होईल. त्याचबरोबर मुंबई ट्रान्सहार्बर लिंक शिवडी ते न्हावाशेवा असा 22 कि.मी.चा सागरी सेतू बांधण्याच्या प्रकल्पाचे काम गेल्या 10 वर्षांपासून रखडलेले होते. ते काम पूर्ण करण्यासाठी यशस्वीपणे वाटचाल केलेली आहे. त्यात पर्यावरण खात्याची मंजुरी असेल, त्यापेक्षा महत्वाची बाब म्हणजे केंद्रीय वित्त विभागाकडून व्हायबिलिटी फंडिंग गॅप म्हणून 1920 कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता मिळालेली आहे. एमटीएलपीचे टेंडर काढण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. 5 कॉन्सरशिअममध्ये आंतरराष्ट्रीय व भारतीय अशा मोठ्या कंपन्या आहेत. त्यांनी इच्छा पत्रे सादर केलेली आहेत. त्यामुळे मुंबई ट्रान्सहार्बर लिंक प्रोजेक्टची सुरुवात या वर्षी होईल.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

त्याचबरोबर राष्ट्रीय बजेटमध्ये मुंबईसाठी काही महत्वाच्या योजना घोषित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये एलिव्हेटेड रेल्वेचा जवळपास 27000 कोटी रुपयांचा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्याचा रेल्वे विभागाने निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी राज्य सरकारने सर्व सहकार्य केलेले आहे. त्यामध्ये एफएसआयच्या नियमात काही बदल करावयाचे आहेत ते केलेले आहेत. हा प्रकल्प करण्याचे एकमेव कारण असे आहे की, नवीन रेल्वे मार्ग करण्यासाठी आता मुंबईत जागा नाही. मुंबईत आणखी पॅरलल रेल्वे बांधण्यासाठी जागा नाही, जागा अधिग्रहित करणे शक्य नाही. म्हणून रेल्वेच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर चर्चगेट ते विरार मार्गावर वरचा मजला बांधून त्यावर एलिव्हेटेड रेल्वे सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचबरोबर पश्चिम उपनगरीय मार्गावर वातानुकुलित रेल्वे सुरु करण्याचा आणि कर्जत-कल्याण या दरम्यान तिसरा मार्ग बांधण्याचा देखील निर्णय घेण्यात आलेला आहे.

शासनाने आणखी एक महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. राज्यातील 48 टक्के जनता नागरी भागात राहते हे आपल्याला माहीत आहेच. नागरी भागाचे प्रशासन, नागरी भागाच्या पायाभूत सुविधा, गृहनिर्माणाचा प्रश्न, लोकांना द्यावयाचे काम, तेथील उद्योगधंदे बाजूला गेले तर पर्यायी व्यवस्था करणे हे सर्व प्रश्न आपल्यासमोर आहेत. त्या दृष्टीकोनातून प्रशासनासमोर जकात कराचा प्रश्न होता. देशामध्ये महाराष्ट्रातच अजूनही जकात कर सुरु आहे. इतर कोणत्याही राज्यात जकात कर सुरु नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 14:55

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

मला काही उद्योगपती विनोदाने सांगतात की, जकात हा कालबाह्य झालेला कर आहे. तो कर जगात फक्त मुंबई आणि इथोपिया नावाच्या देशामध्ये आहे. अन्यत्र कुठेही जकात नाही. जकात कर रद्द करुन पर्यायी व्यवस्था करणे अपरिहार्य होते. म्हणून जकातीच्या ऐवजी स्थानिक संस्था कर (लोकल बॉडी टॅक्स) सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. आतापर्यन्त 19 'ड' वर्ग आणि 1 'क' वर्ग अशा 20 महापालिकांमध्ये एलबीटी लागू करण्यात आलेला आहे. बाकी 6 महानगरपालिकांमध्ये हा कर सुरु करण्याबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. परंतु लवकरच तो सुरु करण्यात येईल. मुंबई, पुणे, नागपूर, पिंपरी-चिंचवड अशा महानगरपालिकांमध्ये समयबद्ध पध्दतीने याच वर्षी जकात कर बंद करुन पर्यायी अकौण्ट पे टॅक्स, एलबीटी सारखा कर सुरु करण्यात येणार आहे. आतापर्यन्तच्या अनुभवानुसार एलबीटी लागू झाल्यानंतर कराचे उत्पन्न वाढते. सुरुवातीच्या काळामध्ये राज्य सरकारकडून देखील मदत देण्यात येते.

सभापती महोदय, आरोग्याच्या बाबतीत काही महत्वाचे निर्णय राज्य शासनाने घेतलेले आहेत. त्यापैकी राजीव गांधी जीवनदायी योजना ही अतिशय महत्वाची योजना आहे. ही योजना सुरुवातीला फक्त 8 जिल्ह्यामध्ये राबविण्यात आली. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्याबद्दल नापसंती व्यक्त केली. जेव्हा आम्ही विमा कंपनीशी चर्चा केली त्यावेळी त्या कंपनीने सांगितले की, एवढया मोठ्या प्रमाणात आणि एकाच वेळी ही योजना राबविण्याकरिता लागणारी क्षमता निर्माण करणे जमणार नाही. त्यामुळे सुरुवातील काही जिल्ह्यात ती योजना राबवा. याबाबतीत तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी 6 जिल्हे निवडले होते. आम्ही त्यामध्ये मुंबईच्या दोन जिल्ह्यांचा समावेश करुन 8 जिल्हयामध्ये ही राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु केली. आतपर्यन्त या योजनेमध्ये 42 हजार पेक्षा जास्त शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. लवकरच ही योजना संपूर्ण राज्यभर राबविण्याचा शासनाचा मानस असून लवकरच त्याचा शुभारंभ राज्याच्या इतर जिल्ह्यामध्ये होईल.

सभापती महोदय, काही दिवसापूर्वी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम महाराष्ट्र राज्यामध्ये राबविण्यास सुरुवात झाली. कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांच्या हस्ते पालघर येथे या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. या कार्यक्रमाअंतर्गत शून्य ते 18 वर्षे वयाच्या सर्व विद्यार्थ्यांची शाळेमध्ये जाऊन आरोग्य तपासणी होईल. या तपासणीमध्ये विद्यार्थ्यांमध्ये काही दोष आढळून





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

आले, काही आजार दिसून आले तर ताबडतोब त्या विद्यार्थ्यांवर कमी वयामध्ये काही उपचार करावयाचे असतील, शस्त्रक्रिया करावयाची असेल तर ती करण्यात येइल आणि बालकांचे स्वास्थ्य सुधारण्यास या कार्यक्रमाचा उपयोग होईल.

सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी रुग्णांना मागेल त्यावेळी रक्त मिळावे यासाठी जीवन अमृत कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. योजना अगदी सोपी आहे. ज्या रक्तपेढ्या आहेत त्या ठिकाणी मोटरसायकल स्वार असतील. कोणत्या ब्लडग्रुपचे किती बाटल्या रक्त पाहिजे यासंबंधीचा दूरध्वनी आल्यानंतर रक्तपेढीतून रक्त दिले जाईल आणि ते रक्त मोटरसायकल स्वार काही मिनिटातच ज्या ठिकाणी रुग्णावर शस्त्रक्रिया करायची असेल तेथे नेईल. राज्याच्या दोन जिल्ह्यामध्ये या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. अतिशय लोकाभिमुख अशा प्रकारचा कार्यक्रम शासनाने राबविलेला आहे.

सभापती महोदय, गुटखा बंदीचा क्रांतिकारी निर्णय शासनने घेतला. त्यामुळे कॅन्सर सारख्या जीवघेण्या रोगावर प्रतिबंध घालण्यास मदत होईल अशी आम्हा सर्वांना खात्री आहे. सुरक्षा आयुक्तांनी धाडी घालून गुटख्याचे अनेक साठे जप्त केलेले आहेत. 26 प्रकरणामध्ये 1 कोटी 70 लाखाचा माल जप्त करण्यात आलेला आहे. जवळ जवळ 8 कोटीपेक्षा जास्त किंमतीचा गुटखा आणि पानमसाल्याचा माल नष्ट करण्यात आलेला असून दोषीविरुध्द न्यायालयात 107 खटले प्रलंबित आहेत.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

सभापती महोदय, ई-गर्व्हनन्सच्या बाबतीत राज्यामध्ये लक्षणीय प्रगती झालेली आहे. काही दिवसापूर्वी मी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये गेलो होतो तेथे ई-ऑफीस नावाचा उपक्रमाचा शुभारंभ केला. ई-ऑफीस उपक्रम एनआयसीच्या माध्यमातून राबविण्यात येणारा असून पेपरलेस ऑफिस असा हा उपक्रम आहे. देशात सिंधुदुर्ग हा पहिला जिल्हा ठरला की, तेथे ई-ऑफिसचा उपक्रम राबविला गेला आहे.

सभापती महोदय, आधार क्रमांक नोंदणीमध्ये महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे. जवळ जवळ साडेपाच कोटी क्रमांकांची नोंदणी झालेली आहे. यात सुरुवातीला काही त्रुटी होत्या, आधार कार्ड मिळण्यामध्ये विलंब लागत होता, तो विलंब बऱ्याच प्रमाणात कमी झालेला आहे. नोंदणी झ ााल्याच्या काही दिवसातच आधार क्रमांकाचे पत्र लोकांना मिळते आहे. आधार क्रमांक मिळाल्याबरोबर डायरेक्ट कॅश ट्रान्सफरचा केंद्र सरकारचा अत्यंत महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे, तो कार्यक्रम महाराष्ट्रातील सहा जिल्हयांमध्ये सुरु झालेला आहे. आधार क्रमांकाची काही जिल्हयात कमी,जास्त प्रमाणात नोंदणी झाली आहे. वर्धा जिल्हयात सर्वात जास्त नोंदणी म्हणजे 87 टक्के लोकांनी आधार कार्डची नोंदणी केलेली आहे.

सभापती महोदय, दिनांक 8 मार्च, 2013 रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने राज्याचे तिसरे महिला धोरण प्रकाशित करण्यात आले. सदर धोरण वेबसाईटवर टाकण्यात आलेले आहे. या धोरणाच्या बाबतीत आपल्या सगळयांच्या सूचना आणि हरकती प्राप्त झाल्यानंतर त्या मंत्रिमंडळासमोर ठेवून त्यावर सखोल अशी चर्चा करुन सदर धोरणाला दोन महिन्यात अंतिम स्वरुप देण्यात येईल.

सभापती महोदय, राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थिनींकरिता 14 वसतीगृहे स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. तसेच स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील 200 विद्यार्थी क्षमतेच्या वसतीगृहांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

सभापती महोदय, या सभागृहात दुष्काळाच्या बाबतीत विस्तृत चर्चा झालेली असली तरी मला त्याबाबत थोडे मनोगत व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. राज्याच्या सर्व

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

अर्थव्यवस्थेमध्ये दुष्काळाचे सावट आलेले आहे. राज्यातील 15 जिल्हयांमध्ये गंभीर दुष्काळ आहे. 11 हजार गावांची आणेवारी 50 पैशांपेक्षा आहे आणि ती गावे दुष्काळामुळे प्रभावीत झालेली आहेत. त्यात मराठवाडयातील काही जिल्हे आहेत. पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र यातील काही जिल्हे आहेत. विदर्भात देखील दोन जिल्हयात कमी,जास्त प्रमाणात दुष्काळ आणि पाणी टंचाई आहे. या दुष्काळग्रस्तांना तातडीची मदत मिळावी म्हणून राज्य सरकारने एक हेल्पलाईन सुरु केलेली आहे. 1077 या टोल फ्री क्रमांकावर दूरध्वनी करता येईल. आपणाला स्थानिक अडचणींच्या बाबतीत माहिती सांगता येईल. ही हेल्पलाईन 24 तास चालेल आणि त्यावर जिल्हाधिकाऱ्यांकडून लक्ष ठेवण्यात येईल.

सभापती महोदय, दुष्काळाच्या अनुषंगाने तीन महत्वाचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांच्या छावण्या आणि हाताला कामे आणि त्याच बरोबर कृषीमध्ये काही मूलभूत बदल करणे, हे विषय आपल्यासमोर आहेत. आता राज्यामध्ये 3200 टँकरने गावे व वाडयांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे. गेल्या वर्षी राज्यामध्ये 300 पेक्षा कमी टॅकर्सने पाणी पुरवठा केला गेला होता. पाण्याच्या टंचाईची तीव्रता पाण्याच्या टँकर्सच्या आकडयावरुन लक्षात येईल.

सभापती महोदय, टँकर्स सुरु करण्यासाठी 50 पैशांपेक्षा कमी आणेवारी असली पाहिजे अशा प्रकारची अट नाही. ज्या ठिकाणी पाण्याची टंचाई असेल टँकर सुरु करण्याचे अधिकार पूर्वी जिल्हाधिकारी यांच्याकडे होते, ते अधिकार आता तहसीलदार यांच्याकडे सोपविण्यात आले आहेत. जी.एस.डी.ए.चे प्रमाणपत्र असावे अशी अट होती, ती अट देखील काढून टाकण्यात आलेली आहे. जेथे पाण्याची गरज भासेल तेथे टँकरने पाणी देण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, ज्या नळपाणी पुरवठा योजना दुरुस्त केल्यामुळे त्या गावात टॅकरने पाणी पुरवठा करण्याचे काम कमी झालेले आहे. नळ पाणी पुरवठा योजना चालल्या पाहिजेत. विद्युत बिले भरणे शक्य होत नाही. म्हणून स्वतंत्र गावाच्या नळपाणी पुरवठा योजनेसाठी दोन तृतीयांश विद्युत बिल शासनातर्फे भरले जाईल अशा प्रकारची घोषणा करण्यात आली होती. आता हा निर्णय

3...



ABG/ D/ D/ ST/ KTG/ प्रथम श्री.शिगम 15:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांसाठी देखील लागू होईल असाही धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. यामुळे 67 टक्के वीज बिल शासनातर्फे भरले जाईल. या धोरणामुळे 2400 गावे आणि वाडया त्यातील 140 प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेचा लाभ मिळणार आहे.

यानंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/गितेनंतर 15:05

श्री.पृथ्वीराज चव्हाण........

गेल्या वर्षी टंचाईच्या पार्श्वभूमीवर जीएसडीएच्या दाखल्यानुसार ज्या तालुक्यांमध्ये पावसाळ्यानंतर पाण्याची पातळी सरासरी 2 मीटरपेक्षा खाली गेली असे 15 तालुके निवडण्यात आले, त्या संदर्भात 10 कोटी रुपयांचा साखळी बंधारे बांधण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यातून 1600 बंधारे 150 कोटी रुपयांच्या कार्यक्रमामधून होणार आहेत. त्यापैकी निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे 830 बंधारे पूर्ण झालेले आहेत. बंधारे पूर्ण झाल्यानंतर ज्या ठिकाणी पाऊस पडला त्या ठिकाणी अतिशय चांगले रिझल्ट दिसून आलेले आहेत. अर्ध्या कि.मी.पर्यंत पाणी साठले आहे. दुष्काळावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी हा अतिशय महत्वाचा उपक्रम ठरला आहे. या वर्षीच्या अंदाजपत्रकाच्या माध्यमातून आम्ही या योजनेचा किमान तिप्पट विस्तार करणार आहोत.

सभापती महोदय, जनावरांच्या छावण्याबद्दल मी सभागृहाला सांगू इच्छितो की, राज्यात 350 पेक्षा जास्त जनावरांच्या छावण्या कार्यरत असून त्यात 4.5 लाख जनावरे एकत्रित आहेत. छावण्या सुरु करण्याबाबत काही अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. पूर्वी 5 लाख रुपये अनामत रक्कम जमा करण्याची अट होती. ती अट शिथिल करण्यात आली आहे. काही ग्रामपंचायती, सहकारी विकास सोसायट्या, पणन संस्था, मार्केट कमिट्या जर छावण्या सुरु करण्यासाठी पुढे आल्या तर त्यांना तत्काळ छावणी सुरु करण्याची परवानगी देण्यात येईल. अनेक सेवाभावी संस्थांनी चारा उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले आहे. काही सेवाभावी संस्था छावण्या सुरु करण्यास पुढे आल्या तर त्यांचे स्वागत केले जाईल. छावण्या सुरु करण्याकरिता जे कोणी पुढे येतील त्या सर्वांना परवानगी देण्यात येईल.

सभापती महोदय, 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी (दुष्काळ)' असे एक विशिष्ट खाते उघडण्यात आले आहे. राज्यातील सर्व जनतेला आवाहन करण्यात आले की, सढळ हाताने मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये पैसे द्यावेत. मला सांगण्यास आनंद वाटतो की, मोठया प्रमाणात शासकीय कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचे, दोन दिवसाचे वेतन किंवा एक महिन्याचे वेतन दिले तसेच मोठमोठ्या कंपन्या, सहकारी संस्थांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस आर्थिक मदत केली आहे. राष्ट्रीयकृत बँकांनी सिन्टेक्सच्या टाक्या दिल्या आहेत. एकप्रकारे मदतीचा ओघ शासनाकडे सुरु आहे. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी पुन्हा एकदा राज्यातील जनतेला आवाहन करु इच्छितो, विनंती करु इच्छितो. या दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सर्वांनी सढळ हाताने मदत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण........

करावी. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या माध्यमातून जी मदत पाठविली आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, महात्मा फुले जल अभियानांतर्गत गाळ काढण्याच्या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. रोजगार हमी योजना हा अतिशय महत्वाचा विषय आहे. मागेल त्याच्या हाताला काम देणे आणि पर्यायाने रोजगाराची व्यवस्था करणे हा राष्ट्रीय कार्यक्रम नरेगा योजनेच्या माध्यमातून राज्यात राबविला जातो. मी या राज्याच्या मुख्यमंत्री पदाची धुरा सांभाळली त्या वर्षात जेमतेम 350 कोटी रुपये या कार्यक्रमामध्ये खर्च झाले. केंद्र सरकारकडून 290 ते 300 कोटी रुपये मिळाले. या कार्यक्रमाचा आता विस्तार केला असून यावर्षी 2000 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम केंद्र सरकारकडून राज्य शासनाकडे राज्याच्या विकास कार्यक्रमासाठी नरेगाच्या माध्यमातून येईल अशी अपेक्षा आहे. कर्मचारी कमी पडतात अशी तक्रार करण्यात आल्यानंतर कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने कर्मचारी घेण्यासाठी परवानगी दिली आहे. डाटा एन्ट्री ऑपरेटर, अभियंते आदी 2508 कर्मचारी कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर घेण्यात आले आहेत.

सभापती महोदय, दुष्काळाला कायमस्वरुपी तोंड देण्यासाठी अर्थसंकल्पातील किमान 1/4 रक्कम 'पाणी' या विषयावर खर्च होईल. जलसिंचन, जलसंधारण, पाणी पुरवठा योजना किंवा कृषी खात्यामार्फत शेततळी, ठिबक सिंचन योजना, सिमेंट नाला बांध कार्यक्रम यासाठी किमान 25 टक्के रक्कम खर्च होईल. त्यातून कायमस्वरुपी पाण्याच्या योजना सुरु होतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, मोठ्या जलसिंचन योजना अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, त्यातील काही छोटे छोटे लिंक्स, काही अंश लवकर पूर्ण होण्यासारखे असतील ते पूर्ण केल्यानंतर दुष्काळी भागाला पाणी मिळण्यासाठी मदत होईल, टंचाई परिस्थितीवर मात करता येईल असे 105 लिंक्स निवडले असून तो प्रस्ताव केंद्र शासनाला सादर केला आहे. केंद्र शासनाकडून मान्य होऊन आला तर ठीक आहे, अन्यथा आमच्या ताकदीवर प्रस्ताव निवडणार आहोत. त्याचबरोबर अवकाळी पावसामुळे जे नुकसान झाले, त्याबद्दल मदत करण्याची घोषणा मी या सभागृहात केली होती. टंचाईग्रस्त गावांमध्ये दारिद्र्य रेषेवरील पत्रिकाधारकांना दारिद्र्य रेषेखालील पत्रिकाधारकांच्या दराने धान्य देता यावे यासाठी केंद्र शासनाकडे स्वस्त दराने 3 लाख मे.टन धान्य देण्याचा प्रस्ताव पाठविला आहे.

नंतर 3सी.1...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण .......

ज्या भागातील शेतकऱ्यांच्या खरीप आणि रब्बीच्या पिकांचे नुकसान झाले आहे त्यांना मदत करण्याची घोषणा या पूर्वीच शासनाच्या वतीने करण्यात आलेली आहे. फळबागा तसेच पिके वाचविण्याकरिता, शेत तळयाच्या आस्तरीकरणासाठी, पीक विम्याची घोषणा देखील करण्यात आलेली आहे. चारा निर्माण करण्याच्या कार्यक्रमासाठी चारा विकास योजनेंतर्गत निर्णय घेण्यात आला असून 4 लक्ष हेक्टरवर चारा लागवड होणार असून यामध्ये 60 ते 70 लक्ष टन नवीन चारा निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, डिपीसी मधील 15 टक्के रक्कम दुष्काळ निवारणासाठी खर्च केली जाईल असाही निर्णय घेण्यात आलेला आहे. उस्मानाबाद, जालना येथील तातडीच्या पाणी पुरवठा योजनेकरिता 51 तसेच 40 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. पाणी पुरवठा विभागाचा यासंदर्भात 400 ते 450 कोटी रुपये खर्च होणार आहेत तसेच दुष्काळी भागातील गावांना पाणी पुरवठयासाठी जलस्त्रोत भरण्यासाठी ताकरी, टेंभू, म्हैसाळ, सोलापूर व पुणे जिल्हयातील जनाई, शिरसाई व पुरंदर तसेच सातारा जिल्हयातील उरमोडी व जळगाव जिल्हयातील मुक्ताईनगर या उपसा जलसिंचनांची विजेची देयके शासनातर्फे देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सभापती महोदय,दुष्काळी परिस्थितीचा सामना करीत असतांना ज्या काही समस्या निर्माण होतील त्याकरिता केंद्र शासनाने 1200 कोटी रुपयांची मदत केलेली आहे. तरी सुध्दा राज्य शासनाच्या बजेटमधून ज्या निधींची आवश्यकता पडेल त्याची तरतूद केली जाईल. दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. टंचाईच्या परिस्थितीचा सामना करीत असतांना राज्याच्या विकासाला खंड पडणार नाही, राज्याच्या विकासाची धौडदौड चालू राहील यासाठी शासनाचा प्रयत्न राहणार आहे एवढे मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले असून त्यातील काही मुद्यांचा मी येथे परामर्श घेणार आहे. कै.यशवंतराव चव्हाणांच्या जन्मशताब्दी निमित्ताने 100 कोटीचा निधी राखून ठेवण्यात आला होता व त्यातील काही निधी खर्च झाला नाही अशी चिंता व्यक्त करण्यात आली होती. या निधीतून जवळ जवळ 82 कोटी रुपयांची कामे सुरु

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण .......

आहेत. यासंदर्भात नियोजन विभाग, ग्रामविकास विभाग, कृषी विभाग, सहकार विभाग, जलसंपदा विभागाने यासंदर्भात चर्चा सत्रे घेतली असून यामधून कायमस्वरपी लोकोपयोगी् कामे उभी राहणार आहेत.

सभापती महोदय, कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ सुरु करण्याची सूचना सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी उपस्थित केली होती. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, कोकण आणि उत्तर महाराष्ट्राचे स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्यासाठी केंद्र सरकारशी पत्र व्यवहार सुरु आहे. या विषयाच्या संदर्भात मी तत्कालीन गृहमंत्र्यांशी देखील चर्चा केली होती व ही चर्चा सुरु पुढे सुरु ठेवून नवीन केंद्रीय गृहमंत्र्यांशी देखील लवकरच चर्चा करण्यात येईल.

सभापती महोदय, धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या संदर्भातील मुद्दा सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केला होता. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या सेक्टर 5 मध्ये काम सुरु असून या ठिकाणी 18 मजल्याच्या इमारतीचे काम सुरु झालेले आहे. या इमारतीमध्ये एकंदर 356 सदनिका तयार होणार आहेत. त्याच बरोबर धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या सेक्टर 1 ते 5 चा प्रारुप आराखडा एमआरयुटीपी नुसार दिनांक 8 मार्च, 2013 रोजी प्रकाशित करण्यात आलेला आहे. यासंदर्भात आता हरकती व सूचना मागविल्या जाणार असून नंतर निविदा काढून काहींना विकास कामे करण्याची संधी देता येईल काय यासंदर्भात सल्लागारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरणाच्या कामाबद्दल प्रश्न उपस्थित केला होता. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात एमआयसीने विकसित केलेले सॉफ्टवेअर वापरण्यात येत असून दि. 14 मार्च, 2013 अखेर 86 टक्के शिधापत्रिकांची माहिती भरण्यात आलेली आहे. मार्च 13 मध्ये प्रायोगिक तत्वावर 11 जिल्हयांमध्ये संगणकीकरणाचे आदेश काढण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय,राज्यामध्ये शतकोटी झाडे लावण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु दुष्काळामुळे या कार्यक्रमावर थोडे निर्बंध आले. परंतु आता पर्यंत 16 कोटी 2 लक्ष झाडांची लागवड करण्यात आलेली आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांनी भूमिअभिलेख्याच्या कामातील संगणकीकरणासंबंधातील प्रश्न विचारला होता. मी त्यांना सांगू इच्छितो की, याबाबत महसूल खात्याने अनेक धोरणात्मक निर्णय घेऊन खूपच सुधारणा आणली आहे. आता महसूल विभागामार्फत ई चावडीचा कार्यक्रम, ई-मोजणीचा कार्यक्रम, विदर्भातील नझूल जमिनीच्या प्रश्नासह अनेक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. यासाठी 228 इलेक्ट्रॉनिक मशिन्स उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. यातील काही मशिन्स नादुरूस्त झाली होती. या मशिन्सची वॉरंटी संपल्यामुळे वेगळी तरतूद करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

येथे मानव विकास अहवालासंबंधी देखील माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांनी प्रश्न विचारला होतो. राज्यातील पहिला मानव विकास अहवाल सन 2002 साली प्रकाशित झाला. आता नवीन अहवाल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. लवकरच राज्याचा दुसरा मानव विकास अहवाल प्रकाशित होईल व आतंरराष्ट्रीय दर्जाच्या मानांकनानुसार कार्यक्रम होईल.

परिवहन विभागाने सीमा तपासणीचा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला आहे. राज्यातील 22 नाक्यांचे आधुनिकीकरण, संगणकीकरण होणार आहे. मी स्वत: याच महिन्यामध्ये आच्छाड नाक्याचे उद्घाटन केलेले आहे. इतर नाक्यांचे काम सुरू आहे.

डॉ.विजय केळकर यांच्या समितीचा अहवाल देखील लवकरच अपेक्षित आहे. विभागीय असमतोल कमी करण्यासाठी आपण डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. या समितीला महिन्या अखेर पर्यंत अहवाल देण्याची विनंती करण्यात आली आहे.

फळ पीक विमा योजने अंतर्गत शेतकऱ्यांना मदत करण्यासंबंधीचा प्रश्न विचारण्यात आला होता. सन 2011 मध्ये 10440 शेतकऱ्यांना रूपये 42 कोटी 97 लाख तसेच सन 20012 मध्ये 2700 शेतकऱ्यांना रूपये 7 कोटी 76 लाख विम्या पोटी भरपाई मिळालेली आहे. त्यामध्ये द्राक्ष, संत्री, मोसंबी, डाळिंबी, केळी,आंबा, काजू इत्यादी पिकांना नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

जीवनदायी योजने संबंधी मी माहिती दिलेली आहे. जवळ जवळ 42807 लोकांवर आता पर्यंत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

मेट्रो आणि मोनो रेलचा देखील प्रश्न होता. या वर्षी या दोन्ही मार्गांचे उद्‌घाटन होऊन दोन्ही रेल्वे धावायला सुरूवात होणार आहे. आता या मार्गांची चाचणी सुरू आहे. आपण वर्तमानपत्रामध्ये त्याचे फोटो देखील पाहिले असतील. त्याच बरोबर महिलांसाठीचे दावे निकालात काढण्यासाठी 25 फास्ट ट्रॅक कोर्ट सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नवीन फॉरेन्सिक लॅबमधील काही पदे रिक्त आहेत. ती पदे लवकर भरण्याकरिता प्रयत्न सुरू आहेत.

सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील व सुभाष चव्हाण यांचा खंडकरी शेतकऱ्यांच्या संबंधातील प्रश्न होता. त्यांना जमिनी देण्यात आलेल्या आहेत. न्यायालयात मराठीचा वापर करण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यासाठी मराठी लघुलेखकांची आणि टंकलेखकांची नेमणूक करण्यात आली आहे. दुय्यम न्यायालयात मराठीचा वापर होत आहे. पण उच्च न्यायालयात मराठीचा वापर होण्याकरिता प्रयत्न सुरू आहेत. तसेच महत्वाची ग्रंथ संपदा ऑडिओ बुकच्या माध्यमातून जनतेच्या वापराकरिता मोफतपणे वेब-साईटवर ठेवण्यात आली आहे. त्यामध्ये दासबोध ग्रंथाचा, श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या पुस्तकांचा, कुसुमाग्रज यांच्या कवितांचा, विंदा करंदीकर यांच्या साहित्याचा समावेश आहे.

येथे मनरेगा संबंधी देखील चर्चा करण्यात आली होती. मनरेगामधील मजुरीचे दर रूपये 145/- वरून रूपये 162/- पर्यंत वाढविण्यात आले आहेत. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन 100 दिवसां ऐवजी 150 दिवस रोजगार द्यावा ही मागणी मान्य करण्यात आली आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

सभापती महोदय, राज्यात नवीन गोदामे बांधण्यात यावीत असा प्रश्न विचारण्यात आला होता...सन्माननीय सदस्यांनी अन्य जे प्रश्न विचारले होते त्याची उत्तरे देऊन सभागृहाचा आणखी वेळ न घेता त्यांच्या प्रश्नांची उत्तरे त्यांना पाठविली जातील असे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मी एका गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. या सभागृहात माझ यावर काही व्यक्तीश: आरोप करण्यात आले. त्यातील काही माझ्या कार्यपध्दतीवर होते. अन्य दोन-तीन गोष्टींबद्दल आरोप करण्यात आले. मी ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, मागील 25 वर्षापासून मी सामाजिक जीवनात समरस आहे. या 25 वर्षामध्ये मला अनेक उच्च पदांवर काम करण्याची संधी मिळाली. या पदांवर काम करीत असताना मी कोणालाही वैयक्तिपणे माझ्याकडे बोट दाखविण्याची संधी दिली नाही आणि या पुढेही देणार नाही. परंतु मी काम करीत असताना मला जे योग्य वाटेल किंवा जे नियमाप्रमाणे असेल ते मी करणार मग त्यावर टीका होवो अगर न होवो. हितसंबंधातील असलेली कामे मला योग्य वाटली नाही किंवा नियमबाह्य असतील तर ती मी मुळीच करणार नाही. मी आतापर्यंत जे करत आलो ते चालू ठेवीन. व्यक्तिगत लाभाच्या कामापेक्षा सार्वजनिक लाभाच्या कामावर माझा भर आहे. सार्वजनिक लाभाची कामे किचकट असल्यामुळे त्यास वेळ लागतो. ती कामे सोडविण्याकरिता मी जास्त प्रयत्न करीत असतो याची मी सभागृहाला ग्वाही देतो. वैयक्तिक हितापेक्षा सार्वजनिक हित महत्वाचे आहे आणि त्याच पध्दतीने निर्णय झालेले आहेत.

सभापती महोदय, माझ्यावर तीन प्रकारचे आरोप ठेवण्यात आले. पहिला आरोप म्हणजे आरक्षणातील बदल, दुसरा मुंबई शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीतील 33 (24) म्हणजे पार्किग लॉट संबंधातील बदला संदर्भात आहे आणि तिसरा स्पेशल टाऊनशीपबद्दलचा आहे.

सभापती महोदय, मागील 20-25 वर्षापासून आरक्षणा बदला संदर्भातील प्रश्न निर्माण झ ालेला आहे आणि तो वाढत्या नागरिकरणामुळे अपेक्षितच आहे. जसजसे नागरिकरण वाढत जाईल तसा हा प्रश्न वाढतच जाणार आहे. कोणत्याही प्रकारचे आरक्षण बदलायचे असेल तर त्याला एक प्रक्रिया असते. सर्वप्रथम अर्ज प्राप्त झाल्यानंतर नगररचनाकारापासून ते नगररचना संचालकापर्यंत सर्व अधिक्री तो प्रस्ताव तपासतात. त्यानंतर तो प्रस्ताव नगर विकास विभागाकडे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

मान्यतेकरिता येतो. त्या विभागाकडून त्याची तपासणी झाल्यानंतर विभागाच्या मंत्री महोदयांदयांकडे किंवा मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव येतो. त्यानंतर एमआरटीपीच्या कलम 37 प्रमाणे त्यावर कारवाई होते. म्हणजे त्यावर जनतेच्या हरकती व सूचना मागविल्या जातात आणि त्यानंतर त्यावर अंतिम निर्णय घेण्यात येतो अशी प्रचलित पध्दती आहे. या सर्व टप्प्यांवर जनतेला आपले आक्षेप नोंदविण्याची संधी असते. जनतेकडून हरकती आणि सूचना प्राप्त झाल्यानंतर नगररचना संचालक पुन्हा त्या प्रस्तावामध्ये आवश्यक ते बदल करुन पुन्हा तो प्रस्ताव नगर विकास विभाग आणि मंत्रीमहोदयांकडे पाठविला जातो. त्या सर्वांचा विचार करुन लोकहिताकरिता आरक्षणाचे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय, माझ्याकडे आरक्षण बदला संदर्भात जे जे प्रस्ताव आले त्यामध्ये मी वर सांगितलेली प्रक्रिया डावलण्यात आलेली नाही किंवा कोणत्याही टप्प्यावर दुर्लक्ष करण्यात आलेले नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी काही ठोस पुरावे, किंवा नियम बदलून काही निर्णय दाखविल्यास त्यामध्ये फेरनिर्णय घेण्यात येईल याची मी ग्वाही देतो.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी स्क्वेअर फुटाचा विचार करावा असे सांगितले. आपण स्क्वेअर फुटाच्या पलीकडे जाऊन थोडा व्यापक विचार करणे गरजेचे आहे. आपण पार्किंग लॉटच्या संदर्भात निर्णय घेतला. मुंबईमध्ये काही दिवसांपूर्वी 33(24) या नियमाखाली पार्किंग लॉटची पॉलिसी निर्माण करण्यात आली. मी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर जेव्हा या पॉलिसीचा विचार केला तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, या धोरणामुळे राज्याचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे आणि त्याचा खूप लोकांना वैयक्तिक लाभ होत आहे. तेव्हा या पॉलिसी धोरणामध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आम्ही बदल केला. मुंबई महानगपालिकेचे तत्कालीन आयुक्त आणि इतर अधिकारी या सर्वांनी मिळून चर्चा करुन त्या पॉलिसीमध्ये बदल केला.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

त्यातून किमान 1 हजार कोटी रुपये बृहन्मुंबई महानगरपालिकेला मिळणार आहेत. हा आकडा या पुढेही वाढत जाईल. हा निर्णय चौरस फुटाचा विचार करुन नव्हे तर राज्याच्या व्यापक हिताचा विचार करुन घेतलेला आहे. अशा प्रकारचा निर्णय घेऊन पार्कींगच्या मजल्यांवर निर्बंध आणले आहेत. दोन तळमजले, एक ग्राऊंड फ्लोअर अशा प्रकारे चार मजल्यापर्यंत पार्कींग सीमित केले आहे. 27 च्या नियमानुसार पुन्हा या प्रकरणी सूचना व हरकती मागवून निर्णय घेतला आहे.

आज मुंबई शहरात पार्कींगची समस्या दिवसेंदिवत वाढत चालली आहे. पूर्वीच्या धोरणानुसार पार्किंगसाठी कितीही मजले बांधले तरी चालत होते, किंबहुना एफएसआय मिळण्यासाठी हे धोरण राबविले जात होते. लोकांच्या सेवेसाठी नव्हे तर जास्त एफएसआय मिळविण्यासाठी धोरण राबविले जात असल्याचे लक्षात आल्यानंतर पूर्वीच्या नियमांमध्ये बदल करण्यात आले. अशा प्रकारचे बदल मुंबई महानगरपालिकेला करता आले असते. परंतु त्यांनी तो बदल केला नाही. जुन्या धोरणामध्ये राज्याचे किती नुकसान झाले असेल याचा आकडा न काढलेला बरा. परंतु शासनाने अशा प्रकारचा बदल केल्यामुळे प्रिमियमच्या रुपाने आतापर्यंत 1 हजार कोटी रुपये मिळाले आहेत. म्हणूनच चौरस फुटाच्या पलीकडे जाऊन वेगळा विचार करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, विशेष नगर वसाहतीबाबत काही आक्षेप घेण्यात आले. मी सांगू इच्छितो की, या प्रकारचे धोरण विचार करुन केलेले आहे. गुजरात राज्याबाबत आपण नेहमी बोलतो. त्या राज्यातील धोरण पाहिले तर त्या राज्यात अशा प्रकारच्या वसाहतींसाठी 1.5 एफएसआय दिला आहे. आंध्र प्रदेश राज्यात तर अमर्याद एफएसआय दिला आहे. हरियाणा राज्यात 1.75, तामिळनाळू व उत्तर प्रदेश राज्यामध्ये 2.5, राजस्थान राज्यामध्ये 1.2 एफएसआय. दिला आहे. या राज्यांत विशेष नवी महानगरे वसविण्याची संकल्पना आहे. आज मुंबईमध्ये जागा नाही. पाणी, वाहतूक, सांडपाणी, घनकचऱ्याच्या बाबतीत अडचणी येत आहेत. जोपर्यंत आपण नवीन नगर वसाहत निर्माण करणार नाही तो पर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. आज कामासाठी लोक महानगरात येतच आहेत. या संदर्भात इतर राज्यांनी जे काम केलेले आणि आपल्या राज्याने जे काम करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याचा सन्माननीय सदस्यांनी तुलनात्मक अभ्यास केला तर त्यांना निश्चितपणे आढळून येईल की, राज्याच्या व्यापक हितासाठीच आम्ही हा निर्णय घेतलेला आहे. या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संदर्भात हरकती व सूचना मागविण्याची प्रक्रिया सुरु आहे. ज्यांना हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी त्या अवश्य घ्याव्यात. राज्याच्या हितासाठी आणि नवीन नागरिकीकरणासाठी हा निर्णय आवश्यक आहे असे मला नम्रपणे सांगावेसे वाटते.

महोदय, या ठिकाणी आरक्षणात बदल केल्याबाबतची काही प्रकरणे सांगण्यात आली. गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत केवळ नागपूर विभागातील 6 आणि पुणे विभागातील 12 प्रकरणी कलम 20 (3) अन्वये जमिनीच्या वापरात बदल करण्यात आला. पूर्वी शेकडो आरक्षणे बदलण्याची प्रथा प्रचलित होती. त्यावर आता खूप मोठ्या प्रमाणावर आळा घालण्यात आला आहे. ही आरक्षणे नियमात राहून आणि हरकती व सूचना मागवून बदलण्यात आली आहेत. तरी सुध्दा विशिष्ट बाबतीत काही बाबी माझ्या लक्षात आणून दिल्या तर निश्चितपणे त्या बाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

मी पुन्हा सांगू इच्छितो की, वाढत्या नागरिकीकरणाच्या बाबतीत काही तरी मूलभूत विचार करावा लागेल. वाढत्या नागरिकीकरणामुळे मुंबईसारख्या शहरात गर्दी होऊ लागली आहे. त्या ठिकाणी नागरी सुविधा पुरवू शकणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शिवाय मुंबई बेटाची लोकसंख्या कमी होऊ लागली आहे. मुंबई बेटात उदरनिर्वाह करणारी माणसे कमी झाली आहेत. मुंबई बेटाच्या बाहेर जाऊन मुंबई उपनगरात आणि ठाण्यामध्ये ही गर्दी वाढत आहे. त्यामुळे या संदर्भात मूलभूत उपाययोजना करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

महोदय, एसआरए किंवा म्हाडाच्या 33 (5) नियमामध्ये बदल करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या बाबत लवकरच अधिसूचना निघेल. अशा प्रकारे इतरही अनेक निर्णय सरकारच्या वतीने घेणार आहोत. कोणताही निर्णय घेतला तरी कोणाला ना कोणाला फायदा होत असतो. कोणी धर्मादाय म्हणून या क्षेत्रात येत नाही. असा निर्णय घेतल्याने त्यात गैरव्यवहार झाला असे म्हणणे उचित होणार नाही एवढेच नम्रपणे सांगू इच्छितो.

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या आभार प्रदर्शनाच्या ठरावावरील चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्यांना मी नम्रपणे सांगू इच्छितो की, त्यांनी केलेल्या सूचनांचा राज्य सरकारकडून आदरपूर्वक विचार केला जाईल. राज्यात दुष्काळी परिस्थिती असली तरी

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्याच्या विकासासाठी आपण सर्व मिळून या दुष्काळावर मात करु या. राज्याचा असाच विकास करुन हे प्रथम क्रमांकाचे राज्य आहे हे प्रस्थापित करण्यासाठी वाटचाल करु या, अशी अपेक्षा व्यक्त करुन आपली रजा घेतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

**सभापती** : आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: वाढदिवसाबद्दल माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचे अभिनंदन

**सभापती** : माननीय नामदार श्री. पृथ्वीराज चव्हाण, माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या वाढदिवसाबद्दल ही विधान परिषद त्यांचे अभिनंदन करीत आहे. त्यांना भविष्यात उत्तम आरोग्य लाभो व त्यांची उत्तरोत्तर भरभराट होवो हीच शुभेच्छा.

----

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**सभापती** : यानंतर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या संघटनांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी परीक्षेच्या कामावर घातलेला बहिष्कार या विषयावर दिलेल्या प्रस्तावावरील अपूर्ण राहिलेली चर्चा आता पुढे सुरु होईल. या चर्चेकरिता सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी मी फक्त 25 मिनिटांचा वेळ देणार आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सर्व मंत्री सभागृहात उपस्थित आहेत त्यामुळे पूरक मागण्यांवरील चर्चा आता सुरु करावी व त्यानंतर सकाळच्या प्रस्तावावरील राहिलेली चर्चा पुढे सुरु करावी.

**सभापती** : ठीक आहे. ही चर्चा नंतर घेण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, दोन्ही शिक्षण मंत्री या ठिकाण्‌ी उपस्थित आहेत...

**सभापती** : सभागृहात जे शिक्षक प्रतिनिधी आहेत त्यांचे मी सातत्याने ऐकण्याचा प्रयत्न करीत असतो. म्हणूनच आज सकाळी सुध्दा आपल्याला मीच 50 मिनिटे वाढवून दिलेली आहेत.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: सन 2012-2013 च्या खर्चाच्यापूरक विवरणपत्रावर चर्चा**

**सभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चा आज व मंगळवार, दिनंक 19 मार्च, 2013 रोजी घेण्यात येणार आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनव्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व मंगळवार, दिनंक 19 मार्च, 2013 रोजी असलेल्या बाकीच्या सर्व मागण्या यावरील चर्चा मंगळवार दिनांक 19 मार्च, 2013 रोजी पूर्ण करावी लागेल.

**विविध मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या**

**सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील.

(1) मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक ए-4, एफ-2, एफ-5, जे-1, जे-3, क्यू-1, क्यू-2, क्यू-3, क्यू-4

(2) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक जी-3, जी-6, के-1, के-6, के-11 ओ-10, ओ-13

(3) उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक के-3, के-7

(4) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एच-1, एच-6, एच-7, एच-8, झेडडी-4

(5) गृह मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक बी-1,बी-4, बी-10

(6) सामाजिक न्याय, भटक्या व विमुक्त जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एन-1,एन-3

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

**सभापती** ....

(7) कृषी व पणन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक डी-3, डी-4, डी-5, डी-7, डी-10

(8) सहकार आणि संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक पी-1, व्ही-2, व्ही-3

(9) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक वाय-1, वाय-5 वाय-6

(10) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक एम-2, एम-3

(11) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक टी-1, टी-2, टी-4 टी-5, टी-6

(12) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक डी-1

यानंतर माननीय विरोधी पक्ष नेते पूरक मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पूरक मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने आम्ही काही मुद्दे उपस्थित करतो आणि नंतर वेळ झाला आहे म्हणून मागणी क्रमांक अमुकअमुक मंजूर करा असे माननीय मंत्र्यांकडून सांगितले जाते. आम्ही जे मुद्दे उपस्थित करतो त्या संदर्भात मंत्री महोदयांनी जे योग्य असेल ते उत्तर देण्याचा प्रयत्न करावा किंवा तसे उत्तर द्यावे अशी मी विनंती करतो. आम्ही उशिरापर्यंत बसणार आहोत त्यामुळे आम्हाला उत्तराची अपेक्षा आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय गट नेते श्री. दिवाकर रावते यांनी जी सूचना केली त्याबाबत मी सांगू इच्छितो की, ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे त्या त्या ठिकाणी जरुर शासनाच्या वतीने तसा प्रयत्न करावा आणि ज्या ठिकाणी शक्य नाही त्या ठिकाणी आपण पूर्वीच्या पध्दतीने त्या बाबतीत लेखी उत्तरे द्यावीत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.बरवड 15:35

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सन 2012-13 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी केवळ 10-12 मुद्देच मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. नगरविकास विभागाच्या बाब क्र.57 वर मी बोलतो. महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सुविधांच्या विकासासाठी अतिरिक्त तरतूद करणे यासाठी ही मागणी केलेली आहे. मागील वेळीही हा प्रश्न सभागृहात मांडण्यात आला होता. सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांचा विकास कामांसंबंधी प्रश्न आला होता. ज्या महानगरपालिकेत ज्या पक्षाचे बहुमत आहे. त्यांच्याकडून ठराव क्र.1 ते 71 मांडले जातात आणि पास केले जातात. दिनांक 20 जून रोजी अकोल्याच्या महानगरपालिकेमध्ये 22 विषयांचा ठराव 5 मिनिटांमध्ये मंजूर करण्यात आला. म्हणजे विकास कामांचा निधी आपल्याकडे वळता करुन घेण्यात आला. यासंबंधी उपायुक्तांकडे चौकशी केली असता अशा प्रकारची सभा चुकीची आहे असे मत त्यांनी व्यक्त केले होते. असे मत येऊनही तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही.

नवीन आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांना मागचे काही माहीत नाही असे गृहित धरुन त्या कामांबाबत मार्च महिन्याच्या आत फंड रिलीज झाला पाहिजे असे सांगण्यात आले. या संबंधी चौकशी करुन अहवाल पाठविण्यासाठी नगरविकास विकास विभागाच्या प्रधान सचिवांनी समिती नेमली होती. त्या आयुक्तांनी सविस्तर अहवाल न पाठविता त्यांनी संक्षित स्वरुपात सोयीस्कर अहवाल पाठविला होता. अकोला महानगरपालिकेचे उदाहरण घेऊन मी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो आहे. घिसाडघाईने ठराव मंजूर करुन लोकशाहीला बट्टा लागेल अशी कामे महानगरपालिकेत सुरु आहेत. ती कामे रद्द करण्याची गरज आहे. अकोला महानगरपालिकेमध्ये सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानासाठी स्टेट बँकेत खाते होते. तरी देखील 150 कोटीचे खाते ओरिएण्टेट बँक ऑफ कॉमर्स या बँकेत उघडले. त्यांना हे खाते सुरु करता येत नाही. त्याबाबत सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

याच बाबीच्या अंतर्गत मी सांगू इच्छितो की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या जेएनएनयूआरएम या योजनेंतर्गत 600 कोटी रुपये खर्च करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली आहे. हा पुनर्वसन प्रकल्प राबविताना महानगरपालिकेच्या अनागोंदी कारभारामुळे या प्रकल्पातून तूट भरुन काढण्यासाठी लाभार्थ्यांकडून स्वहिस्सा घेतला जात आहे. हा झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प रेड झोनमध्ये येत असल्याची बाब प्रशासनाने लपवून ठेवल्यामुळे व या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानग्या न घेता हा प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न पालिका प्रशासन करीत असल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोटीस काढून या प्रकल्पाची अनामत रक्कम जप्त केली आहे. हा प्रकल्प राबविताना प्रशासनाने जी अनियमितता व दिरंगाई दाखविली आहे यावर शासन काय कारवाई करणार आहे याची मी वाट बघत आहे. या प्रकल्पातील झोपडपट्टी धारकांना स्वहिस्सा न घेता मोफत घरे देण्याबाबत शासन काही कार्यवाही करणार आहे काय ? असा प्रश्न मला या निमित्ताने उपस्थित करावयाचा आहे.

यानंतर मी विधी व न्याय विभागाच्या बाब क्र.79 वर बोलणार आहे. विविध उपक्रमांचा अवलंब करुन जून, 2010 च्या अखेरीस राज्यातील दुय्यम न्यायालयात प्रलंबित असलेल्या 41.35 लाख प्रकरणांची संख्या डिसेंबर, 2012 च्या अखेरीस 29.77 लाखांपर्यंत कमी करण्यात शासनास यश आल्याचे राज्यपालांच्या अभिभाषणात नमूद केले आहे. ही जरी वस्तुस्थिती असली तरी यातील बहुतांश वाटा हा दुय्यम न्यायालयातील नियमित न्यायाधीशांचा आहे. गेली 2 वर्षे हे नियमित न्यायाधीश आपला नियमित कार्यभार सांभाळून उपरोक्त प्रकरणे हाताळत होते. परिणामी त्यांच्या कार्यक्षमतेवर तसेच स्वास्थ्यावर विपरित परिणाम होत आहे. वास्तविक चेक बाऊन्सिंग, मोटर व्हेइकल अधिनियम अंतर्गतचे किरकोळ गुन्हे इत्यादी हाताळण्यासाठी विशेष महानगरदंडाधिकारी सक्षम आहेत. परंतु गत 2 वर्षापासून अशा विशेष महानगरदंडाधिकाऱ्यांची पदे शासनाने भरलेली नाहीत. परिणामी नियमित न्यायाधीशांवर त्याचा अतिरिक्त भार पडत आहे. सदर विशेष महानगरदंडाधिकाऱ्यांची पदे भरली जावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

पृष्ठ क्र.114, बाब क्र.117, गृहनिर्माण या विभागासंबंधी मी माझे विचार मांडतो. म्हाडा कर्मचाऱ्यांची पेन्शन लागू करण्याची मागणी आहे. त्यांनी अनेकदा आंदोलने केली आहेत, उपोषणे केली आहेत. युतीच्या काळात सर्व निर्णय झाला होता. परंतु त्याची अंमलबजावणी होईपर्यंत सरकार बदलले आणि म्हाडाच्या कर्मचाऱ्यांचे नशीब बिघडले. पेन्शनसाठी त्यांच्याकडे पैसा आहे, म्हाडाला तोटा झाला तर पेन्शन योजना बंद करण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे. तरीही म्हाडाच्या कर्मचाऱ्यांना पेन्शन दिली तर अन्य कर्मचाऱ्यांना पेन्शन द्यावी लागेल असे कारण पुढे करुन चालढकल केली जात आहे. म्हाडाचे कर्मचारी स्वत:च्या पायावर उभे आहेत, आर्थिकदृष्टया सक्षम आहेत. त्या कर्मचाऱ्यांना पेन्शन दिली पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 15:40

श्री. विनोद तावडे....

तेव्हा म्हाडा कर्मचा-यांच्या पेन्शनच्या संदर्भात माननीय गृहनिर्माण मंत्री आपल्या भाषणात उत्तर देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

गृहनिर्माण विभाग, बाब क्रमांक 118, पान क्रमांक 114. म्हाडाला भाडयाची रक्कम प्रदान करण्यासाठी रु. 25,07,000 इतक्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता मुंबईतील 26 विकासकांना सन 2000 पासून 1586 गाळे वितरित केलेले आहेत. त्यांच्याकडून म्हाडाने भाडे वसूल केलेले नाही. हे भाडे त्या विकासकांकडून वसूल करणे आवश्यक होते. म्हाडाने ही वसुली न केल्यामुळे सुमारे 24 कोटी रुपये भाडे थकीत राहिलेले आहे. सुमारे 10 वर्षापासून ही रक्कम थकीत असताना संबंधित विकासकांवर म्हाडाने आजपर्यन्त कोणतीही कारवाई केलेली नाही. तात्पुरत्या नोटीस देऊन कारवाई केल्याचे सांगून आम्ही या ठिकाणी विचारलेल्या प्रश्नांच्या बाबतीत टोलवाटोलवी केली जाते. ही सरळ सरळ म्हाडाची फसवणूक असून ही फसवणूक म्हाडाचे अधिकारी आणि विकासक यांच्या संगनमताने चालू आहे. विकासकांना जरब बसावी आणि अधिका-यांनी देखील नियमाप्रमाणे वागावे या करिता 26 विकासकांकडून भाडे वसूल करण्याची जबाबदारी ज्या अधिका-यांवर होती त्या अधिका-यांवर म्हाडाला फसविल्या प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी करणारे पत्र मी दिनांक 8.10.2012 रोजी उपाध्यक्ष व कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांना दिले होते. परंतु अद्याप या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. तेव्हा या प्रकरणी दोषी असलेल्या अधिका-यांवर व विकासकांवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी करतो.

बाब क्रमांक 121, पान क्रमांक 115. आताच माननीय मुख्यमंत्र्यांनी कन्व्हेअन्सच्या बाबतीत काय निर्णय घेतला हे सांगून स्वत:च कौतुक करुन घेतले. कन्व्हेअन्सची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. ही कन्व्हेअन्सची प्रकरणे निकाली काढण्यासाठी कार्यालयाकडून आर्थिक मागणी केली जाते. ही कन्व्हेअन्सची प्रकरणे प्रलंबित रहावीत यासाठी विकासक त्यांना पैसे देतात. कन्व्हेअन्सचा अर्ज केल्यानंतर तो प्रलंबित का राहातो याची कारणे समजली पाहिजेत. शिवाय हे कन्व्हेअन्सचे अर्ज ठराविक मुदतीमध्ये निकाली काढले पाहिजेत. या प्रकरणी जे कोणी हेतूपुरस्सर दिरंगाई करीत असतील त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. कन्व्हेअन्सचा केवळ कायदा करुन उपयोग नाही. हा कायदा केल्यानंतर त्याचे रुल्स करण्यामध्ये खूप वर्षे गेली. हे रुल्स झाल्यानंतर कन्व्हेअन्स

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

डीड लोकांच्या हातात मिळेपर्यंत खूप विलंब होतो. या संदर्भात आपण स्टेटस रिपोर्ट सादर करण्याची आवश्यकता आहे. माझी मागणी आहे की, कन्व्हेअन्स डीडसाठी किती अर्ज आलेले आहेत, किती अर्ज निकाली निघाले आणि किती अर्ज प्रलंबित आहेत, किती अर्ज कोणत्या कोणत्या कारणामुळे नाकारले गेले आहेत याचा स्टेटस रिपोर्ट प्रकाशित करावा. कन्व्हेअन्स डीड मिळण्याच्या संदर्भात शासनाने कायदा केलेला असला तरी सुध्दा कन्व्हेअन्स डीडच्या बाबतीत कशी अडवणूक केली जाते हे स्टेटस रिपोर्टवरुन समोर येईल.

गृहनिर्माण विभाग, बाब क्रमांक 118, पान क्रमांक 114. मालड पूर्व येथील सि.टी.एस. क्रमांक 812 पै, 813, 821 पै मध्ये ओमकार रिअल्टर्स ॲण्ड डेव्हलपर्सचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये बांधकाम होत आहे. याबाबतीत मंत्री महोदयांकडून खुलासा झाला तर तेथील नागरिकांना काही तरी दिलासा मिळेल. साधारणपणे मी कधी एसआरएच्या भानगडीत पडत नाही. कारण कधी एका बाजूने तक्रारी येतात तर कधी दुस-या बाजूने येतात. माझ्याकडे तक्रारी आल्यानंतर माझे काही कार्यकर्ते आणि कर्मचारी यांनी प्रत्यक्ष तेथे जाऊन प्रकरणाची शहानिशा केल्यानंतर मी हा विषय येथे मांडत आहे.

या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र व अपात्र झोपडीधारकांमध्ये अनेक अनियमितता असल्याच्या तक्रारी मला प्राप्त झाल्या. या अनियमिततांची मी नंतर खात्री करुन घेतली. सदर मिळकतीबाबत विशेषत: सि.टी.एस.क्रमांक 821 मध्ये क्षेत्र दुरुस्ती होत असून मिळकत पत्रिकेवरील क्षेत्रापेक्षा प्रत्यक्ष जागेवरील क्षेत्र हे कमी येत असून त्यबाबत क्षेत्र दुरुस्ती होत असल्याचे नगर भूमापन अधिकारी, मालाड यांनी ओंकार रिअल्टर्स यांना कळविले आहे. क्षेत्र दुरुस्ती झाल्या खेरीज सदरच्या विकासकास एफ.एस.आय. मंजूर करणे म्हणजे शासनाची दिशाभूल करण्याची कृती होईल. कारण एफएस.आय. हा मिळकत पत्रिकेवरील क्षेत्रानुसार दिला जातो. मिळकत पत्रिकेवरील क्षेत्र तसेच झोपडपट्टीने बाधित क्षेत्राचा मेळ घालून भूमान विभागाकडून सीमांकन झाल्याखेरीज निश्चित किती क्षेत्रझोपडपट्टीने बाधित आहे व किती क्षेत्र झोपडपट्टी विरहित आहे याचा बोध होऊ शकत नाही. त्यामुळे मिळकत पत्रिकेवरील क्षेत्र गृहीत धरुन एफ.एस.आय. व बाधित क्षेत्र मंजूर केले आहे. हे सर्व क्षेत्र अनुमानिक तथा काल्पनिक आहे. अत: जोपर्यंत झोपडपट्टीने बाधित असलेल्या सर्व सि.टी.एस.नं.चे सीमांकन होऊन झोपडपट्टीने बाधित क्षेत्र व झोपडपट्टी विरहित क्षेत्र

..3..



MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 15:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

याचे पोटविभाजन करुन स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार झाल्यानंतरच सदरील पडताळणी केलेल्या क्षेत्रावरच बांधीव क्षेत्राचा एफ.एस.आय. देणे झोपडपट्टी निर्मूलनाचे विकास नियंत्रण नियमावली 33(10) परिशिष्ट 4 च्या 3.14 नुसार बंधनकारक आहे.

...नंतर श्री.गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, परंतु या प्रकरणी विकास नियंत्रण नियमावली 33(10) परिशिष्ट-4 च्या 3.14 नुसार कार्यवाही झालेली नाही. या बाबतीत मी माहितीच्या अधिकारात माहिती मागितली होती, त्यासंबंधीचे पत्र माझ्याकडे उपलब्ध आहे. सदर प्रकरणी जानु भोये नगर सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित), ऐक्यवर्धन सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) व श्री.शिवकोकण सहकारी गृहनताग्ण संस्था या संस्थांनी सादर केलेल्या परिशिष्ट-2 मध्ये 1510 झोपडीधारक दाखविलेले असतानाही झोपडीस्थित नकाशामध्ये एकूण 1841 बांधकामे दाखविण्यात आली आहेत.
त्यामुळे या योजनेत पात्र व अपात्र झोपडपट्टी धारकांबाबत प्रचंड तफावत आहे. अशा प्रकारे अस्तित्वात नसलेल्या झोपडया या जगेवर अस्तित्वात असल्याचे दर्शवून पात्र धारकांची यादी फुगवून वाढीव एफ.एस.आय.घेण्यात आलेला आहे म्हणून या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कामकाजाची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी माझी स्पष्ट मागणी आहे. अशा मागण्यांना प्रामाणिकपणे माझा विरोध असतो. यात गरिबांना घरे मिळत नाहीत. या योजनेत मोठया प्रमाणात लूट केली आहे. या विकासकाला रद्द केलेला श्री-के पुन्हा देण्याचा विचारात शासन आहे. विकासकांना अशा प्रकारच्या सवलती दिल्यामुळे त्यांची मस्ती वाढत असते. या पुनर्वसन योजनेच्या कामकाजाची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी माझी पुन:श्च माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, वित्त विभाग, पृष्ठ क्रमांक 55, बाब क्रमांक 59 ही 2012-2013 या वर्षाचा अधिक खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्याबाबतची आहे. या बाबी अन्वये कर्जात वाढ झाल्यामुळे 609 कोटी एवढी अतिरिक्त रक्कम देण्याकरिता पुरवणी मागण्यांव्दारे निधीची मागणी करण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात राज्यावरील कर्जाचा बोजा 2 लक्ष 80 हजारापर्यंत गेलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी सदर कर्ज वापरण्यात आल्याचे शासनाकडून सांगितले जात आहे. गत 10 वर्षात सदर कर्जाची रक्कम कोणत्या विकासकामासाठी वापरण्यात आली या बाबतची माहिती मी पत्राव्दारे मागितली असता मला कवेळ कर्जाची रक्कम सांगण्यात आली, परंतु सदर रक्कम कोणत्या विकास कामांसाठी वापरण्यात आली याची माहिती संबंधित विभागाने घ्यावी लागेल असे कळविण्यात आले. सदर माहिती मिळावी म्हणून मी गेल्या सहा वर्षापासून पाठपुरावा करीत आहे. महाराष्ट्रावर एवढे कर्ज आहे तर ती रक्कम कोणकोणत्या विकास कामासाठी खर्च झाली

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आहे याची मला वित्त विभाग माहिती देऊ शकले नाही. 2 लक्ष 40 हजार कोटीच्या करण्यात आलेल्या विकास कामांची कर्जाची श्वेतपत्रिका शासनामार्फत काढण्यात यावी, अशी माझी जाहीरपणे मागणी आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय,श्वेतपत्रिका काढण्यात पटाईत आहेत. त्यातील ते तज्ज्ञ आहे. यातील वस्तुस्थिती बाहेर आली पाहिजे.

सभापती महोदय, युतीची सत्ता सन 1999 मध्ये गेल्यानंतर कर्जामध्ये 2 लक्ष 40 हजार कोटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे. पूर्वीचे 36 हजार कोटीचे कर्ज सोडले तर त्या आणखी 2 लक्ष 40 हजार कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. एवढया मोठया रकमेतून कोणती विकास कामे करण्यात आली, हे जाणून घेण्याचा आम्हाला अधिकार आहे. परंतु जाणीवपूक सदर माहिती लपविली जात आहे. प्रत्यक्षात सागण्यासारखे काहीच नसल्यामुळे या बाबीचे उत्तर देण्यास शासन टाळाटाळ करीत आहे. या रक्कमेतून निश्चित कोणकोणती विकास कामे झाली आहेत, 2 लाख 80 हजार कोटी रुपयांचे कर्ज आपल्या राज्यावर होत असेल तर त्या बाबतची वस्तुस्थिती सभागृहाला समजली पाहिजे. या रकमेत प्रचंड विकास कामे झाली असती तर ते आम्ही समजू शकतो. परंतु ही रक्कम प्रत्यक्षात कुठे गेली, या रक्कमचे काय केले या बाबतची माहिती मिळणे आवश्यक आहे. म्हणून गत 12 वर्षात राज्यावर वाढलेल्या कर्जाची श्वेतपत्रिका काढण्यात यावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, उद्योग,ऊर्जा कामगार विभागृ पृष्ठ क्रमांक 92, बाब क्रमांक 92, ही लहान, मध्यम, मोठे उद्योग व मेगा प्रकल्पांना विविध प्रात्साहनासाठी अतिरिक्त तरतूद करण्यासंबंधीची आहे.

सभापती महोदय, राज्यातील विशल, मध्यम व लघु उद्योगांना व मेगा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्याकरिता 411 कोटी रुपयांची पूरक मागणी सभागृहात सादर करण्यात आली आहे. प्रकल्पांना प्रोत्साहन दिले गेले पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. विशाल प्रकल्पाच्या माध्यमातून अविकसित भागात 65 टक्क्यांपेक्षा जास्त गुंवणूक होत असल्याचे शासनाकडून जरी सांगितले असले तरी प्रत्यक्षात परिस्थिती मात्र वेगळीच आहे. ही माहिती वेगवेगळया ठिकाणाहून गोळा केल्यानंतर आमच्या निदर्शनास आली आहे.

3...



ABG/ ST/ D/ प्रथम श्री.शिगम 15:45

श्री.विनोद तावडे...

त्याचप्रमाणे विशाल प्रकल्पाच्या नावाखाली मुंबई, पुणे, नागपूर इत्यादी शहरांमध्ये काही नावाजलेल्या उद्योजकांनी गुंतवणूक करुन शासनाकडून कोटयावधी रुपयांचा प्रोत्साहनपर मलिदा लाटला आहे. ही बाब मी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिषाणावरील माझे मत व्यक्त करताना मांडली आहे. टाटा मोटर्स लिमिटेड, पुणे 1200 कोटी, मर्सिडीज बेंज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,पुणे, 112 कोटी, वौस वॅगन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,पुणे 603 कोटी, भारत फोर्ज लिमिटेड,पुणे 6.43 कोटी, महिद्रा व्हेईकल्स प्रायव्हेट लिमिटेड,पुणे 369 कोटी, एल.जी.इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे, 201, इंडोरामा सिन्थेटिक्स लिमिटेड 140.75 कोटी, जनरल मोटर्स प्रायव्हेट लिमिटेड 387.68 कोटी आणि महिंद्रा ॲण्ड महिंद्रा यासाठी 187.97 कोटी रुपये असे एकूण 3209.37 कोटी रुपयांचे प्रोत्साहन मंजूर करण्यात आले आहे. या प्रकल्पांना एवढया मोठया प्रमाणात सूट दिली आहे...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

यांना जर अविकसित भागात जा, दोन-पाच कोटी रुपये आणखी देतो असे म्हटले असते तर आपण जो समतोल विकासाचा मुद्दा मांडतो त्या विषयाला न्याय मिळाला असता. प्रकल्प अविकसित भागात येण्याच्या दृष्टीने नियोजन विभागाने काळजी घेतली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्रमांक-64. सभापती महोदय, वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहतीचा प्रश्न मार्गी लागला पाहिजे. ज्याप्रमाणे शासनाने गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न संपुष्टात आणला, त्याच धर्तीवर वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहतीमध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या घराचा प्रश्न संपुष्टात आणण्याची गरज आहे. गिरणी कामगारांना आज इतक्या वर्षानंतरही आपण घरे देत आहात. वांद्रे पूर्व येथील जमिनीला असलेला भाव आणि वसाहतीचा पुनर्विकास या गोष्टी लक्षात घेता वसाहतीमध्ये राहणा-या कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने कायमस्वरुपी घर देऊ शकतो. महाराष्ट्रातील विविध भागातून, मराठवाडा, विदर्भ, खानदेश, कोकण परिसरातून आलेले कर्मचारी वांद्र्याच्या शासकीय वसाहतीमध्ये राहतात. त्यांच्या घराचा प्रश्न अतिशय जिव्हाळ्याचा आहे. स्वाभाविकपणे तेथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, परप्रांतातून आलेल्या लोकांना एसआरएच्या माध्यमातून फुकट घरे दिली जातात. इतकी वर्षे त्यांनी शासकीय सेवा केली आणि आता निवृत्तीनंतर त्यांनी जायचे कुठे? योगायोगाने शासन त्या वसाहतीचा पुनर्विकास करु पहात आहे. तेथील जागेचे असलेले भाव विचारात घेता 0.25 टक्के एफएसआय वाढवून दिला तर तेथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांचे भले होईल. या राज्यातील विकासकांचे भले झालेले आहे. तसे कर्मचाऱ्यांचेही भले होईल यादृष्टीने एफएसआय वाढवून द्यावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, पर्यटन विभाग, बाब क्रमांक 160. एमटीडीसीमार्फत माथेरान येथील रिसॉर्ट, डेक्कन ओडिसी, न्याहरी व निवास योजना, पर्यटनासाठी खरेदी करण्यात आलेल्या बोटी इत्यादीमध्ये अनियमितता, गैरव्यवहार व भ्रष्टाचार सुरु आहे. मी वारंवार पत्रव्यवहार केला. पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार वाढू शकतो. पर्यटनाच्या दृष्टीकोनातून कोकण विभागाला फायदा होऊ शकतो. माथेरान येथे महामंडळाने चालविलेल्या रिसॉर्टची दुरुस्ती व नूतनीकरणाचे काम करण्यासाठी मे.परेश कन्स्ट्रक्शन कंपनी, मुंबई यांना काम देण्यात आले. त्यांनी ठरलेल्या मुदतीत काम केले नाही, तुटपुंजी दंड आकारणी करुन पुन्हा याच कंपनीला काम देण्यात आले. ..2..



श्री.विनोद तावडे.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, डेक्कन ओडिसी ही विशेष सफारी ट्रेनच्या चालविण्याचे उपकंत्राट ज्या लक्झरी हॉलिडेज कंपनीला दिले त्या कंपनीकडून रु. 4 कोटीपेक्षा जास्त हॉलेज चार्जेस (Haulage Charges) येणे बाकी असून सदर रक्कमेच्या वसुलीबाबत महामंडळाने कारवाई केली नाही अथवा नोटीस देखील बजावलेली नाही. डेक्कन ओडिसी ट्रेनच्या रंगकामाचा खर्च 15 लाख असताना 36 लाख रुपयांपर्यंत दाखविण्यात आला. डब्यातील पडद्याची शिलाई करण्यासाठी 10 लाख रुपये खर्च दाखविण्यात आला. आम्ही अनियमितता लक्षात आणून देऊनही कारवाई करण्यात आलेली नाही. डेक्कन ओडिसीचा विषय प्रलंबित आहे. नंतर महामंडळ म्हणते की, ही ट्रेन तोट्यात आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील तारकर्ली येथे पर्यटन व्यवसायाच्या वाढीसाठी दोन जून्या बोटी नवीन बोटीच्या दरामध्ये विकत घेण्यात आल्या. आम्हाला सांगण्यात आले की, नवीन बोटी विकत घेत आहोत. परंतु जून्या बोटी नादुरुस्त आहेत, त्यावर लाखो रुपये खर्च करीत आहेत. टीटीएफ प्रदर्शनासाठी महामंडळाने 2011 साली 8 लाख रुपये खर्च केले होते. सन 2012 मध्ये याच प्रदर्शनासाठी 24 लाख रुपये खर्च करण्यात आले. या प्रदर्शनासाठी टीटीएफने महामंडळाचा लोगो वापरला त्याची रॉयल्टी महामंडळाला देण्यात आलेली नाही. नागपूर येथील ऑर्बिट रिसॉर्टची जागा वाणिज्य वापरासाठी दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयावर जुलै, 1995 पासून 30 वर्षाकरिता देण्यात आलेली असताना करारपत्रात देण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार सदर जागेवर अद्यापपर्यंत काहीही बांधलेले नाही.

सभापती महोदय, मागील बजेटमध्ये शासनाने महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाला 100 कोटी रुपये मंजूर केले होते. ती रक्कम डिसेंबर, 2012 पर्यंत रिलिज झाली नव्हती. डिसेंबरमध्ये रक्कम रिलिज झाली. मेजर टूरिस्ट सीझन हा नोव्हेंबर-डिसेंबरचा काळ असतो. महामंडळाला निधी डिसेंबरला मिळाल्यानंतर शैक्षणिक परीक्षा सुरु झाल्या. त्यामुळे पर्यटनाला कोण जाणार? जेव्हा टूरिस्ट येणे अपेक्षित होते, त्या काळात महामंडळाकडे निधी उपलब्ध नव्हता.

नंतर 3एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ......

आणि स्वाभाविकपणे त्यामध्ये अडचणी येतात.

सभापती महोदय,सांस्कृतिक खात्याच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, मुंबईच्या दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये मराठी सिरियल्सचे चित्रिकरण केले जाते. काही चित्रपट निर्माते अतिशय चुकीच्या पध्दतीने वक्तव्य करतात, एक विशिष्ट व्यक्ती तर जास्तच वक्तव्य करते. परंतु एका व्यक्तीवरुन सर्व चित्रपट निर्मात्यांना दोष देण्याचे कारण नाही. हिंदी चित्रीकरणाला आज जो काही रेट आहे तो रेट मराठी सिरियल्स निर्मात्यांना परवडणारा नाही. हिंदी सिनेमा आणि हिंदी सिरियल्सला जो प्रेक्षकवर्ग आहे तो मराठी चित्रपट किंवा मराठी सिरियल्सला मिळत नाही. त्यामुळे मराठी सिरियल्सला आपण हिंदीच्या 50 टक्के कमी दराने देण्याचे मान्य केले. परंतु याचा कालावधी आपण केवळ एक वर्षाचा दिलेला आहे. एक वर्षाहून मराठी सिरियल्स अधिक चालल्या तर आपण त्यांना हिंदीच्या बरोबरीने रेट लावू नये तर पुढील वर्षी त्यामध्ये 10 टक्क्याने वाढ करावी अशी सूचना आहे. परंतु यासंदर्भातील निर्णय मराठी सिरियल्स कलाकृती घेत नाही. माननीय ढोबळे साहेब दर्दी असल्यामुळे ते यासंदर्भात लक्ष घालतील अशी विनंती करतो.

सभापती महोदय,दहशतवाद विरोधी पथकाची हाताळणी करण्यासाठी 48 लाख रुपयांची मागणी पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आली आहे. 26.11 च्या घटनेनंतर शासनाने प्रधान समितीची नियुक्ती केली होती. प्रधान समितीने काही गोष्टी लागू कराव्यात अशा सूचना केल्या होत्या परंतु त्यासंदर्भात अंमलबजावणी शासनाने अजूनपर्यंत केलेली नाही. त्यामुळे प्रधान समितीच्या सूचनांचा शासनाने विचार करावा अशी मी सूचना करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 15 च्या संदर्भात युरोपीयन लोकांसाठी खर्च करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. दुष्काळामुळे राज्यातील बहुसंख्य जनता मुंबईत आली आहे परंतु त्यांची काही एक काळजी राज्य शासन करीत नाही परंतु युरोपीयन लोकांची काळजी घेण्यासाठी हे सरकार पुढे सरसावले आहे. (अडथळा)

सभापती महोदय,या ठिकाणी माननीय गृहराज्य मंत्री बसलेले आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, इंटरनेट तसेच सायबरची उपलब्धता तरुण आणि लहान मुलांना सहज उपलब्ध झाली आहे. त्यामुळे यासंदर्भात विचार करण्याची आवश्यकता आहे. मला या चर्चेच्या निमित्ताने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ......

सांगावयाचे आहे की, इंटरनेट आणि सायबरचे आपल्यावर जे काही आक्रमण होत आहे त्यामधून करमणूक होते, ज्ञान मिळते याबाबत कोणाचाही आक्षेप असण्याचे कारण नाही. परंतु यासंदर्भात मी जेव्हा चौकशी केली तेव्हा मला आढळून आले की, लंडनमध्ये गुगलवर "HOW TO MAKE BOMB" असे टाकले तर काहीच माहिती येत नाही परंतु आपल्याकडे "HOW TO MAKE BOMB" नाव टाकले तर 332 साईट ओपन होतात. त्यामुळे अशी माहिती टाकल्यानंतर विंडो उघडणारच नाही असे काही तरी करण्याची आवश्यकता आहे. चायना सारखी आपल्याला टोटल बॅन करण्याची गरज नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

काही देश अशा प्रकारे सर्च इंजिनमध्ये शोध घेता येणार नाही याची तरतूद करतात. एवढेच नव्हे तर त्या विषयाचा ते पाठपुरावा देखील करतात. जगभरातील फेसबुक उपभोगत्यांपैकी 5,17,87,699 उपभोगते हे भारतीय आहेत. एशियन स्कूल ऑफ सायबर लॉ च्या निकषानुसार 67 टक्के सोशन नेटवर्कींग साईटचा उपयोग 10 ते 12 वर्षाची मुले करायला लागली आहेत. आज लहान मुले मोठ्या प्रमाणावर याचा वापर करीत असल्यामुळे रिस्पाँसिबल नेटीझमची गरज आहे. यातून जे गुन्हे निर्माण होतील त्यासाठी महाराष्ट्र शासनाने सायबर फोर्स निर्माण करण्याची गरज आहे. यासाठी पोलिसांना फिजीकल फिटनेस हा हवा. पण तो इंटरनेट सॅव्ही असला पाहिजे. त्या पोलिसाला हॅकिंग कसे होते याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. एमपीएससी परीक्षा पास झालेला पोलीस हे सर्व काही करू शकत नाही. त्यासाठी बी.एस.सी.(आयटी) असणे आवश्यक आहे. जो बेसिक नॉलेज घेऊन आला आहे अशांचा एक सायबर फोर्स हा महाराष्ट्र पोलिस दलामध्ये निर्माण केला पाहिजे. यातून पॉर्नोग्राफीक साईटवर प्रतिबंध घालता येईल. मुलांमधील सर्वात 10 आवडते खेळ कोणते याचा सर्व्हे करण्यात आला आहे. त्यात बलात्कार कसा करावा हा सर्वांत आवडता खेळ असण्याचे निष्पन्न झाले आहे. अशा संगणक खेळांना येथे खेळण्यासाठी प्रमाणपत्र मिळता कामा नये. अशा खेळांवर बंदी घातली पाहिजे. अशा काही तरी गोष्टी या सायबर फोर्सच्या माध्यमातून आपल्या राज्यात निर्माण कराव्या लागतील. त्या आपण भविष्यात निर्माण केल्या नाहीत तर भविष्यात आपल्याला अडचणीचे जाणार आहे. बलात्कारावर चर्चा होते त्यावेळी सामाजिक बाबीमुळे देखील बलात्कार होतात हा त्यातील प्रमुख मुद्या असतो हे आपण लक्षात घ्यावे.

अमेरिकेमध्ये सर्च इंजिन मध्ये बिन लादेन हा शब्द टाईप केल्यानंतर ताबडतोब त्या संबंधातील माहिती त्यांच्या पोलीस यंत्रणेकडे पोचते. ती व्यक्ती ही माहिती का शोधते आहे हे जाणून घेतले जाते. अभ्यासासाठी शोधत असेल तर काही अडचण येत नाही. पण लादेनच्या साईटस वर जो जातो त्याची नोंद अमेरिकेत होत असते. त्यानंतर त्याचे विश्लेषण करण्यात येते. अभ्यासासाठी, पत्रकारितेसाठी माहिती गोळा करीत असेल तर सोडून देण्यात येते. पण ते सोडून

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

वेगळ्यासाठी वापर करण्यात येत आहे काय, याची माहिती तिकडचे पोलीस घेत असतात. एवढे अद्ययावत आपल्याला रहावे लागेल. डिजिटल क्रांतीमुळे जसा फायदा आहे तसा धोका देखील आहे. त्या धोक्यांशी लढण्याची तयारी आपण आज पासूनच केली पाहिजे. इंटरनेट सर्व्हीस प्रोव्हाईडर कडून फायर वॉल पुरविण्यात येतो. त्यामुळे काही साईटस ह्या ऑटोमेटीक ब्लॉक झालेल्या असतात. यावर मला खूप काही बोलता येईल. पण मी अधिक तपशीलात जात नाही.

सभापती महोदय, आयपीएलचे सामने माननीय गृहराज्य मंत्र्यांच्या ग्राऊंडवर जास्त होतात. तेथेच पोलिसांवर जास्त खर्च होतो. सुरक्षेचे पैसे आयपीएलकडून आले नाहीत तर त्यांना 3 एप्रिल पासून सुरक्षा पुरवू नये. कुठल्याही पॉवरफुल माणसाचा फोन आला तरी स्पष्ट भूमिका शासनाने घेतली पाहिजे. त्यांना म्हणावे की, आधी रोख पैसे द्यावेत मग आम्ही सुरक्षा पुरवू. आपण क्रिकेटप्रेमी युवा गृह राज्यमंत्री आहात. त्यामुळे आपण कुठल्याही पॉवरबाज माणसाच्या फोनला वाकणार नाहीत असे आम्हाला वाटते. शेवटी, ते खात काय आहे हे त्यांना नीट कळलेले आहे.

सभापती महोदय, मी सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 112, पृष्ठ क्रमांक 101 वर बोलणार आहे. समाज कल्याण संस्थांना वेतनासाठी तरतूद या बाबी अंतर्गत करण्यात आली आहे. युती शासनाच्या काळात 28 माध्यमिक व 49 प्राथमिक आश्रमशाळांना इरादापत्र दिले आहे. पण आघाडी सरकारने त्यास स्थगिती दिली. सरकार हे इनकंटीन्यूअस असते असे मानले जाते. तुम्ही मान्यता दिली म्हणून आम्ही स्थगिती देणार असे करता कामा नये. तसे वागता कामा नये. सन 2014 मध्ये ज्यावेळी आम्ही सत्तेवर येऊ तेव्हा असे करू शकतो. पण तसे करणार नाही. कारण आम्ही शासनातील कन्टीन्यूअस प्रोसेस मानणारे आहोत.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, भारतमाता जनसेवा प्रतिष्ठान, करोडी, ता.पाथर्डी ही संस्था न्यायालयात गेल्याने न्यायालयाने विनाअनुदानावर शाळा चालविण्यास परवानगी दिली. हे सर्व प्रकरण माननीय मंत्री महोदयांना माहीत आहे त्यामुळे मी आणखी पुढे जात नाही.

सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, बाब क्रमांक 156, पृष्ठ क्रमांक 157- सन 2004 ते 2007 या कालावधीमध्ये सांगोला तालुक्यात टंचाई निधी,अवर्षणप्रवण क्षेत्र कार्यक्रम, यशवंत ग्राम समृध्दी योजना, 12 वा वित्त आयोग, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, रोजगार हमी योजना इत्यादी योजनेंतर्गत मिळालेल्या निधीतून तालुक्यात निर्माण करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या कामामध्ये श्री.संजय धनशेट्टी, उप अभियंता, सांगोला यांनी अपहार केला आहे. त्याला पाठिशी घालण्याचे काम चालू आहे. 11 पाणी पुरवठा योजनांच्या कामामध्ये भू-स्तराची चुकीची वर्गवारी नोंदवून व चुकीचे परिमाण नोंदवून 9 लाख 83 हजार 940 रुपये इतक्या किंमतीचे मूल्यांकन हेतूपुरस्सरपणे वाढविण्यात आल्याचे दिसून आले आहे.

सभापती महोदय, मोजमाप नोंदवहीमध्ये मोजमापे नोंदविताना करण्यात आलेल्या तांत्रिक चुका व त्रुटी - यामध्ये खोदाईचे परिणाम असेल व अन्य बाबी असतील त्याच्या डिटेल्समध्ये मी जात नाही.

सभापती महोदय, मोजमाप पुस्तकातील नोंदीनुसार असे दिसून येते की, सर्व योजनांच्या पाईपलाईच्या खोदाईसाठी 0.9 मीटर एवढी खोली निश्चित करण्यात आलेली आहे. जेव्हा प्रत्यक्षात साईटवर झालेल्या खोदाईच्या खोलीनुसार कमी जास्त प्रमाणात खोदाईची खोली ही मोजमाप पुस्तकांत नोंद होणे आवश्यक होते.

सभापती महोदय, सदर निविदेमधील जमिनीच्या विविध स्तरातील खोदाईसाठी प्रस्तावित असलेल्या घरांची तुलना केली असता असे दिसून येते की, माती / साधा मुरुम व कठीण मुरुम यांचे दर हे मृदू दगड व कठीण दगड या बाबींच्या दरापेक्षा जास्त असल्याने मृदू दगड व कठीण दगड या जमिनीच्या स्तराची मोजमाप पुस्तकात नोंद करताना खोदाईची खोली वाढवून कंत्राटदारास जास्तीची रक्कम देण्याबाबतची संबंधितांची मनोवृत्ती स्पष्ट होते आणि हे सिध्द झालेले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, प्रत्येक कामाच्या निविदा काढताना पाईप लाईनद्वारे पाणीपुरवठा करणे व पाईप लाईन अंथरण्यासाठी दर प्रस्तावित करताना पाईप पुरवठा केल्यापोटी 10 टक्के रक्कम व पाईप अंथरल्यापोटी 25 टक्के रक्कम ही जलदाब चाचणीसाठी राखून ठेवणे व जलदाब चाचणी घेतल्यानंतर सदरची रक्कम अदा करणे या बाबत निविदेमध्ये तळटीप आवश्यक असताना अशा प्रकारची कोणतीही तळटीप निविदेमध्ये दिसून येत नाही.

सभापती महोदय, मोजमाप नोंदवहीमध्ये नोंदविलेल्या मोजमापांचे चेकींग वरिष्ठ तांत्रिक अधिकाऱ्याने करणे अपेक्षित असताना अशा चेकींगच्या नोंदी मोजमाप नोंदवहीत अभावानेच आढळून आलेल्या आहेत.

सभापती महोदय, भारत निर्माण योजना, यशवंत ग्रामसमृध्दी योजना इत्यादी योजनांच्या पाणी पुरवठा कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार ग्रामसभेला प्रदान करण्यात आलेले आहेत. तथापि,अशी प्रशासकीय मान्यता घेतल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून आले नाही.

सभापती महोदय, या संदर्भात समितीने नोंदविलेले अभिप्राय मी वाचून दाखवितो. तपासणी करण्यात आलेल्या सहा ग्रामपंचातीमध्ये मोजमाप नोंदवहीमध्ये श्री.एस.आर.केदार, श्री.ए.ए.साळुंखे, श्री.वाय.ए.वल्हेकर, श्री.एस.आर.पुजारी सर्व कनिष्ठ अभियंते हे व्यक्तश: जबाबदार आहेत असे नोंदवहीत म्हटलेले आहे. तसेच श्री.संजय धनशेट्टी, उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, सांगोला यांनी कोणत्याही प्रकारची तांत्रिक खात्री न करता सदरची मोजमापे प्रमाणित केली असल्याचे म्हटलेले आहे आणि त्यांचेवर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. त्यांना संरक्षण देणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. कारण मी या संदर्भात खाली तक्रार केली तिथे त्याची दखल घेण्यात आली. शेवटी वर तक्रार केली तरी सुध्दा कारवाई झालेली नाही. तेव्हा जीवन प्राधिकारणातील कोणीतरी अधिकारी त्यांना पाठिशी घालत आहे. आपण असे काम करणार नाही याची मला माहिती आहे. शेवटी सरकारला नापास करणारी ही माणसे आहेत. तेव्हा या प्रकरणी मंत्री महोदयांनी कारवाई करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बाब क्रमांक 106, पृष्ठ क्रमांक 96, गेल्या वर्षी देखील मी हा विषय मांडला होता. कोकणात आंबा आणि काजू पिकावर

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

स्प्रे करण्यासाठी केरोसीन लागते ते केरोसीन अधिकृतपणे मिळत नाही. मग आपलेच अधिकारी त्यांना मार्ग दाखवितात आणि कोकणातील माणसे साधी असल्यामुळे तो मार्ग निवडतात. दोन-तीन महिन्यांचा मामुली कोटा आहे. पिकांवर स्प्रे मारणे गरजेचे आहे. गेल्या वेळी आपण घोषणा केली होती. पण पुढे काही झाले नाही. आपण सांगितले की, खाली कोणी काही करीत नाही. तेव्हा कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना केरोसीन पुरविणे आवश्यक आहे. तेव्हा या बाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात याचा खुलासा करावा.

आदिवासी विकास विभाग, बाब क्रमांक 133 134 व 135 - पृष्ठ क्रमांक 130 ते 134 - उपरोक्त तीनही पुरवणी मागण्या लाक्षणिक स्वरुपाच्या आहेत. विभागाकडे अखर्चित राहिलेला निधी वर्ष अखेर बसस्थानकांचे बांधकाम व आश्रमशाळांच्या इमारती बांधकामासाठी खर्च करण्यासाठी मंजुरी घेण्याच्या उद्देशाने सदर मागण्या करण्यात आल्या आहेत. या तिन्ही मागण्या मिळून शासनाने एकूण 311 कोटी रुपये खर्च करण्याचे प्रस्तावित केले आहे. या बाबत असे नमूद करावेसे वाटते की, विनियोजन विधेयक या आठवड्याच्या गुरुवारी सभागृहात मांडले जाणार असून, उपरोक्त बाबीस मंजुरी मिळाल्यास हा सर्व खर्च आर्थिक खर्च संपण्यापूर्वी 10 दिवसांत खर्च करणे कसे शक्य आहे, की, अगोदरच ठेकेदाराने काम केलेले आहे ? इतकी इफिशिएन्सी आहे काय ?

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

असे असेल तर बील 10 दिवसांत कसे क्लिअर होईल ? महोदय, आदिवासींना नव्हे तर सर्व फायदा बिगर आदिवासींना मिळतो. पुरातन काळापासून आदिवासींची लूट सुरु आहे. आजही काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या सरकारमध्ये आदिवासी मंत्र्यांवर अन्याय होतो. असो.

महोदय, मी ज्या विभागांच्या मागण्यांच्या बाबतीत भाष्य केलेले आहे त्या बाबत माननीय मंत्री महोदय उत्तर देतील अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण थांबवितो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण आपण बोलणार आहात काय ?

श्री.विक्रम काळे : महोदय, मला जायचे असल्यामुळे मी बोलू इच्छितो.

श्री.दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय सदस्यांना सभागृहातून जायचे आहे म्हणून त्यांना बोलण्याची संधी देणे योग्य होणार नाही.

श्री.भास्कर जाधव : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सभागृहाच्या कामकाजाबाबत कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा झालेली आहे. त्या बैठकीला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते सुध्दा उपस्थित होते. त्या बैठकीत तत्वत: असे ठरले आहे की, जे सन्माननीय सदस्य भाषण करतील आणि माननीय मंत्र्यांच्या उत्तराला थांबणार नसतील तर मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांवर भाष्य करण्याची आवश्यकता नाही. सन्माननीय सदस्यांना त्यांनी मांडलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून वा मंत्र्यांकडून उत्तर हवे असेल तर त्यांनी सभागृहात थांबावे, एवढेच मी सांगतो.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, बाब क्रमांक-1, पृष्ठ क्रमांक-3 बाबत माननीय मुख्यमंत्र्यांच्या विभागाने मागणी केली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी थोड्या वेळापूर्वीच माननीय राज्यपालांच्या आभार प्रदर्शनावरील प्रस्तावाला उत्तर देताना विस्तृत प्रकारे काही घोषणा केल्या.

महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी इंदू मिलची जमीन उपलब्ध करुन देऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचे काम राज्य सरकारने केले आहे. तसेच कोल्हापूर येथे शाहू महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याचाही निर्णय घेतला आहे. महोदय, या बरोबरच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय हा महाराष्ट्र राज्यातील मराठी जनतेच्या हिताचा आणि जिव्हाळ्याचा आहे. ज्यावेळी सभागृहात या विषयी तारांकित प्रश्न उपस्थित झाला होता त्या प्रश्नाला उत्तर देताना महत्त्वाची घोषणा केलेली आहे. शिवाय माननीय मुख्यमंत्र्यांनी थोड्या वेळापूर्वीच, एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात केंद्रीय पर्यावरण मंत्री मुंबईत येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या जागेची पाहणी करणार आहेत, अशा प्रकारचे उत्तर दिले आहे. त्यामुळे राज्यातील जनतेला आणि सभागृहातील सदस्यांना शिवाजी महाराजांच्या स्मारकाची जागा किमान हे अधिवेशन संपण्यापूर्वी निश्चित झालेली असेल असा आशावाद वाटतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी जे वक्तव्य केलेले आहे ते खरे व्हावे अशा प्रकारची मी अपेक्षा व्यक्त करतो.

महोदय, बाब क्रमांक-6, पृष्ठ क्रमांक-9 वर राज्य पोलीस दलासाठी वाहने आणि यंत्रसामुग्रीसाठी निधीची मागणी केली आहे. आज मुंबईमध्ये बॉम्बस्फोटाच्या अनेक घटना घडल्या आहेत. पुण्यामध्ये सुध्दा अशा घटना घडल्या आहेत. मुंबई शहरात जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावावे अशी अनेक दिवसांपासूनची मागणी आहे. परंतु पुरवणी मागण्यांचे पुस्तक बघितल्यानंतर त्यामध्ये या कामासाठी कोणत्याही प्रकारची मागणी करण्यात आली नसल्याचा उल्लेख या निमित्ताने आवर्जून करावासा वाटतो. या बाबत खेद व्यक्त करीत असताना मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद यासारख्या मोठ्या शहरांमध्ये बस स्थानक, रेल्वे स्थानक किंवा महत्त्वाच्या ठिकाणी शक्य तितक्या लवकर

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

सी.सी.टी.व्ही.कॅमेरे लावावेत.

महोदय, पोलीस स्टेशनमध्ये सर्वसामान्य माणूस तक्रार करण्यासाठी गेल्यानंतर त्याच्या मनामध्ये पोलीस स्टेशनमध्ये आपली तक्रार घेतली जाईल की नाही या बाबत साशंकता असते.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ...

अनेक पोलीस ठाण्यांमध्ये एखादा तक्रारकर्ता गेला तर त्यांची तक्रार घेण्यामध्ये टाळाटाळ केली जाते किंवा दोन तासाने या, चार तासाने या असे जे काही लोकांना सांगितले जाते त्यावर सुध्दा वॉच ठेवता यावा या दृष्टीकोनातून सुध्दा ही सर्व पोलीस ठाणी संगणकीकृत करण्याची गरज आहे. ही मागणी आम्ही सातत्याने या सभागृहामध्ये केलेली आहे. मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये सुध्दा येत असते की, आम्ही निश्चितपणे त्यांचे संगणकीकरण करणार आहोत पण अजून सुध्दा त्यांचे संगणकीकरण झालेले नाही. त्यांचे संगणकीकरण केले पाहिजे. काही पोलीस ठाणी व्हिडिओ कॉन्फरन्सींगने सुध्दा जोडली गेली पाहिजेत जेणेकरुन मुंबईमध्ये बसलेल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना सुध्दा गावच्या ठाण्यामध्ये काय चालले आहे, तेथील जनतेची दखल त्या ठिकाणी घेतली जाते की नाही यावर वॉच ठेवता येईल. असे जर झाले तर सामान्य माणसाला न्याय मिळण्याची भूमिका घेतल्यासारखे होईल.

सभापती महोदय, यानंतर मी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 31 वरील बाब क्रमाम 35 बाबत बोलणार आहे. यामध्ये मराठवाडा कृषी विद्यापीठासाठी पूरक मागणी करण्यात आलेली आहे. आमच्या मराठवाड्याच्या दृष्टीने हे कृषी विद्यापीठ महत्वाचे आहे. या कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून आज शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात संशोधन सुरु असते. त्या विद्यापीठाला या राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक साहेब यांचे नाव द्यावे अशा प्रकारची सूचना आली होती आणि तशी घोषणा सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेली होती. परंतु त्या घोषणेचे पुढे काय झाले हे आम्हाला कळत नाही. त्या बाबतीत सरकारने काय निर्णय घेतलेला आहे हेही आम्ही जाणून घेऊ इच्छितो. त्याबाबत मंत्री महोदयांकडून उत्तर येईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. कारण त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आपण साजरे करीत आहोत. तेव्हा या बाबत सुध्दा या ठिकाणी उत्तर आले पाहिजे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 32 वरील बाब क्रमांक 38 बाबत बोलणार आहे ठिबक सिंचनाला अनुदान वाढविण्याची गरज आता निर्माण झालेली आहे. कारण पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे आता ठिबक सिंचनाला 90 टक्के अनुदान दिले गेले पाहिजे अशी मागणी मी करीत आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. विक्रम काळे ....

वित्त विभागाच्या पृष्ठ क्रमांक 55 वरील बाब क्रमांक 59 बाबत मी बोलणार आहे. या राज्यातील शिक्षकांना केंद्राप्रमाणे वेतनश्रेणी द्यावी ही जी महत्वाची मागणी होती त्यानुसार बक्षी समितीची नियुक्ती शासनाने केलेली होती. नुकताच बक्षी समितीचा अहवाल घोषित झालेला आहे. त्यामध्ये आमच्या शिक्षकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आहे. मुख्याध्यापकासारख्या महत्वाच्या घटकाला सुध्दा त्यामध्ये जी वेतनश्रेणी मिळावयास पाहिजे होती ती दिली गेलेली नाही. तसेच एमसीव्हीसी किंवा इतर शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीच्या बाबतीत सुध्दा बक्षी समितीने कोणताही विचार केलेला नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे.

सभापती महोदय, यानंतर मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 63 वरील बाब क्रमांक 66 बाबत बोलणार आहे. जिल्हा मार्ग व पुलासाठी या ठिकाणी पूरक मागणी केलेली आहे. आज वाहनांची संख्या वाढलेली आहे. लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आपण सुध्दा पुण्यावरुन वाहनाने या ठिकाणी येता तेव्हा किती तास लागतात हे आपल्याला सुध्दा माहीत आहे. आपण खाजगीमध्ये बोलताना म्हणत असता की, हे रस्ते कधी होणार आहेत. सातत्याने आम्ही या ठिकाणी मागणी करतो की, जिल्ह्याजिल्ह्याला जोडणाऱ्या मार्गांचे चौपदरीकरण झाले पाहिजे. परंतु आज ते होत नाही. ते काम जलदगतीने झाले पाहिजे. पाहिजे तर टोल घ्या परंतु जिल्ह्याजिल्ह्याला जोडणारे रस्ते सुध्दा चौपदरी झाले पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मी सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 101 वरील बाब क्रमांक 110 बाबत बोलणार आहे. या ठिकाणी ज्येष्ठ मंत्री श्री. मोघे साहेब बसलेले आहेत. एक अभ्यासू मंत्री, विदर्भातील नेते म्हणून आम्ही त्यांच्याकडे मोठ्या आशेने पाहतो. सामाजिक न्याय खाते त्यांच्याकडे दिलेले आहे परंतु ज्या मागण्या तातडीने सुटावयास पाहिजे त्या सुटत नाहीत याबद्दल आम्हाला थोडा खेद वाटतो. वसतिगृहांच्या बाबतीत आपण मागणी ठेवलेली आहे. परंतु वसतिगृहाच्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्याची जी मागणी आहे ती सुध्दा तातडीने देण्याचे काम झाले पाहिजे. आपण अर्थखात्याकडे बोट दाखविता. अर्थ खात्याकडून मागणी करण्याचे काम आपण करीत आहात. माननीय मुख्यमंत्र्यांकडे आपले वजन असल्यामुळे त्या मागण्यांना जरी अर्थ खात्याने अडथळा निर्माण केला असला तरी त्या मागण्या मान्य करुन घेण्याची धमक आपल्यामध्ये आहे. ते आपण केले पाहिजे अशी विनंती मी आपल्याला या निमित्ताने करणार आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

श्री.विक्रम काळे.....

सभापती महोदय, व्हीजेएनटीच्या आश्रमशाळा आहेत. त्या आश्रमशाळांची संहिता तयार करण्यासाठी मंत्री महोदयांकडे पाठपुरावा करुनही ते काम होत नाही. त्याबाबत हे अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा अशी मी मागणी करतो.

आजच्या वर्तमानपत्रामध्ये अपंग शाळांच्या बाबतीत एक मोठी बातमी छापून आलेली आहे. या अपंग शाळांचे अनुदान शासनाने रोखलेले आहे. या अपंग शाळांना अनुदानावर आणण्याचे निर्णय तातडीने घेतला पाहिजे. केंद्रीय आश्रमशाळा राज्यात सुरु आहेत. त्या आश्रमशाळांचा निकाल शासनाने लावला पाहिजे. त्या आश्रमशाळांची वारंवार तपासणी केली जाते. त्यांचे अ.ब,क व ड असे वर्गीकरण केलेले आहे. त्या आश्रमशाळा "अ" दर्जामध्ये मोडतात. त्यांना अनुदान कसे देता येईल याबाबत विचार केला पाहिजे. ज्या आश्रमशाळांचा कारभार चांगला नसेल त्यांच्या बाबतही शासनाने निर्णय घ्यावा अशी मी मागणी करतो. आपण मला बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि येथेच थांबतो.

--------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आम्ही आदरणीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करीत असताना माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांनी असे म्हटले होते की, आम्हीही आमचे एक महिन्याचे वेतन दुष्काळ निवारण निधीसाठी दिलेले आहे. आम्ही सुध्दा आमचे एक महिन्याचे वेतन आमच्या पक्षाकडे दिलेले आहे. आम्ही शिवसेना पक्षाचे विधिमंडळातील विधानपरिषदेचे 8 सदस्य आहोत त्या प्रत्येकाने माननीय मुख्यमंत्र्यांना पुष्पगुच्छ न देता 500 रुपये प्रमाणे दुष्काळ निवारण निधी दिलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी तशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांना आम्ही अशा प्रकारे शुभेच्छा दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र.3 वर बोलण्यासाठी मी उभा आहे. विधानपरिषदेच्या आमदारांचे स्थान काय आहे हा विषय सभागृहात अनेकदा येऊन गेलेला आहे. असा प्रकार वारंवार होत असल्यामुळे मी या विषयावर बोलत आहे. शासकीय कार्यक्रम बहुतेक करुन रवींद्र नाट्य मंदिरात होत असतात. तेथे होणाऱ्या कार्यक्रम पत्रिकेत कार्यक्रमाशी राज्यातील संबंधित असलेल्या मंत्री महोदयांच्या नावानंतर स्थानिक आमदारांचे नाव छापले जाते. मी देखील स्थानिक आमदार आहे. मुंबई महानगरपालिकेचा नगरसेवक असताना माझा तो मतदार संघच होता. मला त्या कार्यक्रमांचे निमंत्रण येते. स्थानिक आमदार म्हणून किंवा डीपीडीसीचा सदस्य म्हणून माझे त्या कार्यक्रम पत्रिकेत नाव येते. एकदा सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांचे नाव कार्यक्रम पत्रिकेत छापलेले होते. त्यामुळे विधानपरिषदेच्या सदस्यांचे त्या कार्यक्रमात स्थान काय आहे, असा प्रश्न निर्माण झालेला आहे. तेथे आमचे स्थान असणार आहे की नाही ? मान मागून मिळत नाही, हे आम्हालाही कळते. परंतु अवमान करण्याची राजशिष्टाचार विभागाची शासकीय पध्दत असेल ती आम्ही स्वीकारावयाची काय ? त्याबाबत आम्ही हक्कभंगाची सूचना दाखल केली तर ते अधिकारी माफी मागून मोकळे होतात. सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांनी यासंबंधी योग्य ती दखल घेऊन त्याचे उत्तर दिले नाही तर मी हक्कभंगाची सूचना दाखल करण्याचा माझा हक्क राखून ठेवत आहे.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, या विधिमंडळामध्ये प्रथम स्थान माननीय सभापतींचे आहे.  हे वरचे उच्च सभागृह आहे.  हे सभागृह दुय्यम नाही. त्या ठिकाणी नंतर विधानसभेचे सभागृह अशी व्यवस्था आहे. या वेगवेगळ्या समित्या आहेत.  त्या समित्यांमध्ये स्थानिक आमदार अध्यक्ष होतो आणि विधानपरिषदेचा आमदार सदस्य असतो.  खरे म्हणजे त्या भागातील विधानपरिषदेच्या आमदारांना अध्यक्षस्थान दिले पाहिजे व उपाध्यक्षांचे स्थान त्यांना दिले पाहिजे असे माझे मत आहे.  ते योग्य की अयोग्य ठरविले पाहिजे.  विधिमंडळाचे सचिव हे या सचिवालयाचे प्रमुख आहेत त्यांनी यासंबंधी योग्य तो मार्ग काढणे आवश्यक आहे.

मी मराठी भाषेसंबंधीचा उल्लेख करतो.  याचा उल्लेख माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेला आहे. उच्च न्यायालयामध्ये मराठी भाषेचा वापर अजून सुरु झालेला नाही ही बाब माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वीकारलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्या ज्या उणिवा माझ्या लक्षात येतात त्या उणिवा मी न चुकता या ठिकाणी मांडत असतो. मंत्रालयाचा पत्ता हा, महारष्ट्र राज्य, मंत्रालय असा होता. हा पत्ता पूर्ण लिहिण्याबाबत मी आग्रह धरला. हा पत्ता मंत्रालय, मादाम कामा रोड, याप्रमाणे लिहिला पाहिजे. अनेक मंत्री पूर्ण पत्ता लिहित नाही. तेव्हा शासकीय आदेश न पाळणा-या मंत्र्यांच्या बाबतीत योग्य तो निर्णय घ्यावा. आता राज्यमंत्र्यांना देखील सन्मान मिळतो. त्यांनाही मंत्रिमंडळाच्या बैठकीला बोलावले जाते. माझी सर्व मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी शासनाने काढलेल्या आदेशाचा आदर करावा.

सभापती महोदय, सर्व मंत्र्यांच्या पत्रावर जो शिक्का मारला जातो त्याबाबतीत मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना पत्र लिहिले होते. मंत्र्यांच्या पत्रावर असलेला रबरी शिक्का मराठीमध्ये करावा असा मी आग्रह धरला. मला वाटते मराठीत शिक्का बनविण्यासाठी टेंडर वैगेरे काढावे लागत असावे. काही असले तरी एक साधा शिक्का यांना मराठीमध्ये करता येत नसेल तर ते योग्य नाही. या राज्यामध्ये राजभाषेला स्थान मिळत नाही अशा प्रकारचे पत्र मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना दिले होते. 27 फेब्रुवारी हा वि.वा. शिरवाडकरांचा, कुसुमाग्रजांचा जन्म दिवस जागतिक मराठी दिन म्हणून साजरा केला जातो. कुसुमाग्रजांनी या मराठी भाषेचे वर्णन करताना म्हटले आहे की, ही राजभाषा मंत्रालयाच्या दारात फाटक्या वस्त्रानिशी उभी आहे. तिचे फाटके वस्त्र बदलून तिला भरजारी वस्त्र नेसविण्याची मानसिकता राज्यकर्त्यांमध्ये नाही. ही राजभाष 21 ठिकाणी वापरली जात नाही हे मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले होते.

शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/1080/4605/19/दिनांक 30 डिसेंबर1988 अन्वये मराठीमध्ये कशा प्रकारे नावे लिहिली जावीत हे सांगितलेले आहे. एच.एन.आपटे ऐवजी ह.ना. आपटे, एच.एच. खान ऐवजी ह.ह.खान, ए.पी.अय्यर ऐवजी अ.प. अय्यर, आर.सी.अगरवाल ऐवजी र.स.अगरवाल असे लिहावे. हा आदेश काढताना देखील शासनाने सर्व भाषातील आणि प्रांतातील लोकांची नावे घेतली. हा निर्णय काढताना देखील राज्य मराठी आहे हे दाखविलेले नाही. सभापती महोदय, अशा प्रकारचे इंग्रजी अद्याक्षरांचे फलक जेथे जेथे असतील त्यांचे मी फोटो काढून घेतो आणि त्यांना विचारणा करतो. मी प्रत्येक वेळी मंत्री महोदयांच्या मागे लागत नाही. संबंधितांना सांगितल्या नंतर ते फलक बदलतात. हे मी काही प्रसिध्दीसाठी करीत नाही. प्रसिध्दी हा माझा उद्देश नाही. हे सर्व करीत असताना अजून देखील ग्रामसेवक अशाच पध्दतीने नाव लिहितो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

कोणत्याही पोलीस अधिका-याला मी भेटलो तर प्रथम त्याच्या छातीवरचा नावाचा बिल्ला पहातो. मग तो अधिकारी सांगतो की, मराठीचा बिल्ला घरी राहिलेला आहे. अशा परिस्थिती असेल तर मग हे आमूलाग्र बदल कधी घडणार आहेत. सभापती महोदय, कायदा अंमलात न आणणा-या अधिका-याला जाब विचारला तर गुन्हा दाखल होतो. पण जो अधिकारी कायदा अमलात आणत नाही त्याच्यावर काहीच कारवाई होत नाही.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 16:30

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी मराठीत फलक लावा म्हणून सांगण्यास गेलो, तशी तरतूद आहे म्हणून मी गेलो. या बाबतीत माझ्या विरुध्द गुन्हा दाखल झालेला असून सदर प्रकरण न्यायालयात सुरु आहे. या संदर्भात माननीय मुख्य सचिवांनी आदेश काढले. मला या गोष्टीचे दु:ख आणि खेद आहे की, मराठीत फलक असावेत म्हणून मी आंदोलन केले. मी काही अचानक आंदोलन केले नाही. या सदनात हा विषय मी उपस्थित केला होता. नावाची पाटी मराठीत अक्षरात दिसली नाही तर डांबर फासेन असे सांगितले. त्यानंतर सहा महिन्यांनी मी त्या ठिकाणी गेलो. मी त्या फलकावर काळे फासले नाही, तेथे स्टिकर लावले. कोणतीही वास्तू खराब होऊ नये याची काळजी घेतली. यात सुधारणा होणे महत्वाचे होते. आज सगळया पाटया मराठीत झाल्या आहेत. आम्ही भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी आहोत, आमचा एक वेगळा अधिकार आहे, आमचा एक वेगळा मान आहे, आमचे एक वेगळे सामर्थ आहे, लाल दिव्यांच्या गाडया मंत्री वापरतात, त्याप्रमाणे त्याप्रमाणे आम्ही देखील लाल दिव्यांच्या गाडया वापरतो. विमानात भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी एक्झ ीक्युटीव्ह क्लासमध्ये असतात, आमचे मंत्री बिझनेस क्लासने प्रवास करतात, अशी परिस्थिती आजही आहे. मंत्री महोदय मागे बसले आहेत, ते पाहून अधिकारी हसत असतात. त्यांना उचला आणि बिझनेस क्लासमध्ये फेका असे मी म्हणत नाही.

महोदय,मुख्य सचिवांनी या संदर्भात असे आदेश काढले आहेत की, इतर अधिकाऱ्यांना मराठी अक्षरात पाटया लावण्यासंबंधीचे शासनाचे आदेश लागू आहेत, परंतु ते आदेश भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना लागू नाहीत. या बाबतीत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कधीही विचारणा केलेली नाही. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी हे महाराष्ट्रापेक्षा मोठे आहेत काय, माननीय मुख्यमंत्री आणि मंत्र्यांपेक्षा भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी मोठे आहेत काय ? या बाबतीत मुख्य सचिवांनी जे आदेश काढले होते, ते आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी मागे घेण्यास सांगावयास पाहिजे होते. या राज्यात शासकीय कार्यालयात काम करणारे सचिव अथवा शिपाई असो त्यांना सारखेच नियम लागू असले पाहिजेत. या बाबतीत मुख्य सचिवांनी जे आदेश काढले होते, ते मागे घेण्यास सांगण्याची हिंमत माननीय मुख्यमंत्र्यांनी दाखविली नाही.

महोदय,मंत्रिमंडळातील सदस्य हे एकमेकात भांडतात हे आम्हाला वृत्तपत्रातून वाचावयास मिळते्. मंत्रिमंडळातील सदस्य एकमेकांमध्ये मासळी बाजारा सारखे भांडतात. एका बाजूला

2...

श्री.दिवाकर रावते...

राष्ट्रवादी, दुसऱ्या बाजूला कॉंग्रेस यांच्यात जी भांडणे होतात, त्या भांडणाचे वर्णन वृत्तपत्रांमध्ये छापून येते. राज्यमंत्र्यांना वाटते की, आम्ही बाहेर असतो. आम्हाला काहीही बोलता येत नाही. म्हणून राज्यमंत्र्यांनी देखील हट्ट धरला. त्यांना सांगण्यात आले की, तुम्ही पण भांडण्यासाठी यावे. परतु मंत्रालयातील प्रत्येक भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी आपले नाव मराठी अक्षरात लिहावे यासाठी भांडत नाहीत. हे वर्ष स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. त्यांनी सांगितले होते की, महाराष्ट्र हे मराठी माणसांचे राज्य आहे. त्या मराठी माणसांची अस्मिता जपण्याकरिता भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी उद्दामपणा दाखवित असतील तर तो थांबविला पाहिजे, असे कोणीही राज्यकर्त्यांनी सांगितले नाही. मी या बाबतीत कितीही बोललो तरी "पालथ्या घडयावर पाणी " पडणारच आहे. या विषयावर पुन्हा पुन्हा बोलण्याची संधी मला सरकार उपलब्ध करुन देणार आहे.

सभापती महोदय, गृहखात्याची बाब क्रमांक 6 च्या अनुषंगाने मी बोलणार आहे. पोलिसांना साप्ताहिक सुटी असताना कामावर बोलावितात. त्यांना मोबदल्यात फक्त 68 रुपये देण्यात येतात. माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी मोठया अभिमानाने सांगितले की, मनरेगा योजनेवर काम करणाऱ्या मजुरांना प्रतिदिन 134 रुपये मजुरी देण्यात येत होती, आता त्या योजनेवर काम करणाऱ्या मजुराची मजुरी प्रतिदिन 165 रुपये केली आहे. त्या मजुरांच्या मजुरीत वाढ केली ही आनंदाची गोष्ट आहे. पोलिसांना फक्त 68 रुपये का देता ? पोलिसाला सुटीच्या दिवशी कामावर बोलाविता, त्यास 68 रुपये जास्तीचे देता.

महोदय,पोलिसांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन दिले जात नाही. ज्या प्रमाणे शिक्षकांचे लोकप्रतिनिधी या सभागृहात आहेत, त्यामुळे पोलिसांचे लोकप्रतिनिधी देखील या सभागृहात असले पाहिजे असे मला वाटू लागले आहे. या सभागृहात शिक्षकांच्या पगाराबाबत अनेक वेळा चर्चा होते, परंतु पोलिसांच्या वेतनाबाबत मात्र कोणीच सदस्य चर्चा उपस्थित करीत नाहीत. माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील हे सव्वा तास आम्हाला व्याख्यान देतात. ते पोलिसांच्या वेतना बाबत काहीच बोलत नाहीत. पोलिसांचे मनोधैर्य वाढविण्यासंदर्भातच ते बोलत असतात. पोलिसांची वैद्यकीय तपासणी करणे बंधनकारक असताना, त्यांची वैद्यकीय तपासणी वेळोवेळी केली

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 16:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

जात नाही. अनेक पोलीस कर्मचारी हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यूमुखी पडले आहेत. त्यांच्या वैद्यकीय तपासणीची हेळसांडणा केली जाते ही दुर्देवाची गोष्ट आहे. या बाबतीत शासनाची भूमिका काय आहे यासंबंधी माननीय मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात खुलासा करावा.

सभापती महोदय, पोलीस भरतीच्या बाबतीत वेळोवेळी बोलले जाते. परंतु पोलीस भरतीच्या संदर्भात आपण माननीय उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे की, पोलिसांना पोलिसाचे प्रशिक्षण देण्याकरिता आमच्याकडे पुरेशी व्यवस्था नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते............

एका वेळेला फक्त अमुकच पोलीस प्रशिक्षित होऊ शकतात. त्यामुळे सहा महिन्यानंतर दुसरी बॅच घेता येईल. सध्या महाराष्ट्रात 18 हजार पोलिसांची कमतरता आहे, ती भरुन काढणार का? संख्या कमी असल्यामुळे कार्यरत असलेल्या पोलिसांवर ताण येतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 7, अति दहशतवाद विरोधी पथक. चर्चेला उत्तर देण्यास वेळ असल्यामुळे मंत्री महोदयांनी या मुद्याविषयी माहिती घ्यावी, ढोबळ उत्तर देऊ नये अशी मी विनंती करतो. सध्या केंद्रीय गृहमंत्री भगवा आतंकवाद, हिरवा आतंकवाद, पिवळा आतंकवाद असा नेहमी उल्लेख करीत असतात. सभापती महोदय, महाराष्ट्रातील मालेगाव येथे जे प्रकरण झाले त्यातून कोल्हापूरचा एक माणूस संपूर्ण देशभर भगव्या आतंकवादाची आरोळी ठोकत, बाण मारत सुटला आहे.

महाराष्ट्रातील मालेगाव येथे 2008 मध्ये जे प्रकरण घडले त्यातून दिलीप पाटेदार नावाची एक व्यक्ती, ज्या व्यक्तीला आतंकवादाच्या नावाखाली उचलून आणले, ज्याचे अपहरण केले गेले तो दिलीप पाटेदार अद्याप घरी परत न आल्याने आणि मालेगाव प्रकरणात तुरुंगात नसल्याने त्याच्या जिवाचे बरेवाईट झाल्याची शक्यता असल्याने मुंबई एटीएसचे अधिकारी याला जबाबदार असल्याने दिलीप पाटेदार याच्या भावाने मध्यप्रदेशातील उच्च न्यायालयाच्या खंडपीठामध्ये हेबियस कॉर्पस पिटिशन दाखल केले. उच्च न्यायालयाने त्याचा तपास सीबीआयकडे दिला. या प्रकरणात मुंबईतील पोलीस अधिकारी दोषी असल्याचे सीबीआयने नमूद करुन महाराष्ट्र सरकारकडे सदर अधिकाऱ्याविरुध्द खटला चालविण्याची परवानगी मागितली. सर्वोच्च न्यायालयाचे निकालपत्र माझ्याकडे आहे. या प्रकरणात महाराष्ट्र सरकारने परवानगी दिली का? याचा खुलासा झाला पाहिजे. किती जणांविरुध्द परवानगी दिली आहे, किती जणांविरुध्द परवानगी दिलेली नाही हे सभागृहाला सांगण्यात यावे. मागितलेली परवानगी फेटाळली का, फेटाळली असेल तर त्याची कारणे जाणून घ्यायची आमची इच्छा आहे. परवानगी दिली नसल्यास ती न देण्यामागची अडचण काय निर्माण झाली हाही एक मुद्दा आहे. ज्या अधिकाऱ्यांच्या संदर्भात सीबीआयने गुन्हा दाखल करा असे सांगितले, त्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा सभागृहामध्ये सांगितले तर बरे होईल. उच्च न्यायालयाने त्या प्रकरणामध्ये स्पष्ट शब्दात जे आदेश दिले ते विभागाच्या माध्यमातून आपल्याकडे आले असतीलच. ही व्यक्ती कुठे गेली, तिचे काय झाले? भगव्या आतंकवादाच्या नावाखाली तिला

.2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

उचलून आणले, तिचे अपहरण झाले अशी मध्यप्रदेशातील इंडियन एक्स्प्रेस वृत्तपत्रात बातमी आली होती. दिल्लीतील एका नेत्याच्या विमानातून त्याला घेऊन गेले.

सभापती महोदय, आझाद मैदान प्रकरणाबाबत आम्हाला अद्याप कळलेले नाही, गृहखात्याच्या मागण्यांच्या चर्चेच्या माध्यमातून मी या संदर्भात भाष्य करणार आहे. मी धुळे येथे गेलो होतो. धुळे येथे 224 पोलिसांना मारले.

नंतर 3यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ KTG/ प्रथम श्री. भोगले....... 16:40

श्री. दिवाकर रावते....

त्या ठिकाणी हिंदू-मुस्लीम अशी दंगल झाली नव्हती तर पोलीस-मुस्लीम अशी दंगल झाली होती. यासंदर्भात अहवाल आला असून यासंदर्भातील विचार गृह विभागाच्या चर्चेच्या वेळी मांडणार आहे. त्या ठिकाणच्या मुस्लीम समाजाच्या दबावाखाली सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये जे पोलीस दुकानासमोर होते ते दुकानातील मालाची लूट करीत होते असा आरोप करुन त्यांना निलंबित करण्यात आले. यासंदर्भात काय करावयाचे हा आपला निर्णय आहे त्याबद्दल मला काही बोलावयाचे नाही परंतु सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये पोलीस सापडले परंतु पोलिसांना मारणारे गुन्हेगार सापडले नाहीत ? यामध्ये 122 हिंदूना अटक करण्यात आली. यामध्ये हिंदुंचा काही एक संबंध नव्हता तरी त्यांना अटक करण्यात आली.

सभापती महोदय, आझाद मैदानात जो काही प्रकार झाला होता त्यासंदर्भातील गुन्हेगारांवर आज पावेतो काहीही कारवाई झालेली नाही. आझाद मैदानातील दंगलीत जे आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये दिसतात त्यांना आतापर्यंत पकडण्यात आलेले नाही, त्या गुन्हेगारांना पकडण्याची हिंमत पोलिसांना होत नाही हा काय प्रकार आहे ? परंतु यासंदर्भात कविता करणाऱ्या आमच्या पाटील बाईंना आपण माफी मागायला लावली. एखाद्या महिलेवर झालेला अनन्वित छळ ती समाजाला सांगू शकत नाही परंतु कवितेच्या माध्यमातून तिच्या भावना उफाळून आल्या असतील तर तिला तुम्ही माफी मागायला लावली जाते. "साप को दूध नही पिलाना" ही म्हण आपल्याला माहिती नाही काय ? सापाला दूध पाजू नका ही पारंपारिक म्हण आहे. "साप को दूध नही पिलाना"या ओळीमुळे मुस्लीम समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या ? या म्हणीची दखल विभाग घेतो ? मुस्लीम समाज साप कधी पासून झाला ? मुस्लीम समाज साप झाला हे तुम्ही मान्य केले ? ते सापाची औलाद आहे तुम्ही मान्य करुन श्रीमती पाटील यांना माफी मागायला लावली. या सर्व गोष्टी उद्विग्नता निर्माण करणाऱ्या आहेत.

सभापती महोदय, पालघरचे फेस बूक प्रकरण वेगळेच आहे परंतु त्यासंदर्भातील माहिती दोन तीन दिवसामध्ये सभागृहापुढे येणार आहे. यामध्ये आपण ज्यांचा समावेश नाही अशा पोलीस अधिकाऱ्यांना गुंतवलेले आहे. काश्मीरमध्ये जे घडले ते का निर्माण झाले ? पालघरच्या तरुण मुलीला संरक्षण देण्यासाठी अख्खा हिंदुस्तान उभा राहिला होता. एका बाजूला इस्लामची हाक आणि दुसऱ्या बाजूला दुसरी इस्लामची हाक दिली जात आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, आमच्या पोलीस आयुक्तांनी कायदा आणि सुव्यवस्थेचे काम सोडून दिले आहे काय ? त्यांच्यासाठी पुरवणी मागण्या कशासाठी आणता ? "महिलांनो रोड रोमियोंना तुम्ही चपलाने मारा" असे तुमच्याच पोलीस आयुक्तांनी सांगितले आहे. पोलिसांच्या दंडुक्यात आता ताकद राहिली नाही असे पोलीस आयुक्त कसे काय सांगू शकतात ? तुमचा पोलीस प्रमुख अशा प्रकारे निवेदन करीत असेल आणि महिलांना स्वत:चे संरक्षण करण्यास सांगत असेल तर मग पोलीस ठेवले कशासाठी ? पोलीस प्रमुखानी हे जे हिडीसपणाने सांगितले आहे त्याचे कारण या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मालेगाव प्रकरणातील पोलीस आरोपी एटीएसला सापडत नाही त्याला तुम्हाला सुळावरच चढवावे लागणार आहे. सीमी संघटनेवर बंदी आहे हे सर्वांना माहिती आहे.

सीमी संघटनेचा खलील अखत्र् अब्दूल लकीब आयनी विरुध्द भारत सरकार उच्च न्यायालयाचा अर्ज क्रमांक 17752009 दि.30 जून 2010 चा खटला आहे. एस.टी.भाटिया, न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांनी काय सांगितले ? या प्रकरणात अर्जदार हा बंदी घातलेल्या सीमी संघटनेचा कार्यकर्ता होता. ही सर्व माहिती इंग्रजीमध्ये आहे परंतु त्याचे मी मराठीत भाषांतर केलेले आहे. दि. 30.11.2001 रोजी अर्जदाराने चिथावणीखोर भाषण केल्यामुळे त्याच्यावर प्रतिबंधात्मक कायदा 1967 मधील कलम 10 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणामध्ये सरकारने कारवाई करण्यासाठी परवानगी दिली असता पोलिसांकडून 4,5 वर्षे काहीच कारवाई करण्यात आली नव्हती.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

या गुन्ह्याचे चार्जशीट दिनांक 24.4.2007 रोजी दाखल करण्यात आले. उच्च न्यायालयाने वरील प्रकरणात पोलिसांकडून तपास योग्य त्या कालावधीत न झाल्याचे कारण देत आरोपीवर दाखल केलेला गुन्हा रद्द केला. आपले पोलीस खाते कशा प्रकारे काम करते ते पहावे. असे असेल तर मग या मागण्या आमच्या पुढे कशासाठी आणल्या आहेत ? यात कोणाचा इंटरेस्ट होता ? सीमी संघटनेवर आपण बंदी घातली आहे. सीमी संघटनेचा तो खतरनाक माणूस होता. त्याच्यावर चार वर्षे आरोप दाखल न केल्यामुळे उच्च न्यायालयाने त्याला सोडून दिले. तेव्हा आपण संबंधितांवर कोणती कारवाई करणार आहात ? या चर्चेसाठी जवळ जवळ चार तास वेळ लागणार असल्यामुळे आपल्याकडे उत्तर द्यायला अजून भरपूर वेळ आहे. माझ्याकडे उच्च न्यायालयाची प्रत आहे. ही सर्व वाचण्यासाठी मला पाऊण तास वेळ लागेल. एवढे आपल्या विभागाबाबत लिहिले आहे. तेव्हा याबाबत शासन नेमके काय करणार आहे यासंबंधाची माहिती मला मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 8 - मोटार अपघात यासंबंधी मी बोलणार आहे. हा विषय सभागृहामध्ये अनेक वेळा मांडण्यात आला आहे. अत्यंत क्लेशकारक विषय मी मांडत आहे. वाहनाची नंबर प्लेट कशा प्रकारे असावी यासंबंधी माझ्याकडे सरकारचा 16 जून 1993 चा आदेश क्रमांक एमव्हीए 0393/379-टीआरए-2 आहे त्यात नमूद केले आहे की, , in pursuance of the Government of India, Ministry of Surface Transport Notification, "Registration Mark in Marathi language may also be displayed on the Motor Vehicle." हा विषय मी येथे दहा वेळा मांडलेला आहे. त्यांनी यात म्हटलेले आहे की, आपण मराठी नंबर प्लेट देखील लावावी. यासंबंधी मी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांना विनंती केली होती. त्यांनी मला सांगितले की, वाहने राज्याच्या बाहेर जातात, तेव्हा प्रश्न निर्माण होतो म्हणून हिंदुस्थानामध्ये इंग्रजीमध्ये नंबर प्लेट वापरण्यात येतात. हिंदी भाषा आता युपीएससीच्या परीक्षेकरिता आणली तशी आपली देवनागरी लिपी आहे. केंद्राचा कायदा आहे ठीक आहे. महाराष्ट्रात मराठीमध्ये नंबर प्लेटच्या खाली खाली इंग्रजी भाषेत नंबर प्लेट लावावी असे म्हटलेले आहे. रिक्षा तर महाराष्ट्राच्या बाहेर जात नाही. त्यांच्या नंबर प्लेट मराठीमध्ये कराव्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

अशी सूचना मी केली. एस.टी., रिक्षा यांच्या नंबर प्लेटस् मराठीत कराव्यात यासंबंधी चर्चा झाली. त्यांनी सांगितले की, आम्ही केद्र शासनाकडून खास परवानगी मागतो. पुण्यामध्ये मराठी गाडी, मराठी कार्यक्रम असा एक कार्यक्रम झाला त्याचे फोटो माझ्याकडे आहेत. या कार्यक्रमाला पोलीस आयुक्त हजर होते. ही चांगली गोष्ट आहे.

माझ्या गाडीवर मराठी क्रमांक आहे आणि त्या खाली इंग्रजी क्रमाक आहे. मी जेव्हा परिवहन मंत्री होतो त्यावेळी हे सर्व करायला लावले होते. त्यामुळे माझ्या गाडीवर दोन्ही क्रमांक असतात. हा जो आदेश आहे तो माझ्या प्रत्येक गाडीमध्ये असतो. कायद्याने असा क्रमांक लिहिता येतो हे सांगण्यासाठी हा आदेश महाराष्ट्रातील सर्व जिल्हा प्रमुखांना पाठवून दिला आहे. परवा अडीच वाजता माझा मुलगा मावशीला आणण्यासाठी एअर पोर्टवर गेला होता. येताना त्याची गाडी अडविली. सर्वसाधारण तपासणी होती म्हणून गाडी तपासली. गाडी तपासल्यानंतर त्याला जा म्हणून सांगायला पाहिजे होते. पण त्यांनी नंबर प्लेटला हरकत घेतली. त्यासंबंधातील त्याने शासनाचा आदेश काढला व पोलिसांना दाखवला. तेव्हा ते म्हणाले की, हे आदेश आम्हाला दाखवायचे नाहीत. ते मंत्रालयात दाखवायचे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्या ठिकाणी पाच हवालदार होते. मग माझ्या मुलाने नाव सांगितल्यावर त्यांनी सांगितले की, आम्ही कोणाला ओळखत नाही. वाहतूक पोलीस अधिकारी श्री.शिर्के हे तेथे होते. ही कशासाठी मस्ती ? माझा मुलगा त्यांना एवढेच म्हणाला की, आपण शिर्के म्हणजे मराठी आहात ना ? आपण एवढे कशाला गरम होत आहात. त्यावर त्यांनी सांगितले की, तू स्वत:ला आर.आर.पाटील समजतोस काय ? माझ्या मुलाने सांगितले की, मी आबा आहे की कोण आहे सांगतो असे सांगून त्याने माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या बंगल्यावर रात्री 2.30 वाजता फोन केला. तेथील अटेन्डन्सबरोबर बोलण्यासाठी सांगितले असता, आम्ही असे कोणाचे फोन घेत नाही असे सांगितले. काय ही मस्ती ?

सभापती महोदय, माझ्या राज्यामध्ये मराठी हवालदार मराठी नंबर प्लेटकरिता अख्ख्या मंत्रालयाला आडवे करतो, मंत्रिमंडळाला आडवे करतो. आपण आमदारांना मानू नका. पण मी नियमाप्रमाणे मराठी नंबर प्लेट लावली आहे. प्रत्येक वेळेला मराठी प्लेट आहे म्हणून गाडी अडवावयाची हे बरोबर नाही. सर्व अधिकाऱ्यांच्या जीवावर मराठी भाषा का येते ते मला समजत नाही ? मी मुलाला म्हटले मी उद्या एअरपोर्टला जातो. लायसन्स घेतले त्याची रिसीट माझ्याकडे आहे. मराठी नंबरप्लेटकरिता लायसन्स जप्त करण्यात आले असे लिहून दिले आहे. किती निर्लज्ज माणसे आहेत ? ही मराठी औलाद ? कसा लायसन्स घेतो ते पाहतो अशी वर मिजास. वरिष्ठांना कळल्यावर त्यांनी लायसन्स आणून दिले. आम्ही सांगितले की, कोर्टात जाऊन लायसन्स घेऊ. या राज्यात मराठी भाषेकरिता मला झगडावे लागत असेल, या राज्यातील एक आमदार म्हणून मराठी भाषेकरिता मला असा त्रास होणार असेल तर सर्वसामान्य जनतेची काय परिस्थिती असेल ? हे कोणाचे राज्य आहे ? कसे राज्य चालविण्यात येत आहे ? शासन स्व.यशवंतराव चव्हाणांची कसली जन्मशताब्दी साजरी करीत आहे ? असलें कसले राज्यकर्ते निर्माण झाले म्हणून यशवंतराव चव्हाणांना लाज वाटत असेल. त्यांना मराठी भाषेचा सतत अवमान करणाऱ्यांवर अंकुश लावता येत नाही.

सभापती महोदय, हा व्यक्तीगत विषय नाही. पण आमदार-बिमदार ओळखत नाही, ही कोणती भाषा ? आमदार म्हणून ओळखून दे नको, परंतु अधिकारी आता सत्ताधाऱ्यांसुध्दा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मोजायला तयार नाहीत. हे असले आहेत त्यांना कोण मोजते ? हे आपल्यापुढे पटवापटवी करतात अशी आपली प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये इमेज झालेली आहे म्हणून वाईट वाटते. मला काही न्याय नको. त्या पोलीस अधिकाऱ्याला सस्पेन्ड करा किंवा अन्य काही करा. हे त्या अधिकाऱ्याला काय सस्पेन्ड करणार, त्यांची हिम्मत नाही आणि मी तशी मागणी देखील करीत नाही.

सभापती महोदय, अशीच एक घटना आहे, माझ्या मुलाला दुपारी 2.00 वाजता सिध्दीविनायक मंदिराजवळ मोटारसायकलवर असताना अडविले. त्याने सांगितले की, मी येथेच राहतो आपणाला गाडीचे कागदपत्र आणून दाखवितो. पण पोलिसांनी सांगितले पोलीस स्टेशनला गाडी न्या..

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणात लाज वाटत नाही, काहीच करणार नाही अशाप्रकारचा उल्लेख केला.. दुसरे म्हणजे सन्माननीय सदस्यांच्या मुलाला का अडविले जाते याचा खुलासा झाला तर बरे होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी लाज हा शब्द मागे घेतो. माझ्या मुलाचा कोणताही दोन नंबरचा धंदा नाही, माझा मुलगा दारुचा व्यवसाय करीत नाही. माझा मुलगा गाडीतून अवैध वाहतूक करीत नाही. मी आताची घटना सांगितली ती म्हणजे पोलिसांकडून बॅरिकेटस टाकून नाकाबंदी केली जाते त्यावेळची आहे. पोलीस बॅरिकेटस टाकून वाहनांची तपासणी करतात आणि वाहनचालकांकडून पैसे गोळा करतात. ते सर्वांना दिसते. ही परिस्थिती का आली आहे ? प्रशासनातील अधिकारी मंत्र्यांना आणि आमदारांना विचारत नाही हे मी आपणास सांगत आहे. लाज या शब्दामुळे आपणास वाईट वाटले. आमचे सोडा हो, मी जाऊन थोबाडीत मारीन आणि अंगावर येईल ती केस घेईन. मी अंगावर केस घेणारा माणूस आहे. मी आयुष्यभर तेच करीत आलो आहे. आपल्या आदेशांना अधिकारी मोजायला तयार नाहीत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

महोदय, मी काल भाषण करताना 'बेशरम' हा शब्द शब्दकोषाला अपमान वाटेल असा आहे असे म्हटले होते. आम्ही भाषण करताना मंत्री महोदयांना उद्देशून आदरणीय मंत्री, माननीय मंत्री, सन्माननीय मंत्री, मंत्री महोदय असा शब्दप्रयोग करतो. मी माननीय राज्यमंत्री श्री.सचिनभाऊ अहिर यांना सांगू इच्छितो की, या आदरार्थी शब्दाचा सन्मान होईल अशी पकड आपण प्रशासनावर निर्माण केली तर मला आपल्याबद्दल अभिमान वाटेल. परंतु ती होत नाही, हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत होतो. असो.

महोदय, आता मी दुग्ध व्यवसाय विभागाच्या मागण्यांवर बोलतो. बाब क्रमांक-21 अंतर्गत इतर संस्थांना सहाय्य अंतर्गत मागणी केली आहे. महानंद डेअरीच्या बाबतीत ज्या घटना घडत आहेत त्या बाबत माननीय मंत्र्यांना माहिती असेल. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, सरकारचे प्लांट बंद करुन ठेकेदाराचे प्लांट सुरु करण्याची अधिकाऱ्यांमध्ये जी मस्ती सुरु आहे त्यावर आपण नियंत्रण आणणार आहात की नाही ?

महोदय, एकात्मिक दुग्ध विकास प्रकल्प हा राष्ट्रीय विकास प्रकल्पातून आला आहे. या प्रकल्पांतर्गत एका दुग्ध विकास प्रकल्पासाठी विकासकाला 20-25 लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. त्यांनी केवळ गायी आणावयाच्या व सांभाळावयाच्या आहेत. या प्रकल्पासाठी मराठवाड्यात 2009-10 व 2010-11 या दोन वर्षात ज्या संस्थांची निवड झाली ती राजकीय शिफारशीमुळे झाली. माननीय मंत्री महोदय, आपण कार्यकर्त्यांना अशा संस्था देऊन त्यांना उभे केले ही चांगली गोष्ट आहे. परंतु यामुळे शासनाचे 50 लाख रुपयांचे अनुदान लाटले गेले आहे. माननीय मंत्री महोदय, 'लाटला' हा शब्दप्रयोग केला तर चालेल ना ? कारण 'भ्रष्टाचार' हा शब्दप्रयोग केला तर कोणाला काही वाटतच नाही.

महोदय, 2009 मध्ये तुळजाभवानी दूध उत्पादक सहकारी संस्था, कारलेवाडी, ता.गंगाखेड, जि.परभणी या संस्थेची सर्व प्रक्रिया कागदोपत्री पूर्ण झाली. परंतु त्या संस्थेमध्ये एकही गाय नाही. सर्व अनुदान गायब केले आहे. मी स्वत: तेथे गेलो होतो. तत्कालीन मंत्री महोदयांना सुध्दा मी या बाबत सांगितले होते. तसेच देवकृपा दूध उत्पादक सहकारी संस्था, पिंपळगाव खुरे, ता.वसमत, जि.हिंगोली या संस्थेत सुध्दा एकही गाय नाही. अशा प्रकारे एकूण 15 प्रकल्प मराठवाड्यात दिलेले आहेत. त्यातील केवळ 5-7 प्रकल्प व्यवस्थितरित्या सुरु आहेत आणि बाकी सर्व प्रकल्प

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

गायब आहेत. परंतु या संदर्भात आपल्या अधिकाऱ्यांकडून काहीच कार्यवाही होत नाही. माझ्याकडे पुरावा नाही. परंतु माझ्या माहितीनुसार अर्धी-अर्धी वाटणी झाल्यामुळे अधिकारी याकडे लक्ष देत नाहीत. माननीय मंत्री महोदयांनी याकडे लक्ष दिले तर बरे होईल.

महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी परभणी कृषी विद्यापीठाचा विषय मांडला. हे विद्यापीठ निर्माण झाल्यापासून तेथे 2 गावे वसली होती. त्या गावांना पर्यायी जागा द्यावयाची होती. एका गावाला पर्यायी जागा दिली. परंतु दुसऱ्या गावाचे पुनर्वसन झाले नाही. त्या गावाच्या बाबतीत पुढाऱ्यांचा दर वेळी एक व्यवसाय व्हायचा. ज्या गावाला जमीन दिली नव्हती त्या गावाला ही शेती देऊन टाका असे ते सांगायचे. त्यामुळे गावकरी त्या शेतीत घुसून शेती उधळायचे. त्यामुळे शेंद्रा, जि.परभणी या गावाच्या पुनर्वसनासाठी गावकरी कोर्टात गेले. न्यायालयाने या बाबत निर्णय दिला आहे. त्यांच्या वकिलांनी सांगितले की, गावकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी 3 कोटी रुपये शासनाने भरावेत. या संदर्भात न्यायालयाने दिलेली मुदत एक महिन्यानंतर संपणार आहे. मी या बाबत संबंधित सर्व सचिवांशी सुध्दा चर्चा केली. महोदय, या कामाचे 3 कोटी रुपये जमा केले नाही तर पुन्हा न्यायालयाचा अवमान केल्याची बाब समोर येईल. म्हणून या दृष्टीने उचित ती कार्यवाही लवकर करणे गरजेचे आहे.

महोदय, सरकारी वकिलांच्या नेमणुकीबाबत मी आता बोलत नाही.

महोदय, आता मी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या बाब क्र.139 वर बोलतो. महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी आता सभागृहाचे सदस्य नाहीत. ते पणन महामंडळाचे अध्यक्ष आहेत. त्या ठिकाणी महाव्यवस्थापक हे आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी आहेत. मी माहिती घेतली असता असे निदर्शनास आले की, त्या महामंडळामध्ये या वर्षी केवळ 12,195 क्विंटल कापसाची खरेदी झाली.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्या ठिकाणी 250 कर्मचारी आहेत. त्यांना काहीही काम नाही. दरमहा सव्वादोन कोटी रुपये त्यांचा प्रशासकीय खर्च आहे. माझे असे म्हणणे आहे की, शासनाला काय करावयाचे असेल ते लवकर करावे. त्या ठिकाणी एक भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी दिलेला आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची मंत्रालयामध्ये गरज असताना भारतीय प्रशासकीय सेवेच्या एका अधिकाऱ्याला त्या ठिकाणी काम न करता नुसते बसवून ठेवलेले आहे. ही जी परिस्थिती आहे त्यामध्ये बदल करणार की नाही ? त्या ठिकाण्‍ी जे कोणी श्री.जी.डी.फिलिप्स नावाचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत त्यांना ताबडतोब या ठिकाणी आणले तर बरे होईल अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूरक मागण्यांच्या संदर्भात मी बोलणार आहे. मघाशी माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख सभागृहात उपस्थित होते. मी त्यांना हळूच विचारले. माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जो पुतळा उभा राहणार आहे त्याबाबत बोलत होते. आपल्या हयातील हा पुतळा उभा राहणार नाही हे नक्की आहे. अशी सर्व परिस्थिती आहे. केंद्र शासनाचे पर्यावरण मंत्री येऊन बघणार आहेत. अजूनही डॉ. गोपाळगाव देशमुख मार्गावरील म्हणजेच पेडर रोडवरील पर्यावरणामध्ये अडकेलेल्या एका छोट्याशा पुलाचा शेवटचा भाग समुद्राच्या बाजूला येतो म्हणून जर तो पूल होत नसेल तर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कसा होणार ? मला बांधकाम खात्याकडून हेही जाणून घ्यावयाचे आहे. त्या पुलाचा मी नारळ फोडतो अशा प्रकारे मला सांगणारे माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख आता सभागृहात उपस्थित नाहीत. नारळ फोडावयाचा आहे असे सांगून चार वर्षे झालेली आहेत. तो नारळ अजून फुटलेला नाही. त्या पुलाचे काम कधी चालू करणार ? कारण वाहतुकीची समस्या फार गंभीर झालेली आहे. आजच वर्तमानपत्रात आल्याप्रमाणे दर महिन्याला 60 हजार गाड्या मुंबईमध्ये येत आहेत.

मुंबईमध्ये गाड्यांची परिस्थिती फारच स्फोटक झालेली आहे. तो पूल आमच्या एका अत्यंत जागतिक किर्तीच्या लताताईंनी नको म्हणून सांगितल्यामुळे अडलेला आहे. त्या पुलाची किंमत त्यावेळी 350 कोटी रुपये होती. आता त्या पुलाची किंमत 3500 कोटी रुपये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

झालेली आहे. लताताई सात जन्म घेऊन गाव्यात अशी आमची इच्छा आहे परंतु त्या सात जन्म गायल्या तरी सुध्दा एवढा पैसा उभा राहणार नाही, एवढी त्या पुलाची किंमत वाढली. त्याची जबाबदारी कोणाची हा प्रश्न मला पडलेला आहे. हे पैसे आपल्या खिशातून जाणार आहेत. त्यामुळे लोकांकरिता काम करीत असताना कोणत्या आंदोलनाला कोठपर्यंत सन्मानित करावयाचे हे आपण ठरविले पाहिजे. त्या पुलाच्या संदर्भातील निर्णय मला अपेक्षित आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/ KTG/

श्री. सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) :सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पूरक मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 101 वरील बाब क्रमांक 112 बाबत मी प्रथम बोलणार आहे. राज्यात सर्व जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन बांधून तयार आहेत परंतु अजूनही ती कार्यान्वित झालेली नाहीत. त्यांची उद्‌घाटने झलेली नहीत. गेल्यावेळी मी या बाबत बोललो होतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सुंदर सामाजिक न्याय भवन बांधलेले आहे. त्याचे उद्‌घाटन कधी करणार ?

सभापती महोदय, यानंतर मी सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 101 वरील बाब क्रमांक 111 बाबत बोलणार आहे. यामध्ये वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळाच्या प्रशासकीय खर्चासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. हरित क्रांतीचे प्रणेते श्री. वसंतरावजी नईक यांची आपण जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. वसंतराव नाईक महामंडळ चांगले काम करीत आहे. या जन्मशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने या महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलामध्ये आणि त्यांच्या निधीमध्ये भरीव वाढ करावी. त्या समाजाच्या तांडा विकास योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन द्यावा. आपण जसे समाज मंदिर, सामाजिक न्याय भवन बांधतो त्या पध्दतीने प्रत्येक तांड्यामध्ये वसंत भवन बांधण्यात यावे व त्या वसंत भवनमध्ये त्यांच्या समाजातील लग्न समारंभ, सभा, सांस्कृतिक कार्य, अभ्यासवर्ग, संगणकाचे वर्ग इत्यादी सुरु करण्यात यावेत.

सभापती महोदय, यानंतर मी नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 51 वरील बाब क्रमांक 57 बाबत बोलणार आहे. राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यासाठी वांद्रे येथे शासकीय वसाहत आहे. त्या ठिकाणी शासनाची एकूण 93 एकर जागा आहे. मुंबईतील वांद्रे येथील 1200 कोटी रुपयांचा पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित आहे. त्यांना अजूनही सदनिका मिळालेल्या नाहीत. अनेक कर्मचाऱ्यांना घर मिळविण्यासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागते. खाजगी विकासक की शासन म्हणजेच गृहनिर्माण महामंडळ या दोघांमध्ये वाद सुरु आहे. त्यांच्यामध्ये एकमत होत नाही. हा पुनर्विकास प्रकल्प या शासनाचा अंगीकृत व्यवसाय महाराष्ट्र गृहनिर्मण मंडळ आहे त्यांच्या मार्फत राबविण्यात यावा.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/ पूर्वी श्री.बरवड 17:05

श्री.सुभाष चव्हाण....

सभापती महोदय, आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावीला आहे. धारावी झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रकल्पाचे काम सुरु होत आहे त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांना मनापासून अभिनंदन करतो. हे काम खाजगी विकासकांना न देता म्हाडाकडे देण्यात यावे व 350 चौ.फुटाचे घर त्यांना मिळावे व स्थानिक रहिवाशांचा जास्तीत जास्त फायदा करुन द्यावा अशी मी विनंती करतो.

यानंतर पृष्ठ क्र.161 वरील पर्यटन विभागाच्या बाब क्र.160 वर मी माझे विचार मांडतो. मौजे तोंडवली, तालुका मालवण येथे देशातील जागतिक प्रकल्प सी-वर्ल्ड उभा राहत आहे. सुमारे 8 हजार हेक्टर एवढ्या जागेत 25 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा हा प्रकल्प आहे. हा प्रकल्प खूप मोठा आहे. त्याबाबत मी यापूर्वीच उल्लेख केलेला आहे की, 7 महासागराची प्रतिकृती आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी या प्रकल्पासाठी विशेष निधीची तरतूद करावी अशी माझी आग्रही मागणी आहे.

यानंतर पृष्ठ क्र.100 वरील अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्ग कल्याण विभागाच्या बाब क्र.109 वर मी बोलणार आहे. या विभागाच्या अंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या अंदाजे 150 योजना आहेत. या सर्व योजनांसाठी केंद्र शासनाकडून नियमित निधी मिळत असतो. या वर्गाचा विकास करण्यासाठी एनजीओंचा फार मोठा सहभाग असतो. पण हा निधी वितरित करीत असताना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होतो व त्यामुळे हा निधी आदिवासींपर्यंत पोहोचत नाही. हे सर्व अनुदान आदिवासी एनजीओंच्या खात्यात थेट जमा करावे. त्यामुळे खऱ्या लाभार्थ्यांना लाभ होईल.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.85 वरील उद्योग विभागाच्या बाब क्र.92 वर मी माझे विचार मांडतो. एमआयडीसीच्या निधीतून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी येथे विमानतळ उभे राहत आहे. पर्यटनाचे विशाल प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्ह्यात येत आहेत. या विमानतळाचे काम त्वरित सुरु करण्यात यावे अशी मी विनंती करतो. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलले) : सभापती महोदय, सन 2012-13 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पूरक मागणी म्हणजे काय ? पूरक मागणी म्हणजे अर्थसंकल्पामध्ये मंजूर झालेल्या कामाला निधी कमी पडला तर त्या कामासाठी पुढील अधिवेशनामध्ये पूरक मागणी सभागृहाला सादर करावयाची असते. परंतु या शासनाने आता वेगळी प्रथा सुरु केलेली आहे. तिन्ही अधिवेशनामध्ये पूरक मागण्या सभागृहाला सादर केल्या जातात त्यामध्ये मूळ स्वरुपाच्या कामांचे प्रमाण वाढत चालले आहे. एखाद्या वर्षी दुष्काळ पडला, कोठे अपघात झाला, पूल पडला तर त्याचा अंतर्भाव मूळ स्वरुपाच्या कामामध्ये केला पाहिजे. पण पूरक मागणीमध्ये मूळ स्वरुपाची कामे मोठ्या प्रमाणात घेतली जात आहेत. त्यावर माझा आक्षेप आहे. माझा आक्षेप याबाबतच आहे असे नाही. राज्यपालांच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर बोलतानाही मी म्हटले होते की, राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कॉंग्रेस पक्षाने सुरु केलेल्या कामांचा उल्लेख असतो आणि पूरक मागण्यांमध्ये राष्ट्रवादी पक्षाच्या कामांचा उल्लेख असतो. त्यामुळे आता पूरक मागण्यांबाबत विचार करण्याची वेळ आलेली आहे. या सभागृहाला विचार करावा लागेल. पूरक मागणी कशा प्रकारे सादर केली पाहिजे, मूळ स्वरुपातील काम किती टक्के त्यात आले पाहिजे यावर सभागृहाने विचार करण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्र.1, बाब क्र.1 वर बोलणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेवर दिनांक 24.4.2009 रोजी निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयात असे नमूद केलेले आहे की, कोणतेही शासकीय अधिकारी निवृत्त झाल्यानंतर त्यांची पुनर्नियुक्ती करण्यात येऊ नये. या सभागृहात मी या संदर्भात अनेकदा बोललो आहे. पण सध्या राज्यात काय चालले आहे त्याचा मी थोडक्यात आढावा घेतो. आपल्या राज्यातील आयएएस अधिकारी निवृत्त झाल्याबरोबर त्यांना ताबडतोब पुनर्नियुक्ती दिली जाते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 17:10

श्री. जयंत प्र. पाटील..

श्री. रत्नाकर गायकवाड, मुख्य माहिती आयुक्त, श्रीमती नीला सत्यनारायण, राज्य निवडणूक आयुक्त, श्री. आर.एम.प्रेमकुमार, अध्यक्ष सीकॉम, श्री. सहानी उपाध्यक्ष, सीकॉम, श्री. के.डी.जाधव, अध्यक्ष, जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, श्री. जे.पी.डांगे, अध्यक्ष, राज्य वित्त आयोग, श्री. सुधीर ठाकरे, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, श्री. जॉनी जोसेफ उपलोकायुक्त, महाराष्ट्र राज्य, श्री. आर.गोपाल, उपाध्यक्ष,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, एस.एफ. हुसेन, विशेष अधिकारी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, श्री. सुखथनकर, अध्यक्ष, धारावी पुनर्विकास प्रकल्प तज्ज्ञ समिती, श्री.सुंदर पुरा, सदस्य धारावी पुनर्विकास प्रकल्प, श्री. बलदेव चंद, अध्यक्ष, राज्य अनुसूचित जमाती... यांच्यावर दोन कोटी रुपये खर्च होत आहे. याला माझा आक्षेप आहे. आता प्रशासकीय सेवेमध्ये नवीन आएएस झालेली मुले अधिक प्रभावीपणे काम करतात.

आम्ही इयत्ता आठवीमध्ये इंग्रजी शिकलो. आता पहिलीपासून इंग्रजी शिकविले जाते. जे चांगले आणि प्रामाणिक सनदी अधिकारी आहेत जे पैसे घेत नाहीत त्यांना मात्र साईड पोस्टिंग दिली जाते. श्री.श्रीकांत देशपांडे हे राज्यपाल महोदयांचे ओएसडी आहेत. आमच्या रायगड जिल्हा परिषदेमध्ये ते मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. हे अधिकारी कधी पैसे घेत नाहीत, कोणतेही खोटे काम करीत नाहीत. बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. केन्द्रेकर हे कायदेशीर काम करतात, पण त्यांची बदली करण्यात आली. श्री. विनायक निपूण आमच्या रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी होते. ते पैसे घेत नाहीत. त्यांची साईडपोस्टिंग करण्यात आली. आमच्या रायगड जिल्ह्याचे ते जिल्हाधिकारी असताना त्यांची सव्वा वर्षात बदली करण्यात आली. हे हुशार आणि चांगले अधिकारी आहेत. अशा हुशार आणि प्रामाणिक अधिका-यांची अनेक नावे सांगता येतील.

माझे म्हणणे एवढेच आहे की, निवृत्त झालेल्या सनदी अधिका-यांना पुनर्नियुक्ती देण्याच्या संदर्भात ठोस निर्णय घेतला पाहिजे. उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे की, निवृत्त झालेल्या अधिका-यांना पुनर्नियुक्ती देऊ नये. हा विषय मी या सभागृहामध्ये पूरक मागण्यांच्या माध्यमातून अनेक वेळा उपस्थित केलेला आहे. काही सनदी अधिकारी शासकीय नोकरी सोडून रिलायन्स सारख्या मोठमोठया कंपन्यामध्ये, बिर्लाच्या कंपन्यमध्ये, टाटाच्या कंपन्यामध्ये जातात. या अधिका-यांना पुन्हा दुसरीकडे नोकरी करण्यावर कायद्याने निर्बंध घातले पाहिजेत. हे अधिकारी सर्व

..2..

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 17:10

श्री. जयंत प्र. पाटील....

सुविधा घेतात, पेन्शन घेतात. महाराष्ट्र सदनामध्ये या अधिका-यांना पहिली प्रायॉरिटी असते, आमदारांना तेवढी प्रायॉरिटी नसते. निवृत्त झालेले जे अधिकारी विविध महामंडळावर व आयोगावर नियुक्त झालेले आहेत त्यांची पेन्शन चालू आहे काय ? या अधिका-यांवर 2 कोटी रुपये खर्च दाखविलेला आहे. हे अधिकारी जर पेन्शन घेत असतील तर त्याबाबतीत शासनाने ठोस निर्णय घेतला पाहिजे.

...नंतर श्री. गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 17:15

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, या ठिकाणी मी चुकीचे बोलत असेन तर तसे मला कोणी सांगावे. राज्यातील जनता पाण्याविना फडफडते आहे. राज्यात प्रचंड दुष्काळ पडलेला आहे. आपण भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांना संपूर्णपणे वेतन देत आहात, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आज सभापतींकडे दुष्काळग्रस्तांसाठी निधी दिला. परंतु हे भारतीय प्रशासन सेवेतील निवृत्त अधिकारी शासनाचे पैसे लुटण्याचे काम करीत असतील तर ते बरोबर नाही.

सभापती महोदय, पान क्रमांक 51, बाब क्रमांक 28 ही नगरविकास विभागाची आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष आपण साजरा करीत आहोत. मी राज्य शासनास पुन्हा पुन्हा आठवण करुन देतो की, केंद्र शासनाकडून आलेला निधी अथवा राज्य शासनाकडून मिळणाऱ्या निधीचे समान वाटप झाले पाहिजे. परंतु आज चेहरा बघून, भाग बघून, किती मासे गळाला लागतील याचा विचार करुन राज्य शासनाकडून निधीचे वाटप केले जाते. हे कोठे तरी थांबले पाहिजे.

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील अलिबाग नगरपालिकेच्या बाबतीत नगरविकास राज्यमंत्र्यांना अनेक वेळा भेटलो. तुमचा चेहरा बघितल्यावर मला असे वाटले की, आमच्या अलिबाग शहराच्या नगरपालिकेला मोठया प्रमाणात निधी मिळेल. अलिबाग नगरपालिकेतील माझा एकही नगरसेवक एक रुपया सुध्दा घेत नाही. अलिबाग नगरपालिकेचा कारभार आपण बघितला आहे. नगरपालिका हद्दीतील रस्त्यांची कामे, पाणी पुरवठा योजनेची कामे व्यवस्थितपणे करीत आहोत. गेल्या दहा वर्षाच्या कालावधीत अलिबाग नगरपालिकेला शासनाकडून सर्वात कमी निधी दिला गेला आहे. या सभागृहात मी अनेक वेळा बोललो की, अलिबाग हे जिल्हयाचे मुख्यालय आहे, त्यासाठी आम्हाला 2004 मध्ये शासनाने 5 कोटी रुपयांचा निधी देण्याचे जाहीर केले. त्यातील फक्त 50 हजार रुपयांचा निधी अलिबाग नगरपरिषदेस दिला गेला. माननीय राज्यमंत्र्यांना या सभागृहात उत्तरेच देण्याचा अधिकार आहे. प्रत्यक्षात निधीचे वाटप करण्याचे अधिकार मंत्र्यांना आहेत. राज्यमंत्र्यांना तसा अधिकार असेल तर त्यांनी आम्हाला उत्तरे द्यावीत. निधीचे समान वाटप झाले पाहिजे अशी माझी शासनाकडे मागणी आहे.

2...

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, या वर्षी अलिबाग नगरपालिकेला फक्त 60 लाख रुपये एवढाच निधी दिला गेला. इतर नगरपालिकांना मात्र 10 कोटी, 15 कोटी अशा प्रकारे निधी दिला गेला. सभापती महोदय, या शासनाने आमच्या नगरपालिकेला गेल्या दहा वर्षापासून अत्यल्प प्रमाणात निधी दिला आहे ही अतिशय खेदाची बाब आहे. तरीही 30 वर्षापासून अलिबाग नगरपालिका माझ्या ताब्यात आहे. या नगरपालिकेत 17 नगरसेवकांपैकी 16 नगरसेवक माझे आहेत. शासनाने निधी दिला नाही ही गोष्ट जनतेला कळते्. निधीचे वाटप समान होणार नाही असे शासनाने स्पष्टपणे सभागृहात सांगून टाकावे.

सभापती महोदय, 1962 साली शेतकरी कामगार पक्षाकडून आमदारकी गेली. त्यावेळेस श्री.दत्ताजी खानविलकर आमदार म्हणून अलिबाग मधून निवडून आले होते. त्यावेळी सहकारी तत्वावर भात गिरण्या काढण्याचा मोठा निर्णय झाला. त्यावेळी सहकारी तत्वावर भात गिरण्या काढण्यासंदर्भातील मोळे जाळे तयार झाले होते. अलिबाग तालुक्यात पाच भात गिरण्या शेतकरी कामगार पक्षाने काढल्या, तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याकडे फाईल गेली, त्यावेळी सर्व कॉंग्रेस पक्षाचे शिष्टमंडळ गेले, त्यावेळी त्यांनी शिष्टमंडळास सांगितले की, तुमचे कोणी हात बांधले होते काय ? त्यांनी पाच भात गिरण्या उभारल्या, तुम्ही दहा भात गिरण्या उभ्या करा. तुम्ही प्रस्ताव करा, त्या प्रस्तावाला मी मंजुरी देईन. परंतु विरोधक म्हणून मी त्यांची कामे अडविणार नाही असा कानमंत्र त्यांना दिला. अलिबाग तालुक्यात 23 सहकारी भात गिरण्या आहेत, त्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या 18 सहकारी भात गिरण्या आजही चालू आहेत. अशा प्रकारचे काम केले पाहिजे. मी माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्करराव जाधव यांना सांगू इच्छितो की, हे आडावरचे पाणी आहे. ते आज आहे उद्या नसेल. असे काम करुन दाखविले पाहिजे की, आपले नाव इतिहासात नोंदविले गेले पाहिजे.

सभापती महोदय, माजी मुख्यमंत्री श्री.शरदराव पवार निधीचे समान वाटप करावयाचे. परंतु या बाबतीत छोटे पवार साहेब काय म्हणणार, सरदार बोलणार, त्याप्रमाणे इतर लोक कामे करणार. हे जास्त दिवस चालणार नाही. ही लोकशाही आहे. ज्या पध्दतीने कामे करावयास पाहिजे, तशी कामे आम्ही केलेली आहेत....

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...........

मधुकररावांना मी ओपनली मदत केली. आम्ही तेथे एकत्र बसलो. नियोजन केले आणि माझ्या एका मतावर मार्केट कमिटीचे चेअरमन पद त्यांना मिळाले. माझ्यावर भरपूर प्रेशर आले. आम्ही निवडून दिले. मधुकररावांना मत देतो हे स्पष्ट केले. निवडणूक अधिकारी काही बोलले नाहीत. जे करता येत नाही ते जयंत पाटील करतो. तुम्ही मंत्री आहात, योग्य पध्दतीने काम केले पाहिजे, अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, नगर विकास विभागाची बाब क्रमांक 28, पृष्ठ क्रमांक 51. आज सीआरझ ोड नियमांचा बाऊ केला जात आहे. मंत्री महोदयांनी या विषयाबाबत अनेकदा बैठका घेतल्या आहेत. कोकणातील मालवण, रत्नागिरी आणि अलिबाग या तीन नगरपालिकांच्या क्षेत्रात सीआरझ ोडचा विषय ऐरणीवर आलेला आहे. या तीनही नगरपालिकांच्या क्षेत्रात सीआरझेड नियमांमुळे एकही घर बांधता येत नाही किंवा घराची दुरुस्ती करता येत नाही. म्हणून मंत्री महोदयांनी या विषयाबाबत शासनाचे ठोस धोरण आणि उपाययोजना जाहीर करण्यासाठी दिल्लीतील वन व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाची बाब क्रमांक 83, पृष्ठ क्रमांक 78. शासनाचे प्रलंबित खटले या संदर्भात पुरवणी मागणी सादर केली आहे. सन 1986 ते 2011 या काळातील ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद आणि नांदेड येथील न्यायालयात 2173 आणि 2002 ते 2001 या काळातील 2014 खटल्यांचा तातडीने निर्णय लागण्यासाठी शासनाने यंत्रणा निर्माण करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 60, पृष्ठ क्रमांक 55. निवृत्ती वेतनाकरिता 817 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. आमदारांचे स्वीय सहाय्यक आहेत त्यांच्या वेतनामध्ये वाढ केली जात नाही. सर्वांची पगारवाढ होते. परंतु आमदारांच्या स्वीय सहाय्यकांना 8000 रुपये वेतन दिले जाते. त्यांना किमान 20 हजार रुपये दरमहा वेतन दिले जावे. आमदारांचे स्वीय सहाय्यक हे प्रामाणिकपणे काम करतात, प्रवास खर्च, राहण्याचा खर्च यात वाढ झालेली असल्यामुळे त्यांच्या वेतनामध्ये वाढ करुन दरमहा 20 हजार रुपये करण्यात यावे अशी या निमित्ताने मागणी करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...........

सभापती महोदय, बाब क्रमांक 113, पृष्ठ क्रमांक 105. कोकण पॅकेज अंतर्गत वाडी जोड रस्त्यासाठी 2.5 कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. रायगड जिल्हयास 2010-2011 या वर्षात वाडी जोड रस्त्याच्या कामासाठी शासनाने निकषात बसलेले नसल्यामुळे विधिमंडळाच्या सदस्या श्रीमती मिनाक्षी पाटील यांनी पीआयएल एसटी 7628/2011 दाखल केली आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. याचिकेचा निकाल लागल्यानंतरच वाडी जोड रस्त्याचे कामावर खर्च करण्यात यावा, अशी माझी मागणी आहे. वाडी जोड रस्त्यासाठी नियोजन विभागाने निधी प्रस्तावित केला आहे.

4डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील......

सभापती महोदय, बाब क्रमांक 61, पृष्ठ क्रमांक 61, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भात मी विचार व्यक्त करणार आहे. मुंबई ते पनवेल येण्यासाठी जेवढा वेळ लागतो तेवढाच वेळ वडखळ ते अलिबाग येण्यासाठी लागतो. परंतु अलिबाग ते पेण येण्यासाठी आता दुप्पट वेळ लागतो. वडखळ ते पेण हा चौपदरी रस्ता होतो आहे. वडखळ ते अलिबाग येथील धरमतर ब्रिजचा 18 महिन्यांनी टोल बंद होणार आहे. म्हणून आपण हे काम बीओटीवर घेतले तरी चालेल परंतु वडखळ ते अलिबाग चौपदरी रस्ता होण्याची नितांत आवश्यकता आहे. या रस्त्यासाठी फक्त 211 कोटी रुपये खर्च येणार आहे. या ठिकाणी जागेच्या ॲक्वीझीशनचा काही एक प्रश्न नाही. त्यामुळे राज्य शासनाने या रस्त्याचे काम पूर्ण करावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 15, पृष्ठ क्रमांक 13, गृह विभागाच्या मागण्यांवर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी भटक्या "युरोपियन लोकांना" असा उल्लेख करण्यात आला असून त्या ऐवजी "परदेशी लोकांना" असा उल्लेख करण्याची आवश्यकता आहे. युरोपातील लोक आले तर त्यांना तुम्ही परत पाठविणार व अमेरिका, आफ्रिकेतील लोक आले तर त्यांना तुम्ही ठेवणार असे काही होणार आहे काय ? त्यामुळे यासंदर्भात जो चुकीचा उल्लेख करण्यात आलेला आहे तो दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे.आता पर्यंत तुम्ही किती लोकांना परत पाठवले आहे ? या मागणीसाठी आपण 10 लक्ष रुपयांची मागणी केलेली आहे. त्यामुळे आतापर्यंत आपण कोण कोणत्या देशातील लोकांना मायदेशी पाठविले, ज्या लोकांना मायदेशी पाठविले ते कोणत्या मार्गाने भारतामध्ये आले होते ? हे लोक जल मार्गाने, रेल्वे मार्गाने आले होते की, विमानाने आले होते याची माहिती आता देणे शक्य नसेल तर ती माहिती पटलावर ठेवावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय,बाब क्रमांक 133, पृष्ठ क्रमांक 130 आदिवासी विकास विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सभागृहात गेल्यावर्षी मी अलिबागमधील वायशेतच्या रस्त्याचे काम करण्याची विनंती केली होती तेव्हा मंत्री महोदयांनी मला बाहेर येऊन तुमचे काम होईल असे सांगितले होते परंतु या रस्त्याचे काम अजूनपर्यंत सुरु झालेले नाही. मी सुध्दा अर्धा आदिवासीच आहे, आदिवासींमध्ये जातो, राहतो, जेवतो. माझ्या तालुक्यामध्ये जेवढे आदिवासी लोक आहेत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील......

त्यांच्यातील 75 टक्के जनता माझ्या पाठीशी आहे. माझ्या तालुक्यात आदिवासी वाडयात एकच रस्ता आहे परंतु तो सुध्दा झालेला नाही. या रस्त्यांच्या संदर्भात पूरक मागण्यांच्या माध्यमातून दोन वेळेस मी मागणी केली, मंत्री महोदयांनीही कबूलही केले होते त्यामुळे वायशेत रस्त्याचे काम व्हावे अशी मी पूरक मागण्यांच्या माध्यमातून विनंती करतो.

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील कर्जत तालुका हा 75 टक्के आदिवासी तालुका आहे. या ठिकाणचे काम आदिवासी योजनेतून करावे अशी विनंती आहे. एस.टी. तोटयात आहे याची मला कल्पना आहे त्यामुळे आदिवासी विभागाच्या माध्यमातून हे काम करण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 4, पृष्ठ क्रमांक 8 च्या गृह विभागाच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, तुम्ही लोकांचे संरक्षण करावे अशी अपेक्षा आम्ही व्यक्त करीत असतो. परंतु तुम्ही माननीय मंत्री महोदय श्री गुलाबराव देवकरांच्या खात्यावर कशासाठी आक्रमण करता ? माननीय गुलाबराव देवकर प्रभावीपणे त्यांच्या आरटीओचे काम करीत आहेत, त्यांचे काम वाढत चालले आहे. परंतु तुमची पोलीस यंत्रणा कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलांचे मोटर सायकल अडविण्याचे काम करीत आहे. पोलिसांचे चेक नाके नसून ते लाच घेणारे नाके झालेले आहेत. आता मोटार सायकल चालवणारी मुले लायसन्स काढत नाही अशी परिस्थिती राहिलेली नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

आता प्रत्येक जण लायसेन्स काढतो. आज पोलीस लायसेन्स तपासत आहेत. लायसेन्स तपासणे हे कोणाचे काम आहे ? एखाद्या ठिकाणी बेकायदेशीर वाहतूक होत असेल तर, लायसेन्स न घेता कोणी गाडी चालवत असेल तर संबंधित विभागाला आपण कळविले पाहिजे. यात पोलिसांचे काय काम आहे ? माझ्या तालुक्यात तीन चेक नाके आहेत. माझ्या गावात एक चेक नाका आहे. दुसरा चेक नाका मांडव्याला आहे. मी माझी गाडी थांबवली होती. माझ्या समोर तो पोलीस त्या मुलांकडून पैसे घेत होता. मी पोलिसाला विचारले की तू हे काय करतो आहेस ? मी आमदार आहे. तो पोलीस नवीन आला होता.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितलेला प्रकार जितका खरा आहे तितकाच मी आपल्याला आजचा प्रकार सांगतो. तो मुद्दा विसरण्यापूर्वीच मी आपल्याला सांगतो. विधान सभेतील एक आमदार सी-लिंक ने येत होते. या मार्गाच्या शेवटी श्री.सचिन सूर्यवंशी या अधिकाऱ्याने ज्या गाडीत आमदार मागे झोपले होते ती गाडी थांबवली. ती गाडी थांबवल्यानंतर ड्रायव्हरला दोषारोपाची पावती दिली. आमदार उठले आणि त्यांनी त्या शिपायाला जाऊन विचारले की, हे दुसरे कलम कशासाठी लावले आहे ? शिपायाने साहेबांकडे बोट दाखवले. आमदारानी त्या अधिकाऱ्याला विचारले की, हे कलम कुठले आहे ? त्यांनी सांगितले जे कलम लिहिले आहे ते योग्य आहे. त्यांनी परत त्यांना विचारले की, हे कलम कुठले आहे ? त्यांनी सांगितले की, मी आमदार आहे. तेव्हा तो अधिकारी म्हणाला की, तू आमदार असू दे आणि कोणी असू दे, मी तुला ओळखत नाही. त्यानंतर त्याने आमदाराच्या बापाचा चक्क उद्धार केला आहे. याची पूर्णपणे व्हिडिओ कॅसेट काढण्यात आली आहे. ती कॅसेट मी स्वत: पाहिली आहे. ती पाहिल्यानंतर मला देखील आश्चर्याचा धक्का बसला की, एखादा पीएसआय एवढा ॲरोगंट कसा असू शकतो ? त्यानंतर ते आमदार स्वत: वरळी पोलीस ठाण्यामध्ये गेले. तेव्हा तेथे श्री.कोरे नावाचे कोणी तरी सिनिअर पी.आय.होते. तो पर्यंत श्री.सूर्यवंशी हा आमदारा विरूद्ध एफआयआर दाखल करण्यासाठी पोहोचला होता. तू माझे काय करू शकतोस, तुझ्या विरूद्ध कसा एफआयआर द्यायचा हे मी बघतो असे त्या चित्रफितीमध्ये आले आहे. त्यांनी शेवटी सांगितले की, मी आमदार

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**....

आहे त्यावेळी हे उद्गार काढण्यात आले आहेत. आपणास हवी असल्यास ती व्हिडिओ कॅसेट पूर्णपणे पहावी. अशा प्रकारे उद्दाम वागणाऱ्या पीएसआय विरूद्ध आपण आजच्या आज कारवाई करावी एवढेच मी या निमित्ताने सांगत आहे. या संपूर्ण प्रकाराची त्यांनी व्हिडिओ कॅसेट काढली आहे ती त्यांना पाच मिनिटामध्ये वर आणायला सांगतो. आपण ती स्वत: पाहून खात्री करून घ्यावी आणि त्यात आपल्याला सत्यता पटली तर आपण त्यासंबंधी कायदेशीर कारवाई करावी.

(दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ती कॅसेट बघून निश्चितपणे योग्य ती कारवाई केली जाईल. आमदाराचा सन्मान राखला पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. नेमके काय घडले आहे हे बघून निश्चितपणे कारवाई केली जाईल.

(दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : मंत्री महोदय, आपण फार तर असे सांगावे की, या प्रकरणातील सत्यता पडताळून पाहतो व ती खरी असेल तर ......

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा सन्मान राखून मी सांगू इच्छितो की, ती कॅसेट बघून घेतो. यात अधिकारी चुकला असेल तर त्याला पाठीशी घातले जाणार नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उदाहरण दिल्यानंतर मी लगेच आज घडलेला प्रकार सांगितला. येत्या 5 ते 10 मिनिटामध्ये संबंधित आमदारांना मी वर बोलावून घेतो व आपणास कॅसेट दाखवितो.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात माननीय पीठासीन अधिकारी बोलतात हे खरे मानून संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई केली पाहिजे. असे असताना माननीय मंत्री महोदय तपासून कारवाई करतो असे म्हणत आहेत, ते काय तपासणार आहेत ?

**उप सभापती** : मी सभागृहाची बैठक सायंकाळी 5.45 वाजेपर्यंत स्थगित करतो. दरम्यानच्या काळात आपणास ती कॅसेट दाखवतो.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5.35 ते 5.45 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती डॉ.रणजित पाटील)**

**तालिका सभापती** (डॉ.रणजित पाटील) : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5.45 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली.)

--------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ. रणजित पाटील )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता तहकूब करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6.00 ते 6.10 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला थोडीशी सभागृहाला माहिती द्यावयाची आहे. मघाशी एक मंत्री महोदय असे म्हणाले की, तुमच्या मुलाला अडविले होते. माझ्या मुलाला गाडीच्या नंबर प्लेटच्या कारणास्तव फक्त एकदाच एअरपोर्टवर अडविले होते. मला सांगताना खेद होतो आहे की, आदरणीय सभापतींना सुध्दा 7-8 दिवसांपूर्वी अडविले होते वरळी पोलीस स्टेशनला त्यांना घेऊन गेले होते. त्यांनी स्वत: हे सांगितलेले आहे. त्यांना तेथे घेऊन गेल्यावर ते कोण आहेत ते समजले. पोलीस स्टेशनमध्ये ड्रायव्हरने त्यांना सांगितले की, हे विधानपरिषदेचे सभापती आहेत. त्यावर पोलिसांनी सभापती वगैरे काही माहीत नाही असे सांगितले होते. अशी त्यांची भाषा होती. माननीय सभापतींची ही अवस्था आहे तर बाकीच्या सर्वसामान्य लोकांची अवस्था होत असेल याची आपण कल्पना करु शकत नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये ज्या गोष्टीबाबत चर्चा सुरु आहे ती पाहता केवळ आमदारांच्याच बाबतीत नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांना सौजन्याची वागणूक दिली पाहिजे. हे आपल्याबरोबर गृह मंत्री म्हणून माझेही मत आहे. आज जो अनुभव आलेला आहे त्याबाबत माझ्या पोलीस दलाला योग्य संदेश जावा म्हणून मी दिलगिरी व्यक्त करतो.

सभापती महोदय, या सगळ्या गोष्टींची शासनाकडून चौकशी होईलच. परंतु चौकशी होईपर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहाची बैठक स्थगित झाल्यानंतर अनेक सन्माननीय सदस्यांनी माझ्यासारख्याच भावना व्यक्त केलेल्या आहेत. कॉलेजच्या मुला व मुलींना अडवून मुद्दाम थांबविले जाते. त्यांच्याकडे लायसन्स विचारले जाते. मुलगी दिसण्यास चांगली असेल तर जास्त वेळ थांबविले जाते. मी हे डोळ्यांनी पाहिलेले आहे. माझ्या अलिबाग तालुक्यातील मांडवा येथील पोलिसाला कालच अडविले होते. मांडवा पोलीस स्टेशनमध्ये सांगली जिल्ह्यातील श्री.मदने नावाचे पोलीस कर्मचारी आहेत. मी त्यांना असे विचारले की, तुम्ही विदर्भातील दिसत आहात. त्यांनी मला सांगितले की, मी इस्लामपूरचा आहे. त्यावर मी त्यांना

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.जयंत प्र.पाटील.....

तुम्ही माझ्या गावचेच आहात असे सांगितले. त्या कर्मचाऱ्याचे रोजचे 2 लाख रुपयांचे टार्गेट आहे. दररोज 2 लाख रुपये कमीत कमी मिळाले पाहिजेत असे तो मला म्हणाला आहे. त्या भागात सर्व बंगलेवाले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांचाही बंगला आहे. त्यांचाही तेथे वाद झाला होता. मला सांगण्यास दु:ख होत आहे. पोलीस विभाग आणि सीआरझेडचा काय संबंध आहे ? सीआरझेडबाबत कोणत्याही तहसीलदार किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी पोलीस विभागाकडे तक्रार करण्याची गरज नाही. त्यासाठी वेगळी ॲथोरिटी आहे. पर्यावरण विभाग, सीआरझेड ॲथोरिटी आणि सेंट्रल गव्हर्नमेंटकडे अपील करता येते. ते विभाग गुन्हा दाखल करु शकतात. मी त्यांना फोन केला असता, आमदारांचे काही नाही, शासनाने कायदा केलेला आहे, तलाठ्यांनी तक्रार केल्यानंतर ती मला घेतलीच पाहिजे असे त्यांनी मला सांगितले. सीआरझेडमधील साध्या शेतकऱ्याकडून त्यांनी 3 लाख रुपये घेतले. हे कोठे तरी थांबले पाहिजे. महाराष्ट्रातील तमाम आमदारांच्या भावना आहेत. पोलिसांची चाललेली अरेरावी थांबली पाहिजे. लोकप्रतिनिधींकडे त्यांचा बघण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. लोकप्रतिनिधींसंबंधी वेगळ्या तऱ्हेचे वक्तव्य करतात. त्यांनी काम करु नये. निदान आम्ही तेथे गेल्यावर आमच्याकडे लक्ष द्यावे. शासनाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे लोकप्रतिनिधी, आमदार तेथे गेल्यावर त्यांनी सॅल्युट मारला पाहिजे. सन्मानाने वागले पाहिजे, बसावयास सांगितले पाहिजे. हे सर्व न पाळता उलट अशा पध्दतीने ते बोलत आहेत. माननीय श्री.आर.आर.पाटील हे गृह मंत्रीपदी असताना असे होता कामा नये अशी अपेक्षा मी व्यक्त करतो आणि पूरक मागण्यांवरील माझे विचार संपवितो.

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, विधानसभेमध्ये देखील चर्चा सुरु आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी एक पोलीस कर्मचारी श्री. मदने याच्या संबंधी तक्रार केलेली आहे. मी येथेच डिक्लेअर करतो की त्याच्या सर्व इस्टेटीची ॲण्टीकरप्शन मार्फत ओपन चौकशी होईल. ते हप्ते घेतात, काय करतात या संदर्भात आपणाकडे जे काही पुरावे असतील ते ॲण्टी करप्शनला दिले पाहिजे. केवळ ॲलिगेशनवर आम्ही देखील कारवाई करु शकत नाही. परंतु आपल्याकडे जे पुरावे असतील ते चौकशीच्या दरम्यान आम्ही विचारु त्यावेळी आपण सर्व पुरावे द्यावेत. तो जर दोषी निघाला तर मी आपल्याला खात्री देतो की, तो पोलीस दलात असणार नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : आता पुरावे म्हणजे ग्रामपंचायतीचे सरपंच आहेत, जिल्हा परिषदेचे सदस्य आहेत, पंचायत समितीचे सदस्य आहेत. अशा 25 लोकप्रतिनिधींना मी उभे करीन. तो काय करतो, कशा प्रकारे पैसे मागतो हे मी दाखवितो. तुमच्या समोर आणतो, मग तुमची खात्री पटेल अशी माझी खात्री आहे.

श्री. आर.आर.पाटील : एखाद्या कर्मचा-यावर ॲलिगेशन करताना आणि त्यासंदर्भात चौकशी करताना कोणत्या पध्दतीचे पुरावे लागतात हे आपल्या सर्वांना माहीत आहे. म्हणून मी आधीच सांगितले की, त्याच्या सर्व इस्टेटीची ओपन इन्क्वायरी करण्याच्या सूचना आजच आम्ही देऊ. पण सन्माननीय सदस्यांनी जे काही सांगितले त्या संदर्भात काही पुरावे असतील तर ते त्यांनी द्यावेत. पैसे देणारी संबंधित माणसे असतील ती ती जरुर ग्राह्य मानली जातील. याबाबतीत जे काही पुरावे असतील, ज्यांचा संबंध असेल, ज्याचे काम असेल त्यांचे सर्व पुरावे द्यावेत.आम्ही सर्व चौकशी करु.

--

**उप सभापती** : सभागृहाची वेळ 8.00 वाजेपर्यन्त वाढविण्यात येत आहे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी केवळ सहकार खात्याच्या संदर्भात महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. मी विस्तृत भाषण करणार नाही. परंतु सभागृहामध्ये सहकार खात्याचे कोणीही मंत्री हजर नाहीत. त्यांना सभागृहामध्ये उपस्थित राहाण्यास सांगावे अन्यथा मी नंतर माझे विचार मांडतो.

**उप सभापती** : ठीक आहे.

--

...नंतर श्री.गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले, परंतु त्या उत्तरात त्यांनी थोडे राजकारण आणले. युती सरकारचे साडेचार वर्षातील कामकाज महाराष्ट्रातील जनतेला पसंत पडले नाही म्हणून सलग 14 वर्षे जनतेने आम्हाला सत्तेवर आणले आहे. मला त्यांना विनंतीपूर्वक सांगावयाचे आहे की, युती सरकारच्या साडेचार वर्षाच्या कालावधीमध्ये 18 हजार कोटी रुपये खर्च केले, त्याचा एका मिनिटात मी हिशोब देऊ शकतो. परंतु तुम्ही गेल्या 14 वर्षामध्ये 2 लाख 85 हजार कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे, त्याचा या सभागृहाला हिशोब देण्यात यावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 56, पान क्रमांक 102 ही वित्त विभागाची बाब आहे. त्यावर मी बोलत आहे. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना प्रथमच अशा प्रकारचे राजकीय भाषण करताना पाहिले. मला त्यांच्याकडून अशी अपेक्षा नव्हती.

सभापती महोदय, मी भाषण करणार नाही, काही महत्वाच्या सूचना करणार आहे. पृष्ठ क्रमांक 61, बाब क्रमांक 61, 62 आणि 63 या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या आहेत. मुंबई-गोवा रस्त्याचे चौपदरी करण्याचा दुसरा टप्पा आहे, त्या कामाबाबत आताची परिस्थिती काय आहे त्या बाबतची आम्हाला माहिती मिळाली तर बरे होईल. महाराष्ट्रातील बरेचसे रस्ते चौपदरी इ ाालेले आहेत. तुम्ही सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करता. मुंबई-गोवा रस्त्याचे चौपदरीकरण होत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. या रस्त्याच्या दुसऱ्या टप्प्याची सद्य:स्थिती काय आहे, या कामासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झाला आहे काय, या बाबतची मला माहिती मिळणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाची बाब क्रमांक 116,117, 118 व पान क्रमांक 114 व 115 यावर माझे विचार मी व्यक्त करीत आहे. माननीय श्री.विनोद तावडे यांनी अनावधानाने दोन वेळा उल्लेख केला की, गिरणी कामगारांचा घराचा प्रश्न सुटला. परंतु गिरणी कामगारांचा घरांचा प्रश्न सुटलेला नाही हे मी नम्रपणे सांगू इच्छितो. 6 हजार गिरणी कामगारांना घराचे वाटप केले म्हणून तो प्रश्न सुटलेला नाही. गिरणी कामगारांच्या घरासाठी जागेसंदर्भात आजची स्थिती काय आहे या बाबतची देखील मला माहिती मिळावी.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, पाच विकासकांना 100, 110 आणि 120 एकर जागा शासनाने 3 के च्या माध्यमातून दिली. ती जागा विकासकांना न देता म्हाडाकडून विकसित केली गेली तर सगळया गिरणी कामगारांना घरे मिळू शकतील. गिरणी कामगारांच्या जिवावर आपण या सभागृहात आलो आहोत, त्यांना न्याय दिला गेला पाहिजे. गिरणी कामगारांपेक्षा विकासक मोठे नाहीत. ती जागा विकासकांना न देता गिरणी कामगारांच्या घरांसाठी हे शासन उपलब्ध करुन देईल काय या बाबतचा देखील माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा केला पाहिजे.

सभापती महोदय, विकास नियंत्रण नियमावली 1991 नुसार इमारतीची पुर्नबांधणी करताना म्हाडासाठी राखीव असलेल्या जागा म्हाडाकडे हस्तांतरित करणे बंधनकारक असते. या ठिकाणी गृहनिर्माण राज्यमंत्री उपस्थित नाहीत. माझ्या प्रश्नाचे उत्तर कोण देईल याची मला माहिती नाही. मुंबईत 3 लाख 200 चौरस फुटापेक्षा जास्त जागा विकासकाने परस्पर बाजारभावाने विकली. सदरच्या जागा म्हाडाला हस्तांतरित करावयास पाहिजे होत्या. या जागा भायखळा,दादर, विले-पार्ले या ठिकाणच्या आहेत. त्या जागांना खूप भाव आहे. या जागेमध्ये 3 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. माझ्याकडे यासंदर्भातील यादी आहे, त्यात कोणती इमारत आहे, त्या इमारतीचे नाव, इमारत पुर्नबांधणी करणाऱ्या विकासकाचे नाव, त्या इमारतीत किती फ्लॅट आहेत यासंबंधी सर्व माहिती नमूद केलेली आहे, सभापती महोदय, ती यादी मी आपणाकडे पाठवितो. एकीकडे राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत. केंद्राकडून आर्थिक मदत मिळेल म्हणून आपण कटोरा घेऊन बसलो आहोत. परंतु या ठिकाणी 3 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होतो आहे, ही अतिशय दुर्देवाची गोष्ट आहे. सभापती महोदय, मी आपणास जी यादी सादर करणार आहे, ती यादी आपण माननीय मुख्यमंत्र्यांकडे द्यावी. ज्यांनी सदरच्या जागा परस्पर विकून पैसे खाल्ले, त्यांच्या घशातून ही संपूर्ण रक्कम काढा आणि ती रक्कम सरकारच्या तिजोरीत जमा करा.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.रामदास कदम..........

सभापती महोदय, आदिवासी भागातील आश्रमशाळांसाठी 6.30 कोटी रुपयांच्या चटयांची खरेदी करण्यात आली. एका चटईची किंमत 2000 रुपये इतकी दर्शविण्यात आली आहे. या खरेदीची चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. गॅस शेगडीची किंमत बाजारात 500 ते 800 रुपये असताना 1400 रुपये प्रती नग या दराने 30000 गॅस शेगड्या खरेदी करण्यात आल्या. कृषी पंपाची बाजारातील किंमत 15000 रुपये असताना 19000 प्रती नग या दराने 8500 कृषी पंपांची खरेदी करण्यात येऊन कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आला. या सर्व खरेदी प्रकरणांची सीबीआय मार्फत चौकशी झाली पाहिजे. आदिवासी समाजाचा निधी कोणाच्या खिशात गेला हे बाहेर आले पाहिजे.

सभापती महोदय, आदिवासी विभागातील 60 टक्के पदे आज रिक्त आहेत. प्रत्येक अधिवेशनात शासनाकडून आश्वासन दिले जाते की, तातडीने रिक्त पदे भरण्यात येतील. परंतु दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होत नाही. पर्यायाने आदिवासी समाजाला न्याय मिळत नाही. आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन देणे, शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करणे, धान्य वाटप, खावटी वाटप, वन उपज खरेदी आदी योजनांची रिक्त पदांमुळे प्रभावी अंमलबजावणी होत नाही. या योजना केवळ कागदावर राहिलेल्या आहेत. आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी कधी होणार आहे?

सभापती महोदय, राज्यातील कोणताही आदिवासी माणूस बेघर राहू नये म्हणून सरकारने घरकुल योजना राबविण्यास सुरुवात केली. ठाणे जिल्हयातील मोखाडा, वाडा, जव्हार व विक्रमगड या तालुक्यात फक्त 300 घरकुले देण्यात आलेली आहेत. आदिवासी लोक आपल्याला कधी घरकुल मिळणार या आशेने सरकारी अधिकाऱ्यांकडे नजर लावून बसले आहेत. ठाणे जिल्हयातील मोखाडा, वाडा, जव्हार, विक्रमगड तालुक्यातील आदिवासी समाजाला अशाप्रकारे न्याय मिळणार असेल तर मेळघाट परिसरातील आदिवासींची व्यथा काय असावी? या योजनेचा पैसा कुठे गेला याची विभागाने चौकशी करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शेतीच्या संदर्भात केंद्रीय कृषीमंत्री श्री.शरद पवार यांनी लोकसभेमध्ये उत्तर देताना अशी माहिती दिली की, मागील दहा महिन्यात विदर्भात 228 शेतक-यांनी आत्महत्या केली. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र नेमके केव्हा थांबणार आहे? शेतकऱ्यांच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..........

आत्महत्या थांबण्यासाठी शासनाने डॉ.नरेंद्र जाधव यांची समिती नेमली होती. या समितीने केलेल्या शिफारशी शासनाने स्वीकारलेल्या आहेत. तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते की, आम्ही शिफारशींची 100 टक्के अंमलबजावणी करु. मागील साडेचार वर्षात समितीच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी झालेली नाही, परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत. या अहवालातील शिफारशी अंमलात आल्या तर सभागृहात चर्चा करण्याची गरज भासणार नाही. असे म्हणतात की, झोपेचे सोंग घेतलेल्याला जागे करता येत नाही. हे शासन झोपी गेलेले असल्यामुळे शासनाकडून काही घडेल अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशी कधी अंमलात आणणार आहात याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाकडून 302 मागासवर्गीय संस्थांना पहिल्या टप्प्यामध्ये 356 कोटी रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले. दुसऱ्या हप्त्याची रक्कम घेण्यासाठी 302 पैकी फक्त 70 संस्था पुढे आल्या. उर्वरित संस्था पुढे आल्या नाहीत, याचा अर्थ या 232 संस्था बोगस आहेत. 356 कोटी रुपये नेमके कुठे गेले याचा खुलासा होणे आवश्यक आहे. आदिवासी विकास महामंडळाकडून ब्लॅकेटची खरेदी करण्यात आली. सोलापूरच्या संस्थेला पुरवठ्याचे कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले होते.

नंतर 4एम.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

सभापती महोदय, ज्या ठेकेदाराचा स्वत:चा ब्लँकेटचा कारखाना नाही अशा ठेकेदाराचा ब्लँकेटचा ठेका देण्यात आला. या ठेकेदाराने महिला मंडळाच्या नावावर सोलापूर ग्रामोद्योग घोंगडी उत्पादक सहकारी संस्थेच्या नावाने बोगस ठेका घेतला. या ठेकेदाराचा स्वत:चे ब्लँकेट तयार करण्याचा कारखाना नसतांना, महिला मंडळ नसतांना ब्लॅकेंटमध्ये जो भ्रष्टाचार झालेला आहे याची चौकशी होण्याची आवश्यकता असून त्याचा उल्लेख माननीय मंत्री महोदयानी आपल्या भाषणात करावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

जय हिंद,जय महाराष्ट्र.

------------------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) :सभापती महोदय, बाब क्रमांक 57, पृष्ठ क्रमांक 51, नगरविकास विभागावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. पुणे महानगर पालिकेमध्ये मूलभूत निधी देण्याची आवश्यकता आहे. मेट्रो प्रकल्प हा पुणे शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रकल्प आहे. पुण्यातील मेट्रो प्रकल्पाला केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे. केंद्र शासनाने परवाच्या बजेटमध्ये पुणे मेट्रोसाठी आर्थिक तरतूद जाहीर केलेली आहे. परंतु राज्य शासनाच्या वतीने जो 20 टक्के वाटा द्यावयाचा आहे तो दिलेला नाही. एकंदर 1596 कोटी रुपयांपैकी राज्य शासनाने किमान निधीची तरतूद करणे अपेक्षित होते. त्यामुळे मी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून पुणे मेट्रोसाठी राज्य शासनाने आपल्या हिश्याचा वाटा उचलण्यासाठी काही ना काही तरी निधीची तरतूद करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 63 वरील गृहनिर्माण विभागाच्या मागण्यांवर विचार मांडणार आहे. आरटीओ पुणे येथे जे ऑफिस आहे त्या कार्यालयाचे विभाजन करुन नव्याने कार्यालय बांधण्याची आवश्यकता आहे. परंतु त्यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. तरी उप प्रादेशिक कार्यालयात जागा व इमारतीसाठी शासनाने भरीव तरतूद करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 13, पृष्ठ क्रमांक 13,गृह विभागावर विचार मांडण्यासाठी उभा आहे. राज्यातील पुरस्कार प्राप्त तसेच विजेत्या पोलीस कर्मचाऱ्यांना आता बक्षिसाची जी रक्कम दिली जाते ती अतिशय अल्प दिली जाते. त्यामुळे बक्षिसाच्या रकमेमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, परिवहन विभागाच्या बाब क्रमांक 19, पृष्ठ क्रमांक 15 वर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्र मार्ग परिवहन मंडळाची सेवा बळकट होण्याची नितांत आवश्यकता आहे. गुजरात राज्य सरकार एस.टी.ला दर वर्षी 300 कोटी रुपये देत असते. कर्नाटक आणि आंध्रप्रदेश सरकारने सुध्दा एस.टी. चे कर कमी केलेले आहेत. आपल्या एस.टी. महामंडळाला 125 ते 150 कोटी रुपयांचा दर वर्षी टोल भरावा लागतो. राज्य शासनाच्या शासकीय वाहनांना टोलमध्ये जशी सूट मिळते तशीच सूट एस.टी. बसेसला टोल भरण्यामध्ये द्यावी. एसटीला टोल भरावा लागू नये अशी तरतूद शासनाने करण्याची आवश्यकता आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी......

शासनाच्या वतीने जर एस.टी. महामंडळाला एवढी जरी मदत झाली तर आज एस.टी. महामंडळाची आर्थिक परिस्थिती सुधारु शकते. त्यामुळे परिवहन मंत्र्यांनी टोलच्या संदर्भात प्रयत्न करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, अन्न पुरवठा विभागाच्या बाब क्रमांक 103, पृष्ठ क्रमांक 95 वर विचार मांडणार आहे. पुणे शहराच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या परिमंडळाच्या कार्यालयामध्ये अपूरा कर्मचारी वर्ग असून तेथे तातडीने कर्मचाऱ्यांची भरती करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयात नव्याने कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध तयार करण्याची आवश्यकता आहे.

त्यामुळे मी सादर केलेल्या 3-4 बाबीच्या संदर्भात शासनाने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, सभागृहात माननीय सहकार मंत्री उपस्थित झाल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सहकार विभागाच्या बाब क्रमांक 140 वर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना भाग भांडवल प्रदान करण्यासाठी तरतूद करणे या हेड खाली 40 कोटी,44 लाख, 15 हजार रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, धुळे व जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जालना, भांडवली जोखीम पर्याप्तता गुणोत्तराचे 4 टक्के प्रमाण पूर्ण होत नाही म्हणून या बँकाना भारतीय रिझर्व्ह बँकेने परवाना दिलेला नाही. या बँकांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार त्यांनी संनियंत्रण करणारी कृती योजना तयार करून भारतीय रिझर्व्ह बँकेकडे सादर केली व त्याचे कार्यान्वयन केले. या बँकांनी त्यांच्या एनपीएल मध्ये सुधारणा दाखविली आहे आणि इतर कर्ज वसुली, भाग भांडवल भरणाऱ्या सदस्यांच्या संख्येत वाढ आहे. रूपये 50.89 कोटी धुळे-नंदुरबार मध्यवर्ती सहकारी बँक लि.साठी व रूपये 20.20 कोटी जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.साठी असे एकूण रूपये 71.09 कोटी या सरकारचे भाग भांडवल बँकाना उपलब्ध केले तर हे या बँकाना भारतीय रिझर्व्ह बँकेकडून परवाना मिळण्याकरिता मदतीचे होईल.

माननीय सभापती महोदय, या राज्यातील सहा सहकारी बँका जेव्हा अडचणीत आल्या तेव्हा सहा जिल्ह्यातील लाखो शेतकरी अडचणीत आले. गेली पाच वर्षे त्या बँका अडचणीत आहेत. बँकेचे सीआरएआर कमी झाले. एनपीए कमी झाला. या सर्व बाबी या बँकांनी पूर्ण केल्या नाहीत म्हणून रिझर्व्ह बँकेने त्यांचे परवाने रद्द केले. बँकींग रेग्युलेशन ॲक्ट 1949 चे कलम 11 (1) मधील किमान भांडवल धारणेची अट पूर्ण करीत नसून आमच्या बुलढाणा बँकेस भारतीय रिझर्व्ह बँकेकडून बँक परवाना अद्याप प्राप्त झालेला नाही. मागच्या वेळी मी हा प्रश्न उपस्थित केला होता तेव्हा माननीय सहकार मंत्र्यांनी याच सभागृहात आश्वासन दिले होते की, जर कुठेही काही झाले नाही, नाबार्डने मदत केली नाही, रिझर्व्ह बँकेने मदत केली नाही तरी सुद्धा राज्य सरकार ही बँक बंद पडू देणार नाही. आता आपण जालना जिल्हा सहकारी बँकेला मदत करीत आहात. आता फक्त बुलढाणा जिल्हा सहकारी बँक ही अशी एकमेव बँक राहिली की, तिला आपण मदतीचा हात पुढे केलेला नाही. धुळे-नंदुरबार-जालना बँकेने आपले कृती आराखडे तयार करून वाटचाल केली होती. त्याच पद्धतीने बुलढाणा जिल्हा सहकारी बँक वाटचाल करीत आहे.

नाबार्ड पुणे यांचे सूचनेनुसार सन 2004 ते 2006 पर्यंतचा कृती आराखडा बँकेने दिनांक 2.7.2003 रोजी राज्य सहकारी बँक.मर्या.मुंबई यांच्यामार्फत सादर केला होता. त्यास भारत सरकारकडून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

दिनांक 31.3.2006 पर्यंत सवलत मिळाली होती. त्यानंतरही पूर्तता न झाल्यामुळे सन 2007 ते 2012 पर्यंतचा ॲक्शन प्लॅन सादर करण्यात आला. भारत सरकारद्वारे 31 मार्च 2008 पर्यंत सवलत मंजूर करण्यात आली. दिनांक 31 मार्च 2008 अखेरीस नाबार्ड तपासणी नंतर पुन्हा कृती आराखडा सादर करण्यात आला व त्यास भारत सरकारद्वारा 31 मार्च 2010 पर्यंत सवलत मिळालेली आहे. दिनांक 31 मार्च 2012 पर्यंत सवलत मिळण्यासाठीचा कृती आराखडा दिनांक 23.2.1010 रोजी राज्य बँके मार्फत सादर केलेला आहे. त्यास भारत सरकारने दिनांक 31.3.2011 पावेतो सवलत दिलेली आहे. दिनांक 31.3.2013 पर्यंत सवलत मिळण्यासाठीचा कृती आराखडा दिनांक 24.5.2012 रोजी सादर करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या दिनांक 9.5.2012 च्या पत्रानुसार कलम 35 ए अंतर्गत निर्बंध लागू झाल्यामुळे दिनांक 4.6.2012 रोजी दिनांक 30.9.2012 पर्यंतचा मॉनीटेरेबल ॲक्टशन प्लान सादर करण्यात आला व टास्क फोर्सच्या दिनांक 12.6.2012 च्या सभेमध्ये सदर ॲक्शन प्लान मंजूर करण्यात आला.

बँकेची आजची आर्थिक स्थिती सांगून मी सभागृहाच वेळ घेणार नाही. बँकेने आपली स्थिती सुधारण्यासाठी जे जे प्रयत्न केले आहेत ते मी रेकॉर्डवर आणू इच्छितो. सीआरएआर राखण्यासाठी आजच्या घडीला बँकेला 140 कोटी रूपयांची गरज आहे. दिनांक 31.3.2011 रोजी सीआरएआर राखण्यासाठी आवश्यक रक्कम रूपये 15341.23 लाख एवढी होती. दिनांक 31.3.2012 रोजी सीआरएआर राखण्यासाठी आवश्यक रक्कम 14903.78 लाख होती. नाबार्ड स्नॅप ऑडीटनुसार रूपये 14898.42 लाखाची आवश्यकता होती.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

दिनांक 30.9.2012 ला 13 हजार 910 लाख रुपयांची गरज होती, दिनांक 28.2.2013 ला 13 हजार 286 लाख रुपयांची गरज होती, तर 18.3.2013 ला 10 हजार लाखांची गरज होती.

सभापती महोदय, चार टक्के सी.आर.ए.आर.राखण्यासाठी बँकेने जे प्रयत्न केले ते सांगतो. दिनांक 1.4.2012 पासून बँकेने 3176.53 लाख एनपीए कर्जाची वसुली केली आहे. शेती कर्ज - एनपीए कर्जवसुली 450.12 लाख केलेली आहे तर बिगर शेती एनपीए कर्जवसुली 2726.41 लाख केलेली आहे अशी एकूण 3176.53 लाख रुपयांची कर्ज वसुली बँकेने केलेली आहे.

सभापती महोदय, नाबार्डद्वारा करण्यात आलेल्या स्नॅप ऑडीट नंतर बँकेने रुपये 2501.53 लाख एनपीए कर्ज वसुली केली आहे. सेक्युरिटायझेशन कायद्यांतर्गत सहा युनिटवर कारवाई करुन 1976 लाख रुपयांची वसुली प्राप्त झाली आहे.

सभापती महोदय, बँकेने आपली मालमत्ता विकून आर्थिक स्थिती मजबूत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. बँकेची स्थावर मालमत्ता 9540 लाख रुपयांची आहे तर जंगम मालमत्ता 104 लाख रुपयांची आहे. दोन्ही रक्कम मिळून एकूण 9647 लाख रुपयांची मालमत्ता आहे. त्यापैकी बँकेने स्वत:च्या मालकीच्या सहा रिकाम्या प्लॉटसची विक्री केली असून त्यातून बँकेला 165.11 लाख रुपये प्राप्त झाले आहेत. बँकेच्या इतर सात मालमत्ता विक्रीसाठी माननीय सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मान्यता प्राप्त झाली असून त्या विक्रीतून बँकेला 4337 लाख रुपये प्राप्त होणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, बँकेस शासनाकडून येणे असलेली रक्कम पुढील प्रमाणे आहे. केंद्र शासनाकडून व्याज परताव्याची दोन टक्के म्हणजे 293.92 लाख रुपये मिळणे बाकी आहे. केंद्र शासनाकडून नियमित परतफेड करणाऱ्या सभासदांची व्याज सवलत तीन टक्के रक्कम म्हणजे 386.27 लाख रुपये मिळणे बाकी आहे. राज्य शासनाकडून तीन टक्के व्याज सवलतीचे 200.00 लाख रुपये मिळणे बाकी आहे. राज्य शासनाकडून बीएलव्हीए. (ग्रामीण कारागीर) कर्जमाफी योजनेतील 351.0 लाख रुपये मिळणे बाकी आहे. इतकी रक्कम बँकेला केंद्र आणि राज्य सरकारकडून येणे आहे अशी या बँकेची स्थिती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, मागील चार-पाच वर्षापासून या बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा होत होता. परंतु रिझर्व्ह आणि नाबार्डने घातलेल्या निर्बंधामुळे तो कर्ज पुरवठा आता बंद झाल्यासारखा आहे. बँकेने बिगर शेतीवाल्यांना जे कर्ज दिले आहे त्यांच्याकडून कर्ज येणे बाकी आहे. मग त्यामध्ये साखर कारखाने असतील, सूत गिरण्या असतील, लिफ्ट इरिगेशन असतील किंवा इतर संस्था असतील या संस्थानी बँकेकडून घेतलेले कर्ज फेडले नाही त्याचा फटका जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना बसलेला आहे. बँकेमध्ये शेतकऱ्यांचे डिपॉझीटस आहेत. सोसायट्या आता डबघाईस आलेल्या आहेत. बँक डबघाईस आलेली आहे. राज्य शासनाच्या योजना चालविण्यास दिलेला पैसा देखील त्या बँकेमध्ये आहे. हा पैसा देखील अडकून पडल्यामुळे ग्रामीण भागाचा आणि जिल्ह्याचा विकास थांबला आहे. शिक्षकांचे पगार देखील थांबले होते. परंतु आता ते वळते केल्यामुळे शिक्षकांचे पगार होत आहेत.

सभापती महोदय, माझी सहकार मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी इतर पाच बँकांचा विचार केला त्याप्रमाणे या बँकेचा देखील विचार करावा. केंद्र आणि राज्य स्तरावर बैठका झाल्या, केंद्रीय कृषी मंत्री महोदयांबरोबर बैठका झाल्या.त्यावेळी सर्वांनी पॉझीटीव्हली सांगितले होते. माननीय मंत्री महोदयांनी देखील मला सभागृहात आश्वासन दिले होते की, काहीही झाले तरी शेतकऱ्यांची बँक बंद होऊ देणार नाही. राज्य सरकार बँकेच्या पाठिशी उभी राहील. परंतु आज या ठिकाणी जी पुरवणी मागणी ठेवण्यात आली त्यामध्ये बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती बँकेचा समावेश नाही. तेव्हा बुलढाणा जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना जगविण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेऊन आणि या बँकेचा विचार करुन या ब्ँकेच्या पाठीशी शासन उभे राहणार आहे किंवा कसे हे या सभागृहात आज समजले पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभी आहे.

गृह विभाग, पृष्ठ क्रमांक 8, बाब क्रमांक 4 - गृह विभागाला सर्वात जास्त तरतूद दिली पाहिजे कारण आज महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे आणि ती अतिशय गंभीर बाब आहे. अमेरिकेच्या धर्तीवर वैद्यकीय चाचण्या, फॉरेन्सीक रिपोर्ट यासाठी प्रत्येक शहरात, तालुका पातळीवर तज्ज्ञ पोलीस नेमून त्यासाठी स्पेशल तरतूद केली पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

महिलांवर ॲसिड हल्ला झाल्यानंतर किंवा त्यांच्यावर बलात्कार झाल्यानंतर त्या महिलांचे शारीरिक आणि मानसिक आघातातून पुनर्वसन करण्यासाठी, त्यांना आपल्या पायावर उभे करण्यासाठी, त्यांच्यात जगण्याची उमेद निर्माण करण्यासाठी विशेष निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. शिवाय अशा घटनांतील महिलांवर रुग्णालयात दीर्घकालीन उपचार करण्यासाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. शिवाय यातून पोलीस फोर्स पूर्णपणे तयार होईल. आजच्या घडीला या कामासाठी कॉर्पस फंड निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या अनुषंगाने विशेष तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, पृष्ठ क्र.13, बाब क्र.15 च्या अनुषंगाने सांगू इच्छिते की, बांगलादेश आणि नेपाळमधून मोठ्या प्रमाणावर मुली अवैध मार्गाने आणून त्यांची मुंबई आणि इतर शहरातील कुंटणखान्यामध्ये विक्री केली जाते. कुंटणखान्यातून अनेक मुलींची सुटका करुन त्यांची रवानगी स्त्री सुधारगृहात केली जाते. महोदय, आम्ही राज्यातील निरनिराळ्या सुधारगृहांना भेटी दिल्या. त्यात असे निदर्शनास आले की, परराज्यातील मुलींना त्यांच्या स्वगृही पोहोचून देण्यासाठी निधीअभावी पोलीस दलाला फारसे काही करता येत नाही. त्यामुळे अशा मुलींना त्यांच्या स्वगृही पोहोचून देण्यासाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, पृष्ठ क्र.9, बाब क्र.8 च्या बाबतीत सांगू इच्छिते की, रात्रीच्या वेळी प्रवास करताना टोल नाक्यावर उभ्या असलेल्या वाहनांना टेल लाईट नसतात. त्यामुळे अंधारात वाहनांबाबत पूर्वकल्पना येत नाही. टेल लाईट नसलेल्या वाहनांना लगेच रेडीयम टेप लावून व त्यांना दंड आकारुनच ते सोडावेत अशी मी मागणी करते.

महोदय, पृष्ठ क्र.12, बाब क्र.12 च्या बाबतीत सांगू इच्छिते की, लोकल ट्रेनच्या अपघातामध्ये जखमी होणाऱ्या लोकांना तातडीने मदत मिळण्यासाठी, किंबहुना त्यांच्यावर प्रथमोपचार करण्यासाठी प्रत्येक रेल्वे स्टेशनवर ॲम्ब्युलन्सकरिता खास तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय विभागाच्या पृष्ट क्र.18, बाब क्र.27 वर मी बोलू इच्छिते. महोदय, अन्न प्रक्रिया साठवणुकीसाठी प्रत्येक 5-10 गावात एक प्रक्रिया केंद्र सुरु केले तर तेथील तरुण मुलांना रोजगाराची संधी निर्माण होईल आणि शहरांकडे

..2..

श्रीमती विद्या चव्हाण.....

येणारी संख्या कमी होऊ शकेल. यासाठी छोटेछोटे प्रक्रिया उद्योग सुरु केले पाहिजे. शिवाय त्या ठिकाणी दर्जेदार रस्त्यांसाठी विशेष तरतूद करणे आवश्यक आहे.

महोदय, कृषी विद्यापीठाचे संशोधन व त्याचा उपयोग शेतकऱ्यांना होण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. कोकणामध्ये हवामानाच्या बदलामुळे आंबा आणि काजूचे नुकसान होते. कोकणातील शेतकऱ्यांना ज्या हंगामात डिझेल आणि रॉकेलची आवश्यकता आहे त्या हंगामात डिझेल आणि रॉकेल उपलब्ध करुन देण्यासाठी पुरेशी तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, मत्स्य व्यवसायाच्या बाबतीत सांगू इच्छिते की, मुंबईमध्ये कोळीवाड्यांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यांच्यासाठी सुध्दा तरतूद करण्याची आवश्यकता आहे. मच्छीमार आणि आदिवासींच्या जमिनी बळकविण्याचे कारस्थान मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर सुरु झाले आहे. मासळी आणणे, वेगळी करणे आणि ती सुकविणे यासाठी असलेली राखीव जागा आणि मच्छीमारांची जुनी घरे नवीन करण्यासाठी तरतूद करणे गरजेचे आहे.

महोदय, पृष्ठ क्र.50, बाब क्र.55 च्या अनुषंगाने सांगू इच्छिते की, नगर विकास विभागाच्या माध्यमातून शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता मुंबईत विकासाची कामे होत आहेत. मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, जेएनएनयुआरएम च्या माध्यमातून ही कामे केली जातात. परंतु आज सी-लींकचे काम पुढे जात नाही. या ठिकाणी सांगण्यात आले की, मुंबईत कोस्टल रोड तयार होणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबई ट्रान्स हार्बर, एलिव्हेटेड लोकल ट्रेनसाठी 27 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याचे सांगितले आहे. हे आम्ही अनेक वर्षांपासून केवळ ऐकत आहोत. पण प्रत्यक्षात कार्यवाही होताना दिसून येत नाही.

महोदय, आज अनेक ठिकाणी पुलाची कामे अर्धवट अवस्थेत आहेत. परिणामी मुंबईत वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. सभापती महोदय, कृपया आपण भाषण संपविण्याची बेल वाजवू नका.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ...

सभापती महोदय, आपण वेळ संपल्याची घंटा वाजवित आहात. एक तर आपण मला उशिरा बोलण्याची संधी दिली. माझ्या बाबी मला पूर्ण करु दिल्या तर बरे होईल. सभागृहात फक्त दोनच महिला सदस्या उपस्थित आहेत. त्यांनाही जर आपण बोलण्याची संधी देत नसाल आणि सारखी घंटा वाजवित असाल तर ते बरोबर नाही. आधीचे वक्ते 15-15 मिनिटे बोलत होते तेव्हा आपण घंटा वाजविली नाही. मला असे वाटते की, मुंबई शहरावर बोलले की, आकस निर्माण होतो. कारण मुंबईबद्दल कोणालाच काही पडलेले नाही. या ठिकाणी जे मोठमोठे खुर्च्यांवर बसतात त्यात मुंबईचे कोणीही नाही. पाच हजार माणसे दरवर्षी लोकलच्या अपघातामध्ये मरतात पण त्याची कोणालाही पर्वा नाही. मुंबईचा बकालपणा मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे. दिल्ली आणि कलकत्ता या शहरांशी तुलना केली तर मुंबई शहर पूर्वी चांगले होते पण आता मुंबई शहर अतिशय बकाल होत चालले आहे. मुंबईची अतिशय दुर्दशा होत चालली आहे. त्यामुळे मुंबईसाठी काही तरी स्पेशल तरतूद करणे आवश्यक आहे. कारण एकूण महसुलातील 40 टक्के वाटा मुंबई शहर केंद्र शासनाला देते पण मुंबईकडे पूर्णपणे दुर्लक्ष होते. त्यामुळे जे अर्धवट पडलेले प्लान आहेत त्यांचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, पश्चिम उपनगरामध्ये वेस्टर्न एक्स्प्रेस वेवर एक मोठा नाला आहे. परवा डीपीडीसीची बैठक होती. त्या बैठकीमध्ये मी त्याबाबत सांगितले. त्या नाल्यावर कव्हर केलेले फायबरचे पत्रे पूर्ण तुटलेले आहेत. मुंबई हे शहर जागतिक दर्जाचे असताना, फॉरेनर्स या ठिकाणी येत असताना या ठिकाणी फाटके पत्रे दिसतात अशी अवस्था झालेली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या बैठकीमध्ये आयुक्त सांगतात की, ते काम आमच्याकडे नसून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला सांगितले तर ते काम करण्यास तयार होत नाहीत. आपण सगळ्यांना हे दारिद्र्य दाखविण्यासाठी आहोत का याचेही उत्तर मिळाले पाहिजे. झोपडपट्ट्या खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. म्हाडा एकटे किती लोकांना घरे देणार आहे हे सुध्दा समजत नाही. त्यामुळे या साठी काही तरी स्पेशल तरतूद करणे आवश्यक आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्रीमती विद्या चव्हाण .....

सभापती महोदय, यानंतर मी पृष्ठ क्रमांक 63 वरील बाब क्रमांक 62 बाबत बोलणार आहे. बांधकामाचा खर्च तसेच अनेक ठिकाणी कामाच्या बाबतीत क्वालिटी कंट्रोल कोठेही नाही. कामांची दुर्दशा झालेली आहे. मटेरियल कोणत्या प्रकारचे वापरले जाते या बाबतीत सुध्दा खास प्रोव्हीजन करुन त्याचे इन्स्पेक्शन होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 78 वरील बाब क्रमांक 82 बाबल मी बोलणार आहे. आपण अनेक वेळा ऐकतो की फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये लवकर न्याय मिळणार आहे. यासाठी काही खास प्रोव्हीजन केल्याशिवाय तसेच वेगळी न्यायालये स्थापन केल्याशिवाय फास्ट ट्रॅक कोर्ट प्रत्यक्षात काम करु शकणार नाही. त्यामुळे याकडे सुध्दा जास्त लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर मी अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 95 वरील बाब क्रमांक 104 बाबत बोलणार आहे. रेशन पुरवठा आणि वितरणाची जी सिस्टिम आहे ती मुंबईमध्ये पूर्णपणे कोलमडलेली आहे. मुंबईमध्ये 65 लाख लोक झोपडपट्टीमध्ये राहतात. पण मुंबईत कोठेही धान्य मिळत नाही. एक तर बीपीएलची कार्डे 15 हजार लोकांना सुध्दा दिलेली नाहीत. काळ्या बाजारात 40 ते 45 रुपये लिटर प्रमाणे रॉकेल घ्यावे लागते. त्या ठिकाणी आपण मोबाईल व्हॅन्स देऊन वस्त्यांवर त्या गाड्या लावून लोकांना डायरेक्ट रेशन द्यावे. त्यासाठी स्पेशल प्रोव्हीजन करणे आवश्यक आहे. मुंबईतील रेशन दुकानदार फक्त ब्लॅक करतात. त्या ठिकाणी रेशनिंगचे धान्य आणि रॉकेल मिळत नाही. मुंबई शहराला अन्न व नागरी पुरवठा विभागाने स्पेशल प्रोव्हीजन देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 100 वरील बाब क्रमांक 108 बाबत बोलणार आहे. दलित, मागासवर्गीय, सफाई कामगार, कचरावेचक यांची सहकारी संस्था करुन त्यांना कामे मिळावीत. बाहेरच्या कॉन्ट्रॅक्टरला मिळण्यापेक्षा ज्या कचरावेचक महिला आहेत त्यांना काम मिळण्यासाठी तरतूद करावी. त्यांच्या मुलांसाठी वसतिगृह आणि शिक्षणासाठी तरतूद करण्यात यावी. पृष्ठ क्रमांक 105 वरील बाब क्रमांक 113 अंतर्गत कोकणात वाड्यांना जोडणारे रस्ते, जोडमार्ग याबाबत तरतूद केलेली आहे. या गोष्टी खूप आवश्यक आहेत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्रीमती विद्या चव्हाण ....

सभापती महोदय, यानंतर मी गृहनिर्माण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 114 वरील बाब क्रमांक 111 बाबत बोलणार आहे. प्रत्येक शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन भाडेतत्वावर मोठ्या प्रमाणात घरे बांधण्यासाठी स्पेशल प्रोव्हीजन केली पाहिजे. आपण धारावीचे उदाहरण वारंवार देतो. धारावीला लोकांचे चामड्याचे लोणची-पापडाचे भंगाराचे असे वेगवेगळे छोटेछोटे लघु उद्योग आहेत. धारावीला स्पेशल दर्जा देऊन त्यांच्यासाठी घरबांधणी केली पाहिजे. कामगारांसाठी सुध्दा आपण सहा हजार आणि आठ हजार घरे देत आहोत ती घरे पुरेशी नाहीत. या ठिकाणी साडेतीन लाख कामगार होते. त्यादृष्टीने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाबतीत मला बोलावयाचे आहे. महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे शिरपूर पॅटर्नमध्ये जसे बंधारे बांधलेले आहेत तसे छोटी छोटे बंधारे बांधले तर पुढील काही वर्षातच पाण्याचा प्रश्न सुध्दा सुटू शकेल. सभापती महोदय, आपण अपुरा वेळ दिल्यामुळे थोडेफार मुद्दे या ठिकाणी मांडून मी माझे भाषण संपविते.

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी सन 2012-13 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या बाब क्र.134 वर मी माझे विचार मांडू इच्छितो. आदिवासी आश्रमशाळा बांधण्यासाठी भू संपादन करण्याची मोहिम राज्यात सुरु आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या असहकारामुळे अनेक आश्रमशाळांची कामे अर्धवट स्थितीत राहिली आहेत. काही कामे तर सुरुच झालेली नाहीत. कार्यारंभाचे आदेश दिल्यानंतरही कामे सुरु केलेली नाहीत. त्यामुळे आदिवासी आश्रमशाळा येणाऱ्या पावसाळ्यामध्ये कोसळण्याची भीती निर्माण झालेली आहे. त्याचबरोबर आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना जे जेवण दिले जाते तो विषय चर्चेचा झालेला आहे. त्यांना 15 दिवसातून एकदा मांसाहार मिळाला पाहिजे तो मिळत नाही. अंडी, केळी दिली जात नाहीत. रविवारी मुख्याध्यापक व शिक्षक शाळेत हजर नसतात. तेथील बायोमेट्रिक सिस्टिम फेल झालेली आहे. ती यंत्रणा अनेक ठिकाणी चालत नाही. त्याचबरोबर सोलर पॅनल सिस्टिम एनआरएचएम अंतर्गत बसविली आहे. ती सिस्टिम सुध्दा चालत नाही. सोलर पॅनल सिस्टिम 10 टक्क्यापेक्षाही कमी आदिवासी आश्रमशाळांमध्ये सुरु आहेत. ती सिस्टिम फक्त शो पीस झालेली आहे. अमरावती जिल्ह्यातील आश्रमशाळेसाठी 3 इन्व्हर्टर आणले आहेत ते तसेच पडून राहिले आहेत.

यानंतर बाब क्र.130 वर मी माझे विचार मांडणार आहे. कासा येथे मजूर हक्क परिषद भरली होती. तेथे आदिवासींना किमान वेतन देण्याची घोषणा केली होती. एकाही आदिवासी लाभार्थ्यांना घोषणा केल्या प्रमाणे पैसे मिळालेले नाहीत. विक्रमगढ, पालघर, वसई, मनोर या तालुक्यांमधील आदिवासी संख्याही विभागाकडे उपलब्ध नाही. या भागातील अनेक आदिवासी स्थलांतरित झालेले आहेत. विक्रमगढ, मोखाडा, वाडा येथील गावेच्या गावे ओसाड पडलेली आहेत. मजुरांच्या मुलांसाठी भोंगा शाळा सुरु करण्याची संकल्पना राबविली होती. परंतु ठाणे जिल्हा परिषदेने भोंगा शाळाच बंद केलेली आहे. त्यामुळे वीट भट्टीवरील कामगारांच्या मुलांनी कसे शिकावे हा एक मोठा प्रश्न आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

यानंतर पृष्ठ क्र.13 वरील गृह विभागाच्या बाब क्र.5 वर मी बोलतो. युरोपियन भटके लाकांच्या खर्चासाठी ही मागणी केलेली आहे. त्या लोकांना आपण त्यांच्या देशात पाठवितो. परंतु बांगलादेशातील नागरिकांना परत कधी पाठविले जाणार आहे ? त्या लोकांना रेशनकार्ड दिले जाते. त्या लोकांना कधी परत पाठविले जाईल याची नोंद गृह विभाग कधी घेणार आहे की नाही ?

यानंतर बाब क्र.14 वर मी बोलत असताना सांगू इच्छितो की, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोग शाळा यासाठी ही मागणी केलेली आहे. न्यायसहायक प्रयोग शाळा पाहिल्या तर हजारो प्रकरणांमध्ये व्हिसेरा प्रलंबित आहे. मुरमाडीच्या प्रकरणातील नमुने दिल्लीला पाठवावे लागले. ही आपली स्थिती आहे. मुंबईतील न्यायसहायक प्रयोगशाळा समर्थ नव्हती. त्यामुळे दिल्ली येथे नमुने पाठवावे लागले. या प्रयोगशाळेतील अनेक पदे रिक्त आहेत, अनेक उपकरणांचा अभाव आहे. त्याची पूर्तता करण्यात यावी अशी मी मागणी करतो.

यानंतर बाब क्र.7 वर मी माझे विचार मांडतो. दहशतवाद विरोधी पथकाला निधी देण्यासाठी ही मागणी केलेली आहे. या सभागृहात मुंबईतील सर्व रस्त्यांवर सीसीटीव्ही बसविण्याची घोषणा करण्यात आली होती. रेल्वे स्टेशन्सवर सीसीटीव्ही बसविलेले नाहीत. या बाबीकडेही लक्ष देण्याची गरज आहे.

यानंतर पाणी पुरवठा विभागाच्या बाब क्र.157 वर मी बोलतो. गेल्या वर्षी मोखाडा तालुक्यात डोलारा गावच्या महिलेचा मृत्यू झाला होता. त्यानंतर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन पुढील एक महिन्यात डोलारा गावात पाणी मिळेल अशी घोषणा केली होती. आजही डोलारा या गावातच नाही तर मोखाड्यात सुध्दा पाणी मिळत नाही. पाणी टंचाईमुळे लोक त्रस्त झालेले आहेत. टँकरने सुध्दा पाणी पुरवठा केला जात नाही. त्यामुळे ताबडतोब याबाबत शासनाने लक्ष द्यावे अशी विनंती करतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

--------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अमरनाथ राजूरकर (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

उद्योग विभाग. पान क्रमांक 45] बाब क्रमांक 92. नांदेड येथे विमानतळाशेजारी असलेल्या 191.71 हेक्टर जमिनीचा मुद्दा मी येथे उपस्थित करीत आहे. 2007मध्ये महाराष्ट्र शासनाने 31(2)ची नोटीस काढून सदरची जमीन एमआयडीसीसाठी घेण्याचा ठराव केला. त्यानंतर तेथील खतखरेदी प्रक्रिया बंद झाली. नांदेड शहर, सांगवी, कामठा खुर्द, गाडेगाव, म्हाळदा येथील शेतक-यांच्या जमिनी आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण आणि शेतकरी यांनी बसून हेक्टरी 70 लाख रु. इतका भाव निश्चित केला. आज त्या जमिनीचा भाव एकरी 2 कोटी रुपये आहे. या जमिनीची एकूण रक्कम 350 कोटी रु. होते. उद्योग खात्याची नवीन योजना आलेली आहे. या योजनेप्रमाणे जमिनीचा भाग विकसित करुन शेतक-याला पैसे परत द्यायचे आहेत. असे असताना गेल्या अडीच वर्षापासून शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. सर्व शेतकरी उपोषणाला बसलेले आहेत. त्यापैकी कुणी आत्महत्या करण्याच्या तर कुणी आत्मदहन करण्याच्या तयारीत आहेत. यासंबंधी मी मागच्या वेळी लक्षवेधी सूचना दिली होती. ती लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात आली होती. माझी अशी विनंती आहे की, एमआयडीसीने संपूर्ण जमीन खरेदी करावी व नंतर ती विकसित करुन शेतक-यांना 350 कोटी रु. द्यावेत. नांदेड विमानतळाची 2300 मीटरची धावपट्टी आहे ती 3200 मीटर होईल आणि तेथील भाग विकसित होईल यादृष्टीने निर्णय घ्यावा. हे जर केले नाही तर तेथील कायदा आणि सुव्यवस्था बिघडू शकेल.

मराठवाड्यावरील अन्याय आपण कधी दूर करणार याचा देखील आपण विचार करावा. तेथील दोन्ही आमदार काँग्रेस पक्षाचे आहेत. आमच्या जिल्ह्यातील नऊ आमदार कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीचे आहेत. या ठिकाणी माननीय संसदीय कार्यमंत्री उपस्थित आहेत. माननीय उद्योग राज्यमंत्री उपस्थित आहेत. माझी त्यांना विनंती आहे की, त्यांनी तातडीने निर्णय घेऊन 350 कोटी रु. शेतक-यांना अदा करावेत. जमीन घेतल्यानंतर ती विकसित करुन 350 कोटी रु.चे 500 कोटी रु. करावेत अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012-2013च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, स्वाभाविकपणे सरकारची अपेक्षा अशी असते की, बजेट पेक्षा जो जास्त झालेला खर्च असतो त्याला सभागृहाने संमती द्यावी. त्यामुळे मी केवळ प्रश्न विचारणार आहे. त्या प्रश्नाची उत्तरे आल्यानंतर या पूरक मागण्यांना मंजुरी द्यायची की नाही हे ठरविता येईल.

"General Administration Department, Page 3, Item No 2, Additional Provision for the purchase of Armoured and Non Armoured Vehicles." The bulletproof Vehicle like Tata Safari, Ambassador etc. for use for Hon. President, Hon. Vice President, Hon. Prime Minister and Hon. Foreign dignitaries during their visits to Mumbai यासाठी रु. 3,68,36,000/- इतक्या रकमेस सदनाकडे मंजुरी मागितलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, या आधी आपल्याकडे याबाबतीत किती तरतूद करण्यात आली होती आणि आपण कोणत्या गाड्या वापरण्यात येत होत्या ?

गृह विभाग, बाब क्रमांक 4, पान क्रमांक 8 "Additional provision for the payment of remuneration to police informants." यासाठी 25 लाख रु.ची तरतूद केलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की पोलिसांचे एकूण किती इन्फॉर्मण्ट आहेत आणि वर्षासाठी एकूण किती खर्च होतो. 25 लाख रु. अधिकचा खर्च होत आहे. यासाठी मूळ बजेटमध्ये आपण किती प्रावधान ठेवलेले आहे.

"Page 9, Item No. 7. Additional provision for fees of Special Public Prosecutors conducting the matters of Anti Terrorists Squad." यासाठी रु. 48 लाखाची पुरवणी मागणी केलेली आहे. ॲण्टी टेररिस्ट स्क्वॉडने ज्या वकिलांना नेमले त्यासाठीसुध्दा आकस्किता निधीतून पैसे दिलेले आहेत. हे वकील कोण आहेत, त्यांना कोणत्या केसेस दिल्या, मूळ बजेटमधून आतापर्यन्त किती पेमेंट केलेले आहे याची माहिती शासनाने द्यावी.

"Page 9, Item No. 9 Provision for Domestic Travel Expenses Petrol, Oil and Motor Vehicles etc." डोमेस्टिक ट्रॅव्हलसाठी कमिशनर ऑफ पोलीस यांच्या

..3..



MSS/ ST/ D/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 19:00

ॲड. आशिष शेलार...

कार्यालयाला 10 कोटी रु., पेट्रोल ऑईल आणि ल्युब्रिकण्टसाठी साडेतीने कोटी रु. आणि मोटार व्हेईकलसाठी 3 कोटी रुपये अशा एकूण 16 कोटी 55 लाख रु.ची मागणी केलेली आहे. दिवसाला पोलीस कमिशनर कार्यालयासाठी पेट्रोलचा खर्च किती येतो ?

...नंतर श्री.गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शे्लार...

मूळ बजेटच्या प्रोव्हीजनपेक्षा 16 कोटी रुपये लागले. प्रवासावर एवढा खर्च का झाला याचा खुलासा शासनाने करावा.

सभापती महोदय, "Page-11, Item No.12. Additional Provision to the Railway Police Officers under Director General of Police, Maharashtra State, Mumbai." सभापती महोदय, रेल्वे पोलिसांना काही "रिवॉर्ड" देण्यासाठी असा शब्द वापरण्यात आला आहे. सभापती महोदय, या शब्दाचा उल्लेख आपण देखील केला. रेल्वे पोलिसांना रिवॉर्ड देण्यासाठी 4 कोटी 74 लाख 42 हजार रुपयांची एवढया रक्कमेची मागणी केली आहे. यामध्ये ऑफिस खर्च इत्यादी सर्व बाबींचा उल्ले्ख आहे. परंतु रेल्वे पोलिसांना कोणकोणत्या प्रकारचे रिवॉर्डस् दिले जातात याचा मात्र या मागणीत उल्लेख नाही. आज रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिला सुरक्षित नाहीत. मुंबई, ठाणे येथे बघितले तर फेरीवाल्यांनी रेल्वे स्टेशन समोरील सर्व फुटपाथ अतिक्रमीत केलेले आहेत. पोलिसांना कोणते रिवॉर्ड दिले जाते, ते रिवॉर्ड प्रत्येक वर्षी दिले जातात काय, त्याचा एकूण खर्च किती असतो याबद्दची माहिती शासनाने द्यावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, "Page-26, Item No.30. Additional Provision for Grant-in-aid to Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri." to dispose of the Pending cases of Pension.

सभापती महोदय, मागणीच्या बाबतीत असे कारण दिले आहे की, निवृत्तीवेतनाची प्रलंबित प्रकरणे निकाली काढयासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ यांच्याकरिता अतिरिक्त अनुदानाची तरतूद करण्यात येत आहे. वर्षनिहाय सेवानिवृत्तीच्या किती केसेस येतात, त्या केसेस प्लॅन का केल्या नाहीत या बाबतीत उत्तर शासनाने द्यावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, "Page 47, Item No. 59. Additional provision to cover the excess expenditure for the year 2012-2013 (Rs. 609,68,71,000). The excess of Rs. 609,68,71,000 is mainly due to additional Open Market Borrowings raised during the FY 2012-2013."

2...



**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

सभापती महोदय, 609 कोटी रुपये Open Market मधून Borrowing केले आहे. ते Borrowing काय व्याजाने केले आहे, कोणकोणत्या इन्स्टीटयूटकडून केले आहे, त्याच्या परत फेडीमध्ये आपण व्याज किती लावले आहे, याबद्दलची माहिती सदनासमोर शासनाने द्यावी.

सभापती महोदय, "Page 54, Item No. 63. Provision to cover expenses on Maintenance and Repairs of B.D.D. Chawls at Worli, Naigaon, Shivdi and N.M. Joshi Marg, Mumbai."

सभापती महोदय, यासाठी 10 कोटी रुपयांची प्रोव्हीजन केलेली आहे. बी.डी.डी.चाळीच्या रि-डेव्हलपमेंट बाबत काय झाले, 10 कोटीसाठी मेंटनन्स आणि रिपेअर्ससाठी कॉन्ट्रॅक्टर कोण आहे, या ठिकाणी किती काम पूर्ण झाले या बाबतची माहिती सभागृहात देण्यात यावी.

सभापती महोदय, "Page 68, Item No. 82. Additional provision for Family Courts Rs. 5,58,97,000 for pending bills of Telephone, Electricity and Water Charges, Rent Rates and Taxes of Family Courts."

सभापती महोदय, फॅमिली कोर्टासाठी 5 कोटी 58 लाख 97 हजार रुपयांची प्रोव्हीजन मागितली आहे. टेलिफोन, इलेक्ट्रीसिटी, वॉटर चार्जेस, रेंट चार्जेस यासाठी प्रोव्हीजन मागितली आहे. ज्या गोष्टी एस्टीमेट करण्यासारख्या आहेत, त्या एस्टीमेटमधील गोष्टींसाठी बजेट प्रोव्हीजन मागितली आहे. त्याचा लेखा-जोगा बजेटमध्ये का दिला गेला नाही याची देखील माहिती सभागृहात देण्यात यावी.

सभापती महोदय, मौलाना आझाद महामंडळाचे गेल्या सात वर्षापासून लेखा परीक्षण झाले नाही. गेल्या सात वर्षातील लेखा परीक्षण कधीपर्यंत पूर्ण करणार आहात ? मौलाना आझाद महामंडळास 750 कोटी रुपयांचा निधी दिला गेला आहे, त्यातील 50 टक्के पैसे परत का आले नाही त्याबद्दलचे देखील स्पष्टीकरण शासनाने द्यावे, अशी विनंती करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

-------

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्रमांक 4, पान क्रमांक 8, गृह विभाग यावर माझे विचार व्यक्त करणार आहे. पोलीस खबऱ्यांसाठी 25 लाख रुपयांची प्रोव्हीजन करण्यात आली आहे. मुंबई शहर तसेच महाराष्ट्रातील इतर मोठी शहरे आहेत, त्या ठिकाणी घातपाताचे प्रकार होतात, काही शहरांमध्ये दंगली होतात, या गोष्टींची पूर्व माहिती मिळावी म्हणून पोलीस खबऱ्यांची जुनी पध्दत होती, ती सिस्टीम अतिशय कमकुवत झाली होती, त्या सिस्टीमला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न यातून दिसतो. मला या निमित्ताने एकच बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, यासाठी जास्त निधीची आवश्यकता भासली तर तो निधी वाढवून द्यावा. परंतु या सर्व माहितींचे मूल्यांकन करणे, त्यांच्याकडून मिळालेली माहिती किती उपयोगाची आहे याचाही विचार या निमित्ताने केला पाहिजे. खबऱ्याच्या नावाखाली या पैशांचा अपव्यय होत असेल तर अशा गोष्टी थांबल्या पाहिजेत. या माहितीचा उपयोग पोलीस खात्याला तसेच राज्याच्या सुरक्षिततेसाठी केला पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 24, पान क्रमांक 22 ही कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाई बाबतची ही मागणी आहे. गेल्या तीन वर्षापासून सातत्याने कोकणातील आंबा पिकावर निसर्गाचा कोप होत आहे. त्यामुळे वेगवेगळे प्रश्न निर्माण होत आहेत. आंबा बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. त्या बागायतदार शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून शासनातर्फे प्रयत्न करण्यात येत असतो. आपल्याकडे कृषी विद्यापीठ आहेत. दरवर्षी अशा प्रकारे आंबा पिकाचे नुकसान होत आहे, भविष्यात अशा प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून त्या बाबतीत कृषी विद्यापीठाने संशोधन करणे गरजेचे आहे व संशोधनासाठी शासनाने जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. या बाबतीत देशांतर्गत वेगवेगळया संस्था आहेत, त्यांच्या सहकार्याने आंबा पिकांचे नुकसान होऊ नये म्हणून संशोधन करुन आंबा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला रिलिफ देण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.......

सभापती महोदय, बाब क्रमांक 33, पृष्ठ क्रमांक 30 बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठाशी संबंधित आहे. मागील काळात फलोद्यान मंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते की, रत्नागिरी येथे जे संशोधन केंद्र आहे त्या केंद्रामध्ये आवश्यक ती इक्वीपमेंट्स नाहीत. आम्ही प्रस्ताव तयार केला आहे. इक्वीपमेंट्स खरेदीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 49 व 50 मत्स्य व्यवसायातील सहकारी संस्थांसाठी 100 टक्के अनुदानाची योजना आहे. मत्स्य व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्था ज्या बोटी खरेदी करतात त्या आधुनिक तंत्रज्ञानाने अद्ययावत असल्या पाहिजेत. अशा बोटींमध्ये फिश फायंडर यंत्रणा बसविण्यात आली पाहिजे असे बंधन शासनाने घालावे, अशी माझी विनंती आहे. जेणेकरुन या संस्थांच्या सभासदांचा फायदा होऊ शकतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 53, पृष्ठ क्रमांक 45 वर कबड्डी खेळाडूंचा गौरव करण्यासाठी रक्कमेची मागणी केली आहे, ही अत्यंत चांगली बाब आहे. मी शासनाचे अभिनंदन करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. जी बक्षिसाची रक्कम देणे प्रलंबित होती ती देण्यासाठी पुरवणी मागणी सादर केलेली आहे. मागील दोन अधिवेशनात या विषयाबाबत आश्वासन देण्यात आले होते, त्या आश्वासनाची वेळीच पूर्तता झाली नाही. भावनेच्या आहारी जाऊन चुकीचे बोलू नये. शासनाचे अभिनंदन करण्यासाठी चांगल्या बाबी आहेत, त्याबद्दल अभिनंदन करावे.

श्री.प्रकाश बिनसाळे : चांगली प्रथा आहे. यातून खेळाडूंना प्रोत्साहन मिळू शकते. एखाद्याने चांगली कामगिरी केली तर आपण त्याचा गौरव करतो. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे. Catch them young.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : बाब क्रमांक 53 उद्या चर्चेला ठेवण्यात आली आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : या बाबीसंबंधी मी जे काही बोललो ते उद्या रेकॉर्डवर घेण्यात यावे, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

श्री.विनोद तावडे : मी जो हरकतीचा मुद्दा मांडला तो देखील उद्या रेकॉर्डवर घ्यावा.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, नगरविकास विभागामार्फत 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार तरतुदीचा समावेश पुरवणी मागणीमध्ये केलेला आहे. हा अतिशय दुर्लक्षित विषय आहे. केंद्र सरकारकडून निधी मिळण्यासाठी नगर परिषदांकडून कोणते प्रस्ताव आले पाहिजेत याचे मार्गदर्शन केले पाहिजे असे मला सुचवावयाचे आहे. दुसरी एक सूचना मी करु इच्छिते. नगरविकास विभाग व विधी व न्याय विभाग या दोन्ही विभागांची ही संयुक्त जबाबदारी आहे. पुणे जिल्हयाच्या विकास आरखड्याच्या वेळी हा प्रश्न निर्माण झाला होता. मुंबई महापालिका किंवा राज्यातील इतर कोणत्याही महापालिकेकडे डी.सी.रुल्सची मराठी भाषेतील अधिकृत प्रत उपलब्ध नाही. विधी व न्याय विभागाकडून अधिकृतपणे कोणत्याही महापालिकेला मराठी भाषेतील प्रत मिळालेली नाही, याकडे मी लक्ष वेधू इच्छिते. सर्व महापालिकांना विधी व न्याय विभागामार्फत डी.सी.रुल्सची अधिकृत मराठी प्रत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी नगरविकास विभागाची आहे.

नंतर 4व्ही.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

आपण मराठीच्या संदर्भात बरेचसे मुद्दे मांडतो परंतु ठोसपणाने अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात जी ठोस पाऊले उचलली पाहिजेत अशा मुद्यांकडे मी लक्ष वेधणार आहे.

सभापती महोदय, नगरविकास, ग्रामविकास, आदिवासी विकास विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभागानी महिलांसाठीच्या स्वच्छता गृहाच्या संदर्भातील धोरणे अतिशय सदोष राबवलेली आहेत. सार्वजनिक बांधकामाच्या मंत्री महोदयांनी मला या सभागृहात वेळोवेळी न चुकता तीच तीच आश्वासने दिलेली आहेत. आपल्याकडे हजारो कि.मीटरचे रस्ते तयार झालेले आहेत परंतु केवळ मुंबई पुणे एक्स्प्रेस वे चे उदाहरण सोडता कोणत्याही रस्त्यावर 100-150 कि.मीटर अंतरावर महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छता गृहाची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. मला असे वाटते की, व्हॉट वुमेन्स वाँट नावाचा जो चित्रपट आहे त्याचे मराठीत रुपांतर केलेले आहे. आपण जरा विचार करुन बघा की, स्वच्छता गृहाच्या अभावी महिलांची काय कुचंबणा होत असेल ? पुरुष मंडळी पाहिजे त्या ठिकाणी वाहन थांबवून सर्व क्रिया कर्म करीत असतात परंतु महिला वर्ग तासनतास प्रवास करुन महिला स्वच्छता गृहाची वाट बघत असतात. शासन कोटयावधी रुपयांच्या मागण्या मान्य करुन घेते परंतु ठेकेदारांना महिला स्वच्छता गृहाच्या संदर्भात कोणीही विचारीत नाही.

मुंबई सारख्या ठिकाणी स्वच्छता गृहाचा प्रश्न आहे परंतु सामान्य प्रशासन विभागाचीही जबाबदारी आहे की, रेल्वे प्रसाधन गृहामध्ये रात्रीच्या वेळेस तृतीय पंथीय जाऊन बसलेले असतात त्यामुळे महिला त्या ठिकाणी जाऊ शकत नाही. रेल्वेची स्वच्छता गृहे, रस्त्यावरील स्वच्छता गृहाच्या संदर्भात बांधकाम विभाग व आदिवासी विकास विभागाच्या संदर्भात तसेच ग्रामविकास विभागाच्या संदर्भात जर आपण महिला स्वच्छता गृहाच्या बाबत अग्रक्रम देणार नसाल तर त्याचा काय उपयोग ? पुणे शहरामध्ये सुध्दा स्वच्छता गृहाची संख्या अल्प प्रमाणात आहे. त्यामुळे नगरविकास विभागाची जबाबदारी आहे की, या महानगरपालिकांची आता जी काही बजेट येणार आहेत त्यामध्ये त्यांनी महिलांसाठी कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत हे मंत्री महोदयांनी पहाण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या संदर्भात मला सांगावयाचे आहे की, सन 2004 च्या खटल्यासाठी आता तरतूद करण्यात आलेली आहे. नगर मधील मतिमंद व कर्णबधिर मुलीवर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

बलात्काराची घटना सन 2010 मध्ये घडली होती. ही केस विधी व न्याय विभागाकडे देण्यात आली होती व त्यासाठी स्पेशल वकील नेमण्याची आवश्यकता आहे. त्या मुलीचे म्हणणे समजून सांगण्यासाठी तिची हालचाल, हावभाव समजेल अशा वकिलाची आवश्यकता आहे. त्यासाठी मागणी केल्यावर पैशाची व्यवस्था नाही यासंदर्भात दैनिक लोकसत्तेने बातमी दिली होती. अशा वकिलाची मागणी त्या मुलीचे कुटुंब सन 2010 पासून करत आहे परंतु या केसच्या संदर्भात विधी सल्लागाराची नेमणूक विधी व न्याय विभागाने केलेली नाही. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, शासन कोट्यावधी रुपयांच्या मागण्या मान्य करीत असतांना शासनाने या मुलीला न्याय द्यावा.

सभापती महोदय, बीड जिल्हयामध्ये जंजिरे नावाचे वकील आहेत. कोठेवाडी प्रकरणात त्या वकिलांच्या कामामुळे आरोपींना शिक्षा झाली होती. या केसचा निकाल व्यवस्थित लागला. परंतु विधी व न्याय विभागाने श्री. जंजिरे यांना सरकारी वकील या पदावरुन दूर केले.

सभापती महोदय,स्त्रीभ्रूण हत्येच्या प्रकरणांमध्ये अजून वकील मिळत नाही असे गृह विभाग आम्हाला सातत्याने सांगत आहे. त्यामुळे मला असे सांगावयाचे आहे की, विधी व न्याय विभागाने पाऊले उचलण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वसतिगृहाच्या देखरेखीसाठी जी तरतूद केलेली आहे ती चांगली गोष्ट आहे. परंतु आपल्या निर्णयात एवढा विलंब होतो की, विद्यार्थ्यांना उन्हाळयामध्ये स्वेटर मिळते. स्वेटरची खरेदी थंडीत झाली पाहिजे ती होत नाही. त्यामुळे वसतिगृहाच्या देखरेखीची तरतूद अतिशय महत्वाची आहे.

सभापती महोदय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे मला लक्ष वेधायचे आहे. शिरुर कासार पंचायत समिती व शहर या ठिकाणी पाण्याच्या योजना सदोष झालेल्या आहेत. त्यामुळे माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, या साठी आपण जो निधी खर्च केला तो तसा वाया गेलेलाच आहे. यातील जो ठेकेदार आहे त्यावर कारवाई करण्याबरोबरच तेथे पाण्याच्या योजना योग्य पध्दतीने कशा होतील याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मराठवाडा तसेच ज्या ज्या ठिकाणी छोटी गावे आहेत त्या ठिकाणी पाणी पुरवठा व्यवस्थित होईल यासाठी मंत्री महोदयांनी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

भेट देण्याची आवश्यकता आहे. अँटी करप्शन आणि ब्रायबरी डिपार्टमेंटच्या ज्या मागण्या मान्य करता येतील त्या कराव्यात एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

----------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी सहकार विभागाच्या बाब क्रमांक 115 वर बोलण्यासाठी उभा आहे. जळगाव जिल्हा को-आपॅ.बँकेने संगणकाची खरेदी केली होती. त्यात फार मोठा घोटाळा झाला होता. हा घोटाळा होऊन जवळपास तीन वर्ष झालेली आहेत. त्यासंबंधात चौकशी झाली आहे काय, असल्यास, त्याबाबत संबंधितांविरूद कारवाई का करण्यात येत नाही ?

माझा दुसरा विषय नगररचने संबंधातील आहे. जळगाव महानगरपालिकेला डीपीडीसीमधून निधीच मिळत नाही. फंड दिला तर तो अत्यल्प असतो. जळगाव जिल्ह्याची लोकसंख्या 30 लाखाच्या आसपास आहे. त्यात जळगाव शहराची लोकसंख्या 5 लाख आहे. त्यासाठी फक्त 20 लाखाचा निधी मिळतो. जळगाव जिल्ह्याचे पालक मंत्री स्वत:च्या मतदार संघात कोट्यवधी रूपये घेऊन जातात. आमचा जळगाव जिल्हा भाग्यवान आहे. विधान सभेचे माननीय विरोधी पक्ष नेते जळगाव जिल्ह्यातील आहेत. त्यांच्याकडे देखील कोट्यवधी निधी जातो. डीपीडीसीच्या निधीचे समप्रमाणात वाटप झाले तर आमच्या जळगाव जिल्ह्याचा खूपच फायदा होईल.

आज जळगाव जिल्ह्यामध्ये पाण्याचा प्रश्न बिकट आहे. जळगावमध्ये तापी नदीवर बॅरेज बांधण्यात आले आहे. यात दोन ते तीन टीएमसी पाणी साठा झाला तर पुढच्या 50 वर्षाचा प्रॉब्लेम सॉल्व्ह होईल.

आजकाल जैविक विषयाला महत्व आलेले आहे. त्याकडे कृषी विभागाने लक्ष दिले पाहिजे. जैविक कपाशीला,भाजीला,फळाला जास्त भाव आहे. यासाठी अधिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे. त्याकडे आपण लक्ष दिले तर अधिक फायदा होईल.

मागच्या दहा वर्षापूर्वी लोकसंख्या आणि न्यायालये यांच्यामध्ये प्रमाण किती होते, यासंबंधातील आकडेवारी सांगून मी काही जास्त वेळ घेणार नाही. आज 2013 मध्ये काय परिस्थिती आहे याची तुलना केली तर त्याचा आपल्याला निश्चितच फायदा होईल. एवढे बोलून मी माझे विचार पूर्ण करतो.

......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी गृह विभागाच्या बाब क्रमांक 7 वर - दहशतवाद विरोधी प्रथकाची प्रकरणे हाताळणाऱ्या विशेष सरकारी अभियोक्त्यांची फी प्रदान करण्यासाटी अतिरिक्त तरतूद करणे यावर बोलण्यासाठी उभा आहे. एका बाजूला हे आवश्यक आहे. यासाठी आपण वाढीव तरतुदीची मागणी केली आहे. सरकारी अभियोक्त्यांची एकूण 700 पदे असून त्यापैकी 400 पदे भरली असून उर्वरित 300 पदे रिक्त आहेत. तेव्हा या विषयाकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

या बरोबरच 179 अधिक न्यायालयाचा प्रस्ताव खूप दिवस प्रलंबित आहे. त्या विषयाकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

पान क्र.13 वरील बाब क्रमांक 15 - युरोपियन भटके लोक इत्यादींवरील खर्चासाठी तरतूद करणे यावर मी बोलणार आहे. कोल्हापूर शहरांमध्ये बांगलादेशी सापडले. त्यांच्या विरूद्ध 24 तासामध्ये चौकशी करून सर्व केसेसचा निकाल लागला आहे. हा महाराष्ट्रातील ऐतिहासिक असा निकाल आहे. तेव्हा राज्यातील सर्व बांगलादेशींना शोधून त्यांच्या केसेस मार्गी लावून पोलिसांना काहीना काही तरी बक्षिस देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर मी पान क्र.142 वरील बाब क्रमांक 140 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना भाग भांडवल प्रदान करण्यासाठी तरतूद करणे यावर बोलणार आहे. धुळे-नंदुरबार-जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना मदत करण्यासाठी 142 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील संपूर्ण पतसंस्था वाचविण्यासाठी फक्त 200 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. त्यासाठी आता आपण पुन्हा तरतूद मागत आहोत. या विषयाकडे मला पुन्हा आपल्या मार्फत लक्ष वेधावयाचे आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी गृह विभागाच्या बाब क्रमांक 15 वर बोलण्यासाठी उभा आहे. बांगलादेशी नागरिकांचा मुद्दा सर्वच सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. आज पर्यंत मुंबईसह महाराष्ट्रात अनधिकृतपणे किती बांगलादेशी राहतात, त्यापैकी किती जणांना परत पाठविले आहे, परत पाठवित असताना पोलिसांना चुकवून किती जण परत आले तसेच बांगलादेशीय नागरिकांची पाठवणीकरिता गेलेल्या किती पोलिसांना मारहाण करण्यात आली आहे ? यासंबंधीचा तपशील द्यावा.

. यानंतर मी महसूल विभागाच्या बाब क्र.24 वर बोलणार आहे. कोकणातील बाधा पोहोचलेल्या आंबा उत्पादकांना सहाय्य करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. आपण आंबा उत्पादकांप्रमाणेच काजू उत्पादनकांना देखील सहाय्य द्यावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. नाशिकमध्ये द्राक्ष वाईनरी आहेत. त्याच धर्तीवर कोकणात काजू, करवंद, जांभूळ या फळावंर आधारित वाईनरी काढण्यासाठी शासनाने सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शासनाने योजना जाहीर करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत...

सार्वजनिक बांधकाम विभाग, बाब क्रमांक 65 - मार्ग व पुलाच्या बांधकामासाठी खर्च - मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग हा अपघातांचे ठिकाण झाले आहे. या मार्गाचे चौपदरीकरण करावे अशी समस्त कोकणवासियांची मागणी आहे. तेव्हा शासनाने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन या महामार्गाच्या चैापदरीकरणाचे काम तातडीने सुरु करावे अशी विनंती आहे.

नियोजन विभाग, बाब क्रमांक 113, पृष्ठ क्रमांक 105, - राज्यातील कोकण पॅकेज अंतर्गत वाडी-जोड मार्ग योजनेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मालवण तालुक्यातील गावांसाठी निधी देत असताना तेथील सुकरवाड-तळगाव ते कुडाळ या रस्त्यासाठी विशेष निधीची तरतूद करावी अशी माझी मागणी आहे.

गृह निर्माण विभाग - झोपडपट्टी पुनर्वसन योजना- मुंबईमध्ये एस.आर.ए.अंतर्गत सुरु असलेल्या योजना अधिक पारदर्शक होण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने शासनाने योग्य ती तरतूद करावी अशी विनंती आहे.

पर्यटन व सांस्कृति कार्य विभाग, बाब क्रमांक 159, पृष्ठ क्रमांक 161 साहित्य कला इत्यादी क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना आर्थिक सहाय्य देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे.राज्यातील आणि कोकणातील गणेश मूर्तीकार आजही या मानधनापासून उपेक्षित आहेत.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या मागण्यांवर उद्या चर्चा आहे त्यावेळी आपले म्हणणे मांडावे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

नगर विकास विभाग, बाब क्रमांक 55, पृष्ठ क्रमांक 50- 13 व्या वित्त आयोगानुसार सर्वसाधारण कार्यक्रम अनुदान योजनेखाली 2011-2012 मध्ये राज्याने नऊ सुधार योजनांचे अनुपालन केले त्यासाठी केंद्र सरकारने 58 कोटी 31 लाख इतके अनुदान उपलब्ध करुन दिले आहे आणि त्याचे वितरणही केले आहे. या संदर्भात माझा प्रश्न आहे की, कोणकोणत्या स्थानिक संस्थांना किती व कसा निधी वितरित केला याचा तपशील दिला असता तर त्यामध्ये पारदर्शकता आली असती आणि आम्हाला भाषण करणे सोपे झाले असते.

नगर विकास विभाग, बाब क्रमांक 56, पृष्ठ क्रमांक 50 - नगरपालिकांना सहायक अनुदान देण्यासाठी 2 कोटी 95 लाख 83 हजार इतक्या रकमेची मागणी करण्यात आली आहे. सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पात या कामासाठी नियोजित केलेली तरतूद किती आहे व त्यामध्ये वाढ करण्याची कारणे काय, एवढी मोठी अतिरिक्त तरतूद करण्याची प्रमुख कारणे कोणती याचे विश्लेषण झाले असते तर अधिक बरे झाले असते.

नगर विकास विभाग, बाब क्रमांक 57,पृष्ठ क्रमांक 51 - महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सुविधांच्या विकासासाठी 32 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. हा निधी कोणकोणत्या महानगरपालिकांना देण्यात आला, त्याबाबत कोणते निकष लावण्यात आले , पूरक स्वरुपात तरतूद लागण्याची कारणे काय आहेत या बाबींचा खुलासा झाला असता तर बरे झाले असते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

नगर विकास विभाग, बाब क्रमांक 55, 56 व 57 पृष्ठ क्रमांक 50 व 51 - मागील अधिवेशनात देखील हा विषय चर्चेला आला होता. त्यावेळी माननीय राज्यमंत्री महोदयांनी मला आश्वासन दिले होते की, नगरपालिकांच्या माध्यमिक शाळांचा प्रश्न तातडीने सोडविण्यात येईल. परंतु तो प्रश्न अद्यापपर्यंत सुटलेला नाही. मागील पाच वर्षापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. तेव्हा या प्रश्ना संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी स्वत: लक्ष घालावे अशी विनंती आहे. हा विषय पुन्हा सभागृहात मांडण्याची माझी इच्छा नाही तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी मला सहकार्य करावे.

सभापती महोदय, नगरपालिकांच्या शाळांना शासनाकडून 80 टक्के अनुदान देण्यात येते त्यामध्ये वाढ करुन ते अनुदान 100 टक्के करावे अशी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, आज उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळांची अवस्था अतिशय वाईट आहे. माननीय राज्य मंत्री महोदयांनी त्या ठिकाणी एकदा खासगी गाडीतून प्रवास करावा. आपणास वाहतुकीची आणि अन्य बाबींची कशी कोंडी होते याची जाणीव होईल.

सामाजिक न्याय विभाग, बाब क्रमांक 107, 108, व 109, पृष्ठ क्रमांक 100- अनुदानित वसतिगृहांतील कर्मचा-यांच्या संदर्भात दिनांक 15.5.2012 रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांसोबत बैठक झाली. त्या संदर्भात पुढे काय झाले त्याची माहिती मिळाली नाही. तेव्हा या संदर्भातील माहिती देण्यात यावी. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण् करतो.

-------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, माननीय पर्यटन मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी काल कोकणात एका ब्रिजच्या उद्‌घाटनाच्या वेळी, महाराष्ट्र राज्य हे पर्यटन विभागाला निधी देण्यात मागे असल्याची खंत व्यक्त केली. या निमित्ताने पर्यटन विभागाच्या पृष्ठ क्र.161, बाब क्र.160 बाबत सांगू इच्छितो की, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी पर्यटन जिल्हे म्हणून घोषित केलेले आहेत. या निमित्ताने मी मागणी करतो की, माननीय पर्यटन मंत्र्यांनी खंत व्यक्त केल्यामुळे पर्यटन विभागाला जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री.सचिन अहिर उपस्थित आहेत. मी जो प्रश्न उपस्थित करणार आहे तो 1995 पर्यंतच्या झोपड्यासंदर्भातील आहे. आपण एमयुटीपी, एमयुआयपी इत्यादि प्रकल्प तसेच धारावी झोपडपट्टी आणि विमानतळ प्राधिकरणाच्या बाबतीत 2000 पर्यंतच्या झोपडपट्टयांना मान्यता दिलेली आहे. परंतु एसआरएसाठी आपण कोर्टात गेला आहात. त्यामध्ये 2000 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता देऊन हस्तांतरण करण्याचा आणि त्यांच्या पात्रतेचा मुद्दा लवकरात लवकर सोडविला तर या झोपडपट्टयांचे निर्मूलन होईल.

महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी सोयी सवलतींअभावी स्वत:ला खोल्यांमध्ये कोंडून आंदोलन केले. या निमित्ताने मी मागणी करतो की, वसतिगृहाच्या दुरवस्थेवर मात करण्यासाठी त्यांना निधी उपलब्ध करुन द्यावा.

महोदय, दलित वस्ती सुधार योजनेची कामे मोठ्या प्रमाणावर रखडलेली आहेत. या योजनेचा निधी अन्य कामांवर वळविला जातो. या निमित्ताने मी मागणी करतो की, दलित वस्ती सुधार योजनेचा निधी अन्य कामांकडे न वळविता त्याच कामासाठी उपयोगात आणावा.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

----------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र.1, 2, व 3 या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सुरुवातीलाच विनंती करते.

महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील, अमरनाथ राजूरकर, ॲड.आशिष शेलार यांनी सहभाग घेतला. त्यापैकी सध्या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व ॲड.आशिष शेलार उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विधिमंडळ सदस्यांना सन्मानाची वागणूक देण्याबाबतचा तसेच त्यांना शासकीय कार्यक्रमामध्ये आमंत्रित करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. या निमित्ताने मी सांगू इच्छिते की, दि.4 जून, 2011 रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना या बाबत सूचना दिलेल्या आहेत. जर त्या परिपत्रकाची अंमलबजावणी होत नसेल किंवा सन्माननीय सदस्यांनी या बाबत स्पेसिफिक बाब निदर्शनास आणून दिली तर संबंधितांवर शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने सांगू इच्छिते की, आपल्या राज्यात माननीय राष्ट्रपती किंवा अन्य देशातील मान्यवर व्यक्ती भेटी देत असतात. त्यांच्यासाठी अत्याधुनिक वाहने घेण्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये निधीची मागणी करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी आतापर्यंत राज्यात येणाऱ्या पाहुण्यांसाठी कोणती वाहने वापरण्यात येत होती, असा मुद्दा उपस्थित केला. या निमित्ताने मी सांगू इच्छिते की, आतापर्यंत या कामी ॲम्बॅसेडर आणि सफारी गाडी वापरली जात होती. मध्यंतरी माननीय राष्ट्रपती राज्याच्या दौऱ्यावर आल्यानंतर त्यांना सुध्दा याच गाड्या पुरविण्यात आल्या होत्या. तद्‌नंतर माननीय राष्ट्रपती कार्यालयाने त्या बाबत नाराजी व्यक्त केली होती. त्यांचे म्हणणे होते की, माननीय राष्ट्रपतींसाठी आर्म्ड व्हेईकल असावयास पाहिजे. महोदय, दुसऱ्या देशातील मान्यवर व्यक्ती सुध्दा राज्याच्या भेटीसाठी येत असतात. त्यांच्यासाठी वाहन खरेदी करण्यासाठी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मागणी करण्यात आलेली आहे.

मी सभागृहाला पुन्हा विनंती करते की, सभागृहाने सामान्य प्रशासन विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात.

---------

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेला माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी सुरुवात केली होती. त्यांनी सांगितले की, नाशिक येथे ज्या पध्दतीने प्रस्ताव पारित करण्यात आला होता त्याच पध्दतीने नगर जिल्ह्यातील अकोले महानगरपालिकेमध्ये प्रस्ताव पारित करण्यात आला. त्यांनी सांगितले की, अशा प्रकारचा प्रस्ताव पारित करताना काही पध्दती पाळावयास पाहिजे, किंबहुना त्या प्रस्तावावर चर्चा झाली पाहिजे. मोठ्या रकमेचा प्रस्ताव असेल तर त्यावर विस्ताराने चर्चा व्हावी, अशी त्यांनी जी सूचना मांडलेली आहे ती अनमोल आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

अंबरनाथ महानगरपालिकेच्या कामाच्या संदर्भात आपण या ठिकाणी सांगितले. जेएनएनयुआरएम आणि बीएसयूच्या संदर्भात सांगण्यात आले. जेएनएनयुआरएम च्या संदर्भात काही चुकीचे घडले असेल तर त्या संदर्भात निश्चितपणे काळजी घेतली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आता या ठिकाणी उपस्थित नाहीत. त्यांनी सीआरझेडच्या अनुषंगाने कोकणातील मालवण, रत्नगिरी आणि अलिबाग या तीन नगरपालिकांचा आवर्जून उल्लेख केला. सीआरझेडचा पहिला कायदा 1991 साली झाला. 2011 मध्ये दुसरे नोटिफिकेशन निघाले आणि नवीन कायदा झाला. पूर्वी 1, 2, 3 असे कॅटेगरीवाईज सीआरझेडचे नियम होते आणि त्याप्रमाणे बांधकामाला परवानगी दिली होती.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मघाशी माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात होत असताना नियम सांगितला. त्यांनी असे सांगितले की, कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरले की, जे सदस्य सभागृहात उपस्थित नसतील त्यांच्या मुद्यांच्या बाबतीत कोणतेही उत्तर देऊ नये. मंत्र्यांनीच या ठिकाणी असे सांगितले असताना तेच मंत्री महोदय आता सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसताना त्यांच्या संदर्भात उत्तर देत आहेत. त्यांच्यावर काय कारवाई केली पाहिजे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, त्याचे क्लास वन, टू, थ्री, फोर असे क्लासिफिकेशन झालेले आहे. त्यामुळे त्यामध्ये शिथिलता देण्याची विशेषकरुन कोकणातील नगरपालिकांना बरीच शिथिलता देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी पुणे महानगरपालिकेच्या पायाभूत सोयीसुविधांबाबत आणि पुणे मेट्रो रेल्वेच्या संदर्भात उल्लेख केला. सुरुवातीला जेव्हा ही मेट्रो रेल्वे आणण्याचा प्रस्ताव पारित झाला त्यावेळच्या अनुषंगाने त्या प्रकल्पाची एस्टिमेट कॉस्ट काढली होती. परंतु आता नवीन प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु आहे. लवकरच तो प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे येऊन नवीन झालेल्या किंमतवाढीच्या अनुषंगाने शासन निश्चितपणे आपला अधिभार उचलेल. त्याचबरोबर महानगरपालिकेने किती अधिभार उचलावयाचा आहे, केंद्र शासन, एमएमआरडीए किंवा बाकीच्या ज्या एजन्सीज असतील त्यांनी किती अधिभार उचलावयाचा आहे त्याचा विचार निश्चितपणे केला जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D

श्री. भास्कर जाधव .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी सांगितले की, मासेमारी करणाऱ्या ज्या अद्ययावत बोटी आहेत त्या ठिकाणी अद्ययावत फिश फाईन्डर बसवावेत तसेच जीपीएस सारखी अद्ययावत यंत्रणा बसवावी. ती यंत्रणा बसविण्याचा निर्णय आमच्या विभागाने यापूर्वीच घेतलेला आहे. केवळ निर्णयच घेतला नाही तर त्यामध्ये येणारा जो खर्च आहे त्यातील 50 टक्के रक्कम त्यांना प्रोत्साहन म्हणून आमच्या विभागामार्फत दिली जाते. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी सांगितले की, मुंबई कोळ्यांची, पारशांची समजली जाते आणि मुंबईतील जे कोळीवाडे आहेत त्या कोळी बांधवाच्या घराखालील जमिनी त्यांच्या नावावर व्हाव्यात.. आम्ही राष्ट्रीय पातळीवरचा पहिला फिश फेस्टिव्हल 26 फेब्रुवारी, 2010 रोजी बीकेसी येथे भरविला होता. त्यावेळी केंद्राचे माननीय कृषी मंत्री, राज्याचे माननीय मुख्यमंत्री व सर्व वरिष्ठ नेते उपस्थित होते. त्यामध्ये त्यांनी असे सांगितले होते की, कोळी बांधवांच्या घराखालच्या जमिनी त्यांच्या नावावर असल्या पाहिजेत. कारण तो त्या ठिकाणी जन्माला येतो, त्याच ठिकाणी वाढतो, त्यांचा व्यवसाय त्याच ठिकाणी करतो आणि तो त्याच ठिकाणी संपतो. त्यांना तिथून बाजूला जाता येत नाही. कारण त्यांचा व्यवसायच त्या ठिकाणी आहे. वस्ती वाढलेली आहे. म्हणून त्यांच्या वहिवाटीखालील राहत्या जमिनी त्यांच्या नावावर व्हाव्यात याकरिता 18 जूनला जी.आर. काढण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केंद्र सरकारकडे कोणकोणते प्रस्ताव पाठवावयाचे याबाबत मुद्दा उपस्थित केला. आपण केंद्र शसनाकडे जे प्रस्ताव पाठवितो त्यामध्ये यूआरडीएसएसएमचे प्रस्ताव पाठवितो. जेएनएनयुआरएमचे प्रस्ताव पाठवितो. तलाव संवर्धनाचे प्रस्ताव पाठवितो. आता केंद्र शासन जेएनएनयुआरमच्या दुसऱ्या टप्प्याला आणि युआरडीएसएसएमच्या दुसऱ्या टप्प्याला मान्यता देण्याच्या मन:स्थितीमध्ये आहे. त्यांनी सांगितले की, महापालिकेच्या कोणत्याही साईटवर डीसीआरची कॉपी मराठीमध्ये उपलब्ध होत नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते रागावणार नाहीत असे समजून मी सांगतो. ते सातत्याने मराठीचा पुरस्कार करतात. त्यांच्याबद्दल मला आदर आहे, सन्मान आहे. परंतु बरेच दिवस माझ्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

मनामध्ये एक खंत होती. आमचे मित्र सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शे्लार हे अभ्यासू आहेत याबद्दल शंका नाही. पहिल्यांदाच सभागृहात आले असतानाही त्यांनी आपली छाप पाडलेली आहे. परंतु माझ्या मनामध्ये सारखी शंका येत होती. ते इंग्रजीमध्ये सगळ्या पुरवण्या वाचून दाखवित होते आणि मराठीमध्ये त्याचा खुलासा करीत होते. असा परिणाम का झाला ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

त्याचे कारण असे कळले आहे की, मुंबई महानगरपालिकेचा कारभार सातत्याने इंग्रजी भाषेतूनच चालतो. झोपडपट्टीधारकाला नोटीस सुध्दा इंग्रजीतून दिली जाते. मराठी माणसांच्या व मराठी भाषेच्या पुरस्कर्त्याच्या महानगरपालिकेकडून त्याची सुरुवात व्हावी अशी माझी अपेक्षा आहे. परंतु सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनीही हा महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. अशा प्रकारे सर्वच महानगरपालिकांकडून इंग्रजी भाषेतून ती प्रत प्रसिध्द केली जाते तशी मराठी भाषेतूनही ती प्रत प्रसिध्द करण्याची सूचनाच नाही तर तशी सक्ती सुध्दा केली जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.सोनवणे यांनी नगरपरिषदेकरिता अनुदान देण्याची मागणी केली आहे. त्या नगरपरिषदेला अनुदान दिलेले आहे. 1999 साली नगरपालिकांचा जकात कर बंद करुन त्यांना सहाय्यक अनुदान देण्याची सुरुवात केली आहे. प्रत्येक वर्षी सहाय्यक अनुदान देऊन प्रत्येक वर्षी 10 टक्के वाढ करुन अनुदान देण्याचे त्यावेळी ठरले होते. परंतु 1995 पासून ती वाढ देण्यात आली नव्हती. त्यामुळे नगरपालिकांची थकबाकी साचली होती. मला सांगताना आनंद वाटतो की, या बजेटमध्ये 295 कोटी रुपयांची सहाय्यक अनुदानासाठी तरतूद केलेली आहे. त्यामुळे राज्यातील नगरपालिकांना खूप रिलिफ मिळेल. महानगरपालिका, नगरपालिका यांच्यासाठी विशेष तरतूद केलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी या क्षणापर्यंत राज्यातील प्रलंबित खटल्यांची संख्या विचारली होती. दोन महिन्यापूर्वी पर्यंत राज्यात 29 लाख 14 हजार 618 खटले वेगवेगळ्या कोर्टात प्रलंबित आहेत. गेल्या 5 वर्षात वेगवेगळ्या न्यायालयांचा वापर करुन, न्यायाधीशांची पदे भरुन, राज्यात एकाच दिवशी लोक अदालत घेऊन राज्यातील 31 लाख 26 हजार 647 प्रकरणे निकाली काढण्याच्या कामात न्याय विभागाला यश मिळालेले आहे. मत्स्य विभागाच्या, विधी व न्याय विभागाच्या व नगरविकास विभागाच्या योजना सांगता येतील. नगरविकास विभागाच्या, विधी व न्याय विभागाच्या, संसदीय कार्य विभागाच्या, मत्स्य विभागाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने एकमताने मान्यता द्यावी.

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.भास्कर जाधव....

सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, प्राथमिक शिक्षणाच्या शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाची रक्कम नगरविकास विभागामार्फत देण्याचा शब्द देण्यात आला होता. हे खरे आहे. मी या विषयाचा पाठपुरावा केला आहे. नगरविकास विभागाचे असे म्हणणे आहे की, प्रत्येक निर्णय शिक्षण विभागाकडून घेतला जातो म्हणून हा निर्णयही शिक्षण विभागाने घ्यावा. परंतु शिक्षण विभागाचे असे म्हणणे आहे की, नगरविकास विभागाच्या अंतर्गत ह्या शाळा चालविल्या जातात म्हणून या विभागाने याबाबतचा निर्णय घ्यावा. म्हणून यासंबंधीचा अंतिम निर्णय नगरविकास विभागाने घेतलेला आहे. या प्रस्तावामुळे वित्तीय भार किती येणार आहे त्याचा अभ्यास करावा लागेल. हा अभ्यास करुन तो प्रस्ताव विभागाकडे पाठवित आहे. याबाबतची जबाबदारी कोणत्या विभागाने पार पाडावयाची हा प्रश्न बरीच वर्षे प्रलंबित होता. आता त्याचा निर्णय झालेला आहे. त्याचा अंतिम निर्णय जो काही व्हावयाचा असेल तो लवकर होईल. अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

फॅमिली कोर्ट, फास्ट ट्रॅक कोर्ट सुरु केलेली आहेत. सकाळी व संध्याकाळी 100-100 कोर्ट सुरु केलेली आहेत. याबाबतची सर्व आकडेवारी पटलावर ठेवण्यास मी तयार आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी कर्णबधिर मुलीवर अत्याचार व बलात्कार झाल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यासंबंधी वेगळे वकील देण्याचा मुद्दा मांडला होता. मी ही बाब निश्चितपणे तपासून पाहतो. अशा प्रकरणात विधी व न्याय विभागाकडून आणि गृह विभागाकडून वकील दिला जातो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 19:45

श्री. भास्कर जाधव ..

काही वकील गृह विभागाचे असतात तर काही वकील विधी व न्याय विभागाचे असतात. परंतु त्यांचे सर्व प्रस्ताव आमच्या विभागाकडे येतात. या क्षणी त्या प्रस्तावाबाबतची माहिती माझ्याकडे नाही. मी निश्चितच माहिती घेऊन खास बाब म्हणून ती केस तपासून पाहीन. पैसे भरावे लागतात. पण तशी परिस्थिती नसेल तर निश्चितपणे पैसे न भरता सुध्दा त्यांना निश्चितपणे मदत केली जाईल.

दुसरा मुद्दा असा उपस्थित करण्यात आला की, एक बलात्काराची केस एका वकिलाने जिंकली म्हणून त्याला काढण्यात आले. वस्तुस्थिती तशी नाही. साधारपणे वकिलांना तीन वर्षाच्या मुदतीकरिता एक्स्टेन्शन दिले जाते. त्यांचे वय पाहून आणि जिल्हा कोर्टाचा अहवाल पाहून निर्णय घेतला जातो. त्या बाबतीत जर जाणीवपूर्वक अन्याय झाला असेल तर तो मी तपासून पाहीन. सभागृहाने माझ्या विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2012-13च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी म्हाडाच्या संदर्भात काही मुद्दे या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत.

सभापती महोदय, म्हाडाच्या कर्मचा-यांच्या निवृत्ती वेतनाच्या संदर्भात त्यांनी या ठिकाणी मुद्द मांडला. त्यासंबंधीचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून मंत्रिमंडळामध्ये मांडण्याचा प्रयत्न केला. त्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली नसल्यामुळे तो अमान्य करण्यात आला. हा विषय संबंधित संघटनांनी उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेला असल्यामुळे ही बाब न्यायप्रविष्ट आहे.तीच परिस्थिती पीएमसीपीच्या रेडझोनच्या बाबतीत देखील आहे. माननीय उच्च न्यायालयाने त्या कामाला स्थगिती दिलेली आहे. शासनाच्या वतीने आपण आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत. पर्यावरणाचे काही विषय होते म्हणून एमपीसीबीने देखील इसी रद्द करण्याचे काम केलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काही प्रकरणी चौकशीची मागणी केलेली आहे. त्यांनी स्पेसिफिक प्रकरणे सांगितली तर त्याही बाबतीत चौकशी करण्याची राज्य शासनाची तयारी आहे.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी गिरणी कामगारांच्या घरांच्या सद्य:स्थिती बाबत विचारणा केली. 7 हजार गिरणी कामगारांसाठी आपण घरे उपलब्ध करुन दिलेली आहेत. त्याची सोडत काढण्याचे काम केलेले आहे. गिरणी कामगारांना घरे देण्याची प्रक्रिया झालेली आहे. गिरणी कामगारांसाठी एक तृतीयांश जमिनीवर घरे तयार करण्याचा प्रयत्न होतोय. परवाच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दोन्ही सभागृहामध्ये रेण्टल हौसिंग बाबत स्पष्ट केलेले आहे. रेण्टल हौसिंग गिरणी कामगारांना देण्याच्या बाबतीत याच अधिवेशनामध्ये घोषणा होणार आहे. सर्व गिरणी कामगारंना घरे मिळतील असा प्रयत्न होणार आहे.

सभापती महोदय, 33 विकासकांकडून म्हाडाला जे सरप्लस क्षेत्रफळ प्राप्त व्हायला पाहिजे होते ते मिळालेले नाही. अशा सर्वांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. एवढेच नाही तर त्यांना अशी संधीही दिलेली आहे की संबंधित लोक जर सहा महिन्याच्या आत अशा प्रकारचे क्षेत्रफळ देणार असतील तर अशा लोकांकडून दंडात्मक वसुली करुन ते क्षेत्रफळ घेण्यात येईल. मात्र आपण जो काही गुन्हा दाखल केलेला आहे तो काही मागे घेतला जाणार नाही. त्याही बाबतीत काही प्रगती होताना दिसत आहे.

..3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी सांगितले की, 1995 ते 2000 पर्यन्त पात्रतेच्या बाबतीत शासनाला निर्णय घ्यावा लागणार आहे. विधि व न्याय विभागाकडे ती फाईल पाठविलेली आहे. 2000 पर्यन्तच्या सर्व लोकांना घरे देण्याचा शासनाचा मानस असून ती काळाची गरज आहे. त्यातूनच हे पुनर्विकासाचे काम होईल.

सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी सांगितल्या प्रमाणे बीडीडी चाळीचा पुनर्विकास निश्चित करावयाचा आहे. सद्या ते ट्रांझिट कॅम्पमध्येच रहात आहेत की काय अशी त्यांची अवस्था झ ाालेली आहे. त्या चाळींच्या पुनर्विकासाच्या संदर्भात 10 कोटीची अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत यांनी सांगितले की, एसआरएमध्ये पारदर्शकता आणली पाहिजे. त्यादृष्टीने नवीन नियम तयार करण्याचे काम करीत आहोत. डीसीआरमध्ये काही बदल करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी म्हाडाची व्याप्ती वाढविली पाहिजे असे सांगितले व जेथे झोपडपट्टी आहे तेथे म्हाडानेच पुढाकार घेऊन पुनर्विकास करावा अशी सूचना केली आहे. मुंबई शहरामध्ये अशा प्रकारचे 20 प्रकल्प आयडेण्टिफाय केलेले आहेत. त्या बाबतीत म्हाडा प्रयत्न करीत आहे.

कचरा वेचणा-या कामगारांना सफाई कामगारांच्या धर्तीवर सवलती दिल्या पाहिजेत असेही त्यांनी सांगितले. त्याही बाबतीत शासनाचा विचार आहे. धारावीमध्ये लघु उद्योगांना वाव मिळावा आणि पुनर्विकासामध्ये त्यांच्यासाठीही तरतूद करण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. उद्योग विभागाच्या मागण्यावरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांची नोंद मी घेतलेली आहे. त्यांच्या मुद्याबाबत लेखी स्पष्टीकरण देण्याचा माझा प्रयत्न राहील.

सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी सिंधुदुर्ग येथील सामाजिक न्याय भवनाचा मुद्दा उपस्थित केला. तेथे सामाजिक न्याय भवन केलेले असून त्याचे उद्‌घाटन अद्याप झालेले नाही. सदरहू सामाजिक न्याय भवनाचे उद्‌घाटन माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, माननीय पालकमंत्री आणि संपर्क मंत्री यांच्या उपस्थित करण्यात येईल. विशेष म्हणजे संपर्क मंत्रीच या कार्यक्रमाचे होस्ट असतील.

...नंतर श्री. गिते....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 19:50

श्री.सचिन अहिर...

सामाजिक संस्थांना शासनाने व्यवसायासाठी निधी उपलब्ध करुन दिला होता, ज्या समाजिक संस्थांनी व्यवसाय सुरु केले नाहीत अशा साधारणत: 151 लोकांना आपण नोटीसा दिलेल्या आहेत. त्या सामाजिक संस्थांनी व्यवसाय सुरु करोवत अन्यथा त्या संस्थांवर फौजदारी गुन्हा दाखल करावेत अशा प्रकारची सूचना या ठिकाणी करण्यात आली आहे. ज्या सामाजिक संस्थांना शासनाने विविध व्यवसायासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे, परंतु त्यांनी व्यवसाय सुरु केलेले नाहीत, त्या सामाजिक संस्थांकडून सदरहू निधी वसूल करण्याबाबतची कार्यवाही निश्चितपणे केली जाईल असे मी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो.

सभापती महोदय, स्वेटर खरेदीच्या बाबतीत वृत्तपत्रात बातमी आलेली आहे, त्याची दखल माननीय सामाजिक न्याय मंत्री व मी स्व:ता घेतलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे यांनी निधी दिला जात नाही अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित केला. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, अनेक वेळा पूर्तता करीत असतो, परंतु निधी दिला जात नाही, म्हणून ऑर्डर उशिरा येतात. त्याचा वापर होत नाही. ती दखल देखील घेतली जाईल.

अनेक सन्माननीय सदस्यांनी इतर सूचना केलेल्या आहेत, त्यांची देखील दखल शासनाकडून घेतली जाईल. गृहनिर्माण विभागाच्या 118.14 कोटी, उद्योग विभागाच्या 413 कोटी, सामाजिक न्याय विभागाच्या 77 कोटी रुपयांच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, डीम कन्व्हेअन्स बाबत स्टेटस रिपोर्ट देऊ असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. या संदर्भात किती अर्ज आले, किती अर्ज प्रलंबित आहेत, प्रलंबित राहण्याची कारणे काय याची माहिती सभागृहाला देण्यात यावी. तसेच डीम कन्व्हेअन्सच्या बाबतीत स्टेटस रिपोर्ट सभागृहाला दिला जाईल काय ? मुंबईतील 26 विकासकांकडे 2000 या वर्षापासून 24 कोटी रुपयांची गाळयांची थकबाकी आहे, ती गृहनिर्माण मंडळाकडून वसूल केली जात नाही. वसुली बाबत काय कार्यवाही करण्यात येणार आहे ? मालाड पूर्व येथील सी.टी.एस.क्र.812, 813,व 821 मध्ये ओमकार रिअल्टर्स ॲन्ड डेव्हलपर्सने पुनर्वसन योजनेमध्ये प्रचंड घोटाळा केलेला आहे, त्याची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल काय?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, 23 विकासकांना संक्रमण शिबिरे दिली होती. 33(10)चे एकूण 11 कोटी रुपये थकीत होते. त्या सर्वांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. सहा प्रकरणामध्ये त्यांनी बांधकाम थांबवावे, अशी देखील त्यामध्ये तरतूद केलेली आहे. ती बांधकामे थांबलेली आहेत. आतापर्यंत 17 कोटी पैकी 6 कोटी रुपये वसूल करण्यामध्ये शासन यशस्वी झालेले आहे. यापुढे त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा शासनाचा मानस आहे. जिकडे जिकडे काम चालू झाले आहे, त्या कामांना स्थगिती देण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. डीम कन्व्हेयन्सच्या बाबतीत 2013 पर्यंत एकूण 1659 अर्ज प्राप्त झाले असून 1017 अर्जांवर प्रक्रिया पूर्ण करुन डिम कन्व्हेयन्सची पूर्तता झालेली आहे. 642 अर्ज प्रलंबित आहेत. तिसऱ्या मुद्याच्या बाबतीत सांगू इच्छितो की, सी.आय.डी.ची चौकशी करण्याची काही आवश्यकता नाही. त्यांनी कशा प्रकारचा भ्रष्टाचार केला आहे, या बाबतीत वस्तुस्थिती काय आहे, ही माहिती घेतल्या नंतर निश्चितपणे चौकशी केली जाईल.

श्री.रामदास कदम : आपण 33 विकासांवर गुन्हा दाखल केला. ज्या अधिकाऱ्यांनी सोसायटयांना ना हरकत प्रमाणपत्र दिले. त्या अधिकाऱ्या विरुध्द काय कारवाई करणार आहात ? 3 हजार कोटी अधिकाऱ्यांनी विकासकांच्या घशात घातले, त्या अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई करणार आहात आणि सदरची रक्कम कशा प्रकारे वसूल करणार आहात ?

श्री.सचिन अहिर : सन्माननीय सदस्य 3 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे असे सांगत आहेत. त्यांनी भ्रष्टाचाराची रक्कम सांगितल्यामुळे मला देखील तो चिंतेचा विषय झाला आहे. त्यांनी भ्रष्टाचाराचा जो आकडा सांगितला आहे, त्याची बेरीज करता येईल. परंतु आपण त्या त्या विकासकांना ओ.सी. दिलेली नाहीत. ज्या ठिकाणी अधिकाऱ्यांनी ओ.सी.दिलेली असेल त्या अधिकाऱ्यांविरुध्द निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या एका प्रश्नाला उत्तर देण्याचे राहिले. ते उत्तर मी देवू इच्छितो. सदर घटना नगरमध्ये 2010 या वर्षी घडली होती. श्रीमती संघमित्रा वाडमार, औरंगाबाद हिच्या मागण्याप्रमाणे म्हणजे फिर्यादिने मागितल्याप्रमाणे त्यांना सरकारी वकील दिलेला असून, त्यासंबंधी दिनांक 22.2.2013 रोजी ऑर्डर झालेली आहे.

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी फियादीचे नाव घेतले आहे, ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

श्री. भास्कर जाधव : सदर नाव अनावधनाने घेतले गेले आहे. ते नाव कृपया रेकॉडमधून काढून टाकावे अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : सदर नाव रेकॉर्डमधून काढून टाकण्यात येत आहे.

**---**

यानंतर श्री. भोगले....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (ऊर्जा, नियोजन व वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्यांनी ऊर्जा, नियोजन व वित्त विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सहभाग घेतला आहे. माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी काही प्रश्न मांडले आहेत. त्यांना लेखी स्वरुपात माहिती पाठविण्यात येईल. ऊर्जा, नियोजन व वित्त विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात, अशी मी विनंती करतो.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम, पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांसह अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या मागण्या क्रमांक 156 ते 158, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मागण्या क्रमांक 103 ते 105, पर्यटन विभागाची पुरवणी मागणी क्रमांक 160 यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले आहेत. त्यांच्या सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. मी सभागृहाला विनंती करतो की, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि पर्यटन विभागाच्या मागण्या मंजूर करण्यात याव्यात.

श्री.रामदास कदम : मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाबाबत कोणती प्रगती झाली आहे?

श्री.रणजित कांबळे : फेज 2 बाबत आपण उल्लेख केला आहे. इंदापूर ते झाराप या 360 कि.मी.च्या मार्गाचे काम करावयाचे आहे. मिनिस्ट्री ऑफ हायवेज यांनी नोव्हेंबर, 2011 मध्ये एनएचडीपी-4 मध्ये या कामाचा समावेश केलेला आहे. या कामाची एकूण किंमत 3600 कोटी रुपये असून व्हीजीएफ 1148 कोटी रुपये इतका मिळणार आहे. भूसंपादनाची किंमत 375 कोटी रुपये आहे. प्रस्ताव पीपीपी सेलला सादर केला आहे. हा प्रस्ताव नियोजन आयोगाला 2012 मध्ये सादर केला आहे. पीपीपी सेलकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहे. पहिल्या टप्प्याचे काम सुरु आहे. मान्यता मिळाल्यानंतर आम्ही कामाला सुरुवात करु. केंद्र सरकारकडे प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे निश्चित अशी तारीख सांगणे शक्य होणार नाही. सन्माननीय मंत्री महोदयांनी स्वत: दोन वेळा दिल्ली येथे जाऊन पाठपुरावा केला आहे. सध्याच्या स्थितीत जो काही निधी मिळत आहे त्यातून मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाला प्राधान्य देण्याचा विभागाचा प्रयत्न आहे.

मी पुन्हा एकदा सभागृहाला विनंती करतो की, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि पर्यटन विभागाच्या मागण्या मंजूर करण्यात याव्यात.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृह विभागाच्या पुरवणी मागण्यांवर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुरुवात केली. त्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. सायबर क्राईमचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. रिस्पॉन्सिबल नेटिजन हा विचार निश्चितपणे करता येण्यासारखा आहे. शासनाचा प्रयत्न निश्चितपणे आहे. त्याचाच भाग म्हणून सोशल मीडिया लॅब दोन दिवसापूर्वी सुरु करण्यात आली.

सभापती महोदय, आयपीएल बंदोबस्ताबाबत हायकोर्टात केस प्रलंबित असल्यामुळे तेथे जो निर्णय दिला जाईल त्या अनुषंगाने पुढील निर्णय घेण्यात येईल.

माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दिलीप पाटीदार यांच्याबाबत मुद्दा उपस्थित केला आहे. निश्चितपणे याबाबत सीबीआयने काही निर्देश दिलेले आहेत. यामध्ये दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या संदर्भात काही पत्रव्यवहार झालेला आहे. एटीएस, डीजी कार्यालय आणि गृह विभागाचे अभिप्राय घेऊन या संदर्भातील कारवाई निश्चितपणे करु आणि ती निश्चितपणे सांगितली जाईल.

मालेगावच्या संदर्भात विषय उपस्थित केला आहे. त्याबद्दलची माहिती मागितली आहे. जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार हे प्रकरण कसे घडले, दोषमुक्त कसे झाले हे तपासून त्या संबंधित अधिकाऱ्यावर तत्काळ कारवाई केली जाईल. अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी बरेच विषय मांडले आहेत.

नंतर 5 इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सभागृहाची वेळ पुरवणी मागण्या संपेपर्यंत वाढविण्यात आली आहे.

श्री. बंटी डी.पाटील :नवीन दोन ट्रेनिंग सेंटरला प्रशासकीय मान्यता दिली जात आहे. जळगाव, यवतमाळ या ठिकाणच्या पोलीस ट्रेनिंग सेटरला प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेत आहोत. "भटक्या युरोपियन" हा शब्द वापरण्यात आलेला आहे. त्या ऐवजी "विदेशी नागरिक" असा शब्द येण्याची आवश्यकता होती त्यामुळे या पुढे तशा प्रकारची काळजी घेतली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी ॲसीड हल्ल्याच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केलेले आहेत. ॲसीड हल्ल्यांच्या संदर्भात आता नवीन कायदा आलेला आहे. महिलांना चांगल्या प्रकारचा न्याय देण्याची भूमिका शासनाची राहणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी चांगले मुद्दे उपस्थित केलेले आहेत. आपण 19 कोटी रुपयांच्या मागणीला मान्यता दिली होती. 9 कोटी 76 लाख रुपये वित्त विभागाने मंजूर केले होते व राहिलेले 10 कोटी रुपये मागितलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पोलीस शिपायांच्या संदर्भातील महत्वाचा विषय उपस्थित केला होता. त्यांना आपण 68 रुपये दर देतो परंतु यापेक्षा जास्त दर देण्यासाठी शासन सकारात्मक निर्णय घेईल अशी ग्वाही मी या निमित्ताने देऊ इच्छितो. परवा यासभागृहात बांगला देशी नागरिकांच्या संदर्भात चर्चा झाली होती. न्यायालयामध्ये निर्णय लागल्यानंतर आतापर्यंत किती बांगलादेशींना आपण त्यांच्या मायदेशी सोडले याची जी काही आकडेवारी आहे ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयानी त्यांच्या भाषणात प्रत्येक वेळी निश्चित करण्यात येईल, निश्चित करण्यात येईल असा उल्लेख केलेला आहे. "निश्चित करण्यात येईल" याचा "अर्थ नक्की केले जाईल" असा अर्थ होतो. या ठिकाणी मी जी दोन प्रकरणे मांडली आहेत ती 8-8 वर्षाची प्रकरणे आहेत. आपण अधिकाऱ्यांना कशासाठी येथे बसवता ? या सभागृहाचे महत्व काय ? सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची माहिती मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. आपल्याला उत्तर देण्यास भरपूर वेळ आहे. अधिकाऱ्यांच्या संदर्भात या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सदनामधील सरकारचा धाक निर्माण कधी होणार आहे ? आम्ही प्रश्न मांडल्यानंतर त्याचे उत्तर 5-5, 6-6 वर्षे येत नसेल तर ते योग्य नाही, सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतरही तुम्ही कारवाई काय केली हे सांगू शकत नसाल तर ते योग्य नाही. जे अधिकारी 4-4 वर्षे आरोप पत्र दाखल करीत नाहीत अशा अधिकाऱ्यांवर कारवाई केली जात नाही, तो कोण आहे हे तुम्हाला माहिती असतांना तुम्ही काहीच माहिती देत नाही. केवळ चौकशी सुरु आहे एवढे सांगता त्यामुळे आपण अजून किती वर्षे चौकशी करणार आहात ?

या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री बोलून गेले की, तुमच्या साडेचार वर्षाच्या कारभारामुळे जनतेने आम्हाला साडेचौदा वर्षे सत्तेवर बसवलेले आहे. तुम्हाला अशा प्रकारे काम करण्यास जनतेने नेमले आहे काय ? तुम्हाला जर येथे 14 वर्षे बसवल्याचा अभिमान आहे तर काय निर्णय झाला ते सांगा ? एटीएसचा मुद्दा गंभीर आहे. हा कोण अधिकारी आहे जो सीमीला मदत करतो ? हे फार गंभीर आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मी स्पष्ट केले आहे की, सीबीआयने यामध्ये जे निर्देश दिलेले आहेत त्याचे निश्चितपणे पालन केले जाईल. यामध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही एवढे मी या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, राम प्रधान समितीच्या जवळ जवळ 90 टक्के शिफारसी अंमलात आणलेल्या असून त्यासंदर्भातील विस्तृत माहिती पटलावर ठेवली जाईल. मुंबईच्या सीसीटीव्हीचे टेंडर फायनल करण्यात आले असून पुण्याच्या सीसीटीव्हीचे टेंडर फायनल करीत आहोत व त्या दिशेने आपली कार्यवाही सुरु आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या संबंधित बाब क्रमांक 4 ते बाब क्रमांक 7, बाब क्रमांक 9 व बाब क्रमांक 11 ते बाब क्रमांक 18 अशा एकूण 13 मागण्यांची एकूण रक्कम 92 कोटी 57 लक्ष 92 हजार एवढी असून सदर पूरक मागण्यांना मंजुरी देण्याची मी सभागृहाला विनंती करतो.

--------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन व कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, परिवहन आणि कृषी विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री विक्रमजी काळे, दिवाकररजी रावते, रामदास कदम, मोहन जोशी, पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.मनिष जैन, विनायकजी राऊत यांनी विविध प्रकारच्या सूचना केल्या आहेत.

सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी वाईट हवामानामुळे कोकणातील आंबा व काजू या पिकांचे नुकसान होत आहे. सदर नुकसान टाळण्यासाठी कृषी विद्यापीठाने संशोधन करणे आवश्यक आहे अशा प्रकारची सूचना केली होती. हवामान बदलामुळे आंबा व काजू पिकाचे सातत्याने नुकसान होत आहे. याबाबत कृषी विद्यापीठामार्फत सातत्याने संशोधनाची प्रक्रिया सुरू असते. त्यासाठी कृषी मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. एवढेच नव्हे तर ॲग्रोवन व एसएमएस द्वारे मार्गदर्शन करण्याचे काम करण्यात येते.

मराठवाडा कृषी विद्यापीठाला कै.वसंतराव नाईक यांचे नाव द्यावे अशा प्रकारची मागणी सन्माननीय सदस्य श्री.विक्रमजी काळे यांनी केली आहे. तसेच इतरही सन्माननीय सदस्यांनी यापूर्वी अशा प्रकारची मागणी केली आहे. विद्यापीठाच्या कार्यकारी समितीमध्ये हा विषय घेण्यात आला होता. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी विचार मांडले होते. तेथे याबाबत बरीच मतेमतांतरे झालेली आहेत. सदर प्रस्ताव शासनस्तरावर नुकताच आलेला आहे. सदर प्रस्ताव आम्ही मंत्रीमंडळापुढे सादर करीत आहोत.

ठिबक सिंचनासाठी 90 टक्के अनुदान द्यावे अशा प्रकारची मागणी आहे. सन 2005-06 पासून सूक्ष्म सिंचन योजनेसाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून 80 टक्के आणि 20 टक्के अनुदान राज्या शासनाकडून मिळते. अत्यल्प भूधारकासाठी आपण 60 टक्के अनुदान देतो. सर्वसाधारण संवर्गातील शेतकऱ्यांसाठी 50 टक्के अनुदान देण्याचे धोरण आहे. अनेक लोकप्रतिनिधींनी 80 ते 90 टक्के अनुदान द्यावे अशा प्रकारची मागणी केली आहे. या संबंधातील प्रस्ताव सुद्धा शासन स्तरावर घेत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर...

पुणे येथे परिवहन विभागाचे नवीन कार्यालय सुरू करण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी मागणी केली आहे. पुण्यातील विद्यमान परिवहन कार्यालयामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे जनतेला अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे परिवहन कार्यालयाचे विभाजन करण्याच्या प्रस्तावाबाबत आम्ही विचार करीत आहोत. जागा उपलब्ध झाल्या बरोबर दुसरे परिवहन कार्यालय तेथे सुरू करण्याचा विचार करण्यात येईल.

एस.टी.महामंडळाच्या बसगाड्यांना टोल आकारू नये तसेच प्रवासी करामध्ये सूट देण्यात अशी मागणी करण्यात आली आहे. आंध्र प्रदेश आणि इतर राज्यांमध्ये प्रवासी कर आकारला जात नाही. आपल्या राज्यामध्ये असा विचार करता येईल काय, यासाठी प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली आपण समिती नियुक्त केली असून त्यामध्ये या दोन्ही बाबींचा विचार करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी आदिवासी बसस्थानकांचे बांधकाम झाले पाहिजे अशा प्रकारची सूचना केली होती. परिवहन विभागाला सहाय्य करण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून तरतूद करण्याची व्यवस्था आपण केली आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर...

डॉ.नरेंद्र जाधव यांच्या अहवालाच्या संदर्भात जी माहिती विचारण्यात आलेली आहे तो विषय मदत आणि पुनर्वसन विभागाशी संबंधित आहे. तेव्हा त्या विभागास आपल्याला माहिती देण्याबाबत कळविण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कापूस एकाधिकार विभागातील अधिकारी रिकामी बसले आहेत. त्यांना काही काम नाही.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो कृषी विभागाशी संबंधित नाही. तो पणन विभागाशी संबंधित आहे. माझ्याकडे पणन विभाग नाही.

सभापती महोदय, परिवहन विभागाची 198 कोटी 68 लाख 60 हजार इतक्या रकमेची मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी विनंती आहे. तसेच कृषी विभागाच्या 18 कोटी 89 लाख 76 हजार रुपयांच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी सभागृहाला विनंती आहे.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास विभाग मंत्री ) :सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या मागण्या क्रमांक 127 ते 135 चर्चेला होत्या. या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी भाग घेतला. या संदर्भात त्यांनी केलेल्या सूचना निश्चितपणे विचारात घेतल्या जातील. एकूण 311 कोटी रुपयांची लाक्षणिक मागणी आहे. त्यामुळे ती रक्कम खर्च होईल किंवा कसे हा विषय येत नाही.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितलेल्या रस्त्याच्या संदर्भात सांगू इच्छितो की, त्यांनी डी.पी.डी.सी.मधून पत्र द्यावे त्याबाबत जरुर कार्यवाही केली जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सन 2004 ते 2009 या कालावधीत चटई आणि गॅस खरेदी संदर्भातील मुद्दा उपस्थित केला. त्या संदर्भात उच्च न्यायालयात रीट पिटीशन क्रमांक 153/2012 सुरु आहे तेव्हा बाबत वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, घरकुल योजनेच्या संदर्भात सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभाग एकत्र चर्चा करुन या वर्षी 500 कोटी रुपयांची तरतूद करण्याच्यात विचारात आहे. अशी तरतूद झाल्यास आपणास चांगल्या प्रकारची घरे देता येतील . तेव्हा त्याबाबत जरुर निर्णय घेतला जाईल.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा मांडला. त्यांनी सांगितले की, शाळांमध्ये बायोमेट्रीक सिस्टीम लावली आहे परंतु त्याचा उपयोग होत नाही. काही संस्था मुद्दाहून बायोमेट्रीक यंत्र बंद करतात. ज्या ठिकाणी बायोमेट्रीक यंत्र बंद करण्यात आले असेल त्या संस्थेवर कारवाई केली जाईल. काही ठिकाणी जाणीवपूर्वक यंत्रे बंद केली जातात त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. बोगस शाळा हा विषय जिल्हापरिषदेचा आहे.

सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, महिलांसाठी स्वच्छतागृहे असावीत. आदिवासींच्या प्रत्येक शाळेमध्ये मुलींच्या संख्येप्रमाणे तशी व्यवस्था केलेली आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, आदिवासी विकास विभागाच्या सर्व मागण्या मंजूर कराव्यात.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री म्हणाले की, आज पणन विभाग चर्चेसाठी नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : माननीय राज्य मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांच्याकडे पणन विभाग नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांवर बोलताना विचारले होते की, एकूण 311 कोटी रुपयांच्या तीन मागण्या येत्या दहा दिवसांत खर्च करणार आहेत. इतकी मोठी रक्कम दहा दिवसांत खर्च होईल का, की ते पैसे अगोदर खर्च झालेले आहेत ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, त्या मागण्या येथे माहितीसाठी दिलेल्या आहेत, त्या रकमेची तरतूद झालेली आहे. आपणास अवगत करावे लागते म्हणून त्या दिलेल्या आहेत. त्या खर्च करण्याचा प्रश्न येत नाही.

----------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार व संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, सहकार विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मनीष जैन, चंद्रकांत पाटील तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडले.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी 6 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत सांगताना, मी या सभागृहात पूर्वी काही आश्वासने दिली असल्याचे सांगितले. हे खरे आहे की, राज्यातील 6 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अडचणीत आल्या होत्या. या बँकांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सहकार विभागाने प्रयत्न केला ही गोष्ट सुध्दा बरोबर आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, या बँकांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी राज्य सरकार भरीव आर्थिक मदत करेल असे आश्वासन मी कोठेही दिले नव्हते. या बँकांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी वारंवार बैठका झाल्या. आम्ही दिल्लीला सुध्दा गेलो होतो. आपण सुध्दा एक-दोन बैठकीला उपस्थित होता. माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर सुध्दा बैठक झाली. 6 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना मदत करण्याचा प्रस्ताव आम्ही मंत्रिमंडळासमोर सादर केला होता. मंत्रिमंडळाने या 6 बँकांपैकी जालना आणि धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना मदत करण्यास मान्यता दिली आहे. त्या बैठकीत असेही ठरले की, उर्वरित 4 बँकांच्या बाबतीत आर.बी.आय. ला पुन्हा विनंती करुन एक वर्षाची मुदतवाढ मागावी. या चार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमध्ये काही प्रमाणात सुधारणा होत आहे ही गोष्ट खरी आहे. त्या बँकेच्या दि.30 सप्टेंबर, 2012 आणि दि.31/12/2012 पर्यंतच्या एन.पी.ए.मध्ये बरीच सुधारणा झाली आहे. या बाबतची आकडेवारी सांगून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही.

महोदय, या चारही बँका शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. यातील 3 बँका विदर्भातील आणि 1 बँक मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यातील आहे. या निमित्ताने मी पुन्हा सांगू इच्छितो की, या चारही बँकांच्या बाबतीत आर.बी.आय. ला विनंती करुन एक वर्षाची मुदतवाढ मागण्याचा प्रयत्न करीत आहोत. या बँकांमध्ये वसुली होत आहे यामध्ये दुमत नाही. ही वसुली करीत असताना बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने वसुलीसाठी अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सी.आर.आर. बाबत सांगितले. मी सुध्दा त्या बाबतची माहिती उपलब्ध करुन घेतली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

त्या बँकेचा सी.आर.आर. प्लस करण्यासाठी जवळपास 148.98 कोटी रुपये लागतील. ही रिकव्हरी 15 दिवसांत केली तर योग्य होईल. या संदर्भात 10-12 खात्यांमध्ये विशेष लक्ष घातले पाहिजे. या रकमा वसूल झाल्या तर ही बँक सुस्थितीत आणता येईल.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मनीष जैन यांनी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील संगणक खरेदी आणि इतर मुद्यांच्या अनुषंगाने चौकशी करण्याची मागणी केली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, कलम 88 अन्वये या बाबत चौकशी सुरु झाली आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानुसार त्या प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु करण्यात येईल. या प्रकरणी काही लोकांनी मुदत मागितली होती. त्यानुसार ती मुदत दिली आहे. ही न्यायिकवत चौकशी आहे. आपण त्यावर काही ॲलिगेशन केले आहेत. या प्रकरणी लवकरात लवकर ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

महोदय, संसदीय कार्य विभागाच्या मागण्यांच्या बाबतीत सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी स्वीय सहायकांचे पगार वाढवून देण्याची मागणी केली आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, या बाबत दोन बैठका झाल्या आहेत. वित्त विभागाची वेतन भत्ते समिती आहे. त्यांच्याकडे या बाबतचा प्रस्ताव दिला आहे. काही सन्माननीय सदस्य त्या समितीचे सदस्य आहेत. माननीय वित्त मंत्र्यांना विनंती करुन लवकरात लवकर ती बैठक लावली जाईल. वास्तविक पाहता स्वीय सहायकांचे पगार वाढवून मिळावेत ही सर्वांचीच मागणी आहे. या बाबत योग्य तो मार्ग काढला जाईल.

सभापती महोदय, माझ्या विभागाच्या बाब क्रमांक 115, 137, 138 आणि 140 या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडून येणी बाकी आहेत. ती येणी ताबडतोब मिळाली तर त्या बँकेवरील आर्थिक भार कमी होईल. ही येणी एप्रिल महिना उजाडण्यापूर्वी दिला तर बरे होईल.

..3..



SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित... 20:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

श्री.हर्षवर्धन पाटील : महोदय, वैद्यनाथन समितीच्या पॅकेजमधील बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला 12.7 कोटी रुपये केंद्र सरकारकडून येणे बाकी आहेत. हे कराचे पैसे आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब तपासून बघितली जाईल.

महोदय,य सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कापूस खरेदीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांनी सांगितले की, पणन महामंडळावर आय.ए.एस.दर्जाचा अधिकारी नियुक्त केला आहे. माननीय पणन मंत्री आज उपस्थित नसले तरी, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी मागणी केली आहे त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील.

महोदय, मी पुन्हा एकदा विनंती करतो की, माझ्या विभागाच्या बाब क्रमांक 115, 137, 138 आणि 140 या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकरराव चव्हाण ( पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्री ) : सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांच्या पूरक मागण्यांवर चर्चा करीत असताना ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी एक मुद्दा उपस्थित केला की, मराठवाड्यामध्ये एकात्मिक दूग्धवाढीच्या दृष्टीकोनातून 8 जिल्ह्यांमध्ये आपण मंजुरी दिलेली आहे. त्यापैकी पाच संस्थांनी चांगले काम केले. आपण सांगितल्याप्रमाणे मी माहिती घेतली. कोलेश्वर, ता. अंबड, जालना आणि यशवंत हे तीन प्रकल्प अर्धवट पडलेले आहेत. निश्चितपणे त्याची चौकशी करुन ते प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी अत्याधुनिक पध्दतीने मासेमारी करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. त्या संदर्भात आताच आमच्या माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना सुध्दा उत्तरे मिळालेली आहेत. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो की, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या बाब क्रमांक 39 ते 47 आणि बाब क्रमांक 49 व 50 मध्ये नमूद केलेल्या पूरक मागण्या मंजूर कराव्यात.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : सन 2012-2013 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या मंगळवार, दिनांक 19 मार्च, 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत सकाळी 10.00 ते 11.00 या वेळेत महिलांवरील अत्याचार या विषयावर महाराष्ट्र विधान परिषद नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल. तसेच आजच्या विशेष बैठकीत दाखविलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव नियमित बैठकीत घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.15 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 22 मिनिटांनी, मंगळवार दिनांक
19 मार्च, 2013 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही